२४७० ✓ म. ग्रं. सं. ठाणें

विषय

२१६

लेखक ना. के. गोगटे

हालय क्रमांक

८७

पुस्तकाचें नांव लघुदर्पण

VADHÛ DARPAṆA,

OR

"THE BRIDE'S MIRROR."

ADAPTED INTO MARATHI

BY

BHÁNU KESHEW GÁNG-NÁIK.

FROM THE ORIGINAL URDU

OF

KHAN BAHADUR MAULVI NAZIR AHMED,

Late Deputy Collector and Settlement Officer, Gorakhpur,

AND

At Present Sadar Talukdar Pattancheri,

DECCAN HYDRABAD.

Printed and Published

At the INDIAN PRINTING PRESS.

Registered under Act XXV of 1867,

And all Rights Reserved.

1882.

Price Rs. 1-8-0

वधूदर्पण.

ह्या पुस्तक

भानु केशव गांग नाईक.

यांणीं

या.

खानबहादूर मोलवी नझीर अहमद

माजी डेपुटी कलेक्टर व सेटलमेन्ट आफिसर गोरखपूर

आणि

हल्लीं दक्षिण हैदराबाद प्रांतांत पाटणचेरी येथील

सदर तालुकदार

यांच्या

मूळ उर्दू ग्रंथाधारें केलें.

तें

मुंबईंत

"इंडियन प्रिन्टिंग" छापखान्यांत छापिलें.

सन १८८२.

(सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर करून या पुस्तका-संबंधी सर्व प्रकारचे हक्क भाषांतर कर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत.)

किंमत दीड रुपया.

To

CAPTAIN A. W. PROUDFOOT,

H. M. 9th, Regiment, B. N. I.

AND

ADJUTANT,

Bombay Volunteer Corps,

&c., &c., &c.,

This little Volume,

IS,

BY PERMISSION,

MOST RESPECTFULLY DEDICATED,

IN TOKEN OF GRATEFUL REGARD FOR THE DEEP INTEREST HE HAS EVINCED IN THE PROGRESS AND WELFARE OF THE NATIVE COMMUNITY.

BY

THE AUTHOR.

क्याप्टन् ए. डब्ल्यू. प्राउड्फुट्,

मुंबईच्या १ ल्या काळ्या पायदळ

पलटणीचे क्याप्टन् आणि युरो-

पियन् व्हालंटिअर पलटणीचे

आड्ज्युटन्ट इ० इ०

यांस,

त्यांची एतद्देशीय लोकांच्या कल्याणार्थ व सुख-

वृद्ध्यर्थ सतत तत्परता आणि उद्योग,

यांच्या निदर्शनार्थ त्यांच्या पर-

वानगीनें हा लहानसा ग्रंथ,

कर्त्यानें

मोठ्या आदरानें अर्पण केला असे..

प्रस्तावना.

माझी रेव्हरेन्ड डाक्तर विलसन्‌चे विद्यालयांत असतां थोडेसें फॉरसी भाषेचें ज्ञान संपादन करून त्या विद्यालयांतून निघाल्यावर मी उर्दू व हिंदी भाषेंतील ग्रंथ वाचूं लागलों तेव्हां आपल्या मराठी भाषेमध्यें स्त्रीशिक्षणसंबंधी विषयांवर पुस्तकें लिहिण्याकडे विद्वज्जनांचें जसें लक्ष लागावें तसें अद्याप मुळींच लागत नाहीं असें पाहून या विषयावर एकादा ग्रंथ लिहावा असें मनांत आलें परंतु तो लिहिण्यापूर्वी फॉरसी, उर्दू किंवा हिंदी या भाषांत स्त्री शिक्षणावर कांहीं ग्रंथ प्रसिद्ध असल्यास ते वाचावे अशी साहजीकच जिज्ञासा मनांत उत्पन्न झाली आणि तशा ग्रंथांच्या शोधांत होतों. शेवटीं माझे सन्मान्य मित्र कैलासवासी बाबा किसनदास[2] उदासी निरंजनी, नानक पंथाचे गुरु यांणीं या विषयावर उत्तर हिंदुस्थानांत प्रसिद्ध झालेल्या कित्येक ग्रंथांचीं नांवें मला सांगितलीं व त्यांपैकीं बहुतेक ग्रंथ माझे वाचण्यांत आले. त्यावरून मला असें दिसून आलें कीं या आपल्या मुंबई इलाख्यापेक्षां तिकडील ग्रंथकारांस विद्याविषयक ग्रंथ लिहिण्याचे कामीं जास्त उत्तेजन मिळतें यामुळें त्या प्रांतीं दरवर्षीं फॉरसी, उर्दू व हिंदी या भाषांतून उपयुक्त विषयांवर नवनवे बरेच ग्रंथ प्रसिद्ध होत असतात.

---

१ फ्रीजनरल असेंब्लिज् इन्स्टिट्युशन.

२ यास ता० ५ आक्टोबर १८८१ रोजीं देवाज्ञा झाली त्या वेळीं हें पुस्तक छापण्याचें काम अर्ध्यावर आलें होतें व तें पाहून त्यास बहून संतोष होत असे; परंतु त्याची समाप्ति पहाण्यास ते राहिले नाहींत म्हणून मी फार दुःखी आहें.

या प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांपैकीं स्त्रीशिक्षण विषयावर "मिरातुल अरूस" ह्मणजे वधूदर्पण या नांवाचें पुस्तक खानबहादुर मौलवी नझीर अहमद या लोकमान्य व विद्वान ग्रंथकर्त्यानें लिहिलें आहे तें सरकारानें पसंत करून त्याजबद्दल त्यांस १००० एक हजार रुपये बक्षिस दिले! शिवाय या पुस्तकाच्या २००० दोन हजार प्रती सरकारानें विकत घेतल्या !! नंतर कांहीं वर्षांनीं याच पुस्तकाचा दुसरा भाग "बनातून्नाआष" व तिसरा भाग "तोतातून्ननसूह" या नांवानें प्रसिद्ध केले, त्यांलाही सरकारनें पहिल्याप्रमाणेंच आश्रय देऊन अनुक्रमें ५०० पांचशें व १००० एक हजार रुपये बक्षिस दिले !!! हीं व अशींच दुसरीं पुष्कळ उपयुक्त पुस्तकें यांणीं रचलीं त्यावरून यांची अधिकच वाहवा झाली व पूर्वी यांणीं पिनलकोडाचें भाषांतर करण्यामध्यें सरकारची मर्जी संपादन केली होतीच त्यामुळें तर यांची कीर्ति वाढून सरकारांतून यांच्या मोठमोठाल्या जागेवर नेमणुका होत गेल्या. हे गृहस्थ बरींच वर्षें गोरखपूर येथें डेपुटी कलेक्टर व सेटलमेन्ट आफिसर होते व हल्लीं दक्षिण हैदराबाद प्रांतांत पाटनचेरी येथें उत्तर भागचे सदर तालुकदार आहेत.

"मिरातुल अरूस" हें पुस्तक इतकें लोकप्रिय झालें कीं तें छापून प्रसिद्ध झाल्यावर दोन सवादोन वर्षांचे आंतच याच्या किमानपक्ष १०,००० दहा हजार प्रती खपून गेल्या तरी जिकडून तिकडून लोकांच्या धुम मागण्या येतच होत्या. या पुस्तकाचें भाषांतर गुजराथी, बंगाली, हिंदी, व्रज इत्यादि भाषांत झालेलें असून कित्येकांच्या

---

१ पंडित.

दोनदोन तीनतीन आवृत्त्याही झाल्या आहेत ह्यावरून या पुस्तकाची योग्यता किती आहे हें सहज लक्षांत येईल. तेव्हां स्वतंत्र ग्रंथ लिहिण्यापेक्षां याच पुस्तकाचें भाषांतर आपल्या महाराष्ट्रीय लोकांच्या चालीस अनुसरून करावें असें मला वाटलें. अजूनपर्यंत या पुस्तकाचें मराठी भाषांतर करण्याकडेस विद्वज्जनांचें लक्ष कां गेलें नाहीं याचें कारण कदाचित् ती भाषा आपल्या लोकांस फारशी अवगत नाहीं हें एक असावें. जर करतां त्यांणीं केलें असतें तर खचित तें लोकमान्य झालें असतें यांत संशय नाहीं. तूर्त मी "वधूदर्पण" या नांवानें या पुस्तकाचें यथामति भाषांतर करून विद्वज्जनांपुढें ठेवीत आहें त्यांतील सारांश हाच कीं नूतनच लग्न झालेल्या मुलींस सासरीं गेल्यावर तेथें कोण कोणतीं दुःखें व संकटें भोगावीं लागतात आणि त्यांतून पार उतरून जाण्यास त्यांस काय काय तजविजी योजाव्या लागतात त्यांचें हुबेहुब चित्र दाखविलें आहे. त्याचप्रमाणें चांगल्या किंवा वाईट स्वभावाच्या स्त्रियांच्या वर्तणुकेवरून स्वताला होणारें सुख किंवा दुःख आणि स्त्री जातीला शिक्षण दिल्यापासून होणारे अवर्णनीय फायदे व त्या योगें गरीब स्थितींतून सधन स्थिति प्राप्त करून घेतल्याचें आश्चर्यकारक वर्णन मोज्या चित्तवेधक व सदुपदेशपर दृष्टांताचे रूपानें जींत दिलें आहे अशी एक संभवनीय गोष्ट ह्यांत लिहिली आहे. दुसरी एक विशेष गोष्ट सांगावयाची ती ही कीं या पुस्तकांत वर्णिलेली गोष्ट अगदीं १०।१२ वर्षांतली आहे असें तिला स्वरूप दिलें असल्यामुळें वाचकांस ती गोष्ट खरी आहे असें वाटेल परंतु वास्तविक पहातां ही गोष्ट घडलेली नसून काल्पनिक आहे आणि

आमच्या वधूंची भावी स्थिति कशी असावी तिचें या गोष्टींत दिग्दर्शन केलें आहे.

मूळ पुस्तकांत दिल्लींतील रहाणाऱ्या एका मुसलमानी कुटुंबाचें चरित्र असल्यामुळें मुसलमान लोकांच्या रितिभाती, सण इत्यादिकांचें वर्णन केलें आहे व सर्व भाषांतर कर्त्यांनींही आपापल्या भाषेंत शब्दशः भाषांतर केल्यामुळें ह्या त्या भाषा बोलणाऱ्या स्त्रियांस तें समजण्यास बरेंच कठीण जात असेल. मी जें भाषांतर केलें आहे तें तसें नसून मूळ ग्रंथाचा भावार्थ कोठेंही न सोडतां पुणें येथील एका हिंदु (मराठे ज्ञातीच्या) कुटुंबाचें चरित्र लिहून आपल्या महाराष्ट्रीय लोकांच्या चालीस अनुसरून करण्याचा प्रयत्न केला आहे.

हल्लीं, विशेषेंकरून या मुंबईंत व साधारणतः मोठमोठ्या शहरांत, मुलींस शिक्षणाचा चटका लागलेला आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय; परंतु अशा मुलींस सुबोध व नीतिमार्गप्रवर्तक असे ग्रंथ वाचावयास न मिळतां मनाचा कल कुमार्गाकडे वळेल अशा गोष्टी ज्यांमध्यें असतात तीं वाचावयास मिळाल्यानें फार लहान वयांत त्यांचीं मनें बिघडण्याची भीति असते, ती, त्यांचे घरसंसारसंबंधाची एक सुबोध गोष्ट लिहून त्यांचे हातीं दिली तर अंशतः तरी कमी होईल; एवढाच विचार मनांत आणून हें पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याचा यत्न केला आहे. या पुस्तकाची प्रत्येक कुटुंबामध्यें अत्यंत जरूरी आहे. मग त्या कुटुंबांत स्त्रियांस वाचतां येवो अगर न येवो. ज्या ज्या स्त्रिया हें पुस्तक वाचतील किंवा वाचतांना ऐकतील त्यांचें मनोरंजन होईल इतकेंच नव्हे; तर त्यापासून त्यांस बुद्धि, ज्ञान,

चातुर्य, सारासारविचार, दूरदर्शीपणा, घरसंसार चालविण्याची हातोटी, कुटुंबांत एकोपा कसा करावा इत्यादि गुणांचें ज्ञान झाल्यावांचून रहाणार नाहीं. हें पुस्तक किती योग्यतेचें व कुटुंबामध्यें किती उपयोगीं पडणारें आहे, हें येथें सांगूं लागलें असतां ही प्रस्तावना फारच विस्तृत होईल. यास्तव या मूळ पुस्तकाबद्दल वाय्व्यप्रांताचे डायरेक्टर आफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन् मि. एम्. केंपसन् साहेब व त्याच प्रांताचे लेफ्टनंन्ट गव्हरनर नामदार सर उईलियम् म्यूर साहेब बहादूर के. सी. एस्. आय. यांजमध्यें झालेला पत्रव्यवहार इंग्रजी मध्येंच पुढें दिला आहे त्यावरून या लेखाची सत्यता व ग्रंथाची योग्यता सहज कळून येईल.

आजपर्यंत विषयपर लेखन मी कधींच केलें नाहीं. तशांत माझा जन्म *लष्करांत झाला असून सर्व बाल्यावस्था तेथेंच गेली ह्मणून मराठी शुद्ध भाषेच्या अनाभ्यासामुळें व भाषांतर करण्याचे कामीं कोणाचेंही सहाय न घेतां हा ग्रंथ यथामति मराठी भाषेंत म्या उतरला आहे त्यापेक्षां ह्यांत कित्येक ठिकाणीं वाक्यांची रचना व्याकरणाच्या नियमाविरुद्ध झाली असेल, कित्येक ठिकाणीं शब्दांविषयीं आणि अर्थाविषयीं दोष राहिले असतील आणि कित्येक ठिकाणीं संदर्भाचा गोंधळ झाला असेल याविषयीं शंका नकोच. तसेंच हें पुस्तक कांहीं विशेष कारणामुळें फारच घाई करून काढावें लागलें यामुळें चांगल्या प्रकारें तपासून शुद्ध करून घेतां आलें नाहीं. तरी पुनरावृत्ति काढण्याचा योग आल्यास वरील सर्व दोष दूर करण्यांत येतील. तरी माझी ही ओना-

* मुंबई खात्याची ९ वी काळी पायदळ पलटण.

क्याची पहिली पुस्ती समजून विद्वज्जन वरील व इतर सर्व दोषांची क्षमा करून हा माझा यत्न अंशतः तरी सिद्धीस गेला आहे असें मानतील तर माझ्या श्रमाचें सार्थक झालें असें मी समजेन. ही इच्छा जगन्नियंता परमेश्वर सफल करो.

शेवटीं खानबहादूर मौलवी नझीर अहमद व त्यांचे चिरंजीव बशिरउद्दीन यांणीं उदार बुद्धीनें आपल्या या पुस्तकाचें आणि तसेंच दुसऱ्या भागांचेही भाषांतर करण्याची परवानगी दिली यावद्दल त्यांचा मी फार आभारी आहें. आणि माझे मित्र रेव्हरेन्ड बाबा पदमनजी यांणीं कांहीं हस्तलिखित प्रत वाचून त्यांतलि कित्येक दोषस्थलें दर्शविल्याबद्दल व तसेंच माझे परम स्नेही रा. रा. गंगाधर बाळकृष्ण गद्रे यांणीं हें पुस्तक छापत असतां तें तपासून पहाण्याचे कामीं जो आपला अमोल्य वेळ खर्च केला त्याबद्दल व त्याचप्रमाणें माझ्या दुसऱ्या कित्येक मित्रांनीं हें पुस्तक लिहून काढण्याचे कामीं व दुसरें अन्य प्रकारें सहाय्य केलें ह्याबद्दल मी त्या सर्वांचा फार फार आभारी आहें.

भाषांतरकर्ता.

मुक्काम मुंबई,
ता. १ ली ज्यानुआरी १८८२

मूळ ग्रंथकाराची प्रस्तावना.

या देशांत स्त्रियांस लिहिण्या वाचण्यास शिकविण्याचा जरी फारसा संप्रदाय नाहीं तरी मोठमोठाल्या शहरांतून बहुतकरून मोठया घरच्या आणि उंच कुळांतील स्त्रिया कुरानावर केलेली टीका आणि त्याचप्रमाणें धर्मसंबंधी वेंचे व त्यांवर उर्दू भाषेंत रचलेल्या नीतिपर गोष्टी किंवा दृटांत वाचीत असतात किंवा निदान त्यांजकडून वाचविले जातात. मीही दिल्लीमधल्या अशाच एका कुळांतील आहें म्हणून ईश्वराचा मी आभारी आहें. घरच्या सांप्रदायास अनुसरून माझ्या मुली घरांतील वडील स्त्रियांकडून "कुरानें शरीफ" व त्याजवरील टीका व भाषांतर, शिवाय "राहेनिजात" इत्यादि पुस्तकें व उर्दू मधील दुसऱ्या लहान सहान गोष्टींचीं पुस्तकें वाचावयास शिकल्या. घरांत तर रात्रंदिवस लिहिण्या वाचण्यावर चर्चा चालावयाची आणि माझे पहाण्यांत येत असे कीं आह्मां पुरुषांचें पाहून मुलींना देखील विद्या शिकण्याची एका प्रकारची हौस वाटे. तेव्हां माझे मनांत हा विचार येत असे कीं, नुस्ता धर्मसंबंधाचाच अभ्यास मुलांचे कोमल स्थितीस अनुसरून योग्य नाहीं. केवळ ह्याच गोष्टी त्यांचे समोर येऊन जाऊन असतात यामुळें त्यांचे मनास उल्हास न वाटतां त्यांची बुद्धि मंद होते ह्मणून मजला असें वाटलें कीं एकाद्या मनोवेधक व नीतिबोधक अशा व ज्यांत स्त्रियांच्या स्वतांचे अनुभवास पुढें संसारांत येत असतात अशा गोष्टींचा समावेश केलेला आहे अशा पुस्तकाचा शोध करावा. स्त्रिया जात्या अप्रबुद्ध व हेंकट स्वभावाच्या असल्यामुळें त्या सर्वदां दुःखसागरांत पडलेल्या रहातात ह्मणून त्यांचे विचारांस प्रबोधक व त्यांचे संवर्यांस उत्तेजक करणारें असें एखादें पुस्तक मिळावें, याकरितां सर्व पुस्तकालयें चाळून पाहिलीं पण अशा पुस्तकाचा ठावठिकाण मिळाला नाहीं तो नाहींच. तेव्हां मी या पुस्तकांतील गोष्टींचा विचार बांधला. तीन वर्षां पूर्वी जेव्हां मी झांशींत होतों तेव्हां तेथें मी अंक-

१ हा दोन नावें भाषांतर करते वेळीं अनुक्रमें १ ताराबाई व २ हिराबाई अशीं बदललीं आहेत.

बरी चा वृत्तांत लिहिला. मुलींना तर हा जणोकाय मेवाच मिळाला. त्यामुळें दररोज हें पुस्तक पुरें करण्याचा पाठीशीं तगादा इतका लागला कीं दीड वर्षाचे आंतच मला अंसगरी चा वृत्तांतही लिहिणें भाग पडलें. होतां होतां या पुस्तकाची चर्चा सर्व पेठेंत झाली. आणि कित्येक स्त्रिया तर तें ऐकण्या-करितां नेहमी घरीं येऊं लागल्या व ज्याणीं तें ऐकलें त्या फार आनंद पावल्या. मोठमोठया घराण्यांतून या पुस्तकास मागण्या येऊं लागल्या व कित्येकांनीं तर तें उतरून घेण्याचा बेत केला! या सुमारास माझे मोठे मुलीचें लग्न झालें तेव्हां हिरजडित दागिन्यांचे ऐवजीं मी तीस हें पुस्तक आंदण दिलें. तिचे सासरीं देखील या पुस्तकाची मोठी चाहा झाली. जेव्हां मी अर्से पाहिलें कीं, हें पुस्तक स्त्रियांस फारच हितकारक आहे आणि त्या हें मोठया आवडीनें वाचतात व ऐकतात तेव्हां हें मी वायव्य प्रांतांतिल शाळाखात्याचे डायरेक्टराचे मार्फतीनें सरकारांत पाठविलें. सरकारचे कृपादृष्टीनें तर माझा इतका मान झाला व या पुस्तकाचें इतकें महत्व वाढलें कीं त्याचें वर्णनही माझ्यानें करवत नाहीं. मी तर मनापासून सागतों कीं मी आपला मान व मेहनतीचा योग्य मोबदला मिळवून चुकलों.

हें पुस्तक लिहिण्यामध्यें जो बराच वेळ लागला त्याचे शिवाय आणखी कित्येक दिवस पर्यंत हें पुस्तक लोकांपुढें आणतां आलें नाहीं त्याचें कारण इतकेंच कीं हें पुस्तक अगदीं नव्या चालीचें असल्यामुळें यांतील भाषा वैचित्र्य, असंभाव्य गोष्टी किंवा अतिशयोक्ति इत्यादि दोष जितके कमी करवतील तितके कमी करण्याकडेस बहुत वेळ गेला. तरी देखील अद्याप यांत म्हणजे कोणतेही प्रकारचा दोष राहिला नाहीं असें माझ्यानें म्हणवत नाहीं. माझा हा पुस्तक लिहिण्याचा पहिलाच यत्न आहे म्हणून विद्वज्जन हंसक्षीर न्यायानें यांतील गुण तेवढेच ग्रहण करतील अशी आशा बाळगितों.

(सही) **नझीर अहमद.**

Correspondence Regarding the Original Work Between the Director of Public Instruction and the Secretary to the Government, North-Western Provinces.

Docket No. 925, dated Naini Tal, the 22nd July, 1869.

From—M. KEMPSON, ESQ., M.A.

Director of Public Instruction,

North-Western Provinces.

To—R. SIMSON, ESQ.,

Secretary to the Government,

North-Western Provences.

I HAVE received the following MSS. with much satisfaction, as the work of an able Government servant and a sound scholar. He was one of three native gentlemen selected by the late Sir G. Edmonstone to prepare an Urdu version of the Penal Code some years ago, and received a khilat for his services, and has since held important appointments in the Revenue Department. The work which I have placed at the head of the list is the most interesting and specially adapted of its kind which has appeared, and I regard it as to style and diction as a good model of vernacular composition. In this respect it ranks with the recently published correspondence of the late Mirza Nousha (Ghalib) of Delhi, and certainly rivals the Urdu version of the Alf Laila, and of the Bostan Khial, by Badr-ud-din Khan, also of Delhi, though the two

latter are of course greatly more meritorious in the way of sustained effort and literary industry. The production under notice is a readable every-day book, intelligible to common folk, and pure and practical in tone. There is no pandering to the passions or appeal to the marvellous, which appear to be the ordinary passports to popularity among Oriental writers; and I hope the author may find many imitators.

The five remaining books are simply school-books, but each is meritorious in its way, and shows the author to be a man who desires to place his experience and scholarship at the service of the community. He must have little leisure for literary labours, but what he has, he has undoubtedly well employed. Looking to the spirit as well as to the excellent quality of his performances, I recommend the full reward of Rs. 1,000; I have no doubt he will be willing to place his MSS. at the disposal of Government for edition, correction where necessary, and publication.

(THE BRIDE'S MIRROR.)

Mirat-ul-Arús. Urdu MS., 264 pages, prose.

This work has been composed expressly for the benefit of females. It is a tale of domestic life in a respectable Muhammadan family. Two sisters of entirely different character marry into the same family; and the father-in-law's household thus supplies the chief matter for incident. The elder bride, Akbari, is described as badly brought up and spoiled, and exceedingly ill-tempered and quarrel-

some. She is engaged in perpetual strife with the women of her husband's family, and becomes feared and detested. At last in a fit of anger, she leaves the house and returns to her mother. The females of both families consult over the emergency, and she is persuaded to return to her husband on condition of his finding a separate home for her away from his father's family. Her after behaviour, folly, and general ignorance of domestic management, which lead her into various troubles, are then depicted at some length.

Not long after these events, the younger sister, Asgari, marries into the family. She is a charming picture of woman as she might be, and perhaps often is, in the veiled recesses of the home circles of our fellow subjects. Bred in seclusion, her father's favourite, sweet-tempered, well-taught, and fully accomplished in all matters of household comfort and economy, she comes to her husband's house as a messenger of good. Distrusted at first, as probably a second Akbari, she soon wins the love and confidence of all. She learns the ways of her new home, and takes an active share in the management of the household. By-and-by she detects the untrustiness of the family housekeeper, who, relying on her supremacy in domestic matters and long service, has enriched herself by a secret understanding with the banias and banker, and has brought the family to the verge of ruin and disgrace. Finding an enemy in the new bride, she intrigues to destroy her reputation, and sows evil suspicions in the minds of the husband and mother-in-law. Happily the right prevails. The father of

the family arrives on leave, and the housekeeper's misdeeds are exposed, and she is dismissed. Henceforward all goes well. The family affairs prosper under the young wife's care, and she becomes known throughout the town for her virtues and wisdom. Not the least interesting part of this description is a long letter (pp. 68-82) which the bride receives from her father, a tahsíldar, soon after her marriage. He gives her useful advice as to her conduct in her husband's home, and points out how the many trials and difficulties which the marriage system of the country involves may be best avoided.

After a while Asgari's husband, Muhammad Kamil, who is described as a student, enters Government service, and has to leave Delhi, the scene of the story. In his absence, his wife tries her hand at education. She collects girls from the neighbouring zenanas, and teaches them to read and write, &c., and the arrangements she makes, and the happiness she produces, are fully and profitably described. Her young sister-in-law, Mahmudah, who has been her close friend through all the family troubles, helps her in the school, and by-and-by they make acquaintance with the ladies of a high-born family, resident in the same quarter, into which, by Asgari's management, Mahmudah eventually marries, to the great honour and happiness of her family and friends.

The end of the tale is sad. Asgari's virtues and nobleness are vividly mirrored in the narrative, and it is a disappointment to find that her children, one after the other, die in their infancy, and that she is plunged in distress. The story concludes with a

letter from her father, who attempts to comfort her with reflections on the nature of life and death, and the uselessness of grief. This is well-conceived and expressed in a certain sense, but one closes the book with a feeling of pity for the poor mother, that the highest consolation her creed can afford her is a string of cold philosophical considerations.

The whole of this tale is told in the words of every-day life in good society, the true Urdu of the country, and not the high-flown dialect of pedants and poets. The incidents are natural, such as are well known in every father-in-law's household. The ways of the zenana are as it were exposed, and for the first time a European reader is allowed some insight into the domestic realities of every-day life among the women of the country. Their language, their likes and dislikes, their fondness for their children, their importance in the family circle, their gross ignorance, their spitefulness and petty intriguing, all receive illustration, and the picture bears no signs whatever of exaggeration. The writer evidently paints from life, and leaves the tale to teach its own moral. He is a scholar of acknowledged ability, but there is no attempt at display, and the reflections he throws in from time to time are those of an earnest and right-minded man. The mothers-in-law, the aunts, and others of the family, move before the reader as persons in a drama, and conversation and dialogue, for the first time so far as I know, are designedly used by a native author to pourtray character, instead of the usual verbose description and accumulation of epithet. The book will be read with interest by hundreds as soon as it

becomes known, and cannot but do good to the cause of female education. I shall be able to suggest to the author one or two omissions, and a few emendations.

No. 1236 A., dated Naini Tal, the 20th August, 1869.

From—R. SIMSON, ESQ.,

Secretary to the Government,

North-Western Provinces.

To—M. KEMPSON, ESQ., M. A.,

Director of Public Instruction,

North-Western Provinces.

SIR,—I am directed to acknowledge the receipt of your Docket No. 925, dated the 22nd ultimo, submitting six Urdu books written by Mahomed Nazir Ahmud, Settlement Deputy Collector of Jalaun, with a memorandum containing your opinion on the same.

2. In reply, I am desired to state that the Lieutenant-Governor has perused the Mirat-ul-Arús, or "*the Bride's Mirror*," with the highest satisfaction.

3. The work possesses merit hitherto (so far as His Honour is aware, unknown in Urdu literature; and it well deserves the high encomium you have passed upon it. It is true that as a tale there are obvious imperfections in it, judged from a European point of view. The plan has not been laid out, as a whole, with much artistic design; some of the letters, though conveying valuable advice, are hardly appropriate to the occasion; and marks of haste appear

in many parts. But the sketches are those of real life, the language is simple and artless, and the inner history of an Indian home is pourtrayed true to nature. The characters are preserved each in its own individuality; nor are there wanting touches of genuine feeling and tenderness. In addition to its charming simplicity the work is full of excellent admonition, and every incident is calculated to convey a moral or social lesson. It also brings to light the vast influence exercised by the woman of India, and the manner in which that influence may be crowned with the highest results when education is added to intelligence and virtue. It can hardly be conceived that any native gentleman will rise from its perusal without a strong persuasion of the inestimable benefits to be derived from female education.

4. The book, moreover, possesses the singular virtue of being admirably adapted for the perusal of the females of India. It cannot fail to interest their imagination as well as instruct their minds. And no native gentleman need fear to put it into the hands of his family, but with the certainty that they will be profited as well as entertained thereby. There is not a sentiment expressed throughout the work that is not pure and moral; or a maxim or principle inculcated which (at any rate from a Moslem's point of views) is not innocent and virtuous.

5. While it is thoroughly Mahometan in its tone and spirit, the work is at the same time as thoroughly loyal in its sentiments towards the English Government. The episode in which the domestic life of our Queen, and the approaching

visit of Her Majesty's son are alluded to, shows that some at least of the advantages of English life and European habits can be fully appreciated by the author.

6. The great merit of Mahomed Nazir Ahmud consists in his having broken fresh ground in the right direction, and held out the example of useful and attractive composition in simple and natural style; an example which the Lieutenant-Governor feels assured will soon meet with any followers. In particular, His Honour trusts that what has now been so successfully written of Mahometan domestic life, may be similarly attempted in respect of other circles; and that a picture equally fresh and true may be given us of the Hindoo family and its interior life.

7. The Lieutenant-Governor has peculiar gratification in awarding to Mohamed Nazir Ahmud the full prize of one thousand rupees; and His Honour will add from himself, as a personal appreciation of his authorship, a time-piece bearing an appropriate inscription. His Honour hopes to be able to present these to Mahomed Nazir Ahmud in public, at some place convenient for that officer, perhaps at Etáwah, when the Lieutenant-Governor's Camp passes through the station.

8. An edition of 2,000 copies, lithographed in the best style, may be at once ordered for the use of Government. Mahomed Nazir Ahmud may also take any steps he deems proper for securing the copyright, and for the publication of the work on his own account. It will certainly become a popular book, notwithstanding that the plainness and simp-

licity of the style may at first render it bald and strange to Oriental readers. Nazir Ahmud will, no doubt, be thankful to receive and act upon your suggestions for the correction of some of the defects which you have pointed out.

9. The Lieutenant-Governor thinks that the work may profitably be recommended to the Board of Examiners as a suitable text-book of examination Incomparably superior in its contents to the vapid and often objectionable tales of common Oriental writing, it will not only benefit the student by making him familiar with the spoken language in a pure and elegant yet familior form, but will impart much information in respect of everyday life and habits, which cannot fail of being useful to those whose duties bring them into contact with the people.

10. The other works of Mahomed Nazir Ahmud, though not possessing the merit of originality, will no doubt prove useful in the Schools and Colleges of these Provinces, and your proposals regarding them meet with the full concurrence and sanction of Government.

11. Your memorandum and this letter will be printed in the Supplement to the *Government Gazette*, and in the Selections from the Records of Government, A translation of them will also printed in the Supplement to the *Oodroo Gazette.*

12, The books are herewith returned.

वधूवर परीक्षा.

उपोद्घात.

जो मनुष्य या संसाराचे स्थितीविषयीं मनांत कधींही विचार आणीत नाहीं त्यासारखा निःकाळजी मनुष्य दुसरा सांपडणें कठीण. या संसारांत विचार करण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत, परंतु त्या सर्वांत अतिउत्तम व अगत्याची गोष्ट झटली झणजे मनुष्याची स्थिति होय. मनुष्य जन्मतो तेव्हां पासून तों त्याचे अंतकाळ पर्यंत कोणकोणत्या गोष्टी त्याच्या पुढें येतात व तदनुरूप त्याच्या स्थितींत फेरफार कां होतो या गोष्टीचा प्रथम विचार करणें अवश्य होय. मनुष्याच्या सर्व आयुष्यांत उत्तम काल झटला झणजे बालपण होय. या वयांत मनुष्यास कोणतेही प्रकारची धास्ती किंवा काळजी नसते, आईबाप त्या वेळीं अत्यंत लडिवाळपणानें व आस्थापूर्वक त्यांचें पालनपोषण करितात, तें येथपर्यंत कीं त्यांस सुख व समाधान देऊन पालन करीत असतां कितीही संकटें आलीं तरीं त्यांस तीं जुमानीत नाहींत. आपल्या मुलांनीं चांगलें चांगलें ल्यावें, ल्यावें यांतच आईबापांस एकाप्रकारचा आनंद वाटत असतो. सारांश त्यांस सुख व समाधान व्हावें झणून आपण अनेक विपत्ति व क्लेश भोगण्यास तीं तयार असतात. ज्या पुरुषांस बापाच्यें नातें येतें त्यांपैकीं कोणी मोलमजुरी, कोणी व्यापारउदीम, कोणी चाकरीधंदा, कोणी कांहीं कोणी कांहीं करून आपल्या मुलांस सुख मिळावें झणून ज्यास

जो मिळेल तो धंदा करून पैसा संपादन करितात. आणि ज्या स्त्रियांस मातृत्व प्राप्त होतें त्या नवऱ्याची कमाई घर-खर्चास पुरेनाशी झाली म्हणजे आपल्या शक्त्यनुसार मेहनत करण्यास मागेंपुढें पाहत नाहींत. कोणी शिवणकाम करितात, कोणी दायीपणा करितात, कोणी टोप्या विणतात, आणि कित्येक तर अत्यंत गरीबीमुळें दळणकांडण, स्वयंपाक वगैरे श्रमाचीं कामें करून आपल्या मुलांबाळांचा गुजारा करितात.

आपल्या मुलांविषयीं आईबापांचेठायीं जी प्रीति असते ती केवळ दांभिक किंवा ओढूनताणून चंद्रबळ आणल्यासारखी असत नाहीं; तर ती खऱ्या अंतःकरणापासूनच असते. सारांश जगन्नियंत्या परमेश्वरानें आईबापांच्याठायीं ही माया येवढ्याच करितां उत्पन्न केली आहे कीं तिच्या योगें मुलांचें लालनपालन उत्तम प्रकारें व्हावें. मुलें जन्मतात तेव्हां तीं फार नेणतीं व अशक्त असतात; त्यांस बोलतां येत नाहीं, चालतां येत नाहीं किंवा खातां पितां येत नाहीं; तेव्हां अशा वेळीं जर आईबापांकडून मुलांचें प्रीतीनें पालनपोषण झालें नसतें तर त्यांस अन्नवस्त्र कोठून मिळालें असतें? आणि तीं लहानाचीं मोठीं कशीं झालीं असतीं? ही माया केवळ मनुष्यप्राण्यासच आहे असें नाहीं तर पशुपक्षांतही ती पराकाष्ठेची दिसून येते. पहा बरें, कोंबडी आपलीं पिलें कशी सांभाळते, ती सगळा वेळ त्यांस आपल्या पंखांखालीं झांकून बसते, आणि एक धान्याचा गोटाही तीस मिळाला तर तो आपण न खातां पिलांस बोलावून त्यांचे पुढें चींचींनें ठेविते, आणि जरकरितां त्यांस मारण्याचे हेतूनें घार, मांजर किंवा दुसरें कोणी आलें तर

आपल्या जिवाचें काय होईल हा विचार मनांत न आणितां त्यांच्या आंगावर तुटून पडते. सारांश आईबापांस हीं एका प्रकारची ममता इतक्याचसाठीं दिली आहे कीं, मुलांस कोणत्याही गोष्टींची अडचण पडूं नये, त्यांस भुकेच्या वेळीं अन्न, तान्हेच्या वेळीं पाणी, थंडीपासून बचाव होण्यासाठीं ऊबदार वस्त्रें व यां सारखींच वेळेनुसार दुसरीं इतर साधनें जेव्हांचे तेव्हां मिळावींत म्हणून. विचाराअंतीं असें स्पष्ट दिसून येतें कीं ही अप्रतिम माया मुलांस जेथपर्यंत तिची गरज व जरूर असते तेथपर्यंतच ती राहते. जेव्हां कोंबडीचीं पिलें जाणतीं होतात तेव्हां ती त्यांस पंखाखालीं झांकून ठेवण्याचें सोडून देते आणि तीं हिंडून फिरून आपलीं पोटें आपणच भरूं लागलीं म्हणजे ती त्यांस कोणत्याहीप्रकारें मदत करीत नाहीं इतकेंच नव्हे परंतु फार मोठीं झाल्यावर त्यांस ती बोंचण्यास धांवते. जणुकाय ती त्यांची आईच नव्हे. मनुष्यांचींही गोष्ट कांहीं अंशीं अशीच आहे. जोंपर्यंत मूल लहान आहे तोंपर्यंत आई त्यास दूध देते, व कडेवर घेऊन फिरवित्ये, आणि आपली निद्रामोड करून त्यास थोपटून थोपटून निजविते. जेव्हां मूल जेवावयाजोगें होतें तेव्हां ती दूध देण्याचें मुळींच सोडून देते आणि जें दूध कित्येक दिवस पर्यंत मोठ्या प्रेमानें पाजीत असते तें निष्ठुर होऊन त्यास पिऊं देत नाहीं आणि आपल्या स्तनाच्या बोंडीस कडू किंवा तिखट पदार्थ लावित. असे नानाप्रकार करूनही मुलानें जर हट्टच घेतला तर त्यास मारण्यास व दटावण्यास मागेंपुढें पहात नाहीं. पुढें थोड्या दिवसांनीं असें होतें कीं त्यास कडेवर घेणें हें-हीं आईस बरें वाटत नाहीं.

तुम्हीं अशा कारणासाठीं आपल्या लहान बहिणभावंडांस मार खातांना पाहिलें नाहीं काय? तें तर आईच्या कडेवरून उतरत नाहीं, त्यामुळें आई रागें भरून ह्मणते कीं कसलें कारटें पोर, कडेवरून उतरतही नाहीं. यावरून असें समजूं नये कीं आईची प्रीति ह्मणजे मुलांवर राहिली नाहीं, परंतु प्रसंगानुसार तदनुरूप त्यांची प्रीति असतेच. मुलांची स्थिति सर्वदा एकसारखी असत नाहीं, तिच्यामध्यें नेहमीं फेरफार होतो. आज दूध पितें तर उद्यां खाऊ खात असतें, नंतर कांहीं दिवसांनीं चालूं लागतें याप्रमाणें जसजसें मूल वाढत जातें तसतसा त्याच्या आईबापांच्या प्रीतीमध्यें पालट होत जातो. मुलगे आणि मुली शिकण्याकरितां कसा मार खातात याचा सर्वांस अनुभव आहे. जरी त्यांस अज्ञानपणानें त्याचें कारण त्या वेळीं समजत नाहीं तरी हें खरें आहे कीं आईबापांकडून मुलांस जें दुःख सोसावें लागतें तें त्यांच्या फायद्याकरितांच असतें. आईबापांस सोडून त्यांच्या पश्चात मुलांस या जगांत पुष्कळ दिवस रहावें लागतें कारण सर्वांचे आईबाप त्यांच्या अंतकाळापर्यंत जिवंत असतात असें नाहीं. धन्य नशीब त्या मुलांचें कीं ज्यांणीं आईबापांच्या हयातींत अशी विद्या, कला, व सदाचरण हीं संपादन करून त्यांच्या योगें आपलें सर्व आयुष्य मोठ्या सुखानें व समाधानानें घालविलें; व हतभाग्य तीं मुलें कीं ज्यांणीं आईबापांचे हयातीचें मोल जाणलें नाहीं. व जें सुख व समाधान आईबापांच्या संपत्तीपासून त्यांस प्राप्त झालें असतें तें आळसांत व्यर्थ घालविलें आणि संसाराच्या चिंतेचा भार आंगावर नव्हता अशा वेळीं कोणतीही विद्या व कला शिकावी तें सोडून देऊन खेळण्याबागडण्यांत व उनाडपणा करण्यांत

वेळ घालविला. त्यामुळें त्यांचें सर्व आयुष्य दुःख व संकट भोगण्यांत गेलें. आपण दुःखी झाले ते झाले आणि आपल्यामुळें बिचाऱ्या आईबापांस देखील व्यर्थ दुःखांत टाकिलें. वर सांगितलेला प्रकार मरण्यावरच अवलंबून आहे असें नाहीं पण आईबाप जिवंत असतांना देखील लग्नसोहाळे झाल्यावर मुलें आईबापांपासून विभक्त होतात हें फार वाईट होय. जेव्हां मुलें भरज्वानींत येतात तेव्हां बिचारीं आईबापें त्यांचे रंगढंग पाहून दीनवाणीं होऊन बसतात. हें खरें आहे कीं आईबाप म्हातारे झाल्यावर त्यांजकडून मुलांस फारकरून कोणत्याही प्रकारें मदत मिळण्याचा संभव नसतो, पण उलट मुलांसच त्यांची सेवाचाकरी करावी लागते. याकरितां मुलांनीं विभक्त होतांना आपण विभक्त झाल्यावर आईबापांचें काय होईल हा विचार प्रथम मनांत आणिला पाहिजे. या संसारांत सर्वांत अधिक जडजोखीम पुरुषांचे माथीं आहे. लत्ताकपडा, देवधेव व संसारास लागणाऱ्या सर्व कांहीं गोष्टी ज्या एका पैशानेंच प्राप्त होतात त्या मिळविण्याकरितां त्यांस प्रथमतः झटलें पाहिजे. स्त्रियांस हें मोठेंच सौख्य आहे कीं त्या फारकरून वर सांगितलेल्या गोष्टी संपादण्याच्या मेहनतीपासून सुटतात. पहा बरें, पुरुषांस केवढे जबरदस्त श्रम व मोलमजुरी करावी लागते ती? कोणी जड ओझीं डोकींवरून वाहतात, कोणी फार दूरच्या रानांतून लांकडें आणतात, कोणी वैद्य, डाक्टर, बारिस्टर, इंजनेर, आटर्नी, वकील, नाटकी, सोनार, लोहार, कुंभार, गौंडी, लोणारी, पाथरवट, सुतार, कांसार, चांभार, ओतारी, कातारी, तांबट, तारकस, रंगारी, भटीयारे, भडभुंजे, गौळी, कसाई, धोबी, पाणके, नाल-

बंद, गारुडी, वाजंत्री, भोई इत्यादि जे कामधंदे करणारे लोक आहेत त्या सर्वांस त्यांच्या त्यांच्या मानाप्रमाणें मेहनत व श्रम करावे लागतात. सारांश सर्व कामधंदा केवळ एक पैसा मिळविण्याकरितांच पुरुष आपल्या माथीं घेतात; परंतु यावरून असें समजूं नये कीं खाणें, निजणें, व गप्पा मारणें यांशिवाय संसारांतील कोणत्याही कामाशीं स्त्रियांचा संबंध नाहीं. त्यांस तर संसाराचें सर्व काम पाहिलें पाहिजे. पुरुष आपली कमाई आणून स्त्रियांच्या स्वाधीन करितात. त्यांनीं ती अशा चातुर्यानें व बातबेतानें खर्चिली पाहिजे कीं त्यांस कोणीही नांव ठेवूं शकणार नाहीं. बारीक विचार करूं लागलें असतां असें स्पष्ट दिसून येईल कीं ह्या संसाररूप गाडीचीं एक पुरुष आणि दुसरें स्त्री हीं जीं दोन चाकें तीं दोन्हीही जर सुरळीतपणें चालणार नाहींत तर संसार नीट कसा बरें चालेल? पुरुष पैसा मिळविण्याचा उद्योग करीत असतां त्यास इतका देखील वेळ संसाराचे लहानसहान कामांत घालविण्यास मिळत नाहीं.

मुलांनो, तुम्हीं बाळपणीं अशी विद्या शिका कीं ती मोठेपणीं तुमच्या कामीं पडेल; व मुलींनो, तुम्हीं अशा कला संपादन करा कीं तुम्हीं बायका झाल्यावर त्यांपासून तुम्हांस सुख व समाधान मिळेल. स्त्रियांची पुरुषांशीं तुलना केली असतां स्त्रियांस कांहीं अंशीं पुरुषांपेक्षां अशक्त निर्माण केलें आहे हें खरें; परंतु हात, पाय, कान, डोळे, बुद्धि, समज, स्मरणशक्ति, इत्यादि पुरुषांप्रमाणेंच त्यांस दिलीं आहेत. मुलें याच इंद्रियांच्या योगें कोणी पंडीत, शास्त्री, डाक्तर, वैद्य, कारागीर, व्यापारी, इत्यादि हरएक धंद्यांत दूरदर्शी व बुद्धिकौशल्य निपुण होतात. इकडे मुली तोच वेळ बाहु-

ल्यांचीं लग्नें करण्यांत व कहाण्या सांगण्यांत घालवून अडाणीं होऊन राहतात. ज्या स्त्रियांनीं काळाचें महत्व जाणून व तो योग्य कामीं लावून पुरुषांप्रमाणेंच कीर्तिध्वज उभा केला अशा स्त्रिया देखील आपल्या देशांत होऊन गेल्या. त्या कोणकोणत्या? तर जानकी, तारामति, मंदोदरी, दमयंती, गार्गी, कात्यायनी, मैत्रेयी, द्रौपदी, वगैरे. त्यांस त्या वेळेस फार मान मिळत असे. त्या स्त्रिया व पुरुष नेहमीं एकमेकांस जिवलग स्नेही, असें मानीत असत. आतांसारखें पुरुष यजमान आणि स्त्रिया ह्या केवळ दासी असें तेव्हां मानीत नसत. पूर्वीच्या स्त्रियांना स्वातंत्र्य असे व पुरुष जिकडे जात तिकडे त्यांस यावयास परवानगी मिळत असे. पांडवांची स्त्री द्रौपदी, जिकडे पांडव तिकडे ती, रामाची सीता, नळराजाची दमयंती, हरिश्चंद्राची तारामति, ह्या स्त्रिया आपल्या पतींबरोबर सदासर्वदा असत. त्यांचे पति जसे वागत तशा त्या वागत. रघुवंशांत अज इंदुमतीचा विलाप करीत असतां ह्मणतोः—"गृहिणी सचिवोमिथः सखी" अशा तऱ्हेची पूर्वीच्या स्त्रियांची चाल असे व पतिही त्यांना त्याचप्रमाणें वागवीत; परंतु हल्लीं नवराबायकोंचा स्नेह ह्मटला ह्मणजे होकायंत्रासारखा. ह्मणजे त्या यंत्रांतील कांट्यांचीं तोंडें एके ठिकाणीं केलीं तरी तीं वेगळीं व्हावयाचींच. त्याप्रमाणें ह्मणजे एकाचें तोंड उत्तरेकडे तर दुसऱ्याचें दक्षिणेकडे असावयाचें. ह्मणजे जर एखादी स्त्री आपल्या पतीला ह्मणाली कीं मी आज तुमच्या बरोबर येतें तर त्याजकडून "कांहीं जरूर नाहीं. पुरुषांचे धंदे पुरुषांला व बायकांचे धंदे बायकांना," ह्याप्रमाणें ठरीव उत्तर मिळतें. तसेंच एखादा पुरुष आपल्या स्त्रीस

ह्मणांला कीं, आज सभेंत भाषण ऐकावयास अथवा समुद्रावर किंवा बागांत स्वच्छ हवा घेण्यास चल तर तिच्यां कडूनहीं असें उत्तर मिळतें कीं आपल्या कुळांत अशी चाल नाहीं व लोकांतही वाईट दिसतें ह्मणून मी यावयाचीं नाहीं. ह्याप्रमाणें हल्लीं परस्परांतील सख्य आहे. कितीं तरी कृतघ्न बायका ह्या! ज्या प्राण्याबरोबर त्यांस जन्म काढावयाचा त्यास कर्मधर्मसंयोगानें एखादी विपत्ति आली ह्मणजे त्यास स्वतांची बायको सुद्धां विचारीत नाहींशी होते, मग आप्त सोयरे सोडून जातील यांत नवल नाहीं. पूर्वीच्या स्त्रिया अशा नव्हत्या. श्रीरामाला बारा वर्षें वनवास भोगण्याकरितां कैकईनें धाडिलें असतां नवीन लग्न झालेली सीता, लोक व प्रत्यक्ष सासुसासरा ह्मणजे दशरथ व कौसल्या नको नको ह्मणत असतां तशींच कोणाचें न ऐकतां ती पती बरोबर वनवासास गेली. ही एकशी काय तर अशा पुष्कळ आहेत. दमयंती, द्रौपदी, तारामती ह्या सर्वांस माहीतच आहेत. पूर्वीच्या स्त्रियां कांहीं काम करीत नव्हत्या असें नाहीं. त्या कामें वगैरे करीत तरीही त्यांस बाळपणापासून विद्याभ्यासाकरितां गुरूपाशीं ठेवीत असत असेंही ग्रंथांतरीं आढळतें.

त्यांचा विद्याभ्यास पुरा झाला व त्या उपवर झाल्या ह्मणजे त्या आपल्या परीक्षेनें, पतियोजना करीत असत. आतांसारखा आईबाप देतील त्यास मान्य करून घेण्याचा प्रकार तेव्हां नव्हता. त्या वेळच्या बायका आपलीं कामें उरकून आपल्या पतींबरोबर अनेक विषयांवर भाषणें करीत. त्यांत कधीं वेदांत व कधीं आत्मज्ञान असेही विषय असत. मग त्यांचे पति त्यांस अनुकूळ प्रतिकूळ मतें देत व कधीं

कधीं तर एखाद्या विषयांत समजूत बरोबर झाली नाहीं, तर पतीस प्रश्न करून स्त्रिया आपल्या शंकांचें निवारण करून घेत आणि आपलें आयुष्य सुखांत घालवीत असत. ह्याविषयीं एक उदाहरण आहे तें येथें देतों.

शंकराचार्यांचा वेदांत विषयावर एक मोठा प्रसिद्ध ग्रंथ आहे. त्याचें नांव "शारीरभाष्य." त्याच्या पहिल्या अध्यायाच्या तिसरे भागांत दहाव्या सूत्रावर आचार्यांची टीका आहे. त्यांत अशी गोष्ट आहे कीं याज्ञवल्क्यऋषीची स्त्री गार्गी आपल्या पतीशीं वेदांत विषयावर वाद करीत असतां त्या संवादांत प्रथम गार्गीनें प्रश्न केला कीं "वर दिसतें हें आकाश व खालीं दिसते ही पृथ्वी व त्याजमधील हवेचा भाग व जें कांहीं होऊन गेलें, होत आहे व पुढें होणार हें सर्व, भगवन्! कशावर शिंवलें व गुंफलें आहे तें सांगा." अहाहा! अशा थोर व गहन विषयांवर विचार करणाऱ्या स्त्रिया आमचे देशांत ज्या काळीं होत्या त्या काळाचें व त्या काळच्या लोकांचें केवढें भाग्य समजावें! या गोष्टी मनांत आल्या व सांप्रतची आमच्या भगिनींची अति निकृष्ट स्थिति लक्षांत आली ह्मणजे मन उदास झाल्याखेरीज रहात नाहीं व ही स्थिति बायकांविषयीं पुरुषांचे जे अति नीच विचार त्यांमुळें आली असें ह्मणणें भाग पडतें. किंवा, एका विचारानें असेंही वाटतें कीं बिचाऱ्या पुरुषांचा तरी काय दोष? त्यांच्या बुद्धि ज्यानें भ्रष्ट केल्या अशा दुर्धर काळाचेंच हें माहात्म्य आहे अशी समजूत घालावी. असो.

आपल्यामध्यें सुमारें सात आठशें वर्षां पूर्वी लक्ष्मीदेवी ह्मणून मोठी विद्यासंपन्न स्त्री होऊन गेली तिचीही गोष्ट येथें सांगण्यासारखी आहे. प्रसिद्ध याज्ञवल्क्यस्मृति ह्मणून

धर्मशास्त्र ग्रंथाचा जो मुख्य आधार त्याजवर "ज्ञानेश्वरी" ह्मणून टीका केली आहे, त्या टीकेवर टीका वर सांगितलेल्या श्री लक्ष्मीदेवीनें केली आहे. काय या बाईची थोरवी वर्णन करावी? आपण स्त्रीजाति, कदाचित् आपला ग्रंथ मोठमोठ्या पंडितांस मान्य होतो किंवा नाहीं असा विचार मनांत येऊन तिनें आपलें टीपण नांव "बालंभट" असें ठेविलें व आपल्या ग्रंथास "बालंभट्टी टीका" असें नांव दिलें. अशी या लक्ष्मीदेवीची हकीकत आहे. तिच्या या ग्रंथास "लक्ष्मी व्याख्यान" ह्मणूनही संज्ञा आहे. या बाईच्या पतीचें नांव विद्यानाथ व सासऱ्याचें नांव महादेवभट्ट व त्या कुटुंबाचें आडनांव पायगुंडे असें होतें.

असो. ह्या स्त्रिया तर एकीकडेस राहूं द्या. कारण ह्यांस फार काळ होऊन गेला. पण फार अलीकडच्या आपल्या देशांत ताराबाई, अहिल्याबाई होळकरीण, भोपाळची बेगम इत्यादि व यूरोप व अमेरिका खंडांत आमची चक्रवर्तिनी विक्टोरिआ राणीसाहेब, मिस मेरी कारपेन्टर इत्यादि अमोल्य रत्नांच्या खाणीच आहेत. या वर सांगितलेल्या स्त्रियांपैकीं बहुधा सर्वत्रांनीं केवळ लहानशा घराचा किंवा कुटुंबाचा बंदोबस्त आणि व्यवस्था राखिली असें नाहीं तर सर्व राज्याचा बंदोबस्त राखिला आहे. इतकेंही लांब जाण्याची जरूर नाहीं. या आपल्या भरतखंडांतच हल्लीं प्रसिद्ध पंडिता रमाबाई जिणें आपल्या संस्कृत भाषाज्ञानाचा डंका थेट काशीपासून रामेश्वरापर्यंत गाजऊन मोठमोठ्या पंडितांसही थक्क करून सोडलें! हा लहानसहान प्रताप काय? कित्येक अज्ञान व वेडगळ बायका हा प्रश्न पुढें आणतात कीं "आह्मी बहुतकरून पुरुषाचे सत्तेंत असायाचें, मग आह्मां-

ला विद्या व ज्ञान संपादन करून काय करावयाचें आहे ? पुरुष जसें सांगतील तसें आह्मीं करूं ह्मणजे झालें. आह्मांस पुरुषांप्रमाणें चाकरीरोजगार थोडेच करायाचे आहेत. असें ह्मणून जर अज्ञानदशेंत राहतील तर त्यांमध्यें व पशूंमध्यें भेद तो कोणता ? घोडे, गायी, किंवा इतर जनावरें यांचा व तुमचा उपयोग पुरुषांस सारख्याच प्रकारचा ह्मटला पाहिजे. तुह्मांला ईश्वरानें संसाराचें ओझें वाहण्यास पुरुषांस मदत करण्यासाठीं जी बुद्धि दिली आहे ती व्यर्थ घालवितां. तुमच्या मदतीची पुरुषांस किती जरूरी आहे हें ज्या लोकांमध्यें स्त्रिया आपल्या ज्ञानानें पुरुषांस मदत करण्यास समर्थ झाल्या आहेत त्यांचा संसार कसा चालतो हें पाहिलें ह्मणजे सहज ध्यानांत येईल. उदाहरणार्थ इंग्रज लोक घेऊं. त्यांच्यामध्यें जर कोणत्याही कुटुंबामध्यें एखादी सुज्ञ स्त्री असली तर मुलांचें पालन, शिक्षण वगैरे कुटुंबाविषयीं ज्या अनेक गोष्टी त्यांचें पुरुषांवरचें ओझें फारच हलकें होतें. त्यामुळें पुरुषांस त्यांचीं जीं दुसरीं कामें त्यांकडे लक्ष लावावयास सांपडतें आणि तीं त्यांच्या हातून नीट रीतीनें सिद्धीस जातात. तसेंच जर कोणी स्त्रीनें ह्मटलें कीं " आह्मीं देशाचें किंवा जगाचें हित करायाला जातों आहों कोठें ? आह्मांला कशाला त्या हिताच्या साधनाचें ज्ञान पाहिजे ? " तर तेंही ह्मणणें अयोग्य आहे. जसें पुरुष त्या हिताविषयीं झटतात तसें बायकांनीं निदान आपल्या हिताकरितां कां झटूं नये ? दुसरी एक गोष्ट सांगण्याजोगी आहे ती ही कीं बायकांमध्यें कांहीं गुण आहेत ते पुरुषांमध्यें नाहींत व पुरुषांमध्यें आहेत ते बायकांमध्यें नाहींत. तेव्हां एकमेकांचे गुणांनीं एकमेकांची

सुधारणा झाली पाहिजे. तीं होण्यास एकमेकांचें एकमेकांवर वजन असलें पाहिजे. पण स्त्रिया जर सुशिक्षित नसल्या तर त्यांचें वजन पुरुषांवर कधींच राहावयाचें नाहीं. यास्तव स्त्रियांनीं विद्या संपादन केली पाहिजे हें निःसंशय आहे. आतां स्त्रियांनीं ह्मणजे सर्वच विद्या शिकल्या पाहिजेत असें नाहीं. पण जितक्या शिकण्याची जरूरी आहे तितक्या तरी कितीशा बायका शिकतात ? थोड्यांत थोडें ह्मटलें ह्मणजे निदान साधारण शुद्ध लिहिणें, वाचणें व त्याचा अर्थ समजणें, शिवणें, स्वयंपाक अगर पक्कान्नें करणें इत्यादि विद्या स्त्रियांस अवश्य आल्याच पाहिजेत. त्यांपासून स्त्रियांस पुष्कळ फायदे होतील. शिवतां येत असलें ह्मणजे आपल्या नवऱ्याचे, मुलांचे व आपले कपडे शिवतां येतात, ह्मणून एक तर आपला वेळ व्यर्थ जात नाहीं, आणि दुसरें गरीबी असली तर शिलाईबद्दल मजूरी द्यावी लागत नाहीं आणि बायका आळशी असतात असें ह्मणून घ्यावें लागत नाहीं. कदाचित् कशिदा काढितां आला ह्मणजे आपल्याला दुसऱ्या बायका चांगलें ह्मणतात इतकेंच नाहीं तर आपणास चांगलें काम करतां येतें ह्मणून इतर बायकांशीं निष्कारण गोष्टी सांगत बसल्यापेक्षां शतपट आनंद होतो, व त्या गोष्टीची जास्त अभिरुचि लागते. स्वयंपाक किंवा पक्कान्नें करितां आलीं ह्मणजे दुसऱ्या मनुष्याची गरज न लागतां पाहिजे त्यावेळीं पाहिजे तो पदार्थ आपल्यास करतां येतो, कित्येक स्त्रिया गाणें शिकतात, वाद्यें वाजवितात, इंग्लिश, पार्शियन, संस्कृत, गुजराथी, वगैरे अनेक भाषांचा अभ्यास करितात. ह्या सर्व विद्या जर आल्या तर त्यांपासून स्त्रियांस अधिकाधिक ज्ञान होईल.

तसेंच मराठींतील ग्रंथ ह्मणजे व्याकरण, इतिहास, भूगोल व गणित हेही शिकले पाहिजेत. कारण इतिहासाच्या अभ्यासानें आपल्या देशांत पूर्वी होऊन गेलेले थोर व शूर पुरुष आणि पतिव्रता स्त्रिया यांचीं मनोवेधक चरित्रें दृष्टीस पडतात, तसेंच कोणकोणामध्यें कोणकोणत्या कारणानें लढाया झाल्या, त्यांचे परिणाम काय झाले वगैरे आपल्यास कळतें. भूगोल शिकल्यापासून देश, राष्ट्रें, शहरें, नद्या, पर्वत, पृथ्वी गोलाकार आहे, वगैरे अनेक गोष्टींची माहिती होते. व्याकरण शिकलें ह्मणजे भाषा शुद्ध बोलतां येते; कोणास पत्र लिहिणें झालें तर कर्ता, कर्म, आणि क्रियापद हीं कोठकोठें घालावीं हें आपणास चांगलें समजतें. सदर्हू विषयांपैकीं बहुतेक चांगल्या विषयांची स्त्रियांस किती अवश्यकता आहे याचें स्पष्टीकरण होण्याकरितां एक उदाहरण देऊं. प्रत्येक स्त्रियेस बहुतकरून मुलाची आई व्हावें लागतें, तेव्हां आईचा आणि मुलाचा जितका निकट संबंध असतो तितका बापाचाही नसतो मग इतर माणसांचा कोठून असणार? ह्मणून आई जर सुशिक्षित असली तर मूलही सुशिक्षित निपजतें. जर आईस चांगली विद्या अगर शिक्षण नसलें तर मुलास कोठून असणार? ह्मणून प्रथम स्त्रियांस चांगली विद्या असणें अवश्य आहे. हल्लीं आपल्या देशीं अशा पुष्कळ सुशिक्षित स्त्रिया आढळतील कीं ज्यांचीं मुलेंही सुशिक्षित आहेत. सारांश मूल चांगलें किंवा वाईट निपजणें हें बहुतकरून आईच्या शिक्षणावर अवलंबून आहे. आईस शिक्षण नसेल तर मुलांस कोठून प्राप्त होईल? याबद्दल कित्येक स्त्रिया असें ह्मणतील कीं, मुलांस शाळेंत पाठविलें तर त्यांस शिक्षण

नाहीं का मिळणार? तर यास उत्तर हेंच कीं मुलांस शाळेंत पाठविल्यानें त्यांस शिक्षण मिळेल हें खरें, परंतु लहानपणीं मुलांस मुख्य शिक्षण ह्मटलें ह्मणजे आईनें द्यावें लागतें. लहानपणीं मूल कांहीं वाईट बोललें तर त्याला मना करणें हें आईचें कर्तव्यकर्म आहे. आईनें मुलास वाईट शब्द बोलण्याविषयीं मना केलें नाहीं तर तें तसेंच नेहमी बोलेल. तर ह्या शिक्षणास शाळा काय करील? ह्मणून स्त्रियांस आपल्या मुलांबाळांचे कल्याणार्थ विद्या असणें हें योग्य आहे. मुली लग्न होई पर्यंत व मुलगे सुमारें दहा वर्षांच्या वयाचे होत तोंपर्यंत बहुधा घरांतच विद्याभ्यास करितात. या वेळांत आईच्या बुद्धीचा किंवा चालचलणुकेचा ठसा बालकाच्या कोमल मनावर उठण्याचा पुष्कळ अंशीं संभव असतो; ह्मणून हे बायांनो, मुलांच्या पुढील नशिबाचीं सूत्रें तुमच्या हातीं असल्यामुळें पहिल्यानेंच जर तुह्मीं त्यांच्या मनावर ज्ञानाचा व गंभीर विचारांचा ठसा उठविण्याचें मनावर घ्याल तर तो सहज उठवूं शकाल. कीं ज्या योगें तीं मोठीं झाल्यावर नांवालौकिकास पोंहोचून सुखानें कालक्रमण करतील व आमरणपर्यंत तुमचें कल्याण चिंतितील. आणि जर तुह्मीं त्यांच्या साहजिक गुणांस वाढविण्याचें सोडून त्यांस समूळ काढून टाकायाचें मनांत आणाल तर तेंही सहज करूं शकाल; कीं ज्या योगें तीं जसजशीं वाढत जातील तसतशीं उनाडपणाचे चाळे शिकून आमरणपर्यंत पश्चात्ताप करून तुमच्या नांवानें रडतील. मुलें बोलूं लागलीं ह्मणजे व त्यांची मति विद्याभ्यास करण्याजोगी झाली ह्मणजे, आईचे आंगीं शिकविण्याचें सामर्थ्य असलें तर तिणें तेव्हांपासूनच त्यांस शिक्षण देण्याचें सुरू करावें.

शाळेंत घालण्याची वाट पाहण्यांत बालकाचीं कित्येक वर्षे फुकट जातात. अशा लहान वयांत एक तर त्यांस शाळेंत जाण्याची आवड नसते, आणि त्यांत आईची लाडकीं. ज्यांस आपल्या शिकण्याचें अगत्य मुळींच वाटत नाहीं; पण इतक्या वेळांत जर आईनें शिकविण्याचें मनावर घेतलें तर ती शाळेंतल्यापेक्षां जास्त शिकवूं शकेल. मुलें शाळेंत जाऊं लागल्यावरही कित्येक दिवसपर्यंत निष्काळजीनें अर्थ समजल्याशिवाय एकसारखें वाचीत जातात यामुळें विद्याभ्यासांत गति होण्यास त्यांस पुष्कळ वेळ लागतो. अशा वेळीं त्यांस आईकडून पुष्कळ मदत मिळण्याजोगी असते, कां कीं आईसारखी प्रीति व माया दुसऱ्यांत कोठून असणार? एक तर ती रात्रंदिवस जवळ असते त्यामुळें एखाद्या अक्षरावर किंवा शब्दावर मुलाचें दुर्लक्ष झालें कीं लागलेंच तें त्यास समजाऊन सांगत्ये, कोठें अंकच ह्मणावयास सांगत्ये, कुठें पूर्व पश्चिम वगैरे दिशांचीच ओळख करून देत्ये. याप्रमाणें हरएक गोष्टींत हरएक वेळीं आई कांहींनाकांहीं शिकवूं शकते कीं जें पंतोजी कित्येक वर्षांचे विद्याभ्यासांत शिकवूं शकणार नाहीं. आईचे शिकविण्यांत दुसरें हें एक सुख असतें कीं मुलांस शिकण्याची धास्ती वाटत नाहीं. पण उलटें त्यांची शिकण्याविषयींची उमेद वाढत जाते. त्यांत मुलांच्या सुधारणुकीचा मार्ग व त्यांच्या शरीरसंपत्तीचें संरक्षण व त्यांस लहानाचें मोठें करणें हीं आईचे स्वाधीन असतात. पण कित्येक ठिकाणीं अशा दुष्ट व चांडाळ आया पाहण्यांत येतात कीं त्यांस पोटच्या बालकाची मुळींच कींव येत नाहीं. मग अर्थातच तीं जन्मास येऊन न येऊन सारखींच. असा कोण चांडाळ

असेल कीं जो आईचे प्रीतीचा अभिमान बाळगणार नाहीं ? पण त्या प्रीतीचा जर तिणें वाईट उपयोग केला तर मात्र नफ्याबद्दल उलटें नुकसान होण्याचा संभव आहे. पण हेंही पाहिलें पाहिजे कीं सर्वच आया अशा नाहींत कीं ज्या मुलाच्या हरएक बाबेस दृष्ट लागली, पडछाया पडली, वेताळाची बाधा झाली, ग्रह आडवे आले, असें समजून औषधोपचार करण्याचें टाकून, कोठें पंचाक्षरी, ज्योतिषी, भुते, इत्यादिकांस बोलावून त्यांजकडून झाड, फुंक, मंत्र, तंत्र, तायीत, दोरा, इत्यादि उपाय करितात. तर या अशा वेडगळ समजूतीचा काय परिणाम होत असेल याचा तुम्हींच विचार करा.

आतां तुम्हांस शुद्ध लिहितां येणें हें वाचतां येण्यापेक्षां कांहीं अंशीं कठीण आहे खरें पण कोणत्याही पुस्तकांतून जर दररोज दोनचार ओळी लिहाल आणि त्याचप्रमाणें आपल्या अकलेनें कांहीं तरी रचून लिहाल व तें शुद्ध आहे किंवा नाहीं हें नीट समजून घ्याल तर खचीत तुम्हांस थोड्या दिवसांत शुद्ध लिहितां येईल. आतां वळणदार अक्षराशीं कांहीं संबंध नाहीं कारण मुळीं लिहितां येणें हीच आधीं एक कला आहे, जी प्रसंगाचे वेळीं फार उपयोगी पडते. पहिल्यानें जरी शुद्ध लिहितां आलें नाहीं किंवा अक्षर वळणदार नसून वेडेंवांकडें असलें तरी त्याविषयीं निराश होऊन आपणास तें येणार नाहीं असें म्हणून नाउमेद होऊं नका, कारण कोणतीही गोष्ट म्हटली म्हणजे आरंभीं चांगली येत नाहीं. पहा कीं कोण्या एका मोठ्या पंडिताजवळ मुलाचें यःकश्चित झुबलें किंवा टोपी कापण्यास किंवा शिंवण्यास दिली तर ज्यास

असला प्रसंग जन्मांतही कधीं आला नाहीं तो खचित ती टोपी किंवा तें झुबलें बिघडून टाकील. हें तर एकीकडेस राहूं द्या, पण चालणें, फिरणें ज्याविषयीं तुह्मांस आतां कांहींच वाटत नाहीं व बिनधोक इकडून तिकडे, तिकडून इकडे फिरतां हें शिकण्यास पहिल्यानें किती प्रयास पडले हें तुह्मांस माहीत नाहीं पण तुमच्या आईबापांस किंवा घरांतील वडील माणसांस पक्कें माहीत आहे. कारण तुह्मांस पहिल्यानें आधाराशिवाय बसतां येत नव्हतें. तुह्मांस कडेवरून खालीं उतरून ठेवावयाचें झालें ह्मणजे एका मनुष्यास धरून रहावें लागत असे किंवा एखाद्या उशीस टेंकून ठेवावें लागे. प्रथम तुह्मीं आपटतधोपटत रांगावयास शिकलां, मग कांहीं दिवसांनीं बाजेच्या खुराला, खिडकीच्या गरादीस किंवा भिंतीस धरून उभे राहूं लागलां आणि जेव्हां तुमच्या पायांत शक्ती भरून ते मजबूत झाले तेव्हां पांगुळ गाडीस धरून हळू हळू पावलें टाकूं लागलां आणि त्यांतूनही अनेक वेळां पडून बहुधा दररोज तुह्मांस कांहींनाकांहीं दुखापत होत असे तेव्हां आईबापांस तुमच्या बद्दल किती काळजी बाळगावी लागत असे बरें? आतां तेच तुह्मीं ईश्वरकृपेनें आज बेधडक हिंडतां फिरतां. तर त्याचप्रमाणें कांहीं दिवसांनीं लिहिणें वाचणेंही तुह्मांस येईल. कदाचित् तुह्मांस मुलांप्रमाणें लिहितां येणार नाहीं पण गरजे पुरतें तर येईल आणि धोब्याची धुणावळ, किंवा दळणवालीची दळणावळ दिली किती व राहिली किती याची आठवण रहावी ह्मणून भिंतीवर रेघा ओढून ठेवण्याची अथवा दगडधोंडे मोजून ठेवण्याची गरज पडणार नाहीं. घरखर्चाचा हिशेबठिशेब, देणेंघेणें हें सर्व ध्यानांत ठेवणें ह्म-

टलें ह्मणजे फार कठीण आहे, आणि कित्येक पुरुषांची अशी चाल असते कीं जो पैसा घरांत खर्चास दिलेला असतो त्याचा नेहमीं ते हिशेब विचारीत असतात, आणि अशा वेळीं जर तोंडावर याद नसली तर पुरुषांस उगाच संशय येतो कीं, इनें हे पैसे काय केले? यावरून उभयतांत निरर्थक बोलणें होऊन भांडणास मूळ होतें. याकरितां स्त्रियांनीं आपलें आपणांसच समजण्यापुरतें लिहिणें शिकलें असतां किती वरें चांगलें होणार आहे? लिहिणें वाचणें याशिवाय शिंवणें व स्वयंपाक करणें ह्या दोन्हीही कला शिकण्याची प्रत्येक मुलीस जरूरी आहे. कोणत्याही मनुष्यास हें माहीत नसतें कीं पुढें आपणावर कोणता प्रसंग येईल. मोठमोठाले उमराव व धनाढ्य देखील एकाएकीं गरीब व अन्नास मोताद होऊन जातात अशा वेळीं जर एखादी कला किंवा विद्या त्यांच्या हातीं असली तर ती किती वरें उपयोगी पडेल? पूर्वीच्या काळचे बादशाह व राजे मोठ्या भरभराटींत व धनसंपन्न असतांही कोणती तरी कला किंवा विद्या शिकून ठेवीत असत ती इतक्यासाठीं कीं आपणावर मागें पुढें प्रसंग आला असतां तिचा उपयोग व्हावा. संसाराचा क्रम सदोदीत एकसारखा निर्विघ्न चालेल असें नाहीं हें पक्कें समजून ज्या सुखविश्रांतीचा तुम्ही सध्यां उपभोग घेतां त्याकरितां ईश्वराचे आभार माना, कारण त्याणें दयाळू होऊन तुमच्या घरांत सुखशांति ठेविली. पण या दयेचा हेतू असा नाहीं कीं तुम्हीं बेपरवा राहून असेंच नेहमीं सुख मिळेल असा भरंवसा बाळगून स्वस्थतेच्या वेळीं कोणतीही विद्या किंवा कला शिकाण्यास झटूं नये. सुखशांतीचे वेळीं आपल्या सर्व चांगल्या संवयी नेहमीं जागृत

ठेवणें फार अगत्याचें आहे. ईश्वराचे दयेनें तुह्मांस जरी दासदासी अनुकूल असल्या तरी तुह्मीं आपल्या संवयी मोडतांकामास नये. कारण कदाचित् हें तुमचें वैभव अकस्मात गेलें तर मग पुढें आळशी रहाण्याची संवय तुह्मांस फार जाचेल. आपण उठून आपल्या हातीं पाणी न पिणें किंवा लहानसहान कामासाठीं चाकर माणसांस किंवा घरांतील लहान बहिणभावंडांस मेहनत व त्रास देऊन आपण मोठे आयतोजी होऊन बसणें हें फार वाईट. त्या वेळीं तुह्मांस आपलें सर्व काम स्वतांच केलें पाहिजे. आणि तुह्मीं सावध व हुषार राहिलां तर आपलें स्वत:चें काम उरकून थोडेंबहुत घरांतील कामही करूं शकाल व अशी थोडथोडी जरी मेहनत कराल तरी तुमच्या आईस ती पुष्कळ अंशीं मदत व पाठबळ झाल्यासारखें होईल. आपल्याच्यानें होण्याजोगें जें काम असेल तें करण्यास कधींही हेळसांड करूं नका कीं ज्याचेसाठीं आईस मेहनत पडावी किंवा तिणें तें काम फावत नसल्यामुळें शेजारचे मायबहिणीस बोलाऊन तिजकडून करवावें व तिला श्रम द्यावे. अहो माझ्या प्रिय मुलांनो ! रात्रौ जेव्हां निजावयास जाल तेव्हां आपला बिछाना आपलें हातानें घालून निजा आणि सकाळीं उठलां ह्मणजे तो तुह्मींच गुंडाळून बंदोबस्तानें जागचेजागीं ठेवा. आपल्या कपडयांचें गांठोळें फार शोधल्याशिवाय आपल्यास वेळेवर मिळेल असें ठेवा. जुने कपडे बदलून नवे घालाल तेव्हां जुने कोठें फाटलेतुटले असल्यास नीट शिंवून ठेवा. आपले मळलेले कपडे धोबी येई पर्यंत एका निराळ्या पेटींत किंवा गांठोळ्यांत बंदोबस्तानें बांधून ठेवा. जर कपडे बदलून मळलेले कपडे

गोळा करून उचलून नीट सांभाळून ठेविले नाहींत तर कदाचित् त्यांस उंदीर कुरतुडून टाकितील. किंवा जमिनीवर पडून पडून जास्त मळकट होतील व असें झालें असतां धोबी त्यांस स्वच्छ करूं शकणार नाहीं. किंवा जमिनीचा ओलावा लागून व आंगाच्या घामट्टाणीनें त्यांस एखादे वेळेस वाळवी लागून जाईल. धोब्यास कपडे द्यावयाचे झाले ह्मणजे ते नेहमीं पाहून दिले पाहिजेत आणि ते त्यानें धुवून आणिले ह्मणजेही ते पाहून घेतले पाहिजेत कारण, नजाणो एखादा कपडा कमी किंवा फाडून आणला असेल अथवा कोठें डाग राहिला असेल. याप्रमाणें तुह्मीं आपल्या कपड्यांची खबरदारी राखाल तेव्हांच तुमचे कपडे शुभ्र धोतऱ्याच्या फुलाप्रमाणें धुवून येतील आणि कोणताही कपडा कमी होणार नाहीं. तुमच्या आंगावरचे दागिने फार मोलाचे असतात ह्मणून निजण्याचे पूर्वी व सकाळीं उठतेवेळीं ते सर्व नीट आहेत किंवा नाहींत, हें तपासून पाहिलें पाहिजे. अनेक वेळां असें घडून येतें कीं, मुली खेळण्याच्या नादांत आंगावरचा एखादा दागिना कोठें हरवून टाकतात आणि नंतर कित्येक दिवसांनीं त्यांला त्याची आठवण होत्ये आणि ह्मणूं लागतात कीं, कानांतील कुडें काय झालें, नथीचें मोतीं कोठें पडलें. इकडे घरांत तर अनेक वेळां केरकचरा काढल्यानें लहानसा-रखी वस्तू कोठें नाहींशी होऊन किंवा मातींत दडपून जाऊन सांपडेनाशीं झाली ह्मणजे ती निष्काळजी मुलगी घाबरून जाऊन अतिशय रडूं लागते आणि सगळें घर शोधतां शोधतां पुरे करून सोडते. याप्रमाणें एक वेळ आईबापांस समजलें कीं, आपली मुलगी घातलेला दागिना नीट संभाळून न

ठेवितां खेळण्याच्या नादांत इकडे तिकडे गमावून टाकिते, ह्मणजे त्यांच्या मनासही वाईट वाटतें.

घरांतील कामांपैकीं कोणतें काम आपल्याजोगें आहे याचा तुह्मांस नेहमी विचार केला पाहिजे. फारकरून लहान बहिणभावंडें रडत असतात त्यांस तुह्मांस सांभाळतां आलें तर आईस दुसरें काम करण्यास तितकी फुरसत मिळेल. त्यांचे हात व तोंड धुणें, त्यांच्या खाण्यापिण्याची तर्तूद ठेवणें व त्यांस कपडे घालणें हीं सर्व कामें तुह्मीं मनावर घ्याल तर सहज करूं शकाल. आणि हें करण्याचें टाकून उलटें त्यांच्या खोड्या काढून त्यांस चाळवाल तर तीं तुमचा मान व प्रतिष्ठा मुळींच ठेवणार नाहींत, एवढेंच नव्हे तर त्यापासून तुमच्या आईस सुद्धां सुख न होतां उलट तुमचा त्रास मात्र होईल. ती घरचें काम सांभाळील कीं तुमच्या तेंड्याभांडणांचे न्यायनिवाडे करील ? घरांत जें अन्न शिजतें तें खाऊन संपविण्याचेंच काम तुमचें असें समजून अधाशासारखें तें केव्हां शिजेल आणि केव्हां एकदा तोंडांत पडेल या हेतूनें तिकडेस मुळींच लक्ष देऊं नका. घरांत कुत्रा, मांजर, किंवा इतर ग्राम्य पशु पाळलेले थोडेका आहेत आणि त्यांनीं केवळ पोट भरण्याच्या आशेनेंच जर हावरेपणा केला तर तें मोठेंसें नवल नाहीं. परंतु तुह्मांस तर स्वयंपाक करतेसमयीं प्रत्येक गोष्टीविषयीं फार बारकाईनें लक्ष दिलें पाहिजे. कालवण कसें करितात, मीठ कशास किती घालितात याप्रमाणें प्रत्येक स्वयंपाकाचे प्रकार जर तुह्मीं वारंवार लक्षपूर्वक पाहात जाल तर तुह्मांस थोड्याच दिवसांत सर्व प्रकारचें रांधकाम करितां येईल. आणि तुह्मांस अशी एक कला साध्य होईल कीं जी संसारसंबंधीं सर्व वि-

द्यांत फार अगत्याची कला होय. नेहमीच्या प्रचारांतलीं पक्कान्नें खेरीजकरून इतर पक्कान्नांचीं माहिती करून घेतली पाहिजे. आल्यागेल्याच्या पाहुणचारास नेहमीं पुरी पुरीचे पक्कान्नांची गरज लागते. साखरभात, केशरीभात, पुरणपोळी, अनरसे, मांडे, मोतीचूर लाडू, बासुंदी, मुरंबा इत्यादि हीं सर्व मिष्टान्नें उत्तम पक्कान्नांमध्यें मोडतात. या प्रत्येकाचा करण्याचा प्रकार चांगला लक्षांत ठेविला पाहिजे. हे वरील सांगितलेले सर्व प्रकार कठीण आहेत असें नाहीं. पण ते शिजविण्यामध्येंच त्याची खुबी विशेष आहे जसें कीं अनरसे इत्यादि.

शिवणें फारसें कठीण आहे असें नाहीं पण कापणें हें मात्र तर्काचें काम आहे. तेव्हां तें नीट समजून घेणें फार जरूरीचें आहे. त्यांत बायकांचे कपडे घालण्याचे जितके प्रकार आहेत, तितके पहिल्यानें कापण्यास शिकणें फार अगत्याचें आहे. अशा पुष्कळ अडाणी बायका आमचे पाहाण्यांत आल्या आहेत कीं ज्या आपल्या चोळ्या कापण्याकरितां लोकांच्या दारोदार हिंडत असतात व जराशा कामाकरितां लोकांचें आर्जव करून उगाच त्रास देत असतात. पुरुषांच्या कपड्यांपैकीं आंगरखा कांहीं अंशीं कठीण आहे खरा, पण तुम्हीं जर आपल्या भावाचे आंगरखे कापण्याचें मनावर घ्याल तर तेही दोनचारदां कापल्यावर ते कसे कापावेत हें सहज लक्षांत येईल. मुली लज्जेनें न बोलोत पण मनांत पक्कें समजत असतील कीं कुंवारपणाचे आणखी थोडे दिवस आहेत एकवेळ लग्न झालें ह्मणजे मग सासरीं जावें लागेल आणि तेथें अगदीं निराळे तऱ्हेनें आयुष्य लोटावें लागेल, जसें तुह्मी आपली

आई, आजी, जाऊ, काकी इत्यादि कुटुंबांतील इतर बायकांस पाहातां. त्यांस माहेरीं राहण्यास वेळ फार थोडा मिळतो आणि त्यांतीलहीं पुष्कळ भाग अज्ञानपणांत जातो. आणि तें पर्वतप्राय आयुष्य तर पुढें येतच आहे ज्यांत अनेक प्रकारच्या धास्ती, काळज्या, भांडणें, तंटे वगैरे अनिवार्य भरलेले असतात. आतां तुम्हींच विचार करून पहा कीं तुम्ही मोठ्या भाग्यवंताच्या कन्या नाहीं कीं तुम्हांस एक निराळे प्रकारचीच स्थिति प्राप्त होईल. जें काम जगांतील इतर मुलींस व सुनांस करावें लागतें तेंच तुमच्या नशिबीं येणार म्हणून तुम्हांस स्त्रिया कोणत्या रीतीनें आपलें आयुष्य घालवितात, लग्न झाल्यावर त्यांचा मान व प्रतिष्ठा कोणत्या तऱ्हेनें राहते व पुरुष त्यांचा मोठेपणा कसा राखतात वगैरे गोष्टींचा विचार केला पाहिजे. मोठ्या कुळांतील लोकांचे स्थितीकडे पाहूं नका. त्यांत कित्येक ठिकाणीं स्त्रिपुरुषांचीं असावी त्यापेक्षां जास्त प्रीति दिसून येते. कित्येक ठिकाणीं बायको पुरुषाच्या माथ्याचीं मिळून जाते, व कित्येक ठिकाणीं नेहमीं कांहींनाकांहीं धुसफुस होत असल्यामुळें बायकोचा अगदीं पाणउतारा होऊन जातो. ही मोठ्या लोकांची गोष्ट झाली पण देशाच्या संप्रदायास व जनरूढीस अनुसरून पाहिलें पाहिजे. आम्हांस तर अशा चालींविरून स्त्रियांचा हल्लींचे काळीं कोणत्याही रीतीनें मान व प्रतिष्ठा दिसून येत नाहीं. स्त्रीजात जात्याच अज्ञानी हा तर लोकांचा प्रसिद्ध समज होऊन गेलेला आहे व पुरुषांच्या मुखीं नेहमीं "स्त्रिया साहसीं, घातकी; स्त्रीश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं । देवो नजानाति कुतो मनुष्याः " वगैरे शब्द असतात. पुष्कळ कवींनीं स्त्रियांच्या साहस कर्माबद्दल व

त्यांच्या मूर्खपणाबद्दल लिहिलेलें आहे. वृद्धचाणक्यामध्यें असें झटलें आहेः—

अनृतं साहसं माया मूर्खत्व मतिलोभता ॥
अशौच्यं निर्दयत्वं च स्त्रीणां दोषाः स्वभावजाः ॥१॥

भावार्थ— मिथ्या भाषण, अविचारेंकरून कर्म करणें, कपट, मूर्खपणा, फार लोभ, अमंगळपणा, तसाच निर्दयपणा हे सात स्त्रियांचे स्वाभाविक दोष जाणावे.

स्त्रीणां द्विगुणमाहारो लज्जा सापि चतुर्गुणा ॥
साहसं षड्गुणंचैव कामश्चाष्टगुणः स्मृतः ॥१॥

भावार्थ— पुरुषांपेक्षां स्त्रियांचा आहार दुप्पट आहे तशी लज्जाही चौपट, तसेंच साहस कर्म झणजे अविचारेंकरून कर्म करणें तेंही सहापट अधिक, तसा कामही आठपट अधिक जाणावा.

ह्या सर्व गोष्टी पुस्तकांतील झाल्या आतां घरखटल्यांत पहाल तर तेथेंही जाड्याभरड्या कामाशिवाय कोणत्या झणजे संसारविचाराच्या नाजूक कामांत स्त्रियांशीं विचारपुस किंवा त्यांचें अनुमोदन घेतलें जात नाहीं. ज्या घरांत स्त्रियांचा मान व प्रतिष्ठा राखतात तेथेंही फार फार झालें तर " कसें काय, आज काय कालवण करणार? मुलींसाठीं शालू पाहिजे ती पैठणी आणूं कीं अमदाबादी चिरडी चालेल? तुजकरितां नथ साधी मोत्यांची करून आणूं कीं तिला टीक पाहिजे ? " या असल्या गोष्टींशिवाय कोणतीही स्त्री दाखवूं दे कीं, पुरुषानें कधीं झणजे मोठमोठ्या गोष्टींत त्यांचें अनुमत घेतलें आहे किंवा कोणतेंही नाजूक काम त्यांच्यावर सोपविलें आहे ? तेव्हां हे स्त्रियांनो, अशा लाजीरवाण्या स्थितींत रहाण्याचा तुम्हांस कंटाळा येत नाहीं ?

व पुरुषांस तुमचा विश्वास वाटत नाहीं व त्यांजकडून तुमच्ची अप्रतिष्ठा होते त्यांबद्दल कधीं तुह्मांस पश्चात्ताप होत नाहीं काय? आणि अशी कधीं उमेद वाटत नाहीं काय कीं पुरुषांच्या समोर तुमचा मान व प्रतिष्ठा वाढावी? तुह्मीं आतां योग्य समय आला असतां आपल्या हातानेंच आपली योग्यता वालवूं पहात आहां यामुळें पुरुषांचे मनांतून उतरण्यास तुह्मींच कारण झालां. तुमचेच आंगीं जर योग्यता असती तर पुरुषांनीं कोठपर्यंत तुह्मांस तुच्छ मानिलें असतें? पण तुह्मीं काय तीं भात भाकरी भाजण्यांत व फाटलें तटलेलें शिंवण्यांतच मोठेपणा समजतां तेव्हां जशी तुमची करणी तसें तुह्मांस फळ मिळतें यांत नवल नाहीं.

ह्मणून हे स्त्रियांनो, तुह्मीं पुरुषांचीं अंत:करणें आपल्याकडेस आकर्षण करून घ्या, त्यांच्या सर्व आयुष्यांत तुह्मीं आनंदाचें केवळ भांडारच आहां असें समजा. त्यांच्या डोळ्यांसमोर जगुकाय वसंत ऋतूंतील बाग अशा दिसा, त्यांस आनंद वाटविणाऱ्या आणि त्यांच्या दु:खास दूर करणाऱ्या अशा व्हा, जर पुरुषांच्या मोठमोठ्या कामांत तुमच्याकडून मदत मिळेल आणि तीं मोठीं कामें करण्याची योग्यता जर तुमच्या आंगीं येईल तर खरोखर पुरुष तुमची प्रतिष्ठा राखतील व तुह्मांस आपल्या गळ्यांतील ताईत करून ठेवतील यांत संशय नाहीं, कां कीं तुमच्याहून जास्त त्यांचा रघुवंश करणार व आनंद देणार, तुमच्याहून जास्त त्यांच्या कामांत सल्लामसलत देणार आणि तुमच्याहून जास्त त्यांचें कल्याण इच्छिणार आणखी कोणआहे? परंतु मोठीं कामें करण्याची आवड तुह्मांस कोठून असणार? घराच्या चौंहों वाजूंचे भिंतींनीं तुह्मीं कोंडलेल्या आहां. नाहीं कोणास भेटायाच्या

किंवा कोणाशीं बोलायाच्या, नाहीं कोणतेही गोष्टीची हौस किंवा नाहीं ज्ञान, जें पुरुष एकमेकांपासून संपादन करितात.

पुरुष लिहिणें वाचणें शिकून बुद्धि व ज्ञान संपादून घेतात आणि ज्यास लिहितां वाचतां येत नाहीं तेही हजारों तऱ्हेच्या मनुष्यांशीं मिळून दहाजणांपासून दहा प्रकारच्या गोष्टी ऐकून ज्ञान संपादन करितात. पण तुमच्या नशिबीं तर पडद्यांत बसून राहाण्याचें आलें आहे, त्यामुळें तुम्हांस स्वतंत्रतेची मुळींच आवड राहिली नाहीं. आमच्या देशच्या रीतिभातींनीं तर स्त्रियांस अगदीं गुलाम करून सोडिलेलें आहे. ह्यांपैकीं कित्येक रीतिभाती मोडून टाकण्याची सध्यांच्या कालमानाप्रमाणें फार मोठी जरूरी आहे आणि त्यांस लिहितां वाचतां शिकविणें हाच एक त्या मोडून टाकण्यास सुलभ उपाय होय. कारण तुमची बुद्धि व ज्ञान वाढवण्यास दुसरा उपायच नाहीं. एका अर्थानें पाहिलें असतां पुरुषांपेक्षां स्त्रियांस लिहिणें वाचणें शिकण्याची फार जरूरी आहे. पुरुष तर बाहेरचे हिंडणारे फिरणारे पडले तेव्हां ते लोकांशीं बोलून चालून ज्ञान संपादन करतील पण स्त्रिया घरांत कोंडलेल्या बसून करणार तें काय ? शिंवण्याचे चंचींतून बुद्धीच्या पुड्या काढणार किंवा धान्याच्या कोठारांतून ज्ञानाचें खाजें भरभरून आणणार ? काय तें नकळे. तर अहो स्त्रियांनो, वाचण्यास शिका कीं ज्यायोगें घरांत बसल्या बसल्या अनायासें साऱ्या पृथ्वीचें पर्यटन करूं शकाल. आणि असें ज्ञान व विद्या संपादन करा कीं जेणेंकरून आपल्या पूर्वजांच्या प्राचीन काळच्या गोष्टींची माहिती तुम्हांस होईल ! सारांश हा इतका वेळपर्येत तुम्हांस सांगण्याचा हेतू हाच कीं संसाराचें सुख ज्ञानावांचून नाहीं आणि

ज्ञान विद्येवांचून नाहीं. आतां हें स्पष्ट रीतीनें कळण्यास तुह्मांस एक मौजेची व मनोरंजक गोष्ट सांगतों कीं जीवरून अज्ञानदशेंत राहिल्यानें मनुष्यास कसकशीं संकटें भोगावीं लागतात हें स्पष्ट दिसून येईल.

ताराबाईची गोष्ट.

——ooo——

ताराबाई नांवाच्या एका व्रात्य मुलीचें लग्न बुद्धिवंत नांवाच्या तरूण मनुष्याशीं झालें होतें. त्या ताराबाईनें एक दोन वर्षें सुद्धां सासरीं गुण्यागोविंदानें राहून काढलीं नाहींत. लग्नास पुरतें वर्ष झालें नाहीं तोंच नवऱ्याशीं कट-कट करून रडगाणें सांगूं लागली कीं, "सासू व नणंदा यांजबराबर माझा निभाव लागणार नाहीं, तुह्मीं आपलें निराळें घर करा." त्यावर बुद्धिवंतानें ह्मटलें कीं, "तुझी घरांतील माणसांशीं जेव्हां तेव्हां बोलाचाली व भांडण तंटे मी पाहतों किंवा ऐकितों त्या सर्वांत तुझाच अपराध मला दिसून येतो. पेठेंत जे हलक्या प्रतीचे लोक राहतात त्यांच्या उनाड मुलीं शिवाय तुला एक क्षण सुद्धां चैन पडत नाहीं इतकें त्यांचें तुला वेड लागून गेलेलें आहे. काळू हजामाची मुलगी सठवाय, सदू माळ्याची मुलगी गंगू व मल्हारी धोंडफोड्याची मुलगी साळू, ह्या सर्व रात्रंदिवस पाहिल्या तेव्हां तुजजवळ बसलेल्याच आहेत. ह्याची तुला काहींच लाज वाटत नाहीं? हे लोक आमच्या सोयरेसंबंधांतील, कीं यांच्याशीं आमचा व्यवहार, कीं कधीं उठणें बसणें, कांहीं तरी आहे? पेठेंतील सर्व लोक पहातों ते छीः थूः करितात व माझ्या आईस ह्मणतात कीं कसली

सून बाईनें आणिली आहे कीं जेव्हां पाहावें तेव्हां उनाड मुली जमवून धांगडाधिंगा घालीतच असते, काय आपले पेठेंत पंडित रामशास्त्री, शोभाचार्य उपाध्ये, धनाजीराव जाधव रिसालदार, त्रिंबकराव राजवैद्य इत्यादि लोक राहत नाहींत? या सगळ्या लोकांशीं आमचा घरोबा असून त्यांच्या मुली सूना आमच्या घरीं नेहमी येत जात असतात त्यांच्याशीं मी तुला कधीं चकार शब्दही बोलतांना पाहिलें नाहीं. म्हणून आईनें त्या उनाड मुलींबरोबर धांगडाधिंगा घालूं नको म्हणून तुला सांगितलें असेल त्यांत वाईट तें काय झालें!" यावर त्या आचरट मुलीनें म्हटलें कीं, "कोणा-चेंही प्रेम जडणें तें कळवळ्यावांचून जडत नाहीं. माझे मा-हेरीं आईचे शेजारीं देऊ माळीण म्हणून राहते तिची मु-लगी सखू माझे जिवाची फार मैत्रीण होती. लहानपणीं आम्हीं एकमेकांबरोबर खेळत असूं. एक वेळ मी आपल्या बाहुलीचें लग्न सखूचे बाहुलीबरोबर लाविलें होतें, सखू बिचारी फार भोळी होती, तिला मी आईस नकळतां घ-रांतील पुष्कळ वस्तू नेऊन देत असें; माझे आईनें मला अनेक वेळां धमकाऊन सांगितलें पण मीं सखूची मैत्री कधीं तो-डिली नाहीं." हें ऐकून बुद्धिवंत राग आल्यासारखें दाखऊन म्हणाला कीं, "तर मग तूं मोठे दिवे लावलेस! 'तेव्हां त्या खट्याळ बाईनें उत्तर दिलें कीं, "देवाची शपत, मीं तुम्हांस सांगतें कीं मजबरोबर बोलायाचें असलें तर आपलें तोंड सां-भाळून बोला; नाहीं तर मी आपलें कपाळ आपटून जीव देई-न." असें म्हणून आपल्या आईबापांस श्राप देऊन मोठ्यानें रडूं लागली आणि म्हणाली, "अरें देवा! ह्या मेल्या आईबा-पांचा सत्यानाश होवो, मेल्यांनीं मला असल्या चांडाळाचे

घरीं दिलें, काय माझें प्रारब्ध हें ! माझ्या ओळखीचें येथें कोणी नाहींसें पाहून सर्वांनीं मला ठोमणे मारण्याचें सुरू केलें ना? देवा, अरे माझें एकदांचें मडें बाहेर काढ !" असें म्हणून गडबडां लोळूं लागली व लोळतां लोळतां चौरंगावर पानसुपारीचें तबक ठेविलें होतें तें रागाचे भरांत लाथ मारून खालीं पाडलें त्यामुळें त्यांतील सर्व कात व चुना खालीं सतरंजीवर पसरला व रंगवलेली पासोडी घडी करून पायांशीं ठेविली होती तिला चुना लागतांच तिचा रंग उडून गेला. तबक पडल्याचा आवाज ऐकतांच समोरचे दालनांतून सासू धांवत आली. बुद्धिवंतानें आई आपल्याकडे येत आहे असें पाहतांच दुसरे दरवाज्यानें नाहींसा झाला व मनांत म्हणूं लागला, "किती तरी मी मूर्ख कीं चिखलांत दगड टाकून शिंतोडे आंगावर घेतले." सासूनें येऊन पाहिलें तों चार पैशांचा चुना जो नुकताच आणून साफ निवडून चुनाळांत भरून ठेविला होता तो सर्व सतरंजीवर अस्ताव्यस्त पडला आहे व पासोडी तर त्यांत अगदीं ओली चिंब होऊन गेलेली आहे व सून धूम रडत आहे असें पाहून नवराबायकोंत कांहीं तरी खटपट झाली असेल असें समजून सुनेला पोटाशीं धरली व मुलावर फार रागावली. सासूस इतका प्रेमाचा पाझर आलासें पाहून "आधींच नाचरी आणि तिचे पायांत बांधिली घागरी" असें होऊन ती अधिकाधिक रडूं लागली. सासूनें बावा पुता करून पुष्कळ समजाऊन सांगितलें पण त्या कजाग बायकोवर कांहीं एक ठसा उमठला नाहीं. शेजारच्या बायका रडण्याचा कल्होळ ऐकून धांवत आल्या त्या येथपर्यंत कीं काळू हजामाची मुलगी सठवाय हिला ही बातमी लाग-

तांच तिणें तारेच्या माहेरीं जाऊन "पिसाचा कावळा" ह्मणतात त्याप्रमाणें एकाचीं चार करून सांगितलीं. तारेची आईही "यथा कन्या तथा माता" याप्रमाणें फार तापट स्वभावाची बायको होती, ती कन्येचा वृत्तांत ऐकतांच तिच्या सासवेच्या घरीं बाणासारखी धांऊन आली आणि पुष्कळ शिवीगाळ व भांडणतंटा करून मुलीस बरोबर घेऊन घरीं आली. ही गोष्ट घडल्यावर कित्येक महिनेपर्यंत दोहोंकडचें येणें जाणें वगैरे सर्व कांहीं व्यवहार बंद पडला.

या अडाणी व कजाग मुलीचें नांव तिच्या स्वभावावरून सासरीं "कव्यादाबाई" असें पडलें होतें. ही मुलगी अज्ञान व तिर्सट स्वभावाची होती पण तिची धाकटी बहीण हिराबाई ही बुद्धिमान व शिकलेली असून फार चांगल्या स्वभावाची होती. लहानशा वयांत तिणें गुणाकार भागाकार शिकून व बाळमित्र, इसापनीति वाचून, रामविजयादि कित्येक ग्रंथही तिचे वाचण्यांत आले होते. लहितांही तिला येत असे ह्यामुळें घरचा सर्व मजकूर आपले बापास आठवड्याचे आठवड्यास पत्र पाठवून ती कळवित असे व बहुतेक सर्व प्रकारचे बारीकमोठे कपडे कापून ते तिला शिंवतांही येत असत. तसेंच सर्व जातीच्या पक्वान्नांचीही तिला बरीच माहिती होती. या तिच्या गुणांवरून पेठेंतील सर्व लोक तिची वहावा करीत असत. आईचे घरचा सर्व बंदोबस्त हिराबाईचे स्वाधीन असे व बाप जेव्हां रजा घेऊन घरीं येत असे, तेव्हां घरसंसाराचे सर्व व्यवस्थेंत तिचेंच अनुमोदन घेत असे. रुपये,पैसे, कोठार,पेटी, या सर्वांच्या चाव्या हिराबाईपाशींच असत. आई व बाप या उभयतांचा सर्व जीवप्राण तिजवर असे. हेंचसें काय, पण पेठेंतील सर्व

लोक तिजवर प्रीति करीत असत. हें पाहून तिची मोठी बहीण ताराबाई हिचें नेहमीं तिच्याशीं वांकडें असे. वेळेनुसार तिणें हिराबाईस एकांतीं पाहिलें म्हणजे, कांहींतरी खुसपट काढून मारण्यासही ती मागेंपुढें पाहत नसे. असें होतें तरी हिराबाई आपले वडील बहिणीचा मान ठेवीत असे व तिजविषयींची चहाडी आपले आईस कधींही सांगत नसे. या दोन्ही बहिणींची मागणी दैवयोगानें एकाच घरीं झालीं होतीं. बुद्धिवंत आणि सत्यवंत हे दोघे सख्खे भाऊ होते, त्यांत ताराबाईचा विवाह मोठा भाऊ बुद्धिवंत याजबरोबर झाला, हें मागें सांगितलेंच आहे. व हिराबाईची मागणी त्याचा धाकटा भाऊ सत्यवंत याजला होऊन साखर सुद्धां वांटून चुकली होती, काय तें लग्न मात्र व्हावयाचें राहिलें होतें. ताराबाईचे वाईट स्वभावामुळें सर्वांस उघडपणें दिसून येत असे कीं कसेंही करून एक वेळ हिराबाईची मागणी तुटो म्हणजे झालें; पण या मुलीची मावशी सत्यवंताचे घरा शेजारीं रहात असे, ती नेहमीं न मोडण्याविषयीं भर देत असे व मोठी पुतणी ताराबाई जरी भांडणतंटा करून माहेरीं निघून गेली होती तरी तिची पुष्कळ फजिती करून व उलटेंसुलटें समजाऊन दिपवाळीचे सणानिमित्त तिला परत घरीं आणून पोहोंचविलें. घरीं आल्यावर बुद्धिवंत आपल्या बायकोशीं रुसून राहिला; शेवटीं माऊस सासूनें मध्यस्थ होऊन नवराबायकोचा समेट करून दिला. पण कितीही झालें तरी एक वेळ नव्या उमेदींतील नवराबायकोच्या मनांत त्यांचे अल्लड स्वभावानुळें एकदां विकल्प गेला म्हणजे त्यांची कितीही प्रीति जमो पण मनांतील राहिलेली धुसधुस जेव्हां तेव्हां जरा तब्यत बिघडली कीं

लागलीच बहिर पडावयाची. एके दिवशीं असें झालें कीं बुद्धिवंतानें आपल्या एका मित्रास पाहुणचाराचे निमित्तानें घरीं बोलाविलें व त्याकरितां चांगलें चांगलें जेवण करण्यास आईस सांगितलें. त्यावर ती ह्मणाली कीं, "बाळा, मला जेवण करण्यास किती कष्ट पडतात ते ईश्वर जाणे. आज तीन दिवस झाले मला जेवणाचे वेळीं कांपरी भरून येते त्या वेळीं मला स्वतःची देखील शुद्धी राहात नाहीं. ती विचारी शेजारीण येऊन तेवढा स्वयंपाक तरी करून देते, देव तिचें कल्याण करो. तूं आमंत्रण करण्या पूर्वी मला विचारावयाचें तरी होतें, ह्मणजे कोणाचे तरी हातांपायां पडलें असतें." बुद्धिवंत आश्चर्ययुक्त मुद्रेनें आपले स्त्रीकडे पाहून मोठे कौतुकानें ह्मणाला, "हिला इतकेंही करितां येणार नाहीं काय ?" तारेस हें ऐकिल्याबरोबर धीर कुठचा? तिणें लगेच उत्तर दिलें कीं, " त्या थेरडे सासूबाईस विचारा कीं मुलाचें लग्न केलेंस कीं दासी विकत घेतलीस ? तुह्मींच पहा कीं वर्षाच्या सणावारीं घरीं कामकरीण असतां चुलींत तोंड घालून बसावें हें योग्य आहे काय ? बुद्धिवंतानें मनांत विचार केला कीं जर आतां कांहीं अधिक उणें बोलेन तर पहिल्याप्रमाणेंच घडून येईल. असें समंजून हिरमुसलें तोंड करून उगा राहिला आणि मेजवानीसाठीं कांहीं बाजारचें साहित्य विकत आणलें त्यामुळें हा प्रसंग तर पार पडला. परंतु बुद्धिवंतावर दुसरा एक प्रसंग आला, तो कोणता ह्मणाल तर दिपवाळीचा सण. त्या विचाऱ्या बुद्धिवंतानें दिपवाळीचे अगोदरच एक आठवड्यापासून क्रव्यादाबाईच्या चोळीलुगड्याची तयारी चालविली होती. आज कोठें पैठणी शालू आण, उ-

द्यां कोठें आमदाबादी काळी चंद्रकळाच आण याप्रमाणें दररोज कांहींना कांहीं तरी तऱ्हतऱ्हेच्या रंगीबेरंगी साड्या चोळ्या व काश्मिरी शाली तो आणीत असे पण त्यांतून एकही त्या क्रव्यादाबाईस पसंत पडत नसे. शेवटीं दिपवाळीस एक दिवस बाकी राहिला तेव्हां निरूपाय होऊन तारेच्या मावशीच्या एथें गेला तों तिचें दार बंद आहे असें पाहून बाहेरून हांक मारिली. जांवयाचा शब्द ऐकतांच घरांतून माऊससासू धांवत आली आणि तिनें दार उघडून बुद्धिवंतास दिवाणखान्यांत नेऊन बसविलें व पानाचा विडा करून देऊन इकडचा तिकडचा क्षेमसमाचार विचारल्यावर ताराबाई खुशाल आहेना म्हणून विचारिलें.

बुद्धिवंत—मामी काय सांगूं आपली पुतणी मोठी चमत्कारिक तऱ्हेची बायको आहे. माझा तर तिणें नाईलाज करून सोडिला. हिचे रंग ढंग, बोलणें चालणें, पाहातों तर सगळेंच उलटें. यास करावें तरी काय ? मामी, खरेंच सांगतो कीं माझा तर आतां निरूपाय झाला.

सासू—बाबा हें कांहींएक मनांत आणूं नको. सध्या पोरस्वभाव आहे, उद्यां मुलेंबाळें होऊन संसाराचें ओझें डोईवर पडलें म्हणजे आपोआप स्वभाव बदलेल. आणि पहाशील तर खरा आतां हंसणारांचे पुढें कसे दांत पडतील ते ? बाबा ईश्वरानें तुम्हांस काय कमती केलें आहे ? मेले हंसून मौज पहाणारे पुष्कळ आहेत पण त्यांत अब्रू कोणाची जाते हेंही पाहिलें पाहिजेना ?

बुद्धिवंत—मीही असेंच समजून आज बहुत दिवसांपासून एकसारखा कानाडोळा करीत आलों. मामी, आतां तुम्हींच पहा कीं उद्यांपासून दिपवाळी सुरू झाली, तर तिणें

अझून काय बांगड्या भरल्या आहेत, कीं आपली चोळी शिंवून ठेविली आहे, कीं परवां लुगडीं आणिलीं आहेत त्यांतून एखादें पसंत केलें आहे? कांहीं तरी आहे? मात्र भुतासारखी होऊन स्वस्थ बसली आहे. तुम्ही जरा तेथवर येऊन तिला समजाऊन पहाल तर बरें. मी तर सांगून सांगून दमलों. त्याचप्रमाणें आईनेंही पुष्कळ विनवणी केली पण एकनादोन.

सासू– बरें, जरा थांबा, कारण उद्यां सकाळीं आंघोळीनंतर फराळ करावयाचा त्याचें सामान आणण्याकरितां ते (यजमान) बाजारांत गेलेले आहेत त्यांला येऊं द्या ह्मणजे मी त्यांस विचारून तुह्मांबरोबरच येतें.

इतक्यमाध्यें तिचा नवरा बाजारांतून आल्यावर ती बुद्धिवंताबरोबर त्याच्या घरीं गेली आणि कांसार बोलाऊन ताराबाईस बांगड्या भरल्या व आणलेल्या खणांतून तिजकडून पसंत करवून त्याची तिचे आंगाचीं चोळी कापली आणि घाईचें काम होतें ह्मणून सर्वजणीं मिळून शिंवावयास बसल्या.

मावशीनें तारेस ह्मटलें कीं, "मुली ही घे तूं हातास कळी लाव व तुझी सासू तोंपर्यंत दुसरे हातास जरीची फीत लावील. मी इकडे मान जोडून त्यावर टीप घालतें" असें ह्मणून सर्वजणी शिंवायास लागल्या. थोडक्या वेळानें तारेनें दोन्ही हातास कळ्या लावल्या व मोठ्या डौलानें मावशीस ह्मटलें, "पहा मावशे, तुझी अर्ध्या मानेवर टीप घालून झाली नाहीं तोंच मी दोन्ही हातास कळ्या लावून टाकल्या." हें ऐकून मावशीस मोठें आश्चर्य वाटलें व पहाते तों जरीची फीत लावलेल्या ठिकाणापासून कळ्या उलट्या जोडल्या आहेत! पण करते

काय? तारेची सासू जवळ असल्यामुळें ती कांहीं एक बो-लली नाहीं. पण हळूच दोनचार चिमटे अशा जोरानें घेतले कीं तारेच्या डोळ्यांत आसवें भरून आलीं. आपण कांहीं चूक केली आहे असें तारेस वाटून तिनें आपल्या शिवण कामाकडे पाहिलें तों ती चूक सहज लक्षांत आली. मग तिनें आपलें शिंवलेलें पुन्हां सर्व उसवलें आणि मावशीनें दाखविल्याप्रमाणें कळ्या लावूं लागली. कळ्या लावल्यावर मावशी पहाते तों सर्वांत अगदीं चूण आलेली आहें, हें पाहून तिच्यानें तर मुळींच राहवेना ह्मणून तारेच्या सासचा डोळा चूकवून खुप जोरानें हातास सुई टोंचली आणि तिनें शिंवलेलें सर्व उसवून आपण शिंवूं लागली. ह्याप्रकारें जसें तसें करून वरीच रात्रपर्यंत तारेची चोळी तयार केली. रात्र फार झाली असें पाहून तारेची मावशी आपले घरीं निघून गे-ली आणि घरांतील सर्व मंडळी आपापल्या बिछान्यांवर जाऊन निजली. दुसरे दिवशीं नरक चतुर्दशी असल्यामुळें केव्हां उजाडेल आणि आपण केव्हां फराळ करूं या विवंचनेंत मुलांस सारी रात्र नीट झोंप आली नाहीं. मोठी पहांट होतांच तीं सारींजणें उठलीं व कोणीं तेल-उटणें आंगास लावण्यासाठीं घाई करूं लागलीं, कोणी आपल्याच हातानें तेलउटणें आंगास लावून स्नान कर-ण्यास गेलीं व स्नान करून आल्यावर कारिंठें फोडून उंच स्वरानें "गोविंदा! गोविंदा!!" ह्मणूं लागलीं, कोणी फटाके लावूं लागलीं, असा सर्वांनीं एकच गोंगाट मांडिला. बुद्धिवंतही अरुणोदय होतांच उठून तेल उटणें लावून अ-भ्यंग स्नानास गेला व स्नान करून आल्यावर पहातो तों सर्व मुलें स्नान करून व मंगल वस्त्रें परिधान करून फरा-

ळाची वाट पहात बसलीं अहेत. पण क्रव्यादाबाई तर नेहमीप्रमाणें आपले बिछान्यावर हातपाय ताणून मोठ्यानें घोरत पडली आहे असें पाहून बुद्धिवंत आपली धाकटी बहीण शांताबाई हीस हांक मारून म्हणाला, "शांते, जा तिला जागी कर." हें ऐकतांच शांताबाई जरा मनांत दचकली, कारण कीं या क्रव्यादाबाईला ती फार भीत असे. लग्न झाल्यापासून एक दिवसही ती आपले धाकटे नणंदेबरोबर गोडीगुलाबीनें बोलली अथवा तिची वेणीफणी केली किंवा आपल्या बरोबर कोठें नेलें असें झालें नाहीं. पण बापडी करते काय, भावाची आज्ञा तिला मोडवेना. तशांत वर्षाचा सणाचा दिवस असल्यामुळें मोठ्या आनंदानें धांवत धांवत जाऊन हांक मारूं लागली "वहिनी, गे वहिनी, ऊठ, चल स्नान कर" वहिनीचें तोंड काय विचारतां ! तिनें उठतांक्षणींच शांताबाईचे थोबाडांत फाडकन मारलें. त्यासरशी शांताबाई मोठ्यानें रडूं लागली. बुद्धिवंत बाहेर उभा होताच त्यानें तो रडण्याचा स्वर ऐकतांच धांवत खोलींत आला व शांताबाई रडत आहे असें पाहून तिला कडेवर उचलून घेतलें व कां रडतेस म्हणून विचारलें. शांताबाईनें रडत रडत उत्तर दिलें कीं, "वहिनीनें मला मारलें." क्रव्यादाबाई म्हणाली, "पहा काय तरी लबाड, आपण धांवतां धांवतां पडली आणि माझें उगाच नांव घेते, मी म्हणजे अगदीं कानफाटीच झालें ? " हें ऐकून बुद्धिवंतास पराकाष्ठेचा राग आला पण करतो काय वेळेकडे लक्ष्य देऊन उगा राहिला व शांताबाईस बाबपुता करून उगें केलें व आपले बायकोस म्हणाला, "बरें चल ऊठ, स्नान करून आपलें चोळीलुगडें नेस, दिवस पहा किती वर आला तो. मला बाजारां-

तून फराळाचें सामान आणावयास उशीर झाला." क्रव्यादाबाईनें नाक मुरडून आणि मान हालवल्यासारखें करून झटलें, "मी एवढ्या मोठ्या पहांटेस आणि तशांत अशा कडक थंडीच्या वेळेस न्हाणार नाहीं, तुम्ही बाजारांत जाणार तर जा बापडे; माझा काय खोळंबा झाला आहे ? मी कोणास बांधून ठेविलें नाहीं." बुद्धिवंतास हा रोकडा जवाब ऐकून फार दुःख झालें. अशी ही क्रव्यादाबाई आपल्या नवऱ्याचें मन नेहमीं खिन्न करीत असे. एक दिवस सुद्धां तिनें आपले नवऱ्याबरोबर हंसून खेळून आनंदांत घालविला असेल अशी कांहीं आठवण नाहीं. इतक्यांत बुद्धिवंतास आईनें हांक मारून झटलें, "बाळा, बाजारांत जाऊन फराळासाठीं दूध व केळीं आण; तोंपर्यंत मी इकडे दुसरी तयारी करितें." बुद्धिवंत झणाला, "बरें आई पैसे दे झणजे जाऊन आणतों. पण मी बाजारांतून येईपर्यंत जर ही स्नान वगैरे करून नवी चोळी लुगडें नेसली नाहीं तर सर्व कपडे चुलींत घालून जाळून टाकीन." असें झणून आईनें दिलेले पैसे घेऊन फराळाचें सामान आणण्यास बाजारांत गेला.

मुलाचा स्वभाव फार तापट आहे. अगोदर त्यास कधीं राग येत नाहीं आणि एकवेळ आला झणजे मग त्याचें डोकें ठिकाणावर लौकर येत नाहीं हें आईला पक्कें माहीत होतें, झणून कदाचित् झटल्याप्रमाणें खरोखरच कपडे जाळून टाकील असें वाटून ती घाई घाईनें सुनेपाशीं गेली आणि झणाली, "हें बघ, तुला देवाची शपथ आहे, अशा सणावाराचे दिवशीं तरी हट्ट करूं नको. चल ऊठ, न्हा आणि आपलें नवें चोळी लुगडें नेस."

ऋव्यादा०—नाहीं सासूबाई, मीं अशा थंडीचे वेळीं न्हात नाहीं. आणखीं जराशी थांबून नंतर न्हाईन.

नंतर सासूनें पुष्कळ विनवणी करून एकदाचें सुनेला उठविलें आणि तीस न्हाऊं घालून वेणी फणी करून बुद्धिवंत येण्यापूर्वी तिची नीट समजूत केली. बुद्धिवंत हें पाहून फार खूष झाला. आणि मग सर्वजण मिळून एका ठिकाणीं फराळास बसलीं. फराळ आटोपल्यावर बुद्धिवंतानें वाड्याचे समोरील चौकांत त्या दिवशीं मोठा वार्षिक मेळा जमला होता तेथें जाण्याची तयारी केली आणि जातेवेळीं शांताबाईस विचारलें " शांते, तुला मेळ्यांतून काय काय आणूं ?"

शांताबाई— दादा, दोन चांगल्याशा रंगीत फळ्या माझीं पुस्तकें बांधण्याकरितां, आणि दवूत लेखण्या ठेवण्याकरितां एक लहानसें कलमदान आण ह्मणजे झालें.

ऋव्यादाबाई— (जवळ उभी होतीच ती कोणी विचारल्याशिवाय आपणच होऊन बोलली) आणि माझ्यासाठीं ?

बुद्धिवंत— तुम्हीं जें सांगाल तें आणीन.

ऋव्यादाबाई— वरें तर चांगलीं कोंवळींशीं मक्याचीं कणसें, सिंगाडे, अमदाबादी बोरें, चांगले भाजून फुलविलेले विलायती वाटाणे, एक ढोलकी आणि एक लहानशी खंजेरी आणा ह्मणजे पुरे.

बुद्धिवंत— (हें ऐकून किंचित् गालांत हंसून) सगळें खरें पण ढोलकीचें आणि खंजेरीचें काय करशील ?

ऋव्यादा०— काय करीन ह्मणजे; वाजवीन. आणखीं दुसरें काय करावयाचें आहे ?

बुद्धिवंत मनांत समजला कीं या मूर्ख बायकोचा पोरस्वभाव अद्याप गेला नाहीं. इला पोरांप्रमाणें खाणं आणि

खेळणें यांशिवाय दुसरें कांहीं सुचत नाहीं. ह्मणून तिणें नवे कपडे नेसल्यापासून बुद्धिवंतास जो आनंद झाला होता तो सर्व नाहींसा झाला, आणि उदास होऊन मेळ्यास जावयास निघाला. तो पाठमोरा झाला नाहीं तोंच क्रव्यादावाईनें नवीन एक लचांड उभें करून सासूस ह्मणाली, "मला आपले आईचे घरीं जावेंसें वाटतें सबब माझ्यासाठीं एक डोळी मागवा."

सासू— काय? ही माहेरीं जाण्याची वेळ? चार महिने माहेरीं राहून आल्याला आज आठ दिवसही झाले नाहींत आणि तशांत आज पहिलाच सणासुट्टीचा दिवस असतां त्वां माहेरीं जावें हें मला तर नीट वाटत नाहीं.

क्रव्यादा०— सासूबाई, आज किनई माझा जीव फार कासावीस होतो. माझे मनास कुठेंच चैन पडत नाहीं. मला माझी मैत्रीण देवू माळणीची मुलगी सखू हिची आठवण होते.

सासू— खरेंच आहे तें. कोणाचें एक वेळ मनास मन मिळालें ह्मणजे जसें सखूविषयीं तुझें मन हावरें झालें आहे तसेंच सर्वांस होतें. जर तुझ्यानें इतकें राहवत नसेल तर त्या सखूस च इकडे बलावत्यें ह्मणजे झालेंना!

क्रव्यादा०— काय पण मोज्या बोलावणाऱ्या! बोलवावयाचें असतें तर कालच बोलावून तिला माझे बरोबर बांगड्या नसत्या भरल्या?

सासू— तुला तिची अशी एकाएकीं आठवण होऊन प्रेमाचा हुंदका येईल हें मला काय बरें माहीत?

क्रव्यादा०— पुरेपुरे सासूबाई. असला वितंडवाद करून काय फळ! डोळी मागविणें असेल तर मागवा, नाहीं तर मीं सटवायचा बाप काळू न्हावी याजकडून मागवितें.

सासू— अग ! तुझी अक्कल गेली कोणीकडे ? तूं नव-ऱ्यास विचारल्याशिवाय आपण होऊन चाललीस हें काय ? तुझ्या नवऱ्याला विचारल्याशिवाय तुला पाठवूं आणि जनांकडून मी आपली फजिती करून घेऊं ?

क्रव्यादा०— (धिक्कारून) कसला नवरा आणि कसलें विचारणें ? कोणी आपल्या आईबापांला दिवाळीसारख्या सणाच्या दिवशींही भेटण्यास जाऊं नये ? (असें म्हणून काळू हजामाकडून डोळी मागवून माहेरीं चालती झाली).

थोडक्या वेळानें बुद्धिवंत मेळ्यांतून घरीं आला व दाराशीं येतांच स्त्रीस मोठ्यानें हांक मारून म्हणाला, " अग ही तुझी ढोलकी व खंजेरी घे, आणि बैस वाजवीत." पण घरांत येऊन पहातो तों सर्व स्तब्ध बसलीं आहेत. तेव्हां घाबरा होऊन आईस विचारूं लागला, "असें काय ? काय झालें ? सगळीं बरीं आहेतना ? " शांताबाई म्हणाली, "दादा, वहिनी गेली." हें ऐकतांच बुद्धिवंताची तर पायांची आग मस्तकीं गेली आणि म्हणूं लागला, "कां गेली ? कुठें गेली ? कशासाठीं जाऊं दिलें ?"

आई— बाळा, हें पहा घरांत उगाच बसली होती आणि एकाएकीं म्हणाली कीं मी आपले आईचे घरीं जातें. मी पुष्कळ समजावून नको जाऊं म्हणून सांगितलें, पण तिनें कांहीं ऐकिलें नाहीं. काळू न्हाव्याकडून डोळी मागवून चालती झाली. आणि याप्रमाणें मला रडत ठेवलें.

हें ऐकतांच बुद्धिवंताच्या आंगाचा तिळपापड झाला व आतांच सासुरवाडीस जाऊन त्या कजाग बायकोस शिक्षा करावी अशा हेतूनें घरा बाहेर पडला. त्याचा हेतु लागलाच आईच्या लक्षांत येऊन ती त्यास मागें परतण्याबि-

षयीं हांका मारूं लागली. तो ऐकलें न ऐकिलेंसें करून पुढें चालला. तें पाहून ती म्हणाली " शाबास बाळा शाबास. अरे, मी तुला हांका मारित्यें त्या तूं ऐकतोस पण मागें परतत नाहींस! वाः कलियुगांत आईबापांचा थोरपणा मुलांनीं काय पण ठेविला आहे!" हें ऐकतांच बुद्धिवंत माघारा फिरला.

आई— बाळा, तूं इतक्या घाईने कोठें चाललास? अरे, तुला मेळ्यांतून आल्यास पांच मिनिटेंही झालीं नाहींत आणि इतक्यांत कोठें चाललास? मरेना ती कैदाशीण! तुझा सोन्यासारखा जीव मात्र उन्हांत कासावीस होईल.

बुद्धिवंत— आई, मी कोठें जात नाहीं. मुंबईहून आपल्या शहराची दिपवाळी पाहण्याकरितां एक मित्र आलेला आहे त्यास भेटण्याकरितां शेजारच्या घरीं जातों.

आई— अरे बाळा, माझे केस पांढरे झाले आहेत वरें? हे तुझे छक्केपंजे माझ्यासमोर चालावयाचे नाहींत. तूं म्हणतोस कीं मी शेजारीं मित्रास भेटण्यास जातों. जर शेजारीं जातोस तर तेथें शिलेपोस कशास पाहिजेत? जा जाऊन आंगरखा व पागोटें काढून ठेव.

आईनें असें म्हणतांच बुद्धिवंत टंगळमंगळ करूं लागला. असें पाहून तिणें त्याचा हात धरून खालीं आपले जवळ बसविलें आणि त्याचे डोक्याकडे पाहून म्हणाली, " अरे, मेळ्यांत जाऊन आल्यानें घाम येऊन तुझे केंस अगदीं ओलेचिंब झाले आहेत, आणि तशांत रस्त्यांतील धूळही उडाली आहे म्हणून या उशीवर अंमळ डोकें टेंक, म्हणजे फणीनें विंचरून साफ करित्यें. बुद्धिवंतानें आईचे

सांगण्याप्रमाणें डोकें टेंकलें. इकडे शांताबाईनें आपल्या भावानें उशीवर डोकें टेंकलेंसें पाहून पंखा घेऊन त्यास वारा घालूं लागली. बुद्धिवंतास मेळ्यांत जाऊन आल्यानें फार श्रम झाले होते ह्मणून व त्यास पंख्याचे थंड वाऱ्याची झुळूक आणि आईचें प्रेमानें डोकीवरून हात फिरवणें यांच्या योगानें लौकरच गाढ निद्रा लागली. कांहीं वेळानें जागा होऊन पाहतो तों सूर्य अस्तमानास जात होता आणि याचा रागही शांत झाला होता. बुद्धिवंत जागा झालासें पाहून आई ह्मणाली.—" बाळा, जा हात तोंड धू आणि फराळ करून ये; ह्मणजे तुला एक काम सांगतें." बुद्धिवंत फराळ करून आल्यावर त्यास आई ह्मणाली, "आतां आंगरखा पागोटें घालून सासुरवाडीस जा; पण तेथें कांहीं कमजास्त बोलशील तर माझ्या गळ्याची आण आहे."

बुद्धिवंत— तर मग मी मुळीं जातच नाहीं.

आई अरे बाळा, हें बोलणें तुला शोभतें? अरे, सासुरवाड कोणाची तुझीच ना? तूं न गेलास तर कोणाला पाठवूं हें तूंच सांग बरें. चल, हा घे एक रुपया, तो तुझी मेहुणी हिराबाई हिच्या हातीं दिपवाळीच्या मिठायीसाठीं दे आण ही अधेली तुझ्या माऊससासूचा मुलगा उमाकांत याचे हातीं दे, आणि तूं बाजारांतून आणलेलीं खेळणीं, फटाक्यांच्या पेट्या व मिठाई यांतील कांहीं एका टोपलींत घालून ठकी मोलकरणीच्या डोईवर घेऊन जा आणि सासरच्या मुलांस वाटून दे. पण सांभाळ, कांहीं अधिकउणें बोलशील तर.

बुद्धिवंत— आणि आई, ती ढोलकी व खंजेरीही घेऊन जाऊं?

आई— जा घेऊन बापडा, पण सांगितलेलें लक्षांत ठेव. बुद्धिवंत सासुरवाडीस जाऊन पोहोंचला. घरांत ताराबाई ही आपल्या मैत्रिणी जमवून धांगडधिंगा घालीत होती त्याची ओरड थेट गल्लीच्या नाक्यापर्यंत ऐकूं जात होती. पहिल्यानें ठकी घरांत गेली ती हिराबाईनें दुरून आंत येतेशी पाहून हळूच हांक मारून आपले बहिणीस म्हटलें, "अगे आका, तुमचा खेळ जरा बंद करा पाहूं. ही तुझे सासऱ्याहून मोलकरीण आली आहे." ठकी आंत जाऊन तिनें बुद्धिवंतास येण्याविषयीं सूचना केली. बुद्धिवंत आंत जाऊन पहिल्यानें सासूचे पायां पडला, तेव्हां सासूनें "चिरंजीव हो" असा आशीरवाद दिला. हिराबाईही आपला पदर सरसाऊन खोलीचे बाहेर आली आणि मोठ्या नम्रतेनें आपल्या मेहुण्यास "कसें काय, कुशळ आहेना?" म्हणून विचारिलें. हिराबाईस बुद्धिवंतानें उचलून मांडिवर घेतलें आणि आईनें दिलेला रूपया काढून तिला देऊं लागला. तेव्हां हिराबाई आईचे तोंडाकडे टकमक पाहूं लागली, तें पाहून आई म्हणाली, "घे मुली घे. तुझा मेहुणा दिवाळीची मिठायी देत आहे." हिराबाईनें रूपया घेतला आणि मांडीवरून उठून पलीकडे जाऊन बसली. मग थोड्या वेळानें तिनें आईचे सांगण्यावरून कणारांगोळा घालून पाट व तांब्यापंचपात्री मांडून ठेविली आणि एका ताटांत शेवयांची खीर, मोतीचूर लाडू, अनारसे, जिलब्या वगैरे पक्वान्नें घालून पाटापुढें आणून ठेवलें. तेव्हां सासूनें बुद्धिवंतास म्हटलें, "उठा, हातपाय धुऊन थोडा फराळ करा."

बुद्धिवंत— नको नको सासूबाई, येवढे श्रम नकोत. मीं

मेळ्यांत गेलों होतों तेथें उशीर लागल्यामुळें हा मुक्काच घरीं फराळ करून आलों.

सासू—फराळ केला ह्मणून काय झालें? ठेवलें आहे त्यांतलें पाहिजे तेवढें खा आणि बाकीचें राहूंद्या. चला उठा.

असें ह्मटल्याबरोबर सासूच्या भिडेस्तव बुद्धिवंतानें उठून हातपाय धुतले आणि फराळास जाऊन बसला. इकडे फराळ होई तों पर्यंत हिराबाईनें चांगल्या पिकलेल्या पानांचा लवंग वेलची वगैरे घालून मेहुण्याकरितां खानदार विडा करून ठेविला. फराळ आटोपून थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर बुद्धिवंत ह्मणाला,—"सासूबाई, आतां मी निरोप घेतों."

सासू—संध्याकाळ होत आला आतां कोठें जातां? येथेंच निजा ह्मणजे झालें.

बुद्धिवंत—नाहीं सासूबाई. आज दिपवाळीचा पहिलाच दिवस आहे तेव्हां आल्यागेल्याचा समाचार घेतला पाहिजे व कोणास कांहीं भेट वगैरे पाठविणें राहिली आहे कीं काय हें पाहिलें पाहिजे. तशांतून रहाण्याविषयीं आईस विचारून आलों असतों तर ती गोष्ट निराळी होती.

सासू—भेटी पाठविण्यास तर आतां वेळ राहिला नाहीं; कारण संध्याकाळ होत चालली. आणि भेटी वगैरे पाठविणें हें तुमच्याच साठीं अडून राहील असें नाहीं कारण आमच्या विहीणबाई सगळ्या घरांत आहे ; आणि (गालांत हंसून) आतां तुम्हीं कांहीं आंगावर पीत नाहीं. तर्मी राहिलां असें ठकी जाऊन सांगेल ह्मणजे झालं.

सारांश, बुद्धिवंतानें पुष्कळ ओढेवेढे घेतले पण सासूनें कांहीं चालूं दिलें नाहीं, तेव्हां निरुपाय होऊन बुद्धिवंतास

राहणें भाग पडलें. जेवणखाण आटपेपर्यंत चार प्रहर रात्र गेली. नंतर हिराबाईनें भांडींकुंडीं उजळून अस्ताव्यस्त पडलेल्या वस्तू जागचे जागीं नीट लावून ठेविल्या, वाड्याच्या फाटकाची दिंडी लावन घेतली आणि कोठाराचे खोलीस कुलूप लावून त्याची चावी आईचे स्वाधीन केली. नंतर स्वयंपाकघरांतील व दिवाणखान्यांतील दिवे मालवून आपले आईस, अक्कास व मेहुण्यास पानाचे विडे करून दिले आणि मग आपले खोलींत जाऊन स्वस्थ निद्रा घेती झाली.

सासू— (बुद्धिवंताकडेस वळून) ह्मणाली,—तुह्मां नवराबायकोंत आल्यादिवसा भांडणें तंटे होतच असतात हें काय? मेले तारेस तर अशी वाईट संवय लागून गेली आहे कीं सासरची गोष्ट तिचे तोंडांतून कधीं चुकूनही येत नाहीं. नाहीं तर मेल्या लोकांच्या मुली जरा कांहीं सासरीं झालें कीं लागल्याच माहेरीं येऊन सांगतात पण हिलाच तेवढी न सांगण्याविषयीं ईश्वराकडून शपथ आहे कीं काय कोण जाणे. मेली ही कांहीं सांगेल ह्मणून विचारतां विचारतां तोंड सुद्धां थकून जातें पण हिच्या तोंडांतून हूं देखील निघत नाहीं. पण पेठेंत नेहमीं चर्चा चालून हिच्या सासरीं काय होतें तें आह्मांस घरीं बसल्या ठिकाणीं आपोआप समजतें.

याप्रमाणें सासूचें बोलणें ऐकतांच बुद्धिवंत थोडा वेळ विचारांत पडला आणि लज्जेमुळें तोंडांतून एक शब्दही त्याच्यानें काढवेना, पण मनांत ह्मणतो, हा योग फार दिवसांनीं घडून आला आहे, आणि यांणीं आपण होऊनच गोष्ट काढली आहे तेव्हां कांहीं न बोलतां मुकाट्यानें रहावें हें ठीक नाहीं. बेहत्तर आहे कीं साऱ्या जन्माच्या दुःखाचा आजच उलगडा करूं. कदाचित् आजचे

भाषणांत पुढें काय तजवीज करावी याचा रोंख तरी कळून येईल. असें ह्मणून मनाचा मोठा धीर करून लाजत लाजत ह्मणाला, "ती येथेंच आहे, तिला विचारा कीं आमचे घरीं तिला काय दुःख सोसावें लागतें ? तिला कोणत्या गोष्टीची कमताई किंवा उणीव आहे हें तर सांगूं द्या; किंवा हिच्या बरोबर कोणी कधीं भांडलें झगडलें किंवा कांहीं तरी बोललें आहे काय? तुह्मांस माहीत आहे कीं आमच्या घरीं ईनवीन तीन माणसें. पैकीं आई किती सोसीक व साध्या स्वभावाची आहे याविषयीं सगळी पेंठ साक्ष देत आहे. तिला आजन्मांत कोणाबरोबर भांडणाचा प्रसंग ह्मणून कसा तो माहीतच नाहीं. जरी कोणी कितीही लावून बोललें तरी त्यास प्रत्युत्तर न देतां तिणें उगेंच रहावें. माझा धाकटा भाऊ सत्यवंत तर सारा दिवस लिहिण्यावाचण्यांत गुंतलेला असतो. तो सकाळीं बाहेर जातो तो संध्याकाळीं दिवे लावणीस घरीं परत येतो. आला जेवला कीं नीट आपले निजावयाचे खोलींत. मी आज दिवसपर्यंत त्याला हिजबरोबर कधीं बोलतां किंवा चालतां पाहिलें नाहीं. शांताबाईस तर हिला पाहिल्याबरोबर थरकांप सुटतो. आतां बाकी राहिलों मी, तो हा येथें हजर आहें. तर मजविषयीं जें कांहीं गाऱ्हाणें असेल तें बेलाशक न भितां सांगूं द्या.

साधू— (आपले कन्येकडे वळून) मुली, तुझ्या मनांत जें कांहीं असेल तें स्पष्ट सांगून टाक पाहूं. गोष्ट मनांत ठेवल्यानें चांगलें होत नाहीं पण उलटें त्यापासून जास्त दुःख व त्रास मात्र होतो.

जरी ताराबाई कुभांड रचण्याविषयीं मोठी बहादर बाय-

को होती तरी नवऱ्याच्या समक्ष कुभांड रचाव्यास तिची छाती होईना तेणेंकरून ती मनांतल्यामनांत धावरून गेली. तिला वाटलें कीं मी आजपर्यंत सासरच्या माणसांच्या हजारों चहाड्या तिखटमीठ लावून आईस सांगितल्या आहेत, त्या सर्व आतां बाहेर पडतील. ह्मणून ही गोष्ट अजिबात उडवून टाकावी या हेतूनें इतकेंच ह्मणाली, "तें कांहीं असो; मी आपली निराळी रहाणार."

सासू—(जांवयाकडे वळून) बरें मी विचारल्यें, तुह्मांला निराळें घर करून रहावयाला काय अडचण आहे? आज ईश्वरकृपेनें सर्व कांहीं गोष्टी तुह्मांस अनुकूळ आहेत. स्वतःला चाकरी असून पोटापुरते चार पैसे मिळवीत आहां कोणतेही गोष्टीनें ह्मणजे आईबापांवर तुमचा भार आहे असें नाहीं. आपली कमाई आणि आपला खर्च असें असून दुसऱ्याचें शेंपूट धरून राहाण्यांत काय अर्थ! आईबाप, बहीणभावंडें कितीही जिवाचीं असोत पण जें सुख निराळें राहिल्यानें होतें तें आईबापांजवळ राहिल्यानें कधींही व्हावयाचें नाहीं; निराळें राहिलें ह्मणजे मनास वाटेल तें शिजविलें व खालें. जरा विचार करा ह्मणजे तुह्मांस समजेल कीं आईबापांचे येथें राहून लाखो रुपये कमाविले तरी नांवलौकिक नाहीं. लोकांस काय ठाऊक कीं तुह्मीं आपलें खातां, कीं आईबापांचें खातां तें?

बुद्धिवंत—सासूबाई, सुखाविषयींच जर ह्मणाल तर जें सुख सध्या आह्मांस मिळत आहे त्याची योग्यता निराळें राहिल्यावर आह्मांस लौकरच कळून येईल. सध्यां तर दोन्ही वेळां आयतें शिजलेलें खावयास मिळून बिनफिकीर रहावयास मिळतें. निराळें राहिलें ह्मणजे तांदूळ, डाळ, गहूं;

मीठ, भाजीपाला या सर्वांची काळजी करावी लागेल, आणि घर संसाराचा गाडा चालविणें हें लहानसान किंवा सोपें काम नव्हे हें तुम्हीं जाणतां; असें असतां बुध्या निराळें राहाणें यांत मला तर कोणतेही अर्थानें शहाणपण वाटत नाहीं. तुम्हीं म्हणालां कीं निराळें राहिल्यावर मनास वाटेल तें खावयास सांपडेल, तर हिला विचारा कीं कधीं कांहीं खावेंसें वाटलें आणि तें मिळालें नाहीं असें कधीं झालें आहे काय? हें खरें आहे कीं मोज्या कुटुंबांत अशी अडचण पडते. एकास नुसता डाळभातच आवडतो तर दुसऱ्याचें मिष्टान्नाशिवाय चालत नाहीं, तिसऱ्यास खिचडीच हवी असत्ये, चवथ्यास तळलेलीं वांगींच पाहिजेत, पांचव्याचें तिखट मीठच वैद्यानें वर्ज केलेलें असतें, याप्रमाणें दहाजणांचे दहा प्रकार असतात. पण आमच्या घरांत असा मोठा रगाडा आहे कोठें? कोणताही पदार्थ करा म्हणून सांगणारे आम्हीं आणि खाणारेही आम्हींच. याहूनही जर हिला एखादा पदार्थ खावासा वाटला, तर हिजें काय तो शिजवायास सांगावा हेंही आई अनेक वेळां सांगून चुकली आहे. हिलाच विचारा असें सांगितलें आहे कीं नाहीं तें? बरें, तिसरें तुम्हीं नांवलौकिकाविषयीं म्हणतां तर तेंही मला सयुक्तिक दिसत नाहीं; कारण एकत्र राहिल्यानें आपल्यास जर खरोखर सुख होत आहे तर लोक आपल्या मनांत कांहींकां समजेनात. आम्हीं आईबापांचेच आंगावर पडलों आहों असें लोकांनीं म्हटलें तर त्यांत अप्रतिष्ठा तीं कोणती? व त्याबद्दल वाईट काय म्हणून वाटावें? आईबाप कांहीं कोणी परकी नाहींत, उलटे सर्व प्रकारें आम्हांवर त्यांचे उपकार आहेत. म्हणजे त्यांणीं आम्हांस लहान पडलों आहों असें लोकांनीं म्हटलें तर त्यांत अप्रतिष्ठा तीं कोणती? व त्याबद्दल वाईट काय म्हणून वाटावें? आईबाप कांहीं कोणी परकी नाहींत, उलटे सर्व प्रकारें आम्हांवर त्यांचे उपकार आहेत. म्हणजे त्यांणीं आम्हांस लहान

हानाचें मोठें केलें, अन्नवस्त्र पुरविलें, विद्या शिकविली, दोन हातांचे चार हात केले, या सर्व प्रसंगीं आमची अप्रतिष्ठा झाली नाहीं, आणि आतांच आम्हीं त्यांच्याजवळ राहिलों तर त्यांत आमची अप्रतिष्ठा होईल म्हणतां हें कसें?

सासू– बाबा, असे जर सगळेच लोक तुमच्याप्रमाणें धर्मराज असते तर मग निराळें काय म्हणून होते? खरें म्हणाल तर मुलांनीं आईबापांपासून विभक्त रहावें हा एक सृष्टीचा नियमच आहे व त्याप्रमाणें परंपरा चालत आली असून तुम्हांसही तीच पुढें चालविली पाहिजे. आणि मला वाटतें जगांत अशी एकही बायको नसेल कीं जिचा नवरा स्वतः कमावीत असून ती म्हणजे सासू नणंदांच्या कचाटींत खुशीनें राहूं इच्छील.

बुद्धिवंत– सासूबाई, हें तुमचें म्हणणें मात्र कांहीं अंशीं खरें आहे कारण जर मुलें आईबापांपासून निराळीं न होतीं तर आज गांवांत इतकीं घरें होतीं ना. तथापि माझे स्थितीचे मानानें पहातां मला निराळें होणें अगदीं अयोग्य होय. कारण एक तर मी दाहा रुपड्यांचा चाकर आणि तेवढ्या कमाईवर हा घर संसाराचा गाडा चालविणें म्हटलें म्हणजे फारच कठीण; तशांत पाण्यावरचा बुडबुडा म्हणतात त्याप्रमाणें ही माझी चाकरी ती केव्हां जाईल याचा नेम नाहीं. तसें झाल्यास मग नकटें नाक घेऊन फिरून बापाचे घरीं जाण्यांत मला मेल्यापेक्षां अधिक वाईट वाटेल आणि तेव्हांच मात्र अप्रतिष्ठा व फजिती होण्याचा जास्त संभव आहे. कारण मग लोक म्हणतील कीं मोठे लंबकर्णावरचे शाहाणे होऊन बापापासून निराळे झाले होते पण शेवटीं झकमारीत पुनः बापाचे अन्नावर येऊन धा-

ड घालावीं लागली. ह्मणून अशा गोष्टींत लोकांचें पाहून चालतां कामा नये. त्यावेळीं आपलें अंथरूण पाहून पाय पसरले पाहिजेत. आपण हीं गोष्ट ऐकलीच असेल कीं—
" एका गृहस्थानें बाजारांत जाऊन गांवीं नेण्यासाठीं मीठ
" व कापूस खरेदी केला. पैकीं मीठ खेंचराचे पाठीवर
" लादून कापूस गाढवावर लादला. जातां जातां मार्गांत
" एक नदी आडवी आली. नदी तर पूर येऊन दोहों तडींनीं
" तुडुंब भरून चालली होती, असें असतां त्या गृहस्थानें
" त्या दोघांस ओझ्यानें लादलेलेच पाण्यांतून चालविलें.
" नदीचे मध्यभागीं गेल्यावर खेचरानें पाण्यांत बुडी मारली
" आणि थोडे वेळानें डोकें वर केलें. तेव्हां गाढवानें त्यास
" विचारलें, "गड्या, तूं असें काय केलेंस ?" खेंचर बोलला,
" " दादा, काय सांगूं ! तुझें नशीब मोठें चांगलें कीं तुजवर
" कापूस भरला. त्याचें ओझें कसचें ! मी पडलों फुटक्या
" नशिबाचा ह्मणून माझ्या वाट्यास मीठ आलें; त्याचे भारानें
" माझी कंबर मोडून रक्तबोंबाळ झाली आहे. हा आमचा
" धनी असला पाषाणहृदयाचा आहे कीं त्यास आमच्या
" मेहनतीचें कांहींच वाटत नाहीं आणि मनास मानेल तसें
" आडवेंतिडवें जेवढें पाहिजे तेवढें लादून देतो. मी असा
" विचार केला कीं घरीं पोंहोंचेपर्यंत कमरेचे दोन तुकडे
" होऊन जातील. तेव्हां पाण्यांत बुडी मारली ह्मणजे तरी
" मीठ भिजल्यानें विरवळून जाऊन जितका भार कमी
" होईल तितकाच लाभ. धनी फार फार करील तर सात
" आठ दांडे जास्त लगावील. येरवीं तूर रस्ताभर दांडे
" खातच येत आहें, मग कमी कां ह्मणून करा ! पहा आतां
" माझें ओझें अर्धोअर्ध कमी झालें आहे. "मूर्ख गाढवानें खेंच-

" राचें पाहून आपणही पाण्यांत डुबकी मारली. मग काय
" विचारतां कापूस भिजल्याबरोबर पहिल्यापेक्षां दुप्पट जड
" झाला. मान वर करितो तों ती त्यास इकडून तिकडे
" हलवितां येईना. हें पाहून खेंचर हंसून ह्मणाला. "काय,
" गाढव दादा, कसें काय वाटतें ? " गाढवानें उत्तर दिलें,
" "गड्या, मी तर मरतों." खेंचर बोलला, "अरे मूर्खा, मला
" तरी विचारायाचें होतें कीं नाहीं ? कीं माझें पाहून तूंही केलें-
" स. पण असा विचार केला नाहींस कीं तुझ्या पाठीवर मीठ
" नसून कापूस होता.' ह्मणून सासूबाई, असें लोकांचें पाहू-
न त्याची मी नक्कल करूं लागलों तर माझी स्थिति त्या
गाढवाप्रमाणें होईल.

सासू– आपली तर कोणाच्याने शंका घालवणार नाहीं, आणि तशांत तुमचेप्रमाणें मी कांहीं तर्कशास्त्र शिकलें नाहीं. मी सरळ गोष्ट ही समजतें कीं तुह्मीं दरमहा दाहा रुपये कमावीत आहां, आणि ईश्वराचे दयेनें सध्या दाण्यागोळ्याची स्वस्ताई आहे. तशांत आपल्यास मुलें लेंकरें आहेत असेंही नाहीं. तेव्हां तुह्मां नवराबायकोचें पोट खुशाल भरून कसा तरी बारीक मोठा कपडा नेसायाला मिळेल. तुमच्यासारखे पुढल्याकारितां जर सर्वच काळजी वाहूं लागतील तर मग जगाचा एवढा मोठा कारखाना आजच अगदीं बंद पडेल. चाकरी ती चाकरीच पण आयुष्याचा तरी भरंवसा कोठें आहे ? जो दिवस जातो तोच आपला असें समजून आनंदानें घालवावा ह्मणजे झालें.

बुद्धिवंत सासूबाई, मला पण हेंच समजलें पाहिजे कीं सुख निराळें राहिल्यानें होईल कीं एके ठिकाणीं राहिल्यानें होईल ? याचा आपणही जरा नीट विचार करावा.

सासू– असला वितंडवाद करून काय फळ? सरळ गोष्ट कां नाहीं बोलत कीं मला आईपासून निराळें होणें नाहीं. एक जराशी गोष्ट तुह्मांस तुमचे बायकोनें विचारली तिचा निकाल करण्यास तुह्मांस इतके अढिवेढे घ्यावे लागले. आणि फिरून ह्मणतां कीं मीं हिला कोणतेही गोष्टीविषयीं निराश किंवा निरूत्साह होऊं देत नाहीं. मनाजोगें वागणें ह्मणजे काय कीं ज्यांत नवराबायको एक मनानें व एक विचारानें चालतात तें.

असें ह्मणून निराशेनें हिरमुसल्यासारखी होऊन आळस टाकीत व जांभया देत स्वस्थ राहिली. तेव्हां बुद्धिवंतही मुकाट्यानें बसला व रात्र फार झाली होती ह्मणून सासूस सांगितलें कीं "आतां आपण जाऊन विश्रांति घ्यावी. मी या गोष्टीविषयीं पुन्हा विचार करीन" असें ह्मणून सर्वजणें उठून निजावयास गेलीं. बुद्धिवंताचें मन या गोष्टीचे विचारामध्यें घोळत असल्यामुळें त्यास अवघी रात्र झोंप लागली नाहीं. पहांट झाल्याबरोबर उठून बाहेर येऊन पहातो तों हिराबाई ही केर काढीत आहे. मेहुण्यास हिराबाईनें पाहतांच "कसें काय, ठीक आहे ना? रात्रौ चांगली झोंप लागली ना?" असें मोठ्या मंजुळ स्वरानें विचारलें आणि ह्मणाली कीं "आपणास मुखमार्जन करण्यास पडवींत ऊन पाणी ठेविलें आहे तें जाऊन घ्या.

बुद्धिवंत– इतके श्रम उगाच घेतले, आतां मी एकदम घरींच जाऊन तोंड धुणार होतों.

हिराबाई– थांबा, जाऊं नका. त्यांत श्रम कसले? तुमच्यासाठीं चहाही केव्हांच तयार करून ठेविला आहे. तो

तुम्हांस नुस्ता पाहिजे किंवा दूध घालून पाहिजे तें सर्मजलें ह्मणजे त्याप्रमाणें करीन.

बुद्धिवंत—त्यांत कांहीं नाहीं. कसा असला तरी चालेल.

हिराबाई—पण तुमचा आवाज कांहींसा घोगरा येतो. कदाचित् पित्ताची व्यथा असेल तर ती दुधानें अधिक होईल.

बुद्धिवंत— नाहीं. पित्ताची व्यथाबिथा कांहीं नाहीं. रात्रौ सासूबाईंबरोबर बराच वेळपर्यंत बोलत राहिल्यानें जरा जागरण झाल्यासारखें वाटतें खरें.

इतकें झाल्यावर तेथून उठून शौचविधि व मुखमार्जन करून दिवाणखान्यांत आला. तेथें सासूही मुखमार्जनादि नैमित्तिक कर्में आटपून पान खात बसली आहे असें पाहून "कसें काय, बरें आहेना?" असें ह्मणून एका खुर्चीवर जाऊन बसला. इकडे हिराबाईनें एक मोठा चौरंग आणून त्यापुढें ठेविला आणि त्यावर कढत कढत चहाची चहादाणी, एक प्यालाबशी, एक चमचा, आणि थोडीशी साखर आणून ठेविली. बुद्धिवंत तो चहा प्याला. तो गाईच्या रंगाचा असून अत्यंत सुवासिक असल्यामुळें तो पितांच त्याचा जीव शांत झाला. इतकें झालें तरी ताराबाई ही आपल्या नित्य क्रमाप्रमाणें बिछान्यांत घोरत पडली होती. बुद्धिवंतानें, ती कोठें दिसली नाहीं असें पाहून सासूस ह्मटलें, "ती कोठें आहे? अजून उठली नाहीं काय?"

सासू—बाबा काय सांगूं? ती आपले मावशीची फार लाडकी आहे, आणि तिचे लाडामुळेंच तिला ह्या सर्व वाईट संवई जडून गेल्या आहेत. जेव्हां ही लहान होती तेव्हां अशाच वाईट चालीवरून मीं तिला कधीं कधीं धमकावीत असें तेव्हां ती मजशीं कित्येक दिवसपर्यंत मौन्य

धरून बसत असे. फार कशास ही एक वेळ आपले हट्टास पेटली म्हणजे कोणाची छाती काय कीं हिला म्हणजे हात लावील ? याप्रमाणें ताराबाई क्षुल्लक गोष्टीविषयीं देखील हट्ट घेऊन बसे, आणि जें कांहीं हातास मिळे तें रागानें तोडूनफोडून चकाचूर करून ठेवी. या भीतीमुळें तिला कोणी कांहीं बोलत नसे. या असल्या तिच्या स्वभावामुळें माझें आणि त्यांचें (नवऱ्याचें) नेहमीं भांडण होई.

बुद्धिवंत—सासूबाई, जळो तें राहूंद्या, दिवस फार आला आतां घरीं जाण्यास आपली रजा असावी. कदाचित् आई वाट पाहात राहिली असेल.

सासू— बरें जावें, पण रात्रीची गोष्ट ध्यानांत असूंद्या आणि त्याविषयीं जरूर कांहीं तरी बंदोबस्त करा.

बुद्धिवंत तेथून निघाला तो सर्व रस्ताभर याच गोष्टीचा विचार करीत आला. घरीं पोंचल्यावर त्यास आईनें पाहिलें तों हा कसल्या तरी काळजींत आहे असें त्याच्या मुखचर्येवरून तिला दिसून आलें. त्यावरून ती समजली कीं सासुरवाडीहून कांहीं तरी भांडणतंटा करून आलेला असावा. म्हणून तिनें त्यास विचारलें, "अरे बुद्धिवंता, शेवटीं माझें सांगणें न मानतां आपलें तेंच खरें केलेंसुना ?"

बुद्धिवंत— नाहीं आई. भांडणतंटा कांहीं केला नाहीं.

आई— तर मग तोंडावर इतकी ग्लानी कां दिसते ?

बुद्धिवंत— ग्लानी कसची आई ! निजलेलाच उठून आलों त्यामुळें कदाचित् तुला मीं उदाससा वाटत असेन.

आई— अरे बाळा, शुद्धीवर ये. निजून उठलेला मी कधीं तुला पाहिला नाहीं काय ! खरें सांग माझे गळ्याची शपथ, काय झालें तें !

बुद्धिवंतानें निरूपाय होऊन रात्रीं घडलेलें सर्व वर्तमान एकूनएक आईस सांगितलें. आईनें तें सर्व ऐकिल्यावर तिचे आंगाचा थरकांप होऊन सर्व आंगावर कांटा उभा राहिला, व आंगांतील सर्व रक्त आटून गेलें. अशी स्थिति झाली तरी बुद्धिवंताची आई ही मोठी खोल विचाराची बायको होती त्यामुळें यत्किंचितही न डगमगतां ह्मणूं लागली कीं "माझी हा वेळपर्यंत ही इच्छा होती कीं माझे जिवांत जीव आहे तोंपर्यंत तुह्मां उभयतांस दूर न ठेवावें आणि तुह्मीं दोघे भाऊ रामलक्ष्मणासारखे एकमेकांचे मानेवर मान घालून सुखानें मजपाशीं रहावें; पण हल्लीं मी पहात्यें तर सगळेंच उलटें दिसून येतें, आणि तुजकडे ह्मणून आज मी ही गोष्ट बोलतें कीं तुझें लग्न केल्यावर दुसरे महिन्यापासूनच क्रव्यादाबाईचे मनांतून निराळें बिऱ्हाड करावयाचें होतें. तूं जे दहा रूपये आणून दरमहा मजजवळ देतोस ते तिच्या डोळ्यांत खुपतात. आल्यादिवस तिच्या मैत्रिणीपासून मी ऐकत असतें कीं, तिचे मनांतून गोंसाविपुऱ्यांत बिऱ्हाड घ्यावयाचें आहे, आणि तेथें सटवायला घरकाम करण्यास ठेवावयाचें आहे. जेव्हां या सर्व मुली एके ठिकाणीं जमतात तेव्हां याच गोष्टीची चर्चा त्यांच्यांत नेहमीं चालत असते. मी तुझ्या माऊससासूसही एक वेळ ही गोष्ट सांगितली होती कीं जर क्रव्यादाबाईस आमच्या बरोबर एकत्र राहणें आवडत नसेल तर खुशाल तिणें आपली चूल व लत्ताकपडा निराळा करवावा त्यास आमची बिलकूल आडकाठी नाहीं. मात्र तिणें या वरांतच निराळें असावें. पण शेवटीं तिजकडूनच मला कळलें कीं क्रव्यादाबाईच्या मनास तेंही येत नाहीं. मनुष्य लग्न जें करितो तें केवळ आपल्यास

सुख मिळावें ह्याकरितांच ना? पण तुझें लग्न झाल्यापासून आजेदिवशीं भांडण, उजाडलें कीं कपाळास आठ्या असा प्रकार तुझ्या बायकोचा चालला आहे. याकरितां जर तुझ्या बायकोस निराळें रहाण्यामध्येंच सुख वाटतें तर त्यास माझी ना नाहीं जेथें रहाऊ तेथें सुखानें व आनंदानें मात्र रहा ह्मणजे झालें. ईश्वरानें उगीच एक वेडी माया लावून दिली आहे ह्मणून एवढेंच सांगावेंसें वाटतें कीं जेव्हां जेव्हां तुझा फुरसत मिळेल तेव्हां तेव्हां मला भेटत मात्र जा. ह्मणजे तेणेंकरून माझ्या जिवास कांहीं तरी समाधान होईल. आणि मीही तुझा वरखटल्यांतून फुरसत मिळेल तेव्हां येऊन भेटून जात जाईन." आईचें हें बोलणें ऐकून बुद्धिवंतास गहिंवर आला व दुःखाचा इतका हुंदका आला कीं तो कांहीं केल्या आटोपेना. त्याचप्रमाणें मुलगा जिवंत असून नसल्याप्रमाणें होणार हा विचार मनांत येऊन आईसही फार दुःख वाटून गहिंवर आला. थोड्या वेळानें बुद्धिवंत ह्मणाला, "तीं पाहिजे तर निराळी राहो किंवा घरांतून निघून जावो मी ह्मणून निराळा राहणार नाहीं."

आई—अरे, नवऱ्यानें आपल्या बायकोस सोडून आपण निराळें रहावें असें आजपर्यंत कोठें झालें आहे काय! तुला तर सर्व आयुष्य तिजबरोबर घालवायचें आहे. माझें काय दाहा गेले आणि पांच उरले त्याप्रमाणें मी एक पाय स्मशानांत ठेवून जपमाळ करीत आहें, ह्मणून मी सांगत्यें कीं ती सांगेल त्याप्रमाणें कर. आतां तर ज्या दिवशीं तुझें लग्न केलें त्याच दिवशीं तुला निराळें समजलों. तूंच कांहीं निराळा मुलगा आणि मीच कांहीं निराळी आई आहों असें नाहीं; जगांतील इतर मायलेंकरांचें नातें तेंच तुझें आणि माझें.

बुद्धिवंतानें या गोष्टीच्या संबंधानें आपले एका मित्राचा अभिप्राय विचारला तेव्हां त्याणेंही याचप्रमाणें उत्तर दिलें कीं "भांडणाचा शेवट ज्या गोष्टीनें होत आहे तीच करणें शहाणपण होय, मग एके ठिकाणीं रहाण्यांतच काय आहे? आईशीं निराळें राहूनही तिचे सेवेंत तत्पर रहातां येईल" जेव्हां बहुतेकांनीं याचप्रमाणें आपलें अनुमत दिलें तेव्हां बुद्धिवंताचाही विचार फिरला आणि मनांत ह्मणाला, बरें निराळें राहून तरी पाहूं. कदाचित् असें केल्यानें जर ही बायको सुधारेल आणि घरसंसारांत दक्ष राहून वाईट चाली, हट्टी स्वभाव व अभद्र भाषण सोडून देईल तर निराळें रहाण्यांत कांहीं लांछन नाहीं. निराळें राहिल्यानें घरसंसाराची काळजी बहावी लागेल इतकेंच नव्हे तर आदा पाहून खर्च कसा करावा हेंही समजेल. एरवीं तरी जगांत येऊन कोणतेही गोष्टीची काळजी केल्याविना सुटका नाहीं. सध्या तरी कोणतेही गोष्टीची काळजी आहे असें नाहीं पण या दररोजच्या भांडणांनीं मीं अगदीं त्रासलों आहे. आतां दहा रुपयांत गुजारा कसा होईल ही काळजी करणें व्यर्थ होय, कारण जितकें ईश्वरानें नेमिलें आहे तितकेंच आपणांस मिळायाचें तेथें मनुष्यानें हजारों यत्न केले ह्मणून काय होणार आहे ? असा विचार करून बुद्धिवंतानें वेगळें सरण्याचा निश्चय केला. आणि आईच्या घरासमीपच एक लहानसें बैठें घर रिकामें झालें होतें तें दरमहा एक रुपया भाडें ठरवून घेतलें आणि घरधन्यास भाडेचिठी लिहून देऊन दरवाजास आपलें कुलप लाविलें, आणि सासुरवाडीस बायकोस सांगून पाठविलें कीं, नवीन बिऱ्हाड घेतलें आहे

तेव्हां आतां तरी येण्याची मर्जी असेल तर यावें ह्मणजे चांगला दिवस पाहून नवीन बिऱ्हाडांत जाऊन राहूं. इक॰ डेस आईसही सांगितलें कीं शेजारचें ढमढेऱ्यांचें लहानसें घर भाड्यानें घेतलें आहे. तेव्हां आईनें क्रव्यादाबाईची कपड्यांची पेटी, हंडीमडकीं, पलंग, बिछाना इत्यादि जें कांहीं सामानसुमान होतें तें सर्व निराळें काढून एका खोलींत भरून ठेविलें. संध्याकाळीं क्रव्यादाबाई घरीं परत आली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठल्यावर आईनें सामानाच्या खोलीचें दार उघडून बुद्धिवंतास ह्मटलें, "बाळा, तुमचें जें कांहीं सामानसुमान होतें तें सर्व येथें ठेविलें आहे, तें दोघें नवराबायको मिळून पाहून घ्या."

बुद्धिवंत— आई, हें तूं काय ह्मणतेस ? सामान पाहून कशाला घ्यावयास पाहिजे? तें कांहीं दुसऱ्याच्या घरांत होतें?

आई— बाळा, असें नाहीं खरें, पण तुझे बायकोच्या माहेरून आणलेल्या सामानापैकीं एखादी वस्तू कोठें राहिली असेल ह्मणून असें ह्मणतें. कोणग आहे तिथे, ठके, जा बाई त्या शेजारचे रमाबाईला बोलावून आणून तुह्मीं दोघीजणीं मिळून हें सामान शेजारच्या ढमढेऱ्यांचे घरीं पोहोंचतें करा.

इतक्यांत ताराबाईच्या मैत्रिणी सदवाय, गंगी, साळू, या घारीसारख्या येऊन पोंचल्या व बोलतां बोलतां तें सर्व सामान नव्या घरांत नेऊन पोहोंचते केलें. शेवटीं क्रव्यादाबाईनें मोठ्या हौशीनें नवीन बिऱ्हाडांत जाऊन तेथें एकदांची वस्ती केली. तेथें गेल्यावर तीन दिवस पर्यंत सकाळसांज बुद्धिवंताचे आईनें जेवण पोंचतें केलें. चौथे दिवशीं बुद्धिवंत आपले बायकोस ह्मणाला, "अग आज

आपणास येथें येऊन तीन दिवस झाले तेव्हां नवीन बिऱ्हाडांत आल्यासारखें आज तरी कांहीं जेवणाचा मुहूर्त कर.''

क्रव्यादा०— अहो, अझून सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेलें आहे तें तुह्मांस दिसत नाहीं का? तें ठिकाणावर लागलें ह्मणजे मग फुरसतीनें चुलीकडे पहातां येईल. सध्यां तर मला हें ठिकाणावर लागल्याशिवाय डोकें वर करितां येत नाहीं.

याप्रमाणें आणखी चार दिवस कधीं खाणावळींतून भाकरी व कधीं बाजारांतून मेवामिठाई आणून त्यावर दोघें नवराबायको राहिलीं. शेवटीं दररोज उरफोड करकरून बुद्धिवंतानें क्रव्यादाबाईकडून जेवण करविण्याचा एकदाचा मुहूर्त करविला. क्रव्यादाबाईस आजन्मांत कधीं रांधण्याचा कसातो प्रसंग आला नव्हता, त्यामुळें पहिल्या दिवशीं भाकरी केल्या त्या काय विचारतां? धडना गोल कीं चौकोनी; एक कोन उत्तरेस तर दुसरा पूर्वेस, कांठावर जाड तर मध्यें पातळ, भाजली तीही कोठें कच्ची तर कोठें अगदीं करपलेली, जाळ कमी झाल्यामुळें एकादी तव्यास चिकटून तीं सोडवितांना तिचे तुकडे झालेले, आणि त्या शेकतेवेळीं राखेंत अगदीं मळून गेलेल्या, भात शिजविला त्यांतही तीन तऱ्हा ह्मणजे बुडाशीं करपून गेलेला, मध्यें मऊ व तोंडाशीं कच्चा, वरण केलें तेंही तसेंच डाळ निराळी व पाणी निराळें. सारांश सांगावयाचें इतकेंच कीं क्रव्यादाबाईला एकादें नवीन तऱ्हेचें पक्वान्न करण्याची इतकी हातोटी साधून गेली होती कीं तें पक्वान्न पाहिल्याबरोबर भूक नाहींशी व्हावयाची. कालवण केलें तर त्यास रंगनारूप. एकादा पदार्थ मीठ घालून अगदीं खारट

करून टाकी नाहीं तर अगदीं अळणी ठेवी. याप्रमाणें बुद्धिवंतानें एक दोन दिवस जसे तसे काढले. पुढें बायकोच्या हातून धड जेवण मिळण्याची आशा नाहींसें पाहून तो पुनः आईचे घरीं जाऊन जेऊं लागला. इकडे ताराबाईनेंही आवल्या जेवणाची अशी व्यवस्था लाविली कीं, दोन्ही वेळां बाजारच्या पुऱ्या, बासुंदी, भजीं इत्यादि मागवून खाव्या. त्यामुळें " शिकें तुटलें आणि बोक्याचें साधलें " या म्हणीप्रमाणें घरांत जें कांहीं शिजे तें सटवाय वगैरे तिच्या मैत्रिणींस खावयास मिळे. ही त्यांची पंढरी पिकली खरी पण दाहा रुपड्यांच्या पगारांत हा असा चमचमीत बाजार व धर्माचा पांजरपोळ चालला कसा याविषयीं वाचकांचे मनांत सहज संशय आला असेल; तर हा इतका खर्च चालण्याकरितां क्रव्यादाबाई नवऱ्यास न कळतां घरांतील थोडयेथोडें सामान विकून टाकीत असे. एके दिवशीं असें झालें कीं बुद्धिवंत नेहमीप्रमाणें चाकरीवर गेला आणि क्रव्यादाबाई ही आपल्या नित्यक्रमाप्रमाणें दोनप्रहरची निजली होती, अशा वेळीं साळूनें येऊन आणलेल्या मैत्रिणीस गाढ झोंप लागली आहे असें पाहून घरांतील सामान पळविण्यासाठीं आपला भाऊ खंड्या यास बोलावून आणिलें. खंड्या हा अट्टल चोरांतला चोर होता, त्याणें ती उठण्याचे पूर्वीच सर्व भांडींकुंडीं व घरांत सांपडलें तितकें सामान पसार केलें. क्रव्यादाबाई उठून पाहते तों घर जिकडे तिकडे लख्ख ! कुलूप मारलेले खोलींत जेवढें सामान होतें तेवढें मात्र राहिलें बाकी एकूणएक नाहींसें झालें. पाणी पिण्यास फुटकी वाटीसुद्धां ठेविली नाहीं. बुद्धिवंत चाकरीवरून आल्यावर हें पाहून

फार दुःखी होऊन त्यानें बायकोचा पुष्कळ निषेध केला व आपल्या कपाळावर हात मारून घेतले. पण बापडा करतो काय ! त्रासून त्रासून उगाच बसला. दुसरे दिवशीं कर्जवाम काढून दोन हलक्या सलक्या पातेल्या विकत आणिल्या आणि दुसरीं कित्येक लहानमोठीं भांडीं त्यास आईजवळून मागून आणावीं लागलीं. तवा, कढई, इत्यादि सासूनें पाठवून दिलीं. असें करितां करितां जेमतेम पुनः एकदां संसार जमविला.

दुर्दैवानें अशा संधीसच त्या शहरांत एक चेटकी बाई आली होती, तिनें नानाप्रकारचीं मिषें करून लोकांस नाडण्याचा मोठा सपाटा चालविला होता. आणि तिचेविषयीं सारें पुणें शहर अगदीं खळबळून गेलें होतें. बुद्धिवंतानें या बाईची हकीकत आपले बायकोस सांगून ताकीद केली होती कीं कोणतेही परके स्त्रियेस घरांत मुळींच घेऊं नको इतकें सांगूनसवरूनही क्रव्यादाबाईनें काय मौज केली ती पहाः— ही क्रव्यादाबाई मुळापासून अगदीं मूर्ख आणि कोणत्याही परक्या मनुष्याबरोबर हिचें एक दोन वेळ भाषण झालें म्हणजे तेवढ्यावरून त्या मनुष्यावर सारा विश्वास टाकावयाचा असा तिचा स्वभाव होता. एकेदिवशीं असें झालें कीं त्या चेटकी बाईनें बैरागिणीचा वेष धरून क्रव्यादाबाई रहात असे त्या गल्लींत आली. ही चेटकी बैरागीण मूर्ख बायकांस फसविण्यासाठीं नानाप्रकारच्या औषधी व प्रासादिक वस्तू आपल्याजवळ ठेवीत असे. त्यांत मुख्यत्वेंकरून भारलेल्या तायती, पंढरीचा अबीर, बुका, काशीचा पांच साहा जातींचा प्रसाद, आळंदींत ज्ञानोबानें चालविलेल्या भिंतीची माती, रामेश्वराचें तीर्थ, द्वारकेची पिंजर, याप्रमाणें निरनिराळ्या तीर्थांच्या ठिकाणच्या प्रासादिक वस्तूंचा संग्रह तिजज-

वळ मोठा असे. तिणें गल्लीचे नाक्यापाशीं एक चांगलीशी जागा पाहून तेथें आपल्या बटव्यांतील सर्व वस्तूंचा बाजार मांडिला नाहीं तों थोड्या वेळांतच आसपासचीं पांचपन्नास पोरें तिचे सभोंवतीं जमलीं. क्रय्यादाबाईला ही बातमी लागतांच तिणें पूर्वीच सठवायला सांगून ठेविलें होतें कीं जेव्हां ती बैरागीण नाक्यावरून उठून जावयास लागेल तेव्हां तिला इकडे बोलावून आण ह्मणजे मी तिजपासून कांहीं प्रसाद घेईन. त्याप्रमाणें एके दिवशीं सठवाय बैरागीण जाण्याचे सुमारास धांवत धांवत जाऊन तिचेजवळ उभी राहिली आणि जेव्हां ती आपला बाजार आटपून जाऊं लागली तेव्हां तिला क्रय्यादाबाईकडे घेऊन आली. क्रय्यादाबाईनें तिचें मोठ्या आस्थेनें आगतस्वागत करून तिला आपलेजवळ एका चौरंगावर बसवून तिच्या जवळच्या एकूणएक वस्तू पाहिल्या आणि त्यांतील पंढरीचा अबीरबुका व द्वारकेची पिंजर अशा दोन वस्तू तिनें पसंत केल्या. त्या चेटकी बाईनें जाणलें कीं ही बायको थोड्याशा युक्तीनें सहज फसून जाणारी दिसते ह्मणून एक पैशाचा पुड्कळसा अबीरबुका तोलून दिला आणि दोन आण्यांत पांचसाहा तोळे पिंजर दिली व एक मुंबईची नकली आंगठी तिला बक्षीस दिली. हें औदार्य पाहून क्रय्यादाबाई अगदीं मोहून गेली. नंतर कांहीं वेळ त्या बैरागिणीनें समुद्रांतील प्रवासाची मौज व सेतुबंध रामेश्वराच्या गोष्टी आणि दुसरे दोनचार गमतीचे चुटके, असे तिखटमीठ लाऊन रचून सांगितले कीं ते ऐकून क्रय्यादाबाईला त्या बैरागिणीचें अगदीं वेड लागून गेलें. मग बैरागिणीनें विचारलें, "बाई, आपल्यास कांहीं मूलबाळ आहे काय? "

क्रव्यादा०— (खालीं मान घालून निराश झाल्यासारखें करून) आमची बाई तशी पुण्याई आहे कोठें?

बैरागीण— बरें. मुली, लग्न होऊन तरी कितीसे दिवस झाले?

क्रव्यादा०— येत्या शिमग्यांत एक वर्ष होईल.

हें ऐकून क्रव्यादाबाईचे पोरस्वभावाविषयीं वैरागिणीची खात्री झाली आणि मनांत म्हणते, "मुलाचें नांव काढतांच हिणें एवढा मोठा सुसकारा टाकला यावरून हिला न्हाण येऊन जणूंकाय कित्येक वर्षें झालीं तरी मूल होत नाहीं असें वाटलें असावें." म्हणून उघडपणें म्हणते, "मुली, यांत कांहीं निराश होण्यासारखी गोष्ट नाहीं, कारण मूल होण्याचे दिवस अजून पुढेंच आहेत. पहाशील तर खरें तुला इतकीं मुलें होतील कीं तुझ्यानें तीं सांभाळवणारही नाहींत. पण सध्या हें खरें आहे कीं एवढ्या मोठ्या घरांत सारा दिवस तूं एकटी असल्यामुळें कदाचित् भीति वाटत असेल. बरें, मुली, नवऱ्याचें तरी सुख कसें काय आहे?"

क्रव्यादा०— (निराश झाल्यासारखी होऊन) ते तर सदा मजवर रागावलेलेच असतात. तें बाई कांहीं सांगण्याची सोय नाहीं.

याप्रमाणें क्रव्यादाबाईनें पहिलेच भेटीला घरची बारीक सारीक सर्व कांहीं हकीकत मोकळ्या मनानें सांगितली आणि शेवटीं बैरागीण निरोप घेऊं लागली तेव्हां क्रव्यादाबाई मोठ्या नम्रतेनें तिला म्हणाली, " बरें आतां या पण आपली भेट पुन्हा कधीं होईल?

बैरागीण— काय सांगूं मुली, माझी कीं नाहीं एक भाची एथें काळेवावरांत रहात असते तिला बरें वाटत

नाहीं ह्मणून तिचे समाचाराकरितां मीं दिल्लीहून एथें आलें आहें; तिला मेलें औषधपाणी करतां करतां व शोकतां भाजतां मला वर पहावयास देखील फुरसत मिळत नाहीं. ह्मणून दोन चार दिवसांनीं तरी एकदा तुझा क्षेमसमाचार घेत जाईन.

यावर एक दिवस देखील गेला नाहीं तोंच दुसरे दिवशीं ती बैरागीण एक चंदेरी जरीकांठी खण खांद्यावर टाकून आली. क्रव्यादाबाई ती दुरून येत आहे असें पाहून मनांत फार आनंद पावली आणि ती जवळ येतांक्षणींच तिला विचारलें, "हा खण कोठून आणला?"

बैरागीण— हा कीं नाहीं एकीनें विकण्याकरितां मज-जवळ दिलेला आहे.

क्रव्यादा०— बरें, सुमार कोठपर्यंत विकण्यास सांगितला आहे?

बैरागीण— कोठपर्यंत काय, फार झालें तर मेले चार आणे घेईल, आणखी तें तिला काय मिळणार? बाई एक कीं नाहीं तुझ्यासारखी मोठी श्रीमंताची मुलगी सदाशिव पेठेंत राहाते, पण सध्या ती अगदीं कंगाल दशेस येऊन पोंचली आहे. काय करील बापडी अब्रूसाठीं अंगावरचें थोडथोडें खिडुकमिडुक विकून चरितार्थ चालविते. मीं कीं नाहीं तिच्या अशा पुष्कळ वस्तू विकून दिलेल्या आहेत.

जरीकांठी खण इतका स्वस्त मिळतो हें पाहून क्रव्यादाबाईच्या तोंडास पाणी सुटलें आणि तिनें लगेच चार आण्याचे पैसे काढून बैरागिणीचे आंगावर टाकले आणि बैरागिणीस ह्मणाली कीं, "या उपर जें जें

कांहीं ती बाई विकावयास देईल तें तें सर्वांचे अगोदर मला आणून दाखवीत जा ह्मणजे झालें.”

बैरागीण— बरें, अगोदर तुला दाखवून मग दुसऱ्यास दाखवीन. माझें काय गेलें त्यांत?

नंतर कांहीं वेळ इकडच्यातिकडच्या गोष्टी झाल्यावर त्या बैरागिणीनें आपले बटव्यांतून एक चंची काढली व तींत कपड्यांत गुंडाळलेल्या कांहीं कागदाच्या पुड्या होत्या त्यांपैकीं ज्या पुडींत थोड्याशा लवंगा होत्या ती उघडून त्यांतील दोन लवंगा ऋ्यादाबाईला दिल्या आणि ह्मणाली, “ मुली, या जगांत ईश्वरानें प्रीति एवढ्याच-करितां उत्पन्न केली आहे कीं, तिजपासून एकमेकांस फायदा व्हावा. ह्या ज्या दोन लवंगा मी तुला आतां दिल्या आहेत त्यांपैकीं एक तूं आपल्या अंबाड्यांत खोव आणि दुसरी तुझे नवऱ्याच्या पागोट्यांत ठेव. कदा-चित् त्यास संशय येईल तर त्याचे बिछान्यांतील उशीला शिवून टाक ह्मणजे झालें. हा तोडगा कसाकाय आहे याचा आजच तुला प्रत्यय कळून येईल पण स्वच्छ व निर्मळ रहाण्याविषयीं मात्र फार जप. आतां तुझे उंची बरोबर एक सूत मला मापून दे ह्मणजे त्याची दोरी करून तींत एक ताईत घालून तुला आणून देईन. मी कीं नाहीं जेव्हां सेतुबंध रामेश्वराचे यात्रेस गेलें होतें तेव्हां आमच्या जहाजांत काश्मीरची राणीही बसली होती. कदाचित् तुला तिचें नांव ऐकून ठाऊक असेल. मैनावती निचें नांव होतें. ईश्वरानें कोणतेही गोष्टी-विषयीं ह्मणजे तिला उणें केलें होतें असें नाहीं. धनदौ-लतीस तर पारावार नव्हता. त्याचप्रमाणें नोकर चाकर,

दास दासी, हत्ती घोडे, अंबारी मेणे, पालख्या वगैरे सर्व कांहीं अनुकूळ होतें; राणीच ती मग तिला काय कमी आहे? मात्र एक पोटीं संतान नव्हतें येवढ्याचकरितां ती फार दुःखी व उदास रहात असे. दुसरें इंद्रमहेंद्र महाराजसाहेब हे तिच्याशीं अगदीं हिरमुसलेले असत याचें कारण तरी पोटीं पुत्रसंतान नाहीं हेंच असें ऐकिवांत होतें; नाहीं तर राणीसाहेब म्हटल्या म्हणजे सौंदर्य व सद्गुण यांच्या संबंधानें सामान्य होत्या असेंही नाहीं. त्यांची कांति जणुकाय आकाशांतील पूर्ण चंद्राप्रमाणें चमकत होती. असें सौंदर्य व धनदौलत असतांही त्या इतक्या साध्या स्वभावाच्या होत्या कीं, त्या आमच्यासारख्या यःकश्चित् मनुष्यासही जवळ बसवून त्यांच्याशीं मोठ्या सलगीनें वागत. या राणीचा साधूसंतांवर फारच विश्वास असे. एक वेळ तिला असें वर्तमान कळलें कीं काश्मिरापासून तीन कोसांवर एक मोठा अवलिया साधू आलेला आहे. हें ऐकतांच काळोखे रात्रीस आपले महालांतून बाहेर पडून पायींच त्याजकडे गेली आणि तो ध्यानस्थ होता म्हणून एक प्रहर पर्यंत त्याजपुढें हात जोडून उभी राहिल्यावर म्हणाली, " साधूला साष्टांग प्रणिपात असो." असें म्हणतांच त्या साधूनें डोळे उघडून वर पाहिलें आणि " सौभाग्यवती भव " असा आशीर्वाद देऊन म्हणाला, "मातोश्री, जा पौर्णिमेच्या रात्रीं तुला दृष्टांत होईल त्याप्रमाणें कर म्हणजे ईश्वर तुझे हेतु पूर्ण करील."

पुढें पौर्णिमेच्या रात्रीस राणीस दृष्टांत झाला कीं " तूं रामेश्वरचे यात्रेस जा म्हणजे तुझी मनकामना पूर्ण होईल त्याप्रमाणें राणी सकाळीं उठल्यावरोबर दृष्टांताप्रमाणें

रामेश्वरास जाण्याची तयारी करूं लागली व ज्यांस रामेश्वराचे यात्रेस जाण्याची इच्छा होती अशा सुमारें पांचशें गरीब लोकांस आपल्या खर्चानें घेऊन निघाली. त्यां मधीलच मी एक होतें. पुढें राणीचा व माझा परिचय होऊन तिचा मजवर इतका विश्वास बसला कीं ती मला एक क्षणही एकीकडे होऊं देत नसे. ईश्वर तिचें कल्याण करो. आह्मी निघाल्यावर बऱ्याच दिवसांनीं द्वारकेस पोंचून तेथें कांहीं दिवस मुक्काम केला आणि पुढें जाण्यासाठीं जहाजांत बसलों. आमचें जहाज हांकारल्यावर सुमारें एकसारखे पंधरा दिवस पर्यंत आह्मांस जमीन कशी ती दिसली नाहीं. सोळावे दिवशीं सकाळीं आह्मीं उठून पाहतों तों आमचे समोर त्या अफाट समुद्रांत एक डोंगरासारखी कांहीं उंचवट जमीन दिसूं लागली. तेव्हां आह्मीं जहाजावरील तांडेलास हें काय दिसतें ह्मणून विचारिलें. त्यानें सांगितलें कीं जेव्हां राम सीतेस आणण्याचे हेतूनें लंकेस जाऊं लागला तेव्हां मार्गांत समुद्र आला त्याचें उल्लंघन करण्याकरितां त्यानें जो सेतु बांधला त्यासाठीं वानरांकडून ज्या पर्वतावरील दगड आणविले तो द्रोणगिरी पर्वत हाच होय. त्या फार उंच पर्वतापैकीं हा एवढासा एक कोंपरा बाकी राहिलेला आहे. त्यावर आज फार वर्षांपासून एक अवलिया गोंसावी राहत असतो. त्याजवळ जो गेला त्याचे ह्मणजे मनोरथ शेवटास गेले नाहींत असें कधींच झालें नाहीं. त्यावरून राणी साहेबांनीं सांगितलें कीं कसेंही करून मला त्या डोंगरावर घेऊन चला. तेव्हां तांडेलानें सांगितलें कीं, बाई साहेब, तिकडे जहाज जाऊं शकणार नाहीं पण जर तुमची आज्ञा होईल तर जहाजास येथें

नांगर देऊन एका लहानशा मचव्यांतून तुह्मांस घेऊन जाऊं. त्यावर राणीनें सांगितलें कीं, ठीक. तसेंच होऊंद्या. तेव्हां मी व आणखी चारजणी, राणीबरोबर त्या द्रोणगिरी पर्वतावर गेलों होतों. डोंगरावर जाऊन पोंचल्यावर आह्मांस जिकडे तिकडे घमघमाट वास येऊं लागला, जातां जातां शेवटीं साधूचे आश्रमापर्यंत जाऊन पोंचलों. तेथें आह्मांस कोणीही मनुष्यप्राणी दिसला नाहीं, काय तो एकटा साधू तेवढाच पर्वताचे उंच शिखरावर गुहेमध्यें आश्रम करून राहिला होता. काय त्याचें तेज सांगावें ! तो इतका ह्मातारा झाला होता तरी पंधरा वर्षांच्या ऐन उमेदींतील पुरुषाप्रमाणें तेजस्वी दिसे. त्याणें आह्मांस पाहून आशीर्वाद दिला व राणीसाहेबांस बारा लवंगा कांहीं मंत्र उच्चारून व फुंक मारून दिल्या. व मला सांगितलें कीं जा आणि पुणें व दिल्ली येथील लोकांचें कल्याण होईल असें कर. त्या बारा लवंगांतील ह्या दोन लवंगा मी तुह्मांस दिल्या आहेत. पुढें रामेश्वराची यात्रा करून आह्मीं जेव्हां माघाऱ्या फिरलों तेव्हां आमच्या येण्याचा कांहींएक संभव नसतां किंवा कागद पत्रीही कळविलें नसतां काश्मीरचे महाराज इंद्रमहेंद्र हे एक महिना अगोदरच राणी सरकारास नेण्याकरितां मुंबईस येऊन ठेपले होते. जेव्हां आमचें जहाज मुंबईचे बंदरांत येऊन दाखल झालें व राणीनें बंदरावर पाय ठेविला, तेव्हां इंद्रमहेंद्र राणीस भेटतांच त्यांणीं आपला मुगुट काढून राणीचे पायांवर ठेविला व पश्चात्ताप पाऊन केलेल्या सर्व अपराधांची क्षमा मागितली. पुढें आह्मी सर्व मुंबईहून निघून काश्मिरास जाऊन पोंचलों. नंतर मी सहा वर्षेंपर्यंत काश्मिरांत राहिलें. तेवढ्या मुदतींत ईश्वरकृपेनें व साधूच्या

आशीर्वादानें राणी साहेबांस चार पुत्ररत्नें झालीं. नंतर माझे जन्मभूमीची मला आठवण होऊन मी राणी सरकाराज-
• वळ रजा मागितली तेव्हां त्यांनीं पुष्कळ हरकत घेतली पण मी सांगितलें कीं साधुमहाराजांनीं मजकडे पुणें व दिल्ली शहरची सेवा सोंपविली आहे तेव्हां मला तिकडे गेलें पाहिजे नाहीं तर सत्पुरूषाचा उगाच बोल लागेल. हें राणीनें ऐकतांच तिला या गोष्टीची आठवण झाली आणि तिणें निरूपाय होऊन पुष्कळ देणगीनिशीं दोन सांडणी-स्वार मजबरोबर देऊन मला दिल्लीस पोंहोचती केली."

क्रव्यादाबाईचा ह्या दोन लवंगांनीं व सुमारें दोन घ-टका बैरागिणीनें तिखट मीठ लाऊन सांगितलेली गोष्ट ऐकून त्या बैरागिणीवर मनापासून विश्वास जडला. नंतर ती बैरागीण लवंगा देऊन निघून गेली. इकडे क्रव्यादाबाई न्हाऊन धुऊन व स्वच्छ चोळी लुगडें नेसून केवळ चट. कचांदणी बनली व त्या दोन लवंगांपैकीं एक लवंग ई-श्वराचें नांव घेऊन आपल्या बुचडयांत खुपसून ठेवून दु-सरी आपल्या नवऱ्याच्या पलंगावरची चादर व उशीचें कवर बदलून त्यांत टोंचून ठेविली. संध्याकाळीं बुद्धिवंत चाकरीवरून येऊन बायकोकडे पहातो तों ती स्वच्छ न्हालेली आणि सांगितल्याशिवाय पलंगावरची चादर बदलून शुभ्र धोब्याकडची घातलेली पाहून फार खूष झाला. व तिजबरोबर मोठ्या प्रीतीनें भाषण करूं लागला.

क्रव्यादा०—पहा मी एक जरीचा चोळखण आज विकत घेतला आहे (असें म्हणून तो आणून दाखवितें.)

बुद्धिवंत— बरें, केवढ्यास घेतला हा?

क्रव्यादा०— तुम्हीं सांगा पाहूं केवढ्यास द्यावा तो?

बुद्धिवंत– खण तर चंदेरी किंवा पैठणी असावा, कारण त्याचें सूत व खुमास फार नाजूक दिसते. किमानपक्ष तीन चार रुपयांहून कमी नसावा.

क्रव्यादा०– अबबब ! तीन चार रुपये ! मी तर हा चार आण्यांस घेतला.

बुद्धिवंत– हें खरें सांगतेस कीं आपली थट्टा ?

क्रव्यादा०– तुमच्या गळ्याची शपथ. मीं यास चारच आणे दिले. त्यांत थट्टा ती कशाला पाहिजे ?

बुद्धिवंत– तर मग तूं आज सकाळीं कोल्ह्याचें तोंड पाहिलें होतेंसें वाटतें. खरोखर फारच स्वस्त. पण हा इतका स्वस्त कसा मिळाला ?

क्रव्यादा०– एक बैरागीण कीं नाहीं फार विश्वासू आहे ती आज कित्येक दिवसपर्यंत या पेठेंत येत असते. कोणी आमच्यासारख्या खात्यापित्या श्रीमंतांच्या मुली दुर्दैवानें गरीब स्थितीस आलेल्या आहेत त्यांच्या कांहीं वस्तू कधीं कधीं ती विकावयास आणते. (असें झणून अबीर, बुका, पिंजर व आगठी या वस्तू नवऱ्यास दाखविते.)

लोभ हा इतका वाईट आहे कीं कितीही शहाणा व चतुर मनुष्य असला तरी तो लोभापुढें अगदीं बुद्धिहीन होऊन जातो. मैना, पोपट, बुरी, बुलबुल आदिकरून वनांतील पक्षी मनुष्यास पहातांच भिऊन पळून जातात परंतु तेच धान्याचे लोभानें फसून जाळ्यांत सांपडतात आणि प्राणास मुकतात किंवा आमरण पिंजऱ्यामध्यें कैदी होऊन राहतात. झणून तेच पुण्यवान् आणि धन्य. आणि तेच या संसार समुद्रांतून पार पडतात कीं जे सर्व जगास दंश करून आपल्या विषानें गुंग करून टाकणाऱ्या ज्या

आशा व लोभरूप सर्पिणी त्यांस जिंकितात ! तेव्हां बिचारा बुद्धिवंत लोभाच्या पाशांत सांपडला यांत नवल काय ? तो आपला स्वार्थ पाहून फार खूष झाला आणि जेव्हां क्रव्यादाबाईनें सांगितलें कीं ती वैरागीण या उपर त्या श्रीमंताचे मुलीचें जें जें सामान विकावयास आणील तें तें पहिल्यानें मला दाखविण्याचा करार करून गेली आहे.

बुद्धिवंत—पण ती चोरीबिरीचा माल आणून विकित असेल याविषयीं मात्र सावधगिरी ठेव हो नाहीं तर फुकट चावडीवर तिजबरोबर आह्मांसही रखडावें लागेल. किंवा ती बैरागीण कोणी चेटकी, किंवा लुच्ची भामटी असेल याविषयींही फार जपून वागलें पाहिजे.

क्रव्यादा०—छिः, भलतेंच काय बोलतां ? ती बैरागीण अशी भामटी नाहींहो !

असो. आज बुद्धिवंतावरोबर या अशा प्रीतीच्या गोष्टी झाल्यावरून क्रव्यादाबाईचा त्या लवंगांवर दृढ विश्वास बसला. दुसरे दिवशीं सठवायला पाठवून त्या बैरागिणीला नाक्यावरून बलावून आणलें. आज तर खरोखर ती बैरागीण जशीकाय आजीबाई व ही तिची नात होऊन थोडा वेळ इकडच्या तिकडच्या सुखदुःखाच्या गोष्टी झाल्या. पुढें संध्याकाळीं जेव्हां बुद्धिवंत घरीं आला तेव्हां पुन्हा त्या बैरागिणीविषयीं गोष्टी निघाल्या. तेव्हां बुद्धिवंतानें पुन्हा आपले बायकोस झटलें, "पहाहो पण, तिजविषयीं फार सावध रहा. अशा वेषानें आजकाल पुष्कळ भामट्या निघाल्या आहेत." पण लोभानें बुद्धिवंताचे बुद्धीवर इतकें झांकण घातलें होतें कीं एवढी मोठी ढळढळीत गोष्ट त्याच्या लक्षांत आली नाहीं कीं तीन चार रुपयांची वस्तु कोणी

कारणाशिवाय चार आण्यांस कशी देईल ? ह्मणून बुद्धिवंतास असें करणें योग्य होतें कीं त्यानें त्या बैरागिणीस पुनः दारीं उभें करावयाचें नव्हतें किंवा तिनें दिलेल्या सर्व वस्तु परत करावयाच्या होत्या. क्रव्यादाबाईस हा आंतला भेद समजण्यापुर्ती अक्कल कोठली ? असे कांहीं दिवस लोटल्यावर एके दिवशीं क्रव्यादाबाई त्या बैरागिणीस विचारते, "कांहो आजीबाई, आतांशा त्या बाईचें कांहीं विकावयाकरितां आणीत नाहीं तें ?" बैरागीण मनांत समजली कीं या बाईला फार लोभ सुटला आहे. मग उघडपणें ह्मणाली, "तुमचे योग्यतेच्या कांहीं वस्तु निवाल्या ह्मणजे अगत्यपूर्वक आणीन. मला सांगितल्याची पक्की आठवण आहे पण उगाच लहानसान किंवा फुटक्यातुटक्या वस्तु कशाला आणूं ?" पुढें दोनचार दिवस गेल्यावर एके दिवशीं एक खोट्या मोत्यांची जोडी घेऊन आली आणि ह्मणाली, "मुली, हीं पहा मोत्यांची जोडी तुजकरितां आणिली आहे. हीं त्या बाईच्या नथीच्या आडवटांतील मोत्यें आहेत. न जाणो हजारांची किंवा पांचशांची जोडी आहे. गंभीरमल्लाचे पेढीवर गेलें होतें त्यानें तर ही जोडी पाहून तोंडांत बोटें घातलीं व माझे पदरीं दोनशें रूपये रोख बांधूं लागला. मी तर त्या बाईला पन्नास रूपये येतील असें सांगून आणलेली आहे, तुह्मीं ठेवीत असाल तर ठेवा. अशी वस्तु पुन्हा मिळावयाची नाहीं."

क्रव्यादा०—पण आजीबाई, सध्या मजजवळ पन्नास रूपये रोख नाहींत त्याला कसें करावें ?

बैरागीण—हात्तेच्या ! रोख रूपयेच कशाला पाहि-

जेत ? हातांतील बाजूबंद देऊन घे. एवढेंच कीं, अशी वस्तू घालऊं नको. आज ही जोडी तुझ्या हातून गेल्यावर पुनः परत येईल असा भरंवसा नाहीं.

त्या बैरागिणीनें तिखटमीठ लावून अशी बतावणी केल्यावर क्रव्यादाबाईनें लगेच जाऊन आपल्या पेटींतून दागिन्यांचा करंडा आणून त्यांतून आपला बाजूबंद काढून बैरागिणीचे स्वाधीन केला. तेव्हां बैरागीण क्रव्यादाबाईचे दागिने पाहून ह्मणाली, " अरेरे, काय सोन्यासारख्या दागिन्यांचा मातेरा करून ठेवला आहे हा ! मुली, या तांदळपोतींत नवा दोरा तरी घालून घे, ह:ह:ह: या कर्णफुलांत सर्व मळचमळ होऊन गेला आहे. मळ सोन्यास खाऊन टाकतो बरें मुली. हे नेहमी धुवून पुसून स्वच्छ ठेविले तरच ते दागिने."

क्रव्यादा०—आजीबाई, तुह्मीं सांगतां हें सगळें खरें; पण कोण दोरा घालून आणील आणि कोण धुऊन देईल. ह्यांना सांगितलें ह्मणजे ते ह्मणतात कीं मला फुरसत नाहीं.

बैरागीण—हा वेडे मुली, यांत मोठें काम तें कसचें ? पहा हीं मोत्यें येथें असूं देत. मी आतां जाऊन ही तांदूळपोत कशी पटवून आणतें ती पहा आणि जे दागिनें फार मळकट झाले आहेत तेही मजकडे काढून देत असलीस तर दे ह्मणजे त्यांसही लागलाच सोनाराकडून जरा उजळा देऊन आणतें.

नंतर क्रव्यादाबाईनें आपले सर्व दागिनें काढून बैरागिणीचे हवालीं केले. नंतर बैरागीण ह्मणाली, " सठवायला मजवरीवर द्या. ह्मणजे ती सोनाराचे दुकानीं बसेल, तेव्हांत मी पटवेकऱ्याचे येथें जाऊन दोरा घालून आणीन. "

क्रव्यादाबाई—पण सठवाय तर येथें नाहीं. बरें तिला हांक मारून पहातें.

असें म्हणून क्रव्यादाबाईनें सठवायला हांक मारली. ती आल्यावर बैरागिणीनें तीस म्हटलें, "मुली, चल, जरा मजबरोबर येऊन सोनाराचे दुकानावर या दागिन्यांजवळ बैस." असें म्हणून दागिने बांधलेला रुमाल बैरागिणीनें आपलेजवळ घेतला व सठवायला बरोबर घेऊन तेथून दोघीजणी निघाल्या. गल्लीचे नाक्यावर गेल्यानंतर बैरागिणीनें दागिने बांधलेला रुमाल सोडला आणि सठवायला म्हणाली, "आपण उजळा द्यावयाचे व धुवावयाचे दागिने निराळे काढूं व पटवेकऱ्याकडे न्यावयाचे तेवढे निराळे करूं म्हणजे तेथें गेल्यावर ठीक पडेल." दागिनें निराळे करतां करतां सठवायला म्हणते, "अगे पण या हातांतील गोखरूचें मळसूत्र कुठें आहे?"

सठवाय—यांतच कोठें असेल आणि जाणार कोठें? ती तर लहानशी वस्तू आहे त्या पाटल्यांचे खालीं असेल पहा बरें.

बैरागीण—(पाटल्यांचे खालीं पाहून आठवण झाल्यासारखी करून) हो, हो, तें तर पानपुडावरच राहिलेंसें वाटतें. सठवाय, जा बरें तेवढें धांवत जाऊन घेऊन ये, मी येथेंच आहें.

सठवाय—(धांवत धांवत जाऊन गल्लींतूनच क्रव्यादाबाईला हांक मारून) वैनी, अहो वैनी, पानपुडावर गोखरूचें मळसूत्र राहिलें आहे तें बैरागिणीनें मागितलें आहे. ती गल्लीचे नाक्यावर घेलाभाई वाण्याचे दुकानासमोर बसली आहे.

क्रव्यादा०—(हें ऐकतांच अगदीं घाबरून व दातओंठ खाऊन) अगे कारटे, तूं वेडीबिडी झाली नाहींसना? असें

मळसूत्र मजजवळ होतें कोठें ? तुला माहीत नाहीं ? आतां तरी धांव कारटे, आणि पहा ती बैरागीण कोठें गेली-बिली असेल.

हें ऐकून सठवाय तशीच जीव घेऊन धांवली आणि तेथें पहाते तों कोठची बैरागीण आणि कोठचें काय ! तिला पहाण्याकरितां इकडून तिकडे व तिकडून इकडे धूम खेपा घातल्या पण ती कोठेंच दिसत नाहींसें पाहून पुनः ऋव्यादाबाईपाशीं आली आणि ह्मणाली, " वैनी, बैरागिणीचा तर कोठेंच पत्ता नाहीं. मी थेट मंडई पर्यंत धांवत गेल्यें पण कोठें ठावनाठिकाण, रांड इतक्या वेळांत कोठें नाहींशी झाली कोण जाणे "

ऋव्यादा०— (हें ऐकून घाबरली व कपाळावर हात मारून मोठ्यानें आक्रोश करून) हाय हाय, मला लुटलेंरे लुटलें ! अेरेरे ! मी फुकट नागवलें !! अरे शेजाऱ्यांनों, माझी तुह्मांस करूणा येऊंद्यारे ! अरे देवा, धर्मासाठीं तरी धांव घ्या ! अगआई, मी आतां काय करूं ?

हें असें दीनवाणें रडणें ऐकून शेजारचे लोकांसही दया आली व ते जिकडे वाट फुटेल तिकडे धांवत गेले. त्यांपैकीं कित्येक काळेवावरापर्यंतही गेले. तेथें चौकशी करितां करितां लोक असें सांगूं लागले कीं " कुठची मेली भामटी रांड, भीक मागण्यासाठीं आज महिनाभर भाड्यानें खोली घेऊन राहिली होती. पण आज चार दिवस झाले, भाडें दिल्याशिवाय ती कोठें चालती झाली." हें ऐकल्यावर लोकांस कोठेंच चौकशी करण्यास जागा राहिली नाहीं. संध्याकाळीं जेव्हां बुद्धिवंत घरीं आला तेव्हां हें सर्व वर्तमान ऐकून कपाळावर हात मारून घेऊं लागला आणि बाय-

कोस ह्मणूं लागला कीं "अग अवदसे, तूं साऱ्या वरा-दाराला आग लावून आतां मला जाळायाचें बाकी ठेविलें आहेस. मी पूर्वीपासूनच तुला पक्की ओळखून आहें."

क्रूर्यादा०—आतां फार बोलूं नका. थोडक्यांत शहा-णपण आटपा. त्या दिवसाचा चोळखण पाहून मला तुह्मींच सांगितलेंना कीं त्या बाईच्या आणखी कांहीं वस्तू अशाच स्वस्त मिळाल्या तर घे! मोठे बुद्धिवंत ह्मणवतां. पण त्या वेळेस तुमची बुद्धि कोठें गेली होती?

सारांश, त्या दिवशीं बुद्धिवंताचें बायकोबराबर मोठ्या निकराचें भांडण झालें व तें पहाण्याकरितां पेठेंतील सर्व लोक होते नव्हते तेवढे एकत्र झाले. गोष्टीवरून गोष्ट निघतां असें समजलें कीं त्या वैरागिणीनें कृष्णपु-ऱ्यांतील हैबती दफेदाराचे बायकोपासून तिचे सर्व दा-गिनें एका फकिरापासून किमया करून दुप्पट करून आणून देत्यें असें सांगून उपटून नेले. त्याप्रमाणेंच चि-वूड गल्लींतील धनाजीराव जाधव रिसालदार ह्याचे क-न्येशीं अशी मैत्री जमविली कीं तिचे दागिने एक बाई त्या नमुन्याचे करणार आहे तिला दाखवायाला नेतें असें सांगून घेऊन गेली.

सांगावयाचें इतकेंच कीं क्रूर्यादाबाईचे दागिन्यापरी दा-गिने जाऊन शिवाय लोकांचीं फुकट चीं बोलणीं मात्र ऐकावीं लागलीं. भांडींकुंडीं तर पूर्वीच चोरीस जाऊन चुकलीं होतीं. दागिन्यांचीही अशी वाट होऊन त्यांजबद्दल हजार रुपयांची पाणीदार मोत्यांची जोडी कायती हातीं राहिली होती, पण ती जेव्हां लोकांनीं पाहिली तेव्हां ती तीन पैशांच्या मोलाची ठरली! पुढें सरकारदरबार होऊन ही

त्रातमी कोतवाल चावडीवर गेली. व लोकांनींही आपणांकडून होईल तितकी चौकशी केली पण त्या वैरागिणीचा कोठें ठावठिकाण लागला नाहीं.

येवढा वेळपर्यंत ताराबाईचे दागिने, व भांडींकुंडीं यांची काय वाट झाली हें तुम्हीं वाचलें. आतां शिल्लक राहिलेलीं वस्त्रप्रावर्णें यांची थोडी हकीकत सांगून हा कथाभाग आटपतों.

तुम्हांस माहित अहिच कीं लग्न झालें म्हणजे मुलीचा बाप आपले मुलीस शक्त्यनुसार कांहीं आंदण देत असतो, त्याप्रमाणें ताराबाईचे बापानें तिला पुष्कळ दागदागिनें, भांडींकुंडीं व वस्त्रप्रावर्णें दिलीं होतीं. जेथपर्यंत ताराबाई ही आपले सासूचे येथें होती तेथपर्यंत सासू दर पंधरवड्यास किंवा निदान महिन्यांतून एकदा तरी सर्व कपड्यांस ऊन दाखवीत असे. पण ताराबाई ही पावसाळ्याचे अखेरीस निराळी झाली होती त्यामुळें ज्या खोलींत कपड्यांची पेटी एकदां आणून टाकली होती तेथेंच ती पडून राहिली होती व ती एक दिवस सुद्धां उघडून कधीं पाहिली नव्हती. पुढें जेव्हां थंडी पडूं लागली तेव्हां तिला रजईची आठवण झाली त्यावरून पेटी उघडून पहाते तों बहुतेक कपड्यांस वाळवी व कसर लागून गेलेली होती आणि कित्येक कपडे उंदरांनीं कुरतुडून कुरतुडन टाकिले होते. सारांश एक कपडा देखील कामास येण्यासारखा राहिला नव्हता.

ज्या मुली लहानपणीं आईबापांच्या लाडांत राहून कोणतीही विद्या किंवा कला शिकत नाहींत त्यांस ताराबाईप्रमाणें आमरणपर्यंत दुःख व क्लेश भोगावे लागतील.

ताराबाईची ही जी तुह्मीं वरील हकीकत वाचली त्या सर्व हकीकतविरून तुह्मांस समजलेंच आहे कीं ताराबाईस आईच्या व मावशीच्या लाडांमुळें वारंवार कसकशीं संकटें व दुःखें सोसावीं लागलीं तीं. ताराबाईनें लहानपणीं कोणतीही विद्या किंवा कला साध्य करून घेतली नाहीं; यामुळें तिचा स्वभाव यत्किंचित्‌ही सुधारला नाहीं; जेव्हां ती सासूचे घरांतून निघून निराळी राहिली, तेव्हां भांडींकुंडीं, लत्ताकपडा, दागदागिनें सर्व कांहीं तिजजवळ होतें पण घरसंसार चालविण्याचें तिच्या अंगीं चातुर्य नसल्यामुळें थोड्याच दिवसांत त्या सर्वांचें वाटोळें करून एक वर्षाचे आंतच ती कंगाल होऊन बसली. तशांत बुद्धिवंत जर तिजप्रमाणेंच मूर्ख व अविचारी पुरुष असता तर केव्हांच ताराबाईचे अशा त्या कृत्यांनीं डोकींत राख घालून काशीयात्रेस गेला असता. पण बुद्धिवंत हा मोठा विचारी व खोल बुद्धीचा होता ह्मणून त्याणें आपला मोठेपणा व कुलीनपणा राखला. असो. आतां आपण ताराबाईची धाकटी बहिण जी हिराबाई इजकडे वळूं.

हिराबाईची गोष्ट.

—000—

मनुष्याच्या सर्व शरीरामध्यें नेत्र, किंवा बागेमध्यें गुलाबाचें फूल ज्याप्रमाणें शोभा देतें तद्वतच हिराबाई ही त्या कुटुंबास शोभा देत असे. हरएक प्रकारची विद्या व कला व हरएक गोष्टीविषयीं सारासार विचारशक्ति तिजमध्यें होती. सारांश ज्ञान, बुद्धि, भीड, मर्यादा वगैरे सर्व कांहीं सद्गुण तिच्या अंगांत तारीफ करण्याजोगे ईश्वरानें ठेविले

होते. लहानपणापासूनच खिदळणें किंवा थट्टामस्करी करणें इत्यादि गोष्टींचा तिला कंटाळा असे. लिहिणें वाचणें व घरचें काम करणें यांशिवाय तिणें ह्मणजे व्यर्थ आळसांत वेळ घालविला किंवा एखाद्याबरोबर कधीं भांडण केलें असें ऐकिवांत आलें नाहीं. पेठेंत जेवढ्या बायका होत्या तेवढ्या सर्व तिजवर आपल्या मुलांप्रमाणें प्रीति करीत असत. धन्य भाग्य त्या आईबापांचें कीं ज्यांच्या पोटीं हिराबाईसारखी कन्या व्हावी. तसेंच ज्यांच्या घरीं ही पडली त्यांचेंही सुदैवच समजावयाचें.

हिराबाईला हें तेरावें वर्ष लागून तिची मागणीही कर्मधर्मसंयोगानें सत्यवंताकारितां होऊन चुकली होती असें मागें लिहिलेलें वाचकांस आठवत असेलच. आतां या सुमारास कोणत्या महिन्यांत व कोणत्या मुहूर्तावर लग्न धरावें याची वाटाघाट सुरू झाली. इकडे एका अर्थानें सत्यवंताच्या आईनें आपली मोठी सून ताराबाई हिचे रंग ढंग पाहून तो विचार मनांत आला कीं तिचे सर्व आंगावर रोमांच उभे राहात. ह्मण आहे कीं "पुढल्यास ठेंच मागला शहाणा" याप्रमाणें एक झालें तें झालें पण आतां तरी धाकट्या मुलास मुलगी दुसऱ्या कुठच्या तरी चांगल्या घरची करावी असा आंतून तिचा बेत होता. व हा बेत कोठून कोण जाणे बुद्धिवंताचे कानावर गेला तेव्हां तो एके दिवशीं आईस विचारूं लागला, "आई, तुझ्या मनांत सत्यवंताची मागणी तोडावयाची आहे असें मीं ऐकतों. हें खरें काय ?"

आई— काय सांगूं बाळा, मी मोठ्या काळजींत पडलें आहें. काय करूं मला कांहीं सुचत नाहीं. पहा, तुमच्या

तोंडाकडे पहाण्यास मला मोठी लाज वाटते. सर्व प्रकारें ईश्वरानें मला तुमची अपराधी केलें, आतां पहावें सत्यवंताचें तरी कसें नशिब आहे तें.

बुद्धिवंत— आई, मी खरोखर सांगतों कीं, सारें जग जरी तूं दिवटी घेऊन शोधिलें तरी हिराबाईसारखी ह्मणून मुलगी आपले ज्ञातींत सांपडावयाची नाहीं. जशी रूपलक्षणांनीं तशीच गुणांनींही ईश्वरानें तिला परिपूर्ण केलें आहे ह्मणून कोणतेही गोष्टीविषयीं मनांत संशय बाळगण्याचें कारण नाहीं. सर्व प्रकारें जगन्नियंत्यावर भरिभार घालून एकदां लग्न कर ह्मणजे झालें आणि तिचे (बायकांचे) गुणांवरून जर तूं विचार करीत असशील तर तूं तुकाराम साधूचा अभंग ऐकिलाच असशील कीं,—

दह्याचिया अंगीं निघे ताक लोणी ।
एका मोलें दोन्ही मागों नये ॥
आकाशाचे पोटीं चंद्रतारागण ।
दोहींशीं समान पाहों नये ॥
पृथ्वीचे पोटीं हिरे गारगोटी ।
दोहींशीं समसाठी करूं नये ॥
तुका ह्मणे तैसे संत आणि जन ।
दोहींशीं समान भजूं नये ॥ १ ॥

याप्रमाणें प्रत्येकाचा निरनिराळा गुण व बुद्धि असते. ज्याप्रमाणें बागांत हजारों प्रकारचीं फुलें असतात पण त्या सर्वांचा रंग, रूप, वास जसा निरनिराला असतो त्याप्रमाणेंच हा प्रकार होय, ह्मणून एकीच्या गुणांवरून दुसरीच्या गुणांचें अनुमान करून दोघींसही समान मानणें हें

योग्य नव्हे. ईश्वराचे दयेनें हें कार्य एकदां पार पडल्या-वर माझें म्हणणें खरें आहे कीं नाहीं तें पहाशील.

बुद्धिवंतानें हिराबाईची अशा प्रकारें तारीफ केल्यावरू-न तिलाच करावी असा आईचा पक्का निश्चय ठरला आणि दोहोंकडचे पुढारी मिळून मार्गशीर्ष शुक्ल अष्टमीस गोरज मुहूर्तावर लग्न योजावें असें ठरलें. आणि हिराबाई-चा बाप विश्वासराव हा घांटावर निपाणकरांजवळ चाक-रीस होता त्यास हें वर्तमान लिहून कळविलें. हें वर्तमान कळतांच विश्वासरावास फार आनंद वाटला कारण सर्व मु-लांत हिराबाईवर ह्याची फारच ममता असे. यामुळें ताब-डतोब रजा मिळावी म्हणून त्यानें सरकारांत अर्ज केला पण सध्या रजा मिळत नाहीं असा स्पष्ट जबाब मिळाला. पुष्कळ मध्यस्थी घातल्या पण कांहींएक चाललें नाहीं. पर्जन्यकाळ संपून कामाचे दिवस आल्यामुळें कारभारी साहेबांसही रजा न देण्यास सबळ कारण होतें. विश्वासरावा-स रजा न मिळाल्या करणानें फार वाईट वाटलें खरें तरी निराश न होतां ती मिळण्याविषयीं खटपट करीतच होता. त्याचा वडील मुलगा रमाकांत हा त्याजपाशींच होता त्यास लग्नसंबंधीं सर्व कांहीं व्यवस्था समजाऊन दे-ऊन व पांचशें रुपये रोख देऊन घरीं पाठविलें. घरीं कपडा लत्ता, दागदागिने, भांडीं कुंडीं, वगैरे लग्नाचें साहित्य पूर्वीपासूनच तयार करून ठेविलें होतें. मात्र दा-णागोटा वगैरे किरकोळ सामान घ्यावयाचें राहिलें होतें. रमाकांत घरीं पोंहोचल्यावर त्याणें गहूं, तांदूळ, डाळ, तेल, तूप इत्यादि जेवढें अगत्याचें सामान होतें तेवढें खरेदी केलें. योजलेला दिवस येऊन ठेपल्या कारणानें लग्न

घटिका घालून हिराबाईला हळद लावूं लागले. हिराबाईच्या आईच्या मनांत होतें कीं हिला मोठे बहिणीपेक्षां आंदण जास्त द्यावें व लग्नही मोठ्या डामडौलानें करावें, पण हिराबाई ही त्याच घरांत राहत होती त्यामुळें ज्या कांहीं गोष्टी होत होत्या त्या सर्व तिला सहज समजत असत यांत मोठेंसें नवल नाहीं. जेव्हां हिराबाईला कळलें कीं आकापेक्षां मला जास्त आंदण मिळणार आहे व तेव्हां जर ती मुलगी वेडी असती तर तिला खरोखर मोठा आनंद झाला असता, पण नाहीं; तिला मोठें वाईट वाटून आईच्या हातून अशी गोष्ट न होऊं देण्यास काय युक्ति करावी म्हणून मोठ्या विचारांत पडली. शेवटीं सुमतीबाई म्हणून तिची माऊस बहीण होती. तिजजवळ लाजत लाजत ही गोष्ट काढली आणि म्हणूं लागली कीं "गडे सुमति, मी असें असें ऐकिलें आहे तेव्हांपासून कीं नाहीं मला मोठी काळजी लागली आहे आणि आज कित्येक दिवस विचार करित्यें कीं देवा याची काय वाट करूं. बरें झालें कीं, आज तुझी भेट झाली. तूं गडे माझे बरोबरीची आहेस तेव्हां तुझेजवळ सांगण्यास कांहीं आडकाठी आहे असें नाहीं. तरी कसेंही करून आईस इतकें समजाऊन सांग कीं आकापेक्षां कोणतेही रीतीनें काडीभरही जास्त आंदण मला देण्याचे भरीस पडूं नको."

सुमती— तुझा तरी बाई मला मोठा चमत्कार वाटतो. मेली म्हण आहे कीं नाहीं, "बाळाला दिली वाटी पण बाळ मागतो करटी" तशांतली ही गोष्ट. ती खुशीनें देत असतां तूंग कां नको म्हणतेस?

हिराबाई— तूं तरी बाई वेडी आहेस, यांत किती तंट्याचें

मूळ आहे हें तुला समजत नाहीं? अग आकाचा स्वभाव तर तुला माहितच आहे तेव्हां तिला या गोष्टीपासून फार दुःख होईल आणि मग कीं नाहीं ती आईबरोबर नाहक फुगून बसेल.

सुमती— यांत फुगण्यासारखें तें कारण कसचें बाई? अग हें ज्याचें त्याचें नशीब. पाहूं गेलें असतां यांत मनाची समजूत करण्यास हजार गोष्टी आहेत. तिचेसारखी तूं कांहीं चार वर्षें मागणी होऊन राहिली नाहींस. शिवाय लग्न झाल्यापासून तिला आणणें नेणें, भेटबिट होयनव्हे यांस थोडका का खर्च लागला असेल? अग तर त्या सर्वांची कसर यांत समजून घ्यावी म्हणजे झालें.

हिराबाई— तूं म्हणतेस कीं नाहीं हें सगळें खरें पण याला नांव तर आंदण ना? तें धाकटीला ज्यास्त मिळालें असतां मोठीला त्याचें दुःख सहजच वाटेल. यांतग काय आश्चर्य? एका घरांत राहाणें, नेहमीं एके ठिकाणींच उठणेंबसणें असें असतां ज्या गोष्टीपासून मनांत दुजाभाव राहील अशी गोष्ट करणें यांत शहाणपण तें कोणतें?

सुमती— गडे, अशानें तूं उगाच आपला तोटा करून घेतेस. अग नवनवें आहे तेव्हां एक दोन दिवस वाईट वाटेल पण बघशील तर खरें एक दोन महिने गेले म्हणजे आपोआप त्याचा विसर पडेल.

हिराबाई— गडे, आईबापांचे देण्यानें काय मोठी श्रीमंती येणार? असें कोणाचें आंदण सारे जन्मभर पुरलें आहे? अग ईश्वराची दया असली तर तो सर्व कांहीं देऊं शकतो. म्हणून तूं या गोष्टीविषयीं मला उगीच भर घालूं नको. गडे, तुला ही गोष्ट आईस सांगावयाची नसेल तर

तसेंच सांग ह्मणजे मी दुसरी कांहीं तरी तजवीज करीन. घण ही गोष्ट मी कधींही कबूल करावयाची नाहीं.

शेवटीं हिराबाईच्या आईचे कानावर ही गोष्ट गेली तेव्हां तिणेंही विचार करून आपला पूर्वीचा बेत फिरविला आणि मनांत ह्मणूं लागली कीं द्यावयाचेंच आहे तर हजारों प्रकार आहेत याकरितां दुसरे एकादे वेळीं त्याचें पहातां येईल.

सारांश, नेमलेल्या दिवशीं सुमुहूर्तावर हिराबाईचें सत्यवंताबरोबर मोठ्या समारंभानें लग्न झालें. तिचा भाऊ रमाकांत हा असा बातबेतानें वागणारा होता कीं त्या एकट्यानें मोठ्या कुशलतेनें व काटकसरीनें आपल्या धाकट्या बहिणीचें मंगलकार्य सिद्धीस नेलें. दोहोंकडल्या वऱ्हाड्यांची व आल्यागेल्यांची चांगली संभावना केली. त्याच प्रमाणें ज्यांचा जसा मान राखावा तसा राखिला. कोणतेही प्रकारें ह्मणजे कोणासच नांव ठेवण्यास ह्मणून काडीभर जागा ठेवली नाहीं. यामुळें लग्नकार्यास आलेली सर्व मंडळी शेवटपर्यंत मोठी आनंदभरित दिसली. जेव्हां हिराबाईची घरभरणी सासरीं जावयास निघाली तेव्हां घरांतील सर्व लहानथोर मंडळींचीं तोंडें उतरून गेलीं. आईस तर दुःखाचा फारच कढ आला व पेठेंतील सर्व बायका अगदीं गहिंवरून गेल्या. आली गेली ती तिला मोठ्या प्रेमानें पोटाशीं धरून रडे आणि शेवटीं "जा बेटा, सुखानें नांद" "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव" "चिरायुहो" "कल्याण असो" असे सर्वांचे तोंडांतून आनंदाचे उद्गार निघूं लागले. सारांश तो वेळ, पहाणारास एका अर्थानें फारच आनंदाचा पण दुसऱ्या अर्थानें दुःखाचा असा दिसत होता. हिराबाई या-

प्रमाणें सर्वांच्या आशिर्वचनांचें फारच मोठें आंदण घेऊन सासरीं आली तेव्हां तेथेंही मोठ्या आनंदानें तिच्या लग्नोत्साहाचा शेवट झाला आणि हिराबाईचें सासरचें नांव "विजयालक्ष्मी" असें ठेविलें. हें नांव तिला खरोखर साजण्यासारखें होतें.

पुढें जसजसें तुम्हीं वाचाल तसतसें तुम्हांस हिराबाईनें घरसंसार कोणत्या रीतीनें चालविला व तो चालवीत असतां तीस कोण कोणतीं संकटें आलीं व त्यांचें कसकशा युक्तीनें व सारासार विचारानें तिणें निवारण केलें हें कळून येईल. आतां या ठिकाणीं हिराबाईच्या स्थितीची ताराबाईचे स्थितीशीं थोडीशी तुलना केली असतां बरें पडेल असें वाटल्यावरून ती येथें थोडक्यांत करितों.

हिराबाई ही आपल्या आईची दुसरी मुलगी आणि सासूची दुसरी सून झाली. दोहींकडची हौस आणि उमेद ही हिराबाईचे लग्नामध्यें हवीतशी पुरली होती.

ताराबाईचें लग्न सोळावे वर्षीं झालें होतें पण हिराबाईचें वय लग्नसमयीं पुरें तेरा वर्षांचेंही नव्हतें. ताराबाईचें लग्न झालें तेव्हां तिचा नवरा बुद्धिवंत हा पंधरा रूपयांचे चाकरीवर होता आणि हिराबाईचे लग्नसमयीं तिचा नवरा सत्यवंत हा हायस्कुलांत शिकावयास जात असे. सत्यवंताची बुद्धिवंताबरोबर तुलना केली असतां तो बुद्धिवंतापेक्षां जरा कोमल बुद्धीचा व थोडा शिकलेला होता. ताराबाईचें लग्न झाल्यावर पांच सहा वर्षेंपर्यंत तिला मूल झालें नव्हतें. आणि हिराबाईनें तर लग्न झाल्यापासून तिसरे वर्षींच ईश्वराचे दयेनें पुत्रमुख पाहिलें. ताराबाईस शहराबाहेर जाण्याचा कधींच प्रसंग आला नव्हता पण हिराबाईला बरींच वर्षें दे-

शोदेशीं फिरावें लागलें. सर्वप्रकारें हिराबाईचे स्थितीची ताराबाईचे स्थितीशीं तुलना केली असतां ती चांगली नव्हती. पण हिराबाईस लहानपणापासून चांगलें शिक्षण मिळालें होतें त्यामुळें तिच्या घरसंसार चालविण्याच्या हातोटीनें घरांत एकसारखी लक्ष्मी नांदत होती इतकेंच नव्हे तर हिची मोठी बहीण ताराबाई हिचें नांव सुद्धां कोणास माहित नसून हिराबाईचे नांवानें तर बुधवारचे वाड्यास लागून एक गगनचुंबित मनोरा बांधून त्यावर चोहों बाजूंस चार मोठीं घड्याळें लावलेलीं आहेत. शिवाय शुक्रवार पेठेच्या पश्चिमेस हिराबाग म्हणून एक बाग आहे, व जींत हल्लीं टाऊनहॉल बांधलें आहे तिचें नांव याच बाईचे नांवावरून पडलें आहे. त्याचप्रमाणें बुधवारचा वाडा सोडून थोडेंसें पुढें गेलें म्हणजे कोतवाल चावडीचे शेजारीं जो मोठा हौद आहे तोही याच बाईनें बांधला असें म्हणतात. तसेंच पर्वतीचे पायथ्याशीं जी धर्मशाळा आहे ती या बाईचीच असून तेथें प्रतिवर्षी हिंवाळ्यांत एक हजार घोंगड्या गरीब व निराश्रित लोकांस वांटल्या जातात. असो.

रमाकांतानें आपला बाप विश्वासराव यास पत्र पाठवून, कळविलें कीं " ईश्वराचे कृपेनें प्रिय भगिनी हिराबाई हिचें लग्न मार्गशीर्ष शुद्ध अष्टमीस गोरज मुहूर्तावर झालें " हें वाचून विश्वासरावास फार आनंद झाला पण कन्येच्या वियोगाचें दुःख त्याला फारच झालें. हिराबाईचें लग्न झाल्यावर विश्वासरावानें तीस जें पत्र लिहिलें तें वाचण्याजोगें आहे. कर्मधर्म संयोगानें तें पत्र आमचे हातांत आलें होतें त्याचा हा खालील उतारा होय:—

॥ श्री जगदीश प्रसन्न ॥

"माझे जिवास विश्रांति आणि मनास आनंद देणारी कन्या चिरंजीवि सौभाग्यवति हिराबाई ईस,

"फार फार प्रेमालिंगन आशीर्वाद प्रविष्ट कीजेत विशेष, लिहावयास कारण कीं, चिरंजीव रमाकांत याचे पत्रावरून तुझे लग्नाची सर्व कांहीं हकीकत कळों आली. पुष्कळ वर्षांपासून माझा हेतू होता कीं हें मंगलकार्य मी आपल्या हातानें करावें परंतु तो हेतू सिद्धिस नेण्यास कारभारी साहेबांकडून मला रजा मिळाली नाहीं याकरितां मी फार दुःखी आहें. तूं जाणतेस कीं सर्व मुलांमध्यें मला तुझी एकटीचीच ममता व काळजी विशेष होती हें मी ह्मणजे तुला लिहून कळविलें पाहिजे असें नाहीं. तूं आपल्या गुणांनीं व प्रिय भाषणानें माझें व घरांतील प्रत्येक मनुष्याचें मन आकर्षण करून घेतलेंस. आठ वर्षाच्या वयापासूनच तूं माझे घरचा संसार विचार मौढ मनुष्यासारखा पहायाला लागलीस. घरांत तुझ्या आईला कोणतेही गोष्टीविषयीं काळजी वहावी लागत नसे असें माझे ऐकण्यांत अनेक वेळां येऊन चुकलें आणि घरीं येण्यास जेव्हां जेव्हां ह्मणून मला सवड मिळत असे तेव्हां तेव्हां तुझा हरएक गोष्टीविषयीं बातबेत पाहून मला फार हर्ष वाटत असे, पण आतां तुझे सासरीं जाण्यानें घर संसाराचें इतकें नुकसान होईल कीं त्याची भरपाई करण्यास मी सर्व आयुष्यभर जरी खपलों तरी ती होईल असें मला वाटत नाहीं. ईश्वर तुझें सदैव कल्याण करो. चिरंजीव रमाकांत याचे पत्रावरून हेंही कळून आलें कीं तूं चिरंजीवि सौभाग्यवती ताराबाई पेक्षां कोणतेही रीतीनें अधिक आंदण घेण्यास नाकारिलेंस. यावरून तुझी दीर्घ दृष्टि व खरा उदारपणा हीं दिसून येतात. याबद्दलचें बक्षीस मी तुला पाठवितों तें हें पत्र होय. हें तूं आपलेजवळ जपून ठेव आणि यांतील उपदेशाचें चांगल मनन कर ह्मणजे ईश्वर दयेनें तुजवर कोणतेंही संकट येणार नाहीं आणि तूं आयुष्यभर सुखानें व आनंदानें राहशील.

"प्रथमतः लग्न ह्मणजे काय? हें आपणास समजलें पाहि-

जे. लग्न म्हणजे फक्त तऱ्हेतऱ्हेचीं उंची वस्त्रें नेसल्यानें किंवा चार आया बाया एकत्र जमल्यानें किंवा दागदागिने घातल्यानें व आंदण मिळाल्यानेंच होतें असें नाहीं तर लग्नानें एक नवीन प्रकारचें जिणें सुरू होत असतें म्हणजे नव्या लोकांबरोबर सहवास करावा लागतो, नव्या घरांत रहावें लागतें. ज्याप्रमाणें नवीन शिकाऊ पाडा नांगरास जुंपण्याच्या कामीं लावायाचा असला म्हणजे त्याच्या मानेवर पहिल्यानें रिकामें जूं ठेवीत असतात, त्याप्रमाणेंच मनुष्याच्या मानेवर पहिलें जूं लग्न हें होय. लग्न झालें म्हणजे मुलगी बायको होते व मुलगा नवरा होतो. याचा अर्थ हा कीं, या दोघांस संसाररूप जी माडी तिला जुंपितात. ती त्यांणीं मोठमोठाल्या दऱ्या, खोरीं, पर्वत, रानें, ओलांडून व महत् संकटें सोसून स्मशानभूमी पर्यंत नेली पाहिजे. म्हणून लग्न झालें म्हणजे मन दृढ करून मोठया सहनशीलतेनें हें मोठें ओझें ओढण्यास सिद्ध असलें पाहिजे व आयुष्याचे जितके दिवस जातील तितके मोठया अन्नूनें व गुण्यागोविंदानें काढले पाहिजेत. नाहीं तर कज्जेकफावती, भांडणतंटे, शिव्यागाळी इत्यादि केल्यानें आयुष्याचा प्रवास अधिकाधिक दुःखप्रद होत असतो. हे माझे मीय कन्ये हिरे ! जगन्नियंत्या परमेश्वरानें स्त्री पुरुषमांध्यें किती निकट संबंध ठेविला आहे हें आतां तुला एक पौराणिक गोष्ट सांगून दाखवितों.

"शिवलीलामृतांत व पुराणांतरीं अनेक ठिकाणीं शिवपार्वती विषयीं ज्या गोष्टी आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, शिवाचा स्वभाव तामसी व वृत्ति विरक्त असल्यामुळें नेहमी कांहीं तरी अयाचित प्रकारचें वर्तन करण्याकडे त्याचा कल असावयाचा व पार्वतीनें आपल्या मनोहर सौंदर्यानें व सद्गुणांनीं पतीचें समाधान करून त्याचा कल फिरवून त्यास ठिकाणावर आणावयाचें. याविषयींचे दाखले पुष्कळ आहेत ते तुला विदित असल्यामुळें येथें देण्याची गरज नाहीं. परंतु ह्या गोष्टीवरून तात्पर्य इतकेंच घ्यावयाचें कीं स्त्रीचा जन्म केवळ पुरुषाचें मन आनंदित करावें इतक्याच करितां होय म्हणून स्त्रियांनीं पार्वतीप्रमाणें

आपापल्या पतीचें मन नेहमीं आनंदीत व उल्हासित ठेवण्या-विषयीं तत्पर असणें हेंच त्यांचें मुख्य कर्तव्य कर्म होय. परंतु लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं, फारच थोडया स्त्रिया हें कर्तव्यकर्म बजाबितात. ईश्वरानें स्त्रियांपेक्षां पुरुषांस श्रेष्ठ केलें आहे हें फक्त त्यांच्या बाहेरील व्यवहारावरूनच सिद्ध होतें असें नाहीं तर पुरुषांमध्यें बुद्धि, सामर्थ्य, तेज इत्यादि जे अनेक गुण दिले आहेत त्यांवरून सिद्ध होतें. सृष्टीचा सर्व व्यवहार पुरुषजातीपासूनच होतो. पुरुष पैका संपादन करणारे आणि स्त्रिया त्या पैक्याचा योग्य रीतीनें व्यय करणाऱ्या व तो सांभाळून ठेवणाऱ्या होत. कुटुंब हें एक जहाज आहे आणि पुरुष हे त्यावरचे खलाशी होत. जर खलाशी नसतील तर तें जहाज जसें समुद्राचे लाटांनीं बुडून जाईल किंवा कोठें तरी किनाऱ्यावर आदळून फुटेल तसें कुटुंबांत जर देखरेख करणारे पुरुष नसले तर त्याची वरील जहाजाच्या दृष्टांता प्रमाणेंच दुर्दशा होण्याचा संभव आहे.

"घरांत द्रव्य व माल मिळकत असली ह्मणजेच सुख प्राप्त होतें असें नाहीं. जरी द्रव्य हें सुखाचें मूळ आहे तरी मोठ-मोठाल्या कुटुंबांत व उंच कुळांत त्या द्रव्यामुळें नेहमीं भांडण तंटे होत असतात, असें आपल्या पाहण्यांत येतें. संसारामध्यें सुख व शांति हीं केवळ एकोप्यानें राहिलें तरच मात्र मिळतात. कित्येक गरीब कुटुंबें आपल्या नेहमीं पाहण्यांत येतात तीं अशीं कीं ज्यांची मिळकत फारच थोडी असते व जीं सारा दिवस मोल मजुरी करूनही रात्रीचे प्रहरीं जाडीभरडी भाजीभाकर खाऊन मोठया आनंदानें राहतात. खरोखर माझे मतें हे लोक जाडीभरडी भाजीभाकर खाऊन व फाटकेंतुटकें वस्त्र पांघरूनही फार सुखी समजावे. नाहीं तर आमचे दुर्दैवी श्रीमंत लोक नेहमी भांडण तंटे करून असंतुष्ट व उदास असतात. ह्मणून माझे प्रिय मुली हिरे, तूं सर्वांशीं मोठया नम्रतेनें व प्रेमानें रहा, व असें राहणें हें आपलें एक कर्तव्य कर्मच आहे असें नेहमी लक्षांत ठेव. आतां हा एकोपा कोणत्या गोष्टीनें प्राप्त होतो हें पाहिलें पाहिजे.

"हा एकोपा बायको नवऱ्याशीं प्रीतीनें राहिली ह्मणजेच केवळ तो होतो असें नाहीं तर त्या प्रीतीबरोबर नवऱ्याची भीड व मर्यादाही तिनें ठेविली पाहिजे. जी बायको आपल्या नवऱ्याची बरोबरी करूं पहाते तिजसारखी अज्ञान बायको दुसरी नाहीं. सांप्रत काळच्या मुलींत हा एक वाईट गुण आढळतो कीं त्या बहुधा अमर्याद व उद्धट असतात. जेव्हां अशा स्वभावाच्या अनेक समवयी मैत्रिणी एके ठिकाणीं मिळतात तेव्हां त्यांजमध्यें आपापल्या नवऱ्यांविषयीं नेहमीं चर्चा चाललेली असते. एक ह्मणत्ये, "गडे, काय सागूं! मी तर त्यांना इतकें वळणीस आणिलें कीं, पुण्याई काय कीं माझी गोष्ट ते नाकारतील किंवा त्याचे उलट जातील." दुसरी ह्मणत्ये, "जोंपर्यंत त्यांणीं माझी लाडी गोडी केली नाहीं तोंपर्यंत मी अन्नास शिवेन तर शपथ." तिसरी बढाई मिरवते कीं " ते दहा वेळां विचारितात तेव्हां एकदां मी कोठें मोठे प्रयासानें प्रत्युत्तर देतें." चौथी तोऱ्यांत येऊन बोलते कीं, "पाहिजे तितका वेळ जरी ते पलंगाजवळ येऊन उभे राहिले तरी मी त्यावरून उठून खालीं पाय ठेवीन तर सांगाल तें ऐकेन."

"या व दुसऱ्या अशाच पुष्कळ गोष्टींवरून हें सिद्ध होतें कीं कांहीं स्त्रिया पुरुषांची भीड व मर्यादा कमी करण्याविषयीं नेहमीं तयार असतात. पण हा प्रकार फारच निंद्य आहे कारण यापासून स्त्रीपुरुषांमध्यें वैमनस्य उत्पन्न होतें. ह्मणून जी दुष्ट बायको आपल्या कर्कशपणानें आपल्या नवऱ्यास दाबांत ठेऊं पाहते ती आपल्याच हातें आपल्या पायांवर कुऱ्हाड मारून घेते असें समजलें पाहिजे. या असल्या स्वभावानें ती भांडणाचें बीं मात्र पेरिते व त्याचा परिणाम काय होईल हें त्या वेळीं जरी तिचे लक्षांत आलें नाहीं तरी शेवटीं भांडणांस मूळ कारण तेंच पुढें यावयाचें. ह्मणून मुली हिरे, तुला इतकेंच सांगणें आहे कीं, तूं आपल्या पतीची उठण्या बसण्यांत व बोलण्या चालण्यांतही भीडमर्यादा ठेवीत जा. दुसरें असें कीं लग्नविधि मोठया आवडीनें व भाविकपणानें होत असतो आणि तो एकदां संपूर्ण पार पडला आणि मुलगी सासरीं गेली ह्मणजे तिजबरोबर सासू

नणदांचा कलह सुरू होत असतो. याचें कारण काय याचा विचार करणें योग्य आहे. लग्न होईपर्यंत मुलगा आईबापांशीं प्रेमानें वागत असतो आणि तींही त्याजवर प्रीति करीत असतात. तीं त्यास लहानाचा मोठा करितात त्यांत त्यांचा असा हेतु असतो कीं म्हातारपणीं त्यानें आपल्या उपयोगी पडावें. पण एकदां लग्न झालें म्हणजे सुनेला जाच करणें हा आपला हक्कच आहे असें सासू समजते, आणि सून झटली म्हणजे तिनें सासूचा जाच सोसण्यास तयार असलेंच पाहिजे अशी लोकांची साधारण समजूत आहे. सुनेवर अम्मल केल्याविना सासूपण येतच नाहीं असें सासवांस वाटतें. सुनेनें सासूची आज्ञा निमुटपणें मानली पाहिजे. तिला गुलामाप्रमाणें नमून व भिऊन चाललें पाहिजे. सासू म्हणेल ती सुनेस पूर्वदिशा असली पाहिजे. घरांत नणंदा दीर असतील तर त्यांणीं पायांवर पांय डाळून बसावें आणि मौजा माराव्या. काबाडकष्ट सूनेनें करावे. अशा प्रकारें कोमल मुलींस सासुरवास हा केवळ मरणप्राय होऊन जातो. सासू केवळ तिला बाऊच होतो. मुलाला दटावावयाचें असलें तर जसें पंतोजीचें भय घालतात तसें मुलीला दटावावयाचें असल्यास सासूचें भय घालण्याचा आपल्या लोकांत चाल पडली आहे.

" ही गोष्ट खरी आहे कीं, सर्वच सासवा कठोर असतात असें नाहीं. कित्येक सासवा सुनांशीं ममतेनें वागणाऱ्या व त्यांचे लाड करणाऱ्याही असतात. आणि अशा ममताळू सासवाही सून निमूटपणें त्यांचें ऐकते तोंपर्यंतच बहुधा बऱ्या असतात. त्यांची आज्ञा पाळण्यास सुनेकडून किंचित् अंतर पडलें म्हणजे त्यांची तब्यत लागलीच बिघडते आणि त्या सुनांस जाच करूं लागतात. म्हणजे अर्थातच सुनेस तो जाच सहन होईनासा झाला म्हणजे ती निराळें रहाण्याची इच्छा करूं लागते आणि आपला नवरा कधीं वेगळा सरेल याविषयीं ती मोठ्या विवंचनेंत पडते. या सुमारास ती बरीच मोठी झाली असल्यामुळें नवऱ्याचें प्रेम तिजवर अधिक जडून तिच्या इच्छेप्रमाणें वागण्याविषयीं त्याचाही कल स्वाभाविकपणें होऊन

तो पुढें वेगळा सरतो. तेव्हां लग्नानंतर आईबापांशीं मुलाचा थोडेच दिवस संबंध राहून कधींना कधीं तरी कोणतेही कारणानें म्हणा, त्यास निराळें रहावें लागणार. जगांत आजपर्यंत अशीच गोष्ट होत आली आहे. पण सूनांस इतका धीर कोठचा, त्यांस तर " उतावीळ नवरा दुंगणास बाशिंग " याप्रमाणें वेगळें व्हावयाचें तर लौकर व्हावें असें वाटतें. कित्येक मुलींस अशी वाईट खोड असते कीं, त्या सासरच्या क्षुल्लक क्षुल्लक गोष्टी माहेरीं येऊन सांगत असतात व माहेरचीं माणसेंही मुलीस खोदखोदून विचारीत असतात. पण या अशा विचारण्यानें व बोलण्यानें कांहीं निष्पन्न न होतां भांडण व कलह मात्र वाढतात. कित्येक सुनाही इतक्या मिजासी असतात कीं, कांहीं पुसूं नका. सासरीं कितीही चांगलें अन्न वस्त्र मिळालें तरी त्यास तुच्छ मानीत असतात. अशानें घरांतील मंडळीचें व नवऱ्याचें मन अगदीं संतापून जातें. म्हणून मुली हिरे, तुला या गोष्टीविषयीं फार सावध राहिलें पाहिजे. तुला सासरच्या प्रत्येक वस्तूला मोठेपणा दिला पाहिजे. आणि तुला जी भाजीभाकर व बरें वाईट चोळी लुगडें मिळेल त्यांतच नेहमीं आनंद दाखविला पाहिजे म्हणजे तेणेंकरून घरांतील माणसें तुजवर प्रीति करितील. प्रथमच सासरीं जाणाऱ्या मुलींनीं सासरीं उदास वृत्तीनें राहतांकामा नये. आतां हें खरें आहे कीं, नव्या व अनोळखी लोकांत राहण्याची संवय नसल्यामुळें प्रथम वाईट वाटतें पण कसेंही करून मनाचें समाधान केलें पाहिजे. हल्लीं माहेरून सासरीं जायाचें म्हटलें म्हणजे, रडत, तेथें असे पर्यंत कपाळास सदोदीत आठ्या व कांहीं दिवस तेथें राहिली नाहीं तोंच पुन्हा माहेरीं जाण्याची चिंता असा प्रकार आढळतो, तो चांगला नाहीं. तर उत्तरोत्तर सासरच्या मनुष्यांची प्रीति संपादन करण्याकरितां झटलें पाहिजे. माहेरचा फारच लळा दाखविणें हें सासरच्या लोकांस आवडत नाहीं.

"बोलणें चालणें मर्यादीत असावें म्हणजे उगाच विचारल्या पुसल्या शिवाय सारा दिवस बडबड करूं नये. तसेंच अगदीं अबोला धरूनही उपयोग नाहीं कारण त्या योगें आपण दुस-

ऱ्यास गर्विष्ट आहों असें दिसेल. फार बडबड केल्याचा परिणाम दुःखदायक होतो, कारण रात्रंदिवस अशी बडबड केल्यानें हजारो प्रकारचे विषय निघतात. आणि एकादे वेळीं आपणास नकळत भलताच विषय आपल्या तोंडांतून निघून जातो. अथवा इतकें थोडें बोलतांकामा नये कीं, आपण बोलावें ह्मणून लोकांस आपली खुशामत किंवा विनवणी करावी लागेल. कोणतेही गोष्टीविषयीं आपलाच दुराग्रह घेऊन बसणें हें चांगलें नाहीं. जर करितां कोणतीही गोष्ट खरी असून तुझे मर्जी विरुद्ध जरी त्याचा निर्णय झाला तरी त्या वेळीं उतावीळ न होतां धीर धरावा. कारण पुढें एकादे वेळीं त्या गोष्टीचें खरें स्वरूप बाहेर येतें. कोणतेही वस्तूविषयीं हांवरेपणा करितांकामा नये. हांवरेपणा केल्यानें मनुष्य नजरेंतून उतरतें. जें काम सासू नणंदा करीत असतील तें तूं करण्याविषयीं लाजूं नको. लहानांवर प्रीति करणें आणि मोठ्यांशीं भीड मर्यादेनें वागणें हे दोन उपाय सर्वांची प्रीति संपादन करण्याकरितां रामबाण औषधामणाणें आहेत. आपलें कोणतेंही काम दुसऱ्यावर सोपून जातांकामा नये. त्याचप्रमाणें आपली कोणतीही वस्तू अव्यवस्थित ठेवूं नये कारण ती कोणी उचलून घेऊन जाईल. जेव्हां कोणी कांहीं गुप्त गोष्टी बोलत असतील, तेव्हां आपण त्यांपासून दूर व्हावें आणि तीं आपसांत काय गोष्टी बोलत होतीं याची विचारपुस सुद्धां करूं नये. किंवा तीं आपणाविषयींच कांहीं बरें वाईट बोलत होतीं असेंही समजूं नये. असो, सासवा सुनांची हल्लींची स्थिति आह्मां लोकांस मोठी लाजिरवाणी आहे इतकेंच नाहीं तर ही सुधारल्याविना आमच्या स्त्रियांची हल्लींची गुलामगिरीची अवस्था दूर करून त्यांस योग्य पदास चढविणें अथवा आमची गृह स्थिति सुधारणें हें अशक्य आहे. यास्तव आह्मांमधील सर्व सुशिक्षित पुरुषांनीं आणि स्त्रियांनीं सासू सुनांचा हा दुष्ट व निंदाकारक संबंध बदलण्याविषयीं निकरानें यत्न केला पाहिजे. प्रत्येकानें आपापल्या कुटुंबांत याविषयीं निश्चयपूर्वक उद्योग केला ह्मणजे तूर्त पुरे आहे. असो, आतां तुला मी प्राचीन काळच्या महान् महान् साधू व विचारी

पुरुषांनीं स्त्रियांच्या वागणुकेविषयीं वगैरे कांहीं वचनें लिहून ठेविलीं आहेत त्यां पैकीं कांहीं येथें देऊन हें पत्र पुरें करितोंः—

" प्रिय भाषण करणें हाच स्त्रीचा मोठा पराक्रम आहे.

" स्त्रियांस मर्यादा असणें हेंच योग्य आहे.

" जी प्रीतीनें आणि मधुर भाषणें भ्रताराजवळ बोलते ती स्त्री योग्य आणि मुलांस शिक्षा लाविते तो बाप योग्य.

" लज्जा आणि मर्यादा मुख्यत्वेंकरून स्त्रियांच्याठायींच फार शोभतात.

" स्त्रियांस ईश्वरानें मधुर कंठ दिला आहे हा भांडण्याकरितां दिला आहे असें नाहीं. आणि गर्विष्ट होण्याकरितां निर्बल केलें असें नाहीं. म्हणून त्यांणीं गर्व आणि भांडण करूं नये.

" जी स्त्री माहेरीं शिक्षेंत नसते, आणि सासऱ्याच्याही धाकांत नसते ती दुर्गुणी होते.

" बायकोनें लहानपणीं आईचे शिक्षेंत, मोठेपणीं नवऱ्याचे आज्ञेंत, आणि म्हातारपणीं मुलांचे आश्रयानें राहून चालावें.

" कुलीन आणि सुशील अशी पत्नि ज्यास मिळेल तोच खरा भाग्यवान् होय.

" नवरा बाहेरून घरीं आला असतां त्यास उभें राहून मान देणें, त्याच्याशीं नम्रपणें भाषण करणें, त्याची सर्वप्रकारची तरतूद ठेवून त्याजबद्दल अंतःकरणांत पूज्यबुद्धि ठेवणें, तो निजल्यावर आपण निजणें, व तो उठल्या पूर्वी आपण उठणें इत्यादि गोष्टी स्त्रियांत अवश्य असाव्या.

" पतीवर प्रीति करणें, चाकरमाणसांवर दया ठेवणें, सासूसासऱ्याशीं नम्रतेनें वागणें, जावांवर लोभ ठेवणें, वडिलांचा मान राखणें, कोणी अपराध केला असतां त्याचे आंगावर चवताळून न जातां त्यास समजून सांगणें, सदोदीत आनंदवृत्तीनें असणें, हीं चांगल्या स्त्रीचीं लक्षणें होत.

" नवऱ्याचे आज्ञे शिवाय घराबाहेर पाऊल ठेवणें म्हणजे सापाच्या डोक्यावर पाय देतें असें जीस वाटतें, जीस आपलें घर सोडून दुसऱ्याचे घरीं जाणें म्हणजे एखाद्या दुसऱ्या देशांत गेलें असें वाटतें, जिचें हंसणें खिदळणें एखाद्या धन लोभ्याच्या द्र-

व्यासारिखें दुसऱ्या कोणाच्या दृष्टीस पडत नाहीं, आणि आपल्या पतीशिवाय दुसऱ्या पुरुषाकडे पाहणें हीं ज्यांस महत्संकटें वाटतात, त्या स्त्रिया कुलीन जाणाव्या.

"एखाद्या कृत्यांत योग्य सल्ला देणारी अशी हुषार, संसाराचें काम दक्षतेनें व झटून करणारी, अनेक प्रकारचीं पक्वानें करून नवऱ्यास सुग्रास भोजन घालण्यास समर्थ, आपल्या प्रेमभरीत भाषणानें नवऱ्याचें व्यग्र अंतःकरण सानंदीत करणारी, धार्मिक आणि क्षमाशील, अशी षड्गुणवती स्त्री सुखदायक होय.

"सदोदीत स्वच्छ, गोड व थोडें बोलणारी, नवऱ्याचे आज्ञेंत वागणारी व त्याच्या शुश्रुषेंत दक्ष अशी स्त्री कोणास आनंद करणार नाहीं ?

"ज्याची बायको कुरूप, घाणेरडी आणि भांडखोर आहे, त्याच्यासारखा दुःखी प्राणी कोणी नाहीं.

"पंक्तींत एकाला एक दुसऱ्याला दुसरें असें वाढणारी, नवऱ्याशीं कपट करून त्यास खऱ्याबद्दल खोटें सांगणारी, घरांतील पदार्थ चोरून विकणारी, आणि मुलांवर कमी प्रीति करून मुलींवरच विशेष लोभ करणारी अशी स्त्री दुःशीला होय.

"मैना कोकिळा यांचा सुस्वर हेंच त्यांचें रूप; कुरूप मनुष्यास विद्या हेंच रूप; तपस्वी लोकांस क्षमा हेंच रूप आणि स्त्रियांस त्यांचें पातिव्रत्य हेंच रूप होय.

"पंडित हे अनेक प्रकारच्या विद्यांनीं शोभतात, राजे पराक्रमानें शोभतात, श्रीमान् योग्य दानानें शोभतात आणि कुलवान् स्त्रिया लज्जेनें शोभतात.

"असो. नूर्त एवढींच वचनें लिहून हें पत्र पुरें करितों आणि शेवटीं प्रीय मुली हिरे, मी तुला इतकेंच सांगतों कीं, हें पत्र नं प्रत्यहीं निदान एक वेळ तरी नियमानें वाचीत जावें. स. असें केल्यानें या पत्रांतील उपदेश तुझ्या डोळ्यांसमोरून कधींही दूर जाणार नाहीं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

"मी तुझें ईश्वरापाशीं

"अखंडित कल्याण इच्छिणारा पिता,

"विश्वासराव."

याप्रमाणें बापाकडून आलेलें पत्र वाचून हिराबाईचे मनावर एक विलक्षण प्रकारचा ग्रह झाला व तिला आनंदाचा गहिंवर आला आणि डोळे अश्रूंनीं भरून येऊन पराकाष्ठेचें रडें कोसळलें. पण मोठा धीर करून आलेला हुंदका आंतले आंत दाबून टाकला. नंतर तें पत्र तिनें मोठ्या काळजीनें आपल्या स्मरण वहींत ठेविलें व त्या दिवसापासून ती तें पत्र प्रत्यहीं न विसरतां एकदां वाचून त्यांतील विषयांवर मनन करीत असे. नुकतेंच लग्न होऊन हिराबाई ही सासरीं प्रथमच आली असल्यानें तिचें मन फार उदास असे. याचें कारण उघडच आहे कीं एकदम आईचें घर सोडून तीस नव्या लोकांत व नव्या घरांत रहावें लागलें आणि तशांत तिला पहिल्यापासून कामकाज व मेहनत करण्याची संवय असल्यामुळें येथें कामावांचून आळशासारखें रिकामें बसून व लाजेमुळें कैक दिवस पर्यंत एकाच खोलींत कोंडल्या प्रमाणें रहावें लागलें. बापाच्या घरीं असतां तिला जी मोकळीक व स्वतंत्रता होती तिचा लवलेशही या ठिकाणीं मिळाला नाहीं. सासरचीं व शेजारचीं माणसें तिच्या हरएक गोष्टीकडे व रिती भातींकडे न्याहाळून पाहूं लागलीं. कोणी तोंडच न्याहाळून पाहात, कोणी केंसांची लांबी विचारीत, कोणी आंबाडा कशी बांधित्ये याकडेसच नजर ठेवीत, कोणी तिच्या ऊंचीकडेस पाहात, कोणी दागदागीने, व कोणी चोळी लुगडें यां विषयीं टीका करीत; जेवावयास बसलीं कीं तिनें घांस किती मोठा घेतला, तोंड किती उघडलें, तोंडांत घालतांच तो गिळला किंवा चाऊन गिळला, चालते वेळीं पदर कसा घेते, निऱ्या कशा खोंवते,

निजावयास गेली केव्हां व उठली केव्हां या सर्वांविषयीं तिजवर नजर असे. हा सर्व प्रकार तिचे लक्षांत येऊन अशा स्थितींत रहाण्यापासून तिला पराकाष्ठेचें दुःख होत असे पण ती जात्या हुषार व बुद्धिमान असल्यामुळें या सर्व प्रसंगीं ती उत्तम प्रकारें कसोटीस उतरली व तिची सर्व चालचलणूक सासरचे लोकांस आवडली. ती बोलूं लागली तर उगाच बडबड करीत नसे कीं, लोकांनीं म्हणावें "काय हो, या मुलीस सासरीं येऊन चार दिवसही झाले नाहींत तोंच ही विचारल्या पुसल्याशिवाय किती बडबडत आहे" किंवा इतकी कमीही बोलत नसे कीं लोकांनीं तिला मुखस्तंभ, गर्विष्ट व कपाळास आठ्या घातल्या सारखी दिसते असें म्हणावें. जेवतेवेळीं इतकें जेवायचें नाहीं कीं साऱ्या पेठेंत त्याच्याविषयीं टीका होईल. तसेंच घरांत दिवे लागण्याचा अवकाश कीं, लागलीच निजली किंवा पिशाच्याप्रमाणें मध्यरात्री पर्यंत जागी राहिली असें कधींही झालें नाहीं.

नवी सून आली म्हणजे कांहीं दिवस शेजार पाजारच्या मुली तिजभोंवतीं जमत असतात त्याप्रमाणें हिराबाईजवळही पहाऱ्या तेव्हां पांच दहा मुली असत, पण हिराबाईनें त्यां पैकीं एकीबरोबरही मैत्री जोडली नव्हती. जरी एकादी मुलगी सारा दिवस तिजजवळ बसून राहिली तरी तिनें असें म्हणूं नये कीं, "बाई, तुम्हीं आपल्या घरीं जा." तसेंच एखादी मुलगी एक दिवस मुळींच न आली तरीही विचारीत नसे कीं, "बाई, काल तुम्हीं कोठें होतां किंवा आलां कां नाहीं?" याप्रमाणें सासरच्यांस आवडेल अशा रीतीनें आलेल्या मुलींशीं हिराबाईकडून वर्त-

न होत असल्यामुळें त्या मुली हळूहळू येतनाशा झाल्या. मुख्यत्वेंकरून हलक्या घराण्यांतील मुली कीं ज्यांचें काम कांहीं मिळण्याजोगें असेल तें काढून घेण्याचें असतें त्यांणीं जेव्हां पाहिलें कीं, आपणांस पानसुपारी किंवा भातुकली बितुंकली कांहींच मिळत नाहीं, तेव्हां थोड्या दिवसांनीं एकीमागून एक याप्रमाणें सर्वजणी तिजकडे येण्याच्या बंद झाल्या.

हिराबाईनें पाहिल्यानें आपली नणंद शांताबाई हिजबरोबर स्नेह जोडला. शांताबाई जात्या शहाणी मुलगी असल्यामुळें थोड्याशा लाडीगोडीनें तिजबरोबर अनायासें संवट्टग पडलें. सारा दिवस ती अगदीं हिराबाईजवळ असे. हें पाहून एक दिवस तिचे आईनें तिला म्हटलें, "कांग शांते, याच भावजईवर तुझी एवढी माया आणि मोठे भावजईचें तुला दर्शन देखील नको, याचें कारण काय?" तेव्हां शांता म्हणाली कीं, "आई, ती जेव्हां तेव्हां मला मारीत असे आणि ही माझी धाकटी वहिनी मजवर प्रीति करित्ये."

या प्रकारें शांताबाई अनुकूळ जाहाल्यावर हिराबाईस आपले सर्व मनोरथ शेवटास नेण्यास सोपें पडलें. प्रथम तिजकडून तिनें सर्व कुटुंबाची व पेठेची हकीकत विचारून घेतली, त्याचप्रमाणें ज्या गोष्टी प्रथमतः लाजेमुळें आपण होऊन विचारण्यास तिला धीर होईना, त्या मोक्ष्या युक्तीनें शांतेकडून विचारून घेतल्या, नंतर हिराबाई हळू हळू आपले पाय घर खटल्यांत अशा रीतीनें शिरकवूं लागली कीं पहिल्यानें संध्याकाळ झाली कीं शांताबाई-कडून कापूस आणवून त्याच्या दिव्याकरितां वाती वळून द्याव्या, घरांत शाकभाजी असेल ती नीट निवडून चिरून

द्यावी, शांताबाईचे व घरांतील माणसांचे कपडे शिंवून द्यावे व सासूसाठीं व नवऱ्यासाठीं विडे करून ठेवावे. असें करतां करतां स्वयंपाक घरांत जाऊं लागून स्वयंपाकाचे कामांत सल्ला मसलत देऊं लागली. असे कांहीं दिवस लोटल्यावर हिराबाईचेच धोरणानें सर्व स्वयंपाक होऊं लागला, जेव्हांपासून स्वयंपाकांत हिराबाईचा हात शिरला तेव्हांपासून घरांतील सर्व मंडळीचें जेवण उत्तम प्रकारें होऊं लागलें अशा विषयीं खात्री झाली. आणि मग असें झालें कीं ज्या दिवशीं हिराबाईला कांहीं कारणामुळें स्वयंपाकाचे कामांत स्वयंपाकणीला सल्ला मसलत द्यावयास फावत नसे त्या दिवशीं सर्वांच्या ताटांत कांहीं तरी पडून राही.

आपल्या लोकांत सासवा सुनांचें भांडण व्हावयाचेंच असा साधारण प्रकार आढळतो, पण हिराबाईचे अंगीं भांडणास कारण होतील असे गुण मुळींच नव्हते; असें असतां ह्या ठिकाणीं तिचा चांगलेपणा व कर्तृत्व हींच भांडणास कारण झालीं. ह्मणजे घरांतली मोलकरीण ठकी ही इतकी वरचढ झालेली होती कीं, हिचे शिवाय घरांतील पान सुद्धां हालत नसे. कपडा लत्ता, दाणा गोटा, इत्यादि सर्व सामान सुमान बाजारांतून आणविणें हिचेच हातीं असे. एकादा दागिना करावयाचा असला तर तोही हीच करून आणावयाची, आणि एकादे वेळीं कर्ज काढावयाची जरूर लागली तर तेंही हिचेच मार्फत काढीत असत. सारांश सांगावयाचें ह्मणून इतकेंच कीं, ठकी ही कर्त्या पुरुषाप्रमाणें या घरचा सर्व कांहीं कारभार चालवीत असे. जेव्हांपासून हिराबाईनें स्वयंपाकांत

हात घातला तेव्हांपासून प्रत्येक गोष्टींत ठकीची ठकबाजी उघडकीस येऊं लागली. एके दिवशीं वांगीं चुलींत भाजत होतीं आणि हिराबाई स्वयंपाक घरांत बसून त्या मोलकरणीला दाखवीत होती. जेव्हां वांगीं थोडीशी ऊब घेऊन तयार झालीं व त्यांस दहीं मसाला लावायाची वेळ आली तेव्हां हिराबाईनें म्हटलें, "ठकू मावशी, दहीं कसें आहे तें मला पाहूंदे, कदाचित् दहीं आंबट किंवा शिळें असलें तर भरीत बिघडेल." मोलकरणीनें थोडेसें दहीं काढून हिराबाईचे हातावर ठेविलें तें तिणें चाखून पाहिलें तों आंबट आंबट ढाण! किती दिवसांचें होतें कोण जाणें! त्यांतील पाणी निराळें आणि दहीं निराळें झालें होतें त्यावरून हिराबाईनें म्हटलें "अरे राम! किती आंबट तरी दहीं हें, हें तर भरिताचे अगदींच उपयोगी नाहीं. मावशे, जलदी जाऊन दुसरें एक पैशाचें चांगलें ताजें व गोड दहीं आण पाहूं."

ठकी— वेडे मुली तूं काय म्हणतेस, इतक्यांस पैशाचें दहीं! म्हणतात कीं नाहीं समुद्रांत खसखस तसें पैशाचे दह्यानें तें काय होणार, हें जें दहीं तूं आंबट म्हणतेस तें एक आण्याचें आहे बरें?

हिराबाई— (आश्चर्य पावून) मावशे, माझे माहेरीं तर मी नेहमीं वांग्यांचें भरीत करीत असें. त्या वेळीं कीं नाहीं नेहमीं रोजच्या भरीतास दोन पईचें दहीं मी मागवीत असें म्हणून त्या मानानें मीं पैशाचें अधिक येईल असे, समजून तुला सांगितलें. कारण भरीत चांगलें झालें पाहिजे.

ठकी— मुली, तूं आपल्या पेठेचा हिशोब इकडे सांगूं नको. कुठें मंडयी आणि कुठें शुक्रवार पेंठ? जी वस्तू

मंडयींत एक पैशाला मिळते ती, येथें चार पैसे दिले तरी मिळणार नाहीं. ही मेली पेंठ उजाड नगरी ह्मणतात कीं नाहीं तशी आहे. नेहमीं प्रत्येक वस्तूचा मेला दुष्काळ. कोणती वस्तू ह्मणजे वेळेवर पाहिजे तर मिळेल असें नाहीं.

हिराबाई—(जेवणास उशीर होत होता ह्मणून हें ऐकून गप्प राहिली आणि ह्मणाली) बरें, मावशे, जेवढ्याचें मिळेल तेवढ्याचें तरी जाऊन लवकर घेऊन ये ह्मणजे झालें.

हिराबाई ही इतकी भोळी नव्हती कीं, मोलकरणींचे ह्मणण्यावर विश्वास ठेवील. ती मनांत पक्कें समजून राहिली कीं, येथें कांहीं तरी काळें गोरें आहे. काय मेला पै दोन पैंचा फरक असला तर कांहीं चिंता नाहीं. पण हा काय जुलूम! एकाच शहरच्या दोन निरनिराळ्या पेंठा जरा लांब झाल्या ह्मणून भावांत जमीन अस्मानाचा फरक! ह्मणून त्या दिवसापासून हिराबाई ही तिचे पाळतीवर राहूं लागली. नंतर दुसरे दिवशीं ठकीनें खायाचीं पानें आणिलीं तीं पाहून:—

हिराबाई—मावशे, तूं तर बाई अगदीं हिरवीं पानें उचलून आणत्येस. त्यांस कांहीं तरी चव किंवा गोडी असत्ये? बकरीस चारा आणतात कीं नाहीं तो तरी अम्मळ बरा असतो. आतां तर मेले थंडीचे दिवस अहेत पानांस कांहीं तोटा नाहीं, ह्मणून चांगलीं चांगलीं कळीदार पिकलेलीं पानें पाहून आणीत जा.

ठकी—मुली, पिकलेलीं कळीदार पानें तर पैशास पांच मिळतात, आणि येथें तर दररोज एका पुड्याचा खर्च आहे तेव्हां कळीदार पिकलेलीं पानें आणून कसा निभाव लागेल?

इतक्यांत हिराबाईचे माहेरून तिची मोलकरीण सगुणा ही तिचा समाचार घेण्याकरितां तेथें आली होती तेव्हां ही पानांचीं भानगड पाहून हिराबाईनें सगुणेस विचारिलें, "कसें काय सगुणे, आतांशा पानें कशीं मिळतात?"

सगुणा– कां बरें, पैशास सोळा मिळतात.

हिराबाईनें पेटी उघडून दोन पैसे सगुणीचे हातावर ठेविले आणि झटलें, "जा, या दोन पैशांचीं याच पेठेंतील तांबोळ्यापासून पानें घेऊन ये पाहूं."

नंतर सगुणीनें जाऊन चांगलीं कळीदार व पिकलेलीं पानें दोन पैशांचीं ४० आणलीं हें पाहून:–

हिराबाई– वः, हिनें तर बाई मंडयीपेक्षां दर पैशामागें चार पानें अधिक आणिलीं.

सगुणी– आका, ही पेंठ तर शहरचें नाकें आहे व सर्व बागबगीचे व पानांचे मळे या बाजूस असल्यामुळें जें कांहीं शहरांत जातें तें याच रस्त्यानें जात असतें. यामुळें कीं नाहीं भाजीपाला, फळफळावळ इत्यादि सर्व कांहीं वस्तू या पेंठेंत तेथच्यापेक्षां पै दोन पैनीं स्वस्त मिळतात. बटाटे व कांदे मात्र इकडे होत नसल्यामुळें दुकानदार लोक ते मंडयींतून आणतात. तेव्हां कदाचित् ते येथें महाग विकत असतील. विकलेलीं पानें झणून पैशाचीं चाळीस मिळालीं आणि जर हिरवीं घेतलीं असतीं तर ६० सुद्धां मिळालीं असतीं.

हिराबाई– ही अवदसा ठकी तर प्रत्येक वस्तूंत अशी ठकवते यास काय करावें? सगुणें, तूं तरी बाई दोन चार दिवस येथें रहा. तुझेविषयीं मी आईस सांगून पाठवतें. ते-

थचा काम धंदा कसा तरी मेला दोन चार दिवस सांभाळून घेईल.

सगुणी— आका, आपण सांगाल त्यास मी राजी आहें, मजकडून कांहीं ना नाहीं.

सारांश, सगुणी चार दिवसपर्यंत तेथें राहून सर्व जिनसांचा बाजार व्हाट तिणें केला. त्यावरून प्रत्येक वस्तूंत ठकीची किती ठकबाजी होती हें स्पष्टपणें दिसून आलें. या सर्व गोष्टी हिराबाईनें अशा कांहीं चातुर्यानें करविल्या कीं, त्यां संबंधीं एक शब्द देखील सासूचे कानावर जाऊं दिला नाहीं. ह्या गोष्टी काय त्या हिराबाई, सगुणी व ठकी या तिघींसच ठाऊक. हिराबाई ही सुशील व दयाळू बायको असल्यामुळें त्या म्हाताऱ्या मोलकरणीची फजिती व बेअब्रू करणें तिला बरें वाटलें नाहीं.

या ठकी मोलकरणीचीं गोष्ट अशी होती कीं ही बायको सतत पंचवीस वर्षें याच घरांत कामाला होती आणि इचें लक्ष्य नेहमीं लुटण्यावर असे. एक दोन दिवसांची गोष्ट असती तर झांकून जाती पण इची दररोज कांहींना कांहीं तरी लबाडी उघडकीस आल्यावांचून राहत नसे यामुळें इला कैकवेळां घरांतून काढूनही लाविली होती. पण इला काढलें कीं इचे मागें वाणी, कापडवाला, सोनार, शाकभाजीवाला इत्यादि ज्यांची म्हणून इचे मार्फत उचापत काढलेली होती, ते सर्व आपापल्या कर्जाविषयीं तगादा लावीत, या भीतीमुळें तिला पुन्हा बोलावणें भाग पडे. या अशा घरच्या अव्यवस्थित कारभारामुळें ठकी ही दिवसेंदिवस अट्टल चोर व शिरजोर होऊन बसली होती. ती सांगूनसवरून द्यावयाची व देखतां देखतां चोरावयाची

त्याचप्रमाणें धडधडीत दाखवून कोणताही जिन्नस काढावयाची व मारवाड्यांचे चोपडींत लिहून यांच्या खात्यावर जमा करावयाची. घरांत पुसाल तर प्राप्ति थोडी व खर्च मोठ्या मिजाशीचा अशी स्थिति होती. खाण्यापिण्यांतही असाच उधळेपणा यामुळें सर्व प्रकार कर्जावर अवलंबून होता. व तें कर्ज ठकीचे जिवावर मिळत होतें म्हणून ती धडधडीत बोलून दाखवीत असे कीं, माझें निघणें असें तसें नाहीं. घरादाराचें लीलांव करवून चार लोकांत फजिती करवीन तेव्हांच निघेन. तरच माझें नांव ठकी.

हिराबाईनें हिशोबांत जेव्हां रोखठोक सुरू केली तेव्हां ठकी ही केवळ हिराबाईची हाडवैरीण होऊन बसली आणि तेव्हांपासून हिराबाई आणि तिचा भ्रतार व सासू यांजमध्यें वैमनस्य उत्पन्न करण्याच्या प्रयत्नास लागली. मोलकरीण असें करील हा विचार हिराबाईचे स्वप्नीं सुद्धां आला नव्हता पण उलटें तिचे असें पाहण्यांत आलें कीं ठकी ही घरची सर्व प्रकारें मुक्त्यार आहे आणि ती जीव गेला तरी आपली संवय म्हणून सोडणार नाहीं किंवा घरांतून निघणार नाहीं मग उगीच इजबरोबर कटकट करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

त्या दिवसापासून हिराबाईनें स्वयंपाक घरांत जाऊन ठकीला रांधण्याचे कामांत सल्ला मसलत देण्याचें अगदीं बंद केलें. परंतु घरांतील मंडळीस हिराबाईचे हातच्या जेवणाची गोडी लागली होती त्यामुळें जेवणाची वेळ आली कीं सर्वांचीं तोंडें उतरून जात असत. कोणी म्हणत, "काय ही भाकरी मातीसारखी कचकचीत लागते," कोणी म्हणत, "या डाळींत मीठ तरी किती हें? जिभेवर ठेवि-

तांच ओकारी यावयाची.” असें होतें तरी आजपासून तूं स्वयंपाकाकडे पहा असें हिराबाईस कोण ह्मणेल? ठकी शिजवून घालील तें सर्वांस मुकाट्यानें खाऊन राहणें भाग पडे.

पावसाळ्यांत एके दिवशीं आकाश ढगांनीं अगदीं भरून जाऊन झिमझिम पाऊस पडत होता व अतिशय गारठा पडला होता, अशा वेळीं सत्यवंतास गरम गरम भजीं खावींशीं वाटून तीं बायकोकडून करविण्याविषयीं ठकीला सांगितलें. आलीकडे हिराबाई ही कांहीं तरी काम घेऊन माडीवर जाऊन बसत असे त्यामुळें तिच्या नवऱ्यानें भजीं खाण्याची इच्छा दर्शविली हें तिला कोणी सांगितल्यावांचून कळणार कसें? ठकीनें तूप वगैरे भज्यांस लागणारें साहित्य बाजारांतून आणलें आणि सत्यवंतास ह्मणाली, “भज्यांचें सर्व साहित्य तयार आहे. आतां माडीवर जाऊन धाकट्या बाईसाहेबांस बोलावून आणितें.” असें ह्मणून माडीवर गेली आणि हिराबाईला भज्यांविषयीं कांहीं एक न सांगतां खालीं येऊन लटकेंच सत्यवंतास ह्मणाली, “ बाळासाहेब, वैनीबाई ह्मणतात माझें डोकें दुखतें. ”

ठकीला साधा डाळ भात तोही बरोबर रांधतां येत नसे मग बेसणाचीं मसालेदार भजीं काय आपलें कपाळ रांधते! सर्व जिनसांचा मातेरा मात्र करून टाकला. सत्यवंतानें भजीं मोठ्या आशेनें करण्यास सांगितलीं होतीं तीं अशीं वाईट झालेलीं पाहून तो अगदीं खिन्न झाला. नंतर माडीवर जाऊन पाहतो तों हिराबाई आपले चोळीवर वेलबुट्टी काढीत आहे. तेव्हां मोठ्यानें चरफडून ह्मणाला कीं, “वेलबुट्टी काढतांना डोकें दुखत नाहीं, आणि

जरा भजीं करावयास सांगितलें त्यास डोकें दुखण्याचें निमित्य ? बरें, याची चांगली आठवण असूं दे. ''

याप्रमाणें हिराबाईविषयीं सत्यवंताचे मनांत कुविचार उत्पन्न होण्याचा हा पहिलाच प्रसंग होय, आणि अशाच लहान लहान गोष्टींमुळें प्रथमतः स्त्री पुरुषांमध्यें बेबनाव उत्पन्न होतो. आणि आपल्या लोकांत बहुतकरून लहानपणींच लग्न करून टाकण्याची चाल असल्यामुळें त्या वयांत दीर्घदृष्टि, सारासार विचार, तारतम्यज्ञान हीं त्या अल्पवयी दंपत्यांत मुळींच नसतात. ह्यामुळें जर एकादी गोष्ट जरा मर्जी विरुद्ध झाली तर नवऱ्यानें बायकोवर संतापावें किंवा तिला मारावें, आणि बायकोनें तोंड घेऊन कोठें कोना कोपऱ्यांत जाऊन रडत बसावें असें वारंवार होत असतें. कारण मनांत एकदां थोडासा विकल्प गेला ह्मणजे तोच दुसऱ्या कित्येक कारणामुळें हळूहळू वाढत जाऊन मोठ्या भांडणाच्या रूपानें बाहेर पडतो आणि असें झालें ह्मणजे मग उभयतांमध्यें प्रेम किंवा भीड मर्यादा मुळींच न राहतां तीं सर्व आयुष्यभर एकमेकांचीं वैरी होऊन बसतात. असें न होऊं देण्याचा उत्तम व सोपा उपाय मुलें अज्ञान व अल्पवयी आहेत तों पर्यंत त्यांचीं लग्नें न करितां त्यांस चांगलें शिक्षण प्राप्त करून देऊन तीं सुशिक्षित व प्रौढ झालीं ह्मणजे त्यांच्या इच्छेनुरूप नवरा पाहून त्यांचा विवाह करणें हा होय.

सत्यवंतामध्यें जर अशाप्रकारची दीर्घदृष्टि, प्रौढपणा व सारासार विचार असता तर खचीत त्यानें आपले बायकोस ठकीनें सांगितलेली गोष्ट कळवून ती त्यावर काय ह्मणते हें ऐकून घेऊन त्यावरून जर ती दोषी आहे

अशी त्याची खात्री झाली असती तरच तिजवर रागावता. असो. सत्यवंताचा राग झाल्यामुळें हिराबाईस फार वाईट वाटलें. ती ह्मणाली, "देवा, आतां कसें करूं भांडणाचें चिन्ह दिसत आहे. सासूकडे पहावें तर तीही खिन्नवदन दिसते, देवा मज दुबळीवर काय प्रसंग हा!" ती हें संकट कसें टाळावें या विवंचनेंत होती तोंच ठकीनें दुसरें एक कुभांड रचिलें. तें कोणतें ह्मणाल तर त्या वेळीं दसऱ्याचा सण समीप आल्या कारणानें सत्यवंताचे आईनें मोलकरणीस ह्मटलें, "कायग ठकू, दसऱ्याचा सण तर जवळ येऊन ठेपला त्यासाठीं एव्हांपासूनच तयारीस लागलें पाहिजे, नाहीं तर सगळ्याच गोष्टींची एकदम घाई होऊन जाणार. लहान मोठ्यां सर्व भांड्यांस कल्हई करून घेतली पाहिजे, घरास चुना लाविल्यास वर्ष होत आलें तर तोही लाऊन घेतला पाहिजे, तेव्हां तूं तिलकचंद मारवाड्यापाशीं जाऊन कसेंही करून तूर्त दसऱ्याचे खर्चास ह्मणून पन्नास रूपये मागून आण ह्मणजे झालें.

ठकी— आईसाहेब, हा इतका खर्च पाहिजे कशास? धाकट्या वहिनी तर आपल्या माहेरीं जाणार आहेत. आणि मी ऐकिलें कीं त्यांचा बापही घांटावरून येथें येणार आहे तो आला ह्मणजे अर्थातच सणासाठीं मुलींस घेऊन जाईल. मी आणखी असेंही ऐकिलें आहे कीं धाकट्या वहिनींचे मनांतून आपल्या बापाबरोबर निपाणीस जावयाचें आहे. तेव्हां त्या जर गेल्या तर बाळासाहेबही जातील असें वाटतें कारण सुई बरोबर धागा. मग तुमच्या एकट्या जिवाकरितां घराला चुना व भांड्यांस कल्हई पाहिजे कशाला? तो मेला तिलकचंद तर हल्लीं गर्वानें इतका

कुणून गेला आहे कीं आल्या दिवसा त्याचा मनुष्य वसुलासाठीं दारावर येऊन उभा आहेच. असें असतां तो कर्ज कसें देईल?

हें ऐकून सत्यवंताचे आईस फार खेद झाला. कारण खेद होण्याजोगीच ही गोष्ट होती. तिचा नवरा ज्या दिवसापासून कोल्हापुरास गेला त्या दिवसापासून घरचें तोंड कसें आहे हें कांहीं पाहिलें नव्हतें. मनांत आलेंच तर कधीं वर्ष साहा महिन्यांनीं कांहीं घर. खर्चास पाठवीत असे, नाहीं तर तेंही नाहीं. मोठा मुलगा बुद्धिवंत हा आईपासून कधींच वेगळा राहिला होता. घरांत पुरुष म्हणावयास कायतो एकटा सत्यवंत होता आणि तोही गेला म्हणजे मग काय घरांत उजेड, पहायाला नको.

सत्यवंताची आई—अग ठकू विजयालक्ष्मी माहेरीं जाणार हें तूं खरें सांगतेस?

ठकी—आईसाहेब, खरें कीं खोटें तें ईश्वरास ठाऊक, पण मीं जें ऐकलें होतें तें सांगितलें.

सत्यवंताची आई— बरें, ठकू, तूं हें कोठें ऐकिलें व याविषयीं कोण बोलत होतें तें तर सांगशील?

ठकी—तिच्या माहेरची मोलकरीण सगुणी इजपाशीं मी परवां उसनवार म्हणून दोन रुपये मागितले होते तेव्हां ती म्हणाली, "मी रुपये दिले असते पण मला लौकरच घांटावर जावयाचें आहे" तेव्हां तिचें माझें बरेंच बोलणें झालें त्यावरून मला समजलें कीं निघाणीस जाण्याची सर्व तयारी होऊन आतां तहशीलदार येण्याची मात्र खोटी आहे. ते आले कीं दसऱ्याचे पूर्वी एकदोन दिवसांत सर्वजण येथून निघणार. आतां हें खरें

कीं खोटें हें तुह्मींच पहा. काय आई साहेब, आलंकिडच्या तिच्या रंगा ढंगांवरून तुह्मांस कळत नाहीं कीं पाहिल्यानें ती कशी घरचा काम धंदा पहात होती आणि आतां आपली माडीवर जाऊन बसते ती खालीं उतरेल तर शपथ. आणि आतांशा तर काय बापाचे नांवें कागदावर कागद जात असतात त्यांत तरी दुसरें काय असणार?

हें ऐकतांच सत्यवंताची आई तेथून मोठ्या संतापानें निघून चालती झाली. इतक्यांत सत्यवंत कोठें बाहेर गेला होता तो घरीं आला त्यास पाहून तिनें आपलेजवळ बलाविलें आणि ह्मणाली, " बाळा, मीं तुला कांहीं विचारित्यें तें तूं खरें सांगशील? "

सत्यवंत— आई मी तुला सांगणार नाहीं अशी गोष्ट कोणती आहे बरें?

मग बुद्धिवंताचे आईनें जें कांहीं मोलकरणीकडून ऐकलें होतें तें शब्दश: त्यास सांगितलें. नंतर,

सत्यवंत— आई, खरें ह्मणशील तर याविषयीं मला कांहीं एक ठाऊक नाहीं व ती मजजवळ याविषयीं मुळींच कांहीं बोललीही नाहीं.

आई— चल लबाड! माझे पुढें गोष्टी लावतोस? येवढी मोठी गोष्ट आणि तुला माहित नाहीं हें मोठें नवल ह्मणावयाचें.

सत्यवंत— आई, तुला विश्वास येत नाहींना? तुझे गळ्याची शपथ; याविषयीं मला कांहीं एक ठाऊक नाहीं.

सत्यवंताची आई— (ठकीस पाहून) कायग ए ठके, तूं कीं नाहीं मला जी गोष्ट सांगितलीस ती सत्यवंत ह्मणतो आपणास अगदीं माहित नाहीं हें कसें?

ठकी—(बाळासाहेबांकडे पाहून) बाळासाहेब, तुमचे घरकरणीनें जावयाचीं तयारी केली आहे याविषयीं कांहीं संशय बाळगूं नका कदाचित् तुमचे जवळ ती चोरीत असेल; ही कांहीं फटकळ कज्यादावाई नव्हे कीं जें तोंडास येईल तें बोलून सोडावयाचें मग त्यांत कोणाचीही अमर्यादा होवो. ह्या तर नांवाच्या विजयालक्ष्मी वरें! यांचे पोटांतील गम कोणास कळावयाचा नाहीं. येथें मनांत एक आणि जनांत एक असें आहे याची पक्की आठवण ठेवा.

सत्यवंताची आई—वरें; बाळा, ही गोष्ट खरी असली तर तुझें काय ह्मणणें आहे?

सत्यवंत—पण आई ही गोष्ट खरी होईल कशी? उगाच खरी ह्मटली ह्मणून झालें? आणि खरी झालीच तर मला काय असें वेड लागलें आहे कीं तुला एकटीला टाकून जाईन? आणि ती तरी अशी काय माजली आहे कीं विचारल्या पुसल्या खेरीज आपण होऊन चालून जाईल? वरें फार कशाला आज मी तिला विचारीन कीं हा काय प्रकार आहे तो.

आई—ह्या अवदसे मोलकरणीचे बोलण्यावर काय भरंवसा ह्मणून उगाच तूं कीं नाहीं कांहीं जास्त बोलाचाली करूं नको. जेव्हां ही गोष्ट खरी अशी ठरेल तेव्हां पाहतां येईल.

या प्रकारें ठकी मोलकरीण ही हिराबाईशीं तिची सासू व नवरा यांचें वैमनस्य लावून देण्याचे कामीं लागली होती. इतकें झालें तरी हिराबाईला ह्मणून कोणी प्रत्यक्ष विचारून खरे खोटेपणाचा प्रत्यय घेतला नाहीं. तथापि बाहेरील सर्व चिन्हांवरून ती मनांत पक्कें समजली होती कीं, कांहीं तरी वांकडें झालें आहे. हिराबाईची शांताबाई

ही एक मोठी विश्वासू जासूद होती. घरांत हिराबाईचे अपरोक्ष ज्या गोष्टी होत त्या शांताबाई येऊन लगेच तिला सांगत असे. ह्यामुळें ठकीचा सर्व खोटसाळपणा तिला पूर्णपणें कळला होता. परंतु हिराबाई ही इतकी उतावीळ बायको नव्हती कीं, विचार केल्यावांचून कांहीं भलतेंच करील. तिची इच्छा उलट अशी होती कीं या गोष्टीचा खोटेपणा परस्परच उघडकीस यावा. परंतु ती मनांत ह्मणाली, "बरें ठके, कांहीं चिंता नाहीं, पहा तर खरी तुझी कशी दशा दशा करून टाकत्यें ती. तूं आतांशा फार चढून जाऊन घरांतल्या घरांत कलह माजऊं पहातेस, नाहीं? मी नांवाची विजयालक्ष्मी होईन तरच तुझें डोकें अशा ठिकाणीं मारवीन कीं, जेथें पाणी मागितलेंस तर एक थेंब सुद्धां मिळणार नाहीं आणि असें करून टाकीन कीं तुझा पाय पुन्हा या पेठेंत कधीं पडणारच नाहीं."

ठकीच्या मनांत हिराबाईचा चांगला सूड उगवावयाचा होता ह्मणून इतकें करूनही तिची तृप्ति झाली नाहीं. तिनें आणखी एक तिसरेंच कुभांड रचिलें तें असें. तिलकचंद मारवाड्यास जणुकाय संवयच पडून गेली होती कीं तो जेव्हां जेव्हां ठकीस आपले दुकानावरून जातांना पाही तेव्हां तेव्हां त्यानें तिचा खोळंबा करावा व तिची कांहींना कांहीं टवाळी करून ह्मणावें, "कशं काय ठके, आज्य घणा दिवश झ्याला मजे गरिबाचा हिशाब किताबनीं कांई याध अशूं दे हो" आणि याप्रमाणें सात आठ दिवसांनीं घरीं येऊन तगादा लावावा. एके दिवशी दररोजच्या प्रमाणें ठकीही बाजारांत कांहीं जिन्नस व्यावयास

जात असतां तिलकचंदानें तिला अडविलें तेव्हां तिणें ।
ह्मटलें:—

ठकी—कायरे लाला? तूं तर आपला मला चिडवाया-
चा धंदाच मांडला आहेस. मला पाहून जेव्हां तेव्हां तुझे
पोटांत उकळतें वाटतें? मी बिचारी गरीब माणूस माझे ज-
वळ एका फुटक्या कवडीची देखील माया नाहीं, असें अस-
तां शेट सावकारांचे देण्याबद्दल उगाच खालीपिली माझे
पाठीशीं तगादा कां?

तिलकचंद—ये तमे शूं वात करते कीं माझ्यो साथ
सबंध न्हाय! दुकान उपरथी तर तमे माल घेऊनशी जाते.
हाताशी हात पिछाणते हाय ह्मनुशी हामी तर तुह्मांला
पिछाणते हाय अने तमचे साख उपर अवडा माल धिर-
ले हाय न्हायतर अमे घरवाल्याशी काय पिछाणते?

ठकी—अरे लाला, जरा शुद्धीवर ये. असा वेड्यासा-
रखा होऊं नको. काय बिचारा भोळा! अरे आज शेंकडों
रुपये व माल जो तूं मला दिलास तो कांहीं माझे दौलती-
स भुलून दिला नाहींस. मला तर ना जाहागीर ना दौलत.
हे पैसे मजपासूनच जर घेणार तर जा आतां घे कसे घे-
शील ते. काय माझे वाडे उभे आहेत ते लीलांव करतोस
कीं सरकारांतून पेनशन येते ती बंद करवितोस! पहातें
आतां काय करितोस तें?

तिलकचंद—(थोडासा दचकून) आज्य तमे कोणाची साथे
भांडण करूनशी आलेले जणाते. जरा शांग तर खरे शूं
वात हायती बायजी शाबांनीं शुं ह्मटला-ईया न्हानगे बाळा-
शाब गुस्सा झ्याले वारूं इकडे येऊनशी जरा बश तर खरा.

असें ह्मणून दुकानावर मुलगा बसला होता त्याजपाशीं

एक पैसा देऊन सांगितलें कीं, "ज्या छोकरा जलदीथीं बे बिडां जरदो नखावीनें सारा मज्याना करावी लाव." नंतर ठकी बसली तेव्हां तिजकडे वळून, " ठके मने ज्यणाते के आज तमे खरे खरे कोणाचीं साथ तरी भांडण करूनशी आले हाय "

ठकी—रामा! रामा!! असें ह्मणूं नको. भांडणाचें तोंड काळें, अरे तूं माझी गोष्ट काढून विचारलेंस ह्मणून मी तुला खरें खरें होतें तें सांगितलें खऱ्यास काय मरण आहे!

तिलकचंद—ये तर ठीक वात शांग्लेश व्यवार तर मालकाचे साथे हाय पण ते तमचे हाताशी होते कीं न्हा य. न्हाय हामचे नामनी चिट्ठी काय पतरी, तमे माल-काच्ये नांवाशी जे काय मागते ते मे आपते.

ठकी—हां या गोष्टीस मी कोठें नाहीं ह्मणतें? जें घेऊन गेलें आहे तें हजारांत तर काय पण लाखों माणसांत सांगून देईन त्यास मी भीत नाहीं. आणि आमच्या बाईसाहेबही (देव त्यांचें कल्याण करो) विचाऱ्या कधीं तरी तक्रार करतात का कीं हें असें कां आणलें किंवा हें कां आणलें नाहीं ह्मणून?

तिलकचंद— ठके, बाईशाब तर लई सारा अने अमीर माणश हाय. वाव्हा, कुठे त्येची वात? (असें ह्मणून हळूच विचारतो) न्हानले बहूजीच्या कशा हाल हाय ? पोताचे मोठी बेनच्या पंगला पर हाय कीं जूदे तरेच्या-मिजाज हाय.

ठकी—तें काय पुसूं नको. लाला, झांकली मुठ सवा लाखाची तसें मुलगी तर मोठ्या कुळांतली आहे पण बाई मनाची मोठी चिकू. एक दमडीचा सौदा पण तोही चार

चारदां परत करून मागविला तरीही तो मनास यावयाचा नाहीं, पण देवाचे दयेनें विद्या, हुन्नर, भीड, मर्यादा इत्यादि इतर बायकांपेक्षां अधिक आहेत. स्वयंपाक कामांत तर तिची मोठा आचारीही बरोबरी करूं शकणार नाहीं. त्याचप्रमाणें शिवण्यांतही ह्मणशील तर शिंपी व शिंपिणी तिजपुढें झक मारतात पण यास काय आग लावायाची आहे लाला? पहिल्या पहिल्यानें मजबरोबर हुमरे तुमरे करूं लागली होती. लाला, तूं तर जाणतोस कीं माझें काम कसें चोख असतें तें. शेवटीं तिलाही हात टेंकून मजपुढें वसावें लागलें. बाईसाहेब तर मनाच्या शुद्ध आहेत; त्यांच्याच पायांचे आशिर्वादानें घरांत लक्ष्मी नांदत आहे; आणि आमचेसारखे गरीबही त्यांचेच आश्रयानें राहिले आहेत. पुष्कळ लोकांनीं बाईसाहेबांस भडकाविलें, पण ईश्वर त्यांस चिरायू करो, त्यांच्या ह्मणून मनांत कधीं मजविषयीं काळें गेलें नाहीं, किंवा एक चकार शब्दानें, असें नाहीं असें, ह्मणून विचारलें नाहीं.

तिलकचंद—मे ऐकला हाय कीं न्हानी महुजीला पुस्कळ आंदेण मिळाला हाय. तर ही खरी वात हाय?

ठकी—काय धूळ मोठी करतां ही पण उतरतें.

तिलकचंद—तर आ पुस्कळ ताजुवची वात हाय. तेचे लगनचे वखते तर तेच्या बाप इश्वासराव तहशील-धार इयाला हता तेव्हां मोठी छोकरी करता वधारे देवाचे त्येला लाजम होते.

ठकी—अरे लाला! विचाऱ्या तहसीलदाराचा यांत कांहीं अन्याय नाहीं. त्या बापुड्यानें तर आपली होईल तेवढी तयारी केली होती पण हीच अवदसा! आईबापाचे बऱ्या-

साठीं पाठीस लागलागून पुष्कळ आंदण कमती करविलें.

तिलकचंद—हा जर येम हाय तर मोठी बेनच्या जेवा ये पण जुदूं घर करशेल.

ठकी—निराळें घर कसचें पण ही जास्त आंग पांखडील. मोठी सून कर्कशा होती खरी पण मनाची मोठी चोख. पण ही साखरेची सुरी म्हणतात तशी आहे. तोंडापुरती मात्र गोड गोड पण मनांत वज्रापेक्षांही कठीण. कोणी जीव देऊन जरी काम केलें तरी इचे मनास म्हणून यावयाचें नाहीं. बोलेल तीही कशी तोंडावर एक आणि मनांत एक, नाहीं वा, ही बायको एक दिवसही टिकावयाची नाहीं. आतांशा तर काय बापाकडेस घांटावर जाण्याचे तयारीस लागली आहे.

तिलकचंद—कोल्हापुराशी आमणा कांहीं कागद पतर आले हाय कीं न्हाय.

ठकी—लाला, तें काय सागूं? बाईसाहेब तर दररोज वाट पाहत असतात, माहित नाहीं कीं काय तिकडे झालें आहे तें. त्यांस खर्चाची तर मोठीच चिंता लागली आहे आणि तशांत दुसरा खर्च डोईवर येत आहे. दोनचार दिवसांपूर्वी मला म्हणत होत्या कीं तिलकचंदापाशीं जाऊन दसऱ्याकरतां पन्नास रुपये कसें तरी करून आण.

तिलकचंद—(कर्जाचें नांव ऐकतांच दचकला आणि म्हणाला) आगला रुप्याचे वाट बाईशाब करशेल तेवा बीजा रुप्याची वात. हाथां तर माज्या भागींया मानते न्हाय बाईशाबासनी चयांगला समज्याऊनशि सांधा की जिकडून-शी बनून येयल तिकडेशीं रुपिया आनूनशी देसेल. न्हाइ तर माज्या खालीं पिली बदनाम थशेल.

ठकी—तुमचे रुपये देवाचे मर्जीनें फिटले तर फिटतील, एरवीं बाईसाहेबांस ज्याचे त्याचे कर्जाच्या ओझ्यानें नाकीं नळ येऊन चुकले आहेत. वाणी निराळा जीव खातो, तर इकडे कपडेवाला दाराची माती नेतो, असा ज्याचा त्याचा प्रकार आहे.

तिलकचंद—मने विज्या मागनाराचे साथ काय लागते वळगते हाय? आमचे दुकानाच्या हिशाब बाईशाबांनीं फेड करवा पडशेल, मे तर बाईशाबचे घरचे लई मुलाजा राखते हाय पन माज्ये भागी या छदामीमल्ल मोज्या मानते न्हाय अगर त्येलाही वात ठाऊक पडशेल तर आज्य फरयादी ठोकूनशी देसेल.

ठकी—ही गोष्ट मी बाईसाहेबांस पाहिजे तर कळवीन, पण कळवून तरी कांहीं वळेल असें दिसत नाहीं. कारण घरची जरा जरा गोष्ट मला माहित आहे कीं नाहीं, फिरयादी करा किंवा टांच काढा दोन्ही सारखीं. रुपये झणून मिळायाचे नाहींत. रुपयेच जर असते तर येवढें कर्ज कशाला केलें असतें? इतक्या गोष्टी करून ठकी तेथून चालती झाली आणि बाजार करून घरीं गेली.

सत्यवंताची आई— (बाजारांतून येण्यास उशीर लागला असें पाहून) ठके, तूं बाई बाजारांत एकदां गेलीस झणजे कीं नाहीं पाठीमागची काळजी तुला मुळींच नसते. पहा बरें, दिवस किती वर आला आहे तो. आतां चुलींत आग केव्हां पेटेल आणि यापुढें जेवण केव्हां तयार होईल? तूं तर बाई मला पुरे पुरे केलेंस.

ठकी—मेल्या तिलकचंदाचे भांडणांत इतका वेळ गेला. मेला नेहमीं येतां जातां माझे कपाळाशीं कटकट करितो.

आज माझा कीं नाहीं जीव त्रासला आईसाहेब, तेव्हां मग मी ह्मटलें कीं तूं माझे पाठीस असा हात धुवून कां लागलास? जीव कां देतोस जरा चार दिवस धीर धर. कोल्हापुराहून हुंडी येऊंदे ह्मणजे तुझा जो कांहीं मागला पुढला हिशोब झाला असेल तो चुकविण्यांत येईल. मेला आतांशा कीं नाहीं तो फारच चढून गेला आहे. भर बाजारांत कीं हो त्यानें माझी फजिती करून सोडली.

सत्यवंताची आई—आजच त्याचे डोक्यांत इतकें वेड कां शिरलें वरें? आज पुष्कळ वर्षें त्याच्याशीं आपला व्यवहार आहे व आमच्याकडून कधीं लवकर आणि कधीं उशिरां त्याचा उलगडा होत आहे. पण इतका हात घाईवर कधींच आला नव्हता.

ठकी—आईसाहेब, कोणी दुसरा छदामी मल्ल नांवाचा शेट दुकानास भागीदार झाला आहे त्या मेल्यानें ही इतकी धांदल करून सोडली आहे. ज्यांचेकडे कांहीं येणें आहे त्यांजपासून उभ्याउभ्या वसूल करीत चालला आहे. आणि जे देत नाहींत त्यांजवर फिरयादी मांडण्याचा सपाटा चालविला आहे. तिलकचंदानें तर हात जोडून तुह्मांस सांगितलें आहे कीं आतां माझा कांहीं इलाज चालत नाहीं. या दोन च्यार दिवसांत जसें बनेल तसें करून रुपयांची फेड करून टाका नाहीं तर नांवाचा छदामी मल्ल आहे. फिर्याद केल्या शिवाय सोडणार नाहीं.

हें ऐकून सत्यवंताची आई फारच भ्याली आणि आपली धाकटी बहीण दुर्गाबाई ही भवानीपेठेंत रहात होती व ती इजवर फार प्रीति करीत होती ह्मणून ठकीला ह्मटलें, "ठके, कोल्हापुराहून तर फार दिवस कांहीं का-

गद आला नाहीं. तेव्हां हुंडीची कुठली आशा? जर करितां तिलकचंदानें खरोखर फिर्याद मांडली तर मग कसें होईल? माझें जवळ तर इतके दागदागिनेही नाहींत कीं ते विकून कर्ज फेडीन आणि फिर्याद मांडल्यावर मग देण्यांत काय शोभा? कारण मग सर्व शहरांत बेअब्रू होईल म्हणून जा लौकर गाडी घेऊन ये मी दुर्गाबाईपाशीं तरी जातें आणि पहातें तेथें कांहीं तोड निघाली तर."

ठकी—आईसाहेब, त्यानें फिर्याद तर केलीच असें समजा. जो तोंडानें बोलला त्यास करावयास किती उशीर? आणि धाकट्या बाईपाशीं तरी रुपये मिळतील असें वाटत नाहीं कारण त्या स्वतःच सध्या अडचणींत आल्या आहेत.

सत्यवंताची आई—अग तें खरें पण आतां कसेंही करून तोड काढल्या शिवाय तर दुसरा उपाय नाहींना?

ठकी—(जवळ जाऊन हळूच) वैनीबाई जर एक महिना पर्यंत आपले हातांतील सोन्याचे गोट देत्या तर सगळें मिटलें असतें. ते गोट कोठें तरी महिन्याचे बोलीनें गहाण ठेवून तिलकचंदाचा सध्यां अर्धा तरी हिशेब चुकवून दिला असता आणि तेथपर्यंत कोल्हापुराहून जी हुंडी येईल तींतून किंवा दुसऱ्या कोणत्या तरी सावकाराकडून रुपये काढून गोट पुढें मागें सोडवितां आले असते.

सत्यवंताची आई—वहावाग, काय पण मसलत सांगितली? खबरदार अशी गोष्ट पुन्हा तोंडांतून काढशील तर घरादारांचें लीलांव झालें आणि प्राण गेला तरी सुनेचा दागिना मी कदापि मागणार नाहीं.

ठकी—आईसाहेब, मी आपलें भोळेपणानें म्हटलें, कारण तुम्हाला मुलगी व सून कांहीं निराळी नाहीं, आणि

गोट तरी आपणांस विकावयाचे थोडेच आहेत. एवी तेवी तरी महिन्याचे महिने पेटींत पडून राहिलेले अस-तात ते एक महिना सावकाराचे येथें ठेविले असें समजा. तेथें ठेविल्यानें उलटी त्यांची बडदास्त तरी चांगली होईल.

सत्यवंताची आई—ठके तूं काय सांगतेस, मला तर सून व मुलगी यांत कींनाहीं जमीन अस्मानाचा फरक वाटतो. आणि तशांत नवीनच लग्न झालेल्या मुलीजवळ डागिना मागण्यास कोणाची बाइ छाती तरी होईल ? संभाळ अशी गोष्ट मजपाशीं पुन्हा बोलशील तर. देव करो आणि ही गोष्ट सुनेच्या कानावर न जावो म्हणजे झालें.

ठकी—शांताबाई तर ही आतां येथें बारीचे आड उभी राहून ऐकत होती पण तिचें कांहीं नाहीं ती अजून मूल आहे. तिचें लक्ष असल्या गोष्टींत नाहीं.

सत्यवंताची आई—बरें तें असो, आधीं गाडी लवकर घेऊन ये. दुर्गीला भेटूंदे तर खरी. मग तेथें जसा वि-चार ठरेल तसें करितां येईल.

सत्यवंताची आई गाडींत बसून भवानीपेठेंत गेल्यावर इकडे शांतेनें सर्व कांहीं घडलेला प्रकार आपल्या धाक-ट्या वहिनीस जाऊन सांगितला. तेव्हां अशा प्रसंगीं हिरा-बाईस दुसरें तर कांहीं सुचलें नाहीं पण तिनें तत्क्षणीं आपला वडील भाऊ जो रमाकांत त्यास खालीं लिहिल्या-प्रमाणें निपाणीस पत्र लिहून पाठविलें :—

मुक्काम पुणें अश्विन वद्य ५.

"**मम प्रियबंधु रमाकांत दादा यांस,**

"शिरसाष्टांग दंडवत, विनंती विशेष.

"फार दिवस होत आले तरी मजकडून आपणास वेगळें पत्र गेलें नाहीं याजबद्दल मला फार वाईट वाटतें. निराळें पत्र

न पाठविण्याचें कारण इतकेंच कीं, इकडील जो कांहीं नवल-विशेष मजकूर कळविण्यासारखा असतो तो बाबाचे नांवानें पत्र पाठवून कळवीत असतें यामुळें तो आपले पाहण्यांत वारंवार येतच असेल असें समजून स्वतंत्र पत्र पाठविण्याची अवश्यकता न दिसल्यावरून तसें केलें नाहीं याबद्दल राग नसावा. आतां हें पत्र लिहिण्यास असा कांहीं प्रसंग येऊन पडला आहे कीं जो आपणास कळविल्याशिवाय अन्य उपायच नाहीं. तो प्रसंग हाच कीं ज्या दिवसापासून मी सासरीं आल्यें त्या दिवसापासून आजपर्यंत मला वाईट वाटण्याजोगी कोणतीही गोष्ट घडून आली नाहीं, आणि ज्या गोष्टीमुळें आकास वारंवार कागाळी करावी लागत असे तशी एकही गोष्ट तुमच्या सर्वांचे पुण्याईनें मजमुळें आली नाहीं. सर्वजणें मजवर प्रीति करीत असतात ह्यामुळें मी नेहमी उल्हासवृत्तीनें रहात असतें. मात्र घरांत ठकी ह्मणून एक मोलकरीण आहे तिजपासून मला इतका त्रास होतो कीं तसा कितीही कर्कशा सासू किंवा जगभांड स्वभावाची नणंद असली तरी तिजपासून सहसा होणार नाहीं. ही बायको ह्या घरांत फार जुनी मोलकरीण आहे आणि घराबाहेरील व आंतील सर्वप्रकारचें काम हिचे स्वाधीन आहे. ह्या बायकोनें सर्व घरदार लुटून त्याचा मातेरा करून सोडला आहे. सध्या कर्ज तर इतकें झालें आहे कीं तें कसें फिटेल याची कल्पना देखील करवत नाहीं. घरांत कोणत्याही रितीची व्यवस्था ह्मणून मुळींच नाहीं. मी कांहीं दिवस घरचें कामकाज पहात होतें त्या वेळीं मला सर्व ठिकाणीं तिची लुच्चेगिरी व ठकवाजी दिसून आली. माझ्या रोखठोकीच्या व्यवहारानें ती मोलकरीण माझी हाडवैरीण झाली असून दररोज नाहीं नाहीं तें कुभांड मजवर रचून कलह माजविण्याच्या उद्योगास लागली आहे. ईश्वराचे कृपेनें आजदिवसपर्यंत भांडण होण्यापर्यंत मजल येऊन ठेपली नाहीं, परंतु ही मोलकरीण घरांत असल्यानें केव्हां तरी भांडण-तंटा होईल असें मला आतां मोठें भय वाटत आहे आणि ही बाई घरांतून निघणेंही सध्या फार कठीण दिसत आहे. कारण बाजारचा सर्व सौदा हिचे मार्फतीनें उधार मिळतो त्यामुळें हिला

काढावयाचें नांव घेतलें कीं ही लगेच जाऊन दुकानदारांचे कान फुंकते. कर्जाचा कांहीं हिशेब बिशेब आहे म्हणावा तर तोही नसून देण्याघेण्याचा सर्व व्यवहार तोंडजबानी चालला आहे. तेव्हां माझें इतकेंच म्हणणें आहे कीं सर्व लोकांचा हिशेब चांगल्या रीतीनें होऊन तो एकदा कागदावर मांडला जावा व दर महिन्यास अमुक रकमेपर्यंत खर्च करावा असा कांहीं निर्बंध बांधला जाऊन ह्या उपर कोणत्याही रितीनें कर्ज म्हणून काढावयाचें नाहीं असा कांहीं ठराव व्हावा व हल्लीं जर कांहीं कर्ज आहे असें आढळून आलें तर त्याची दरमहा अमुक रकम घेऊन फेड करावी असाही नियम असावा. व या मोलकरणीस घरांतून अजिबात काढून टाकण्याची लवकर तजवीज व्हावी.

"दसऱ्याच्या सणासाठीं बाबा इकडे येणार आहेत असें समजतें; त्यांजबराबर आपणही इकडे येण्याचें करून येतेवेळीं कृपा करून कोल्हापुरास जाऊन मामाजींस हा सर्व प्रकार कळवाल व एक पंधरवडयासाठीं त्यांसही बराबर घेऊन याल तर फार चांगलें होईल. कारण आपण सर्वजण इकडे आलां म्हणजे मी जें आपणास लिहिलें आहे तें खरें आहे किंवा नाहीं याचा आपणास प्रत्यक्ष अनुभव येईल. मी हें पत्र मोठया संकटाचे वेळीं लिहिलें आहे. कारण कोणीएक सावकार फिर्याद करण्यास उठला आहे व मोलकरणीच्या मतें माझे हातांतील गोट गहाण ठेवून त्याची समजूत करावी असें आहे. सासूबाई याची काय तोड करावी याच्या विचाराकरितां मावस सासूच्या इथें गेल्या आहेत. या शिवाय कांहीं विशेष मजकूर ह्या प्रसंगीं मला सुचत नाहीं. कळावें लोभ असावा हे विज्ञापना.

"तुझें नित्य प्रेम इच्छिणारी वहीण,

"हिराबाई."

वरील मजकुराचें पत्र हिराबाईनें आपल्या भावास पाठविलें व नंतर आपल्या मावशीस सांगून पाठविलें कीं, "मी घरांत एकटी आहें करितां कसेंही करून दोन दि-

वसांसाठीं सुमती आकास मजकडे पाठवावें. ती तुमचेकडे सासऱ्यांहून आली आहे असें मी कालच ऐकिलें."

त्याच दिवशीं संध्याकाळीं सुमती येऊन पोंचली आणि गाडींतून घरांत येतांच मोठ्यानें म्हणाली,"कायग हिराबाई, तुझेसारखी अधिरी बायको मी कोठें पाहिली नाहीं, अग मी मावशीचें पत्र नाग मागितलें होतें? तें तूं पाठविलें नाहींस कसें? आजकाल बाई माणसाला धीर नाहीं. तुला वाटलें असेल कीं, मी तें पत्र खाऊनबिऊन टाकीन. असेंच ना?

हिराबाई—गडे, कोणावरोबर बरें मागाविलेंस आणि कधीं तें तर सांग. हें काय बाई लटकें कुभांड?

सुमती—हातचे कांकणास आरसा नको. ही पहा येथें ठकी हजर आहे. कायग ठके, गेल्या शुक्रवारीं तूं माझे घरीं आली होतीस तेव्हां तुला मी काय सांगितलें होतें?

ठकी—होय बाई, तुम्ही पत्र आणावयास सांगितलें होतें खरें पण मेली मला आठवणच राहिली नाहीं. या घरच्या कामधंद्यामुळें मीं अगदीं बावऱ्यासारखी झालें आहें.

हिराबाई—(हळूच) असें खरें, पण कांहीं चोरावयाचें असलें आणि कांहीं कळ लावून द्यावयाची असली म्हणजे कशी चांगली आठवण राहत्ये? (सुमतीकडेस वळून) गडे, हें घे पत्र आणि बावांनीं एक नवीन पुस्तक पाठविलें आहे तेंही जातेवेळीं घेऊन जा.

नंतर हिराबाईनें तिला एकीकडे नेऊन मोलकरणीचा एकूणएक वृत्तांत तीस सांगितला. सुमती ही फार तापट स्वभावाची बायको होती आणि तिला खोटें अगदीं सोसत नसे. तिणें ती ठकीची हकीकत ऐकून लगेच काठी

घेऊन तिला मारण्यास धांवली परंतु हिराबाईनें तिचा हात धरून तिला थांबविलें आणि ह्मणाली, "गडे, माझें ऐकशील तर अशी उतावीळ होऊं नको, अशानें सगळ्याची घाण करून सोडशील, दुसरें कांहीं नाहीं."

सुमती—गडे, तूं नेहमीं असेंच करकरून आपला अपमान करून घेत्येस. मी कीं नाहीं तुझे जागीं असतें तर या कारटीला खेटरांनींच मारमारून अशी वळणीस आणली असती कीं तिलाही जन्मभर आठवण राहिली असती.

हिराबाई—गडे, काय करूं; सध्यां इच्यापुढें माझा कांहीं उपाय चालत नाहीं. परंतु लौकरच इचें पारिपत्य देव कसें करील तें तूं पाहशील.

सुमती—बरें तें असो, पण तुझी सासू आपल्या बहिणीकडे कशाला गेली आहे?

हिराबाई—याच अवदसेनें त्यांस आज दारोदार हिंडावयास लावलें आहे. कोण्या सावकाराचें देणें असून तो फिर्याद करण्यास उठला आहे असें इणें सांगितल्यावरून रुपयांची तजवीज करायाकरितां गेल्या आहेत.

सुमती—असा कुठला सावकार फिर्याद करणार बाई?

हिराबाई—गडे, त्याचें नांव मला माहित नाहीं.

सुमती—(ठकीस हांक मारून) ठके, कुठलाग सावकार यांजवर फिर्याद करणार आहे?

ठकी—तो मेला तिलकचंद.

सुमती—ज्याचें दुकान सराफ आळीचे नाक्यावर आहे तोच कीं नाहीं?

ठकी—होय बाई, तोच मेला तिलकचंद. मेल्याचें काळें तोंड होवो.

सुमती—त्याजबरोबर तर आमचे मामाजींची देवघेव आहे. त्याची काय छाती आहे फिरयाद करण्याची. मी इकडून गेलें म्हणजे तुझे भावोजीला सांगेन म्हणजे तो त्याची कशी रेवडी उडवून देईल तो तर पहा.

दोन दिवस सुमती हिराबाईचे इथें राहून तिसरे दिवशीं आपले माहेरीं गेली, आणि जातेवेळीं सांगून गेली कीं, तुमचा सासरा आल्यानंतर ठकीचें प्रकरण ज्या दिवशीं निघेल तेव्हां जरूर मला बलावणें पाठविल्या शिवाय राहूं नको. त्या दिवशीं ठकीला उलट सुलट प्रश्न करण्याचें काम मात्र मजकडे येऊं दे म्हणजे पहा कशी तिची बत्तिशी वसऊन टाकत्यें ती.

इकडे सत्यवंताची आई आपले बहिर्णीचे येथें गेली होती तिला बहिणीनें राहून घेतलें. ती म्हणाली, "आल्याबाई, तुम्हीं कधींकाळीं आमचे घरीं येतां आणि कधीं आलांच तर एक घटकाभरही न राहतां लागल्याच परत जातां. आतां आल्यासारख्या आठ दिवस राहून मग घरीं जा. घराहून कोणीना कोणी तरी मनुष्य दररोज येतेंच तेव्हां तिकडे कांहीं अधिक उणें झाल्यास तावडतोब कळेल." बहिणीच्या आग्रहास्तव सत्यवंताची आई तेथें राहिली. तेवढ्या मुदतींत ठकीनें बसल्या बसल्या आणखी एक नवीनच विभु रचिला. तो फारच भयंकर व घाबरण्यासारखा होता यांत संशय नाहीं. तो असा.—

त्या सुमारास महाराणी विक्टोरिया साहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव **प्रिन्स आफ् वेल्स** हिंदुस्थान पाहण्याचे उद्देशानें पहिल्यानें मुंबईस येऊन तेथून पुण्यास यावयाचे होते म्हणून पूर्वीपासूनच शहरचे दुरुस्ती क-

रितां व साफसफाईकरितां म्युनिसिपल कमिशनराक-
डून सक्त ताकीद मिळाली होती. दरएक पेठेंत व दर-
एक गल्लीकुचींत जाहिरनामा लावण्यांत आला होता
कीं, सर्व घरवाल्यांनीं आपापल्या गल्ल्या, बोळ व घरें
साफसुफ ठेवावीं व घरास चुना लावावा आणि जर कुठें
केरकचरा आढळण्यांत येईल तर तेथले घरवाले जबर-
दस्त दंडास पात्र होतील. अशा मजकुराचा एक जाहिर-
नामा या पेठेच्या नाक्यावरील घराचे भिंतीस लावला होता
तो ठकीनें रातोरात जाऊन हळूच तेथून काढून आणला
व आपले घराचे दरवाज्यावर लावून दिला. नंतर मोठे
पहांटेस काळोख असतांही सत्यवंताचे आईस कळविण्या-
करितां भवानी पेठेंत गेली आणि घराचें कवाड उघ-
डलें नव्हतें तोंच तिनें मोज्यानें हांक मारली. सत्यवंताचे
आईनें हांक ऐकतांच शब्द ओळखला आणि घाबऱ्या
घाबऱ्या ह्मणूं लागली, "अरे धांवा आधीं, जाऊन कवाड
उघडा. ठकी अशा वेळीं कां धांवत आली आहे नकळे."
(ठकी आंत आलीस पाहून) कां ठके, काय बाई खबर? सग-
ळीं खुशाल आहेत ना?

ठकी—आईसाहेब, होय सगळीं खुशाल आहेत; पण घरा-
वर नोटीस कीं नोटी काय ह्मणतात ती लागली आहे.
मला वाटतें कीं तिलकचंदाचे फिरयादी बाबद त्यांत
कांहीं तरी असावें.

सत्यवंताची आई—(बहिणीस) बाई दुर्गे, मी तर जातें.
पाहूं बरें त्या तिलकचंदाचे हातां पायां पडून तरी त्यास
दया आली तर. एरव्हीं दुसरा उपाय मला कांहीं एक
ह्या वेळीं सुचत नाहीं.

दुर्गाबाई–आते, मला मोठी लज्जा वाटते कीं मजकडून रुपयांची कांहींच तजवीज झाली नाहीं; पण ही माझे गळ्यांतील सरी आपले पुढें हजीर आहे ती घेऊन जा. गहाण ठेवून काम होत असेल तर बरेंच झालें नाहीं तर विकून टाका.

सत्यवंताची आई–बरें, सध्यां तर ही सरी मी घेऊन जातें. पण त्याचे रुपये फार झाले असतील आणि ते येवढ्याशा सरीनें फिटतील असें मला वाटत नाहीं.

दुर्गाबाई–येवढ्यानें होत नसेल तर त्याणीं (भ्रतारानें) ही झटलें आहे कीं, मी कोठून तरी दुसऱ्या सावकाराकडून कर्जी रुपये आणून तुमची गरज पुरवितों. सध्यां तुह्मीं ईश्वरावर भार ठेवून एकदाच्या येथून जा पाहूं बरें? आणखी अंमळशानें ते उठतील, उठले कीं तुमचे पाठोपाठ त्यांस पाठवित्यें.

इतक्या गोष्टी झाल्यावर सत्यवंताची आई तेथून निघून आपल्या घरीं आली. दाराशीं येतांच दरवाज्याकडे पाहते तों ठकीनें सांगितल्याप्रमाणें खरोखरच नोटीस चिकटवलेली आहे असें पाहून मनांत फारच भ्याली आणि खिन्नवदन होऊन घरांत जाऊन बसली. सासू आली असें ऐकतांच हिराबाई माडीवरून खालीं आली आणि तीस क्षेम कुशळ विचारल्यावर दीनवदन पाहून:–

हिराबाई–सासुबाई, आपण आज इतक्या उदास कां दिसतां बरें?

सासू–अगे उदास होऊं नको तर काय करूं? सावकार नोटीस देऊन तर चुकला, आतां फिर्यादीस काय उशीर? रुपयांची तजवीज कोठूनही होत नाहीं, दुर्गेलाही विचा-

रून पाहिलें पण ती बिचारी कोठून देणार? पहावें आतां काय होतें तें.

हिराबाई–सासुबाई, आपण याची अगदीं काळजी करूं नका. तिलकचंदानेंच जर नोटीस लाविली आहे तर कांहीं चिंता नाहीं.. कारण सुमतीबाईचे सासरीं यांचें घेणें देणें आहे. तुम्हीं येथून गेलां त्या दिवशींच ती येथें आली होती व कालच परत गेली. जातेवेळीं ती मला पक्कें वचन देऊन गेली आहे कीं, मी कसेंही करून याविषयीं तिलकचंदास मामाजींकडून सांगवीन व सांगूनही नच ऐकेल तर त्याचे रूपयांची फेड कोणत्याही रीतीनें करवीन. म्हणून सासुबाई, आतां उगाच काळजी वाहून काय उपयोग! अशानें जिवाची मात्र वाट लागेल. तुकारामानें म्हटलें आहे–"**आलिया भोगासीं असावें सादर ॥ देवावरी भार घालूनियां.**"

सासू–तूं म्हणत्येस हें सगळें खरें पण सुमती तर अजून मूल आहे, तिला सरकार दरबारच्या गोष्टी काय माहित! असें न होवो कीं, " करूं गेला गणपती पण झालें केलडें " आपण तिचे भरंवशावर रहावें आणि मध्येंच तिसरें कांहीं तरी व्हावें.

हिराबाई–होय, सुमती तर मुलगी आहेच याविषयीं माझें कांहीं म्हणणें नाहीं. पण मी ही गोष्ट मोठी पक्की करून घेतली आहे व त्याविषयीं माझी पूर्ण खात्री आहे कीं ती ही गोष्ट शेवटास नेल्याशिवाय राहणार नाहीं.

ह्या गोष्टी होत होत्या इतक्यांत सुमतीचा धाकटा भाऊ उमाकांत वाडीचे फाटकाशीं येऊन हांक मारूं लागला. हांक ऐकतांच हिराबाई म्हणाली, "पहा, हा उमाकांत

ही आला. खचित कांहीं तरी निरोप घेऊन तो आला आहे.'' असें म्हणून शांताबाईस फाटक उघडण्यास सांगितलें. त्याबरून शांतेनें जाऊन फाटक उघडलें व उमाकांत आंत आला. तो आंत आल्याबर हिराबाईनें त्यास विचारलें, " उमाकांता, येवढ्या सकाळीं कोठें ? "

उमाकांत— आकानें तुला फार फार विचारलें आहे आणि तुझी सासू वहिणीचे येथून आली किंवा नाहीं हें पाहून यायला सांगितलें आहे. बाबानें तिलकचंदास बोलावून आणलें होतें व त्यास बाबानें बरेंच रागें भरून धमकाविलें त्याबरून त्याणें माफी मागितली व फिरयादी करणार असें सहज थट्टेनें ठकीजवळ बोललों असेंही तो म्हणाला. हेंही तुला कळवायास सांगितलें आहे.

हें ऐकून सत्यवंताचे आईस कांहींसें समाधान वाटलें. पण हिराबाईस याचें मोठें आश्चर्य वाटलें कीं तिलकचंद फिरयाद करणार असें जर थट्टेनें बोलला होता, तर ही नोटीस कशी लागली ! तेव्हां या नोटिशींतच कांहीं तरी कपट असावें, कारण मी घरांत प्रत्यक्ष बसल्यें असतां मला या नोटिशीविषयीं कांहीं माहित नाहीं हें कसें ? सरकारांतून नोटीस लागली असती तर कोर्टाचा शिपाई किंवा चपरासी कोणी तरी येऊन त्याणें घरच्या माणसांस हांक मारली असती. असें म्हणून शांतेस म्हणाली, " शांताबाई, जा पाहूं दरवाज्यावर कागद चिकटवला आहे तो तूं हळूच काढून आण."

असें म्हणतांच शांतेनें तो काढून आणून हिराबाईपाशीं दिला, तिनें तो वाचून पाहिला तों त्यांत गल्ल्याकुच्या साफमुफ ठेवणें व घरांदारांस चुना लावणें या वि-

षयीं मजकूर असून तिलकचंदाचें नांवही नव्हतें. त्यावरून मनांत पक्कें समजली कीं ही ठकी शिवाय दुसरे कोणाचीही ठकबाजी नव्हे. हिराबाईनें या गोष्टीविषयीं सासूस कांहींएक कळूं दिलें नाहीं पण उलटें तिला समजाऊन व चार गोष्टी सांगून खात्री करून दिली कीं फिर्यादीची आतां कोणत्याच प्रकारें काळजी वहाण्याचें कारण नाहीं.

सासू—तुझे या सांगण्यावरून फिरयादीची तर आतां धास्ती नको असें वाटतें. पण दसऱ्याचा सण जवळ आला व तो गेला कीं त्याचे पाठोपाठ वीस दिवसांनीं दिवाळी येईल. हे दोन्ही सण खर्चाचे अहित तेव्हां कांहीं तरी चाली प्रमाणें पोळी पक्कान्न केलें पाहिजे. नाहीं तर मुलांना त्या दिवशीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावें लागेल. कोल्हापुराहून कागद पत्र येण्याचें मुळांच बंद झालें यास काय करूं? मेला या दोनही काळज्यांनीं माझा जीव रात्रंदिवस झुरणीस लागला आहे त्यास काय करावें?

हिराबाई—सासुबाई, दिवाळीस तर अजून पुष्कळ दिवस आहेत. ईश्वर सर्वांची काळजी वाहणारा आहे तेव्हां अर्थातच त्याचे दयेनें तेथपर्यंत कोठूनना कोठून सर्व सुयंत्र होईल. सध्यां त्याची काळजी वाहूं नका. हा दसरा मात्र जवळ आला खरा त्यास फार तर आठ दिवस असतील पण तो सण असा नाहीं कीं त्यांत ह्मणजे फारसा खर्च केलाच पाहिजे.

सासू—अग बाई, माझे घरीं तर दर वर्षास हा सण आला कीं कमींत कमी वीस रुपये तरी खर्च होतो. हातचे कांकणास आरसा नको. ही खर्च करणारी ठकी येथें हजर आहे तीच काय तें तुला सांगेल.

हिराबाई—सासुबाई, यांत फारसें नवल नाहीं, बापडे शंभर रुपये खर्च केले तरी नाहीं का होणार ? पण दसरा झटला झणजे दिवाळीसारखा मोठा सण नाहीं, कीं त्यांत अधिक खर्चाची जरूरी आहे.

सासू—अग, तूं झणतेस तें खरें, पण माझे सत्यवंतास चांगली बायको मिळावी झणून लक्ष्मीनारायणाला नवस केला होता, तो तर फेडला पाहिजे ना ! शिवाय लोकांचे येथें भेटबीट धाडायची सवरायची हें तर कुठें चुकलें नाहीं. बोलायला कीं नाहीं सगळें दिसतें पण दर वर्षाचे चालीप्रमाणें पांच रुपये तर एकट्या तुझ्या नवऱ्याकरितांच पाहिजेत, शिवाय नणंदेकरितां दारूसामान व फटाक्याच्या पेट्या, बाहुल्या व बुडकुल्या यांस फार नाहीं तरी तीन चार रुपये लागतील. सत्यवंताला आतां चार हात फुटले झणून तो कांहीं मला मोठा नाहीं, आणि येवढ्यांत का त्याची पोरबुद्धि गेली आहे ? त्याचा कीं नाहीं अजून पोरस्वभाव आहे तो आहे. निदान शें दोनशें चंद्रजोती, पन्नास पाउणशें नळे, व वीस पंचविस फटाक्यांच्या पेट्या इतकें घेईल तेव्हांच त्याची तृप्ति होईल. नाहीं तर माझा बाई जीव तोडतोडून खाईल. आणि तशीच शांताबाई बाहुल्या बुडकुल्यांविषयीं रडरडून जीव देईल, पण ऐकावयाची नाहीं.

हिराबाई—सासुबाई, आपले मनांत नवस फेडावयाचा आहे तर त्यास फारफार तर पांच शेर मिठाई लागेल. भेटी पाठवायच्या सवरायच्या तें तर थोडक्यांत आहे, तें असें. इकडून आली कीं तिकडे पाठवली, व तिकडील इकडे, असें करून बाहेरची पीडा बाहेर. आतां मोठी चिंता कायती दारूसामानाची व बाहुल्या बुडकुल्यांची, तर या विषयीं

त्यांची व शांतेची मी समजूत करून घेईन. याप्रमाणें सर्व कांहीं खर्च करायचें काम जसें होईल तसें करून मजकडे सोंपवा ह्मणजे झालें. याच अडचणीबद्दल जर कर्ज काढायचें आहे तर आपण त्याविषयीं कांहींएक काळजी करूं नका.

हिराबाई सासूबरोबर याप्रमाणें बोलून चुकली पण दारूसामानावरून नवऱ्याचें मन कसें वळवावें याविषयीं तिला मोठी चिंता पडली. शेवटीं तिणें नवऱ्याची अशा युक्तीनें समजूत केली कीं, एक तर सहज गोष्टीवरून गोष्ट निघावी आणि तिजवरून नवऱ्यास वाईट न वाटतां उलटा बोध व्हावा. एके दिवशीं सत्यवंताचे समोर हिराबाई शांतेस चिडवून ह्मणाली; "कसेंकाय शांताबाई, तूं दसऱ्या दिवाळीसाठीं काय काय बेत करून ठेविले आहेस?"

शांताबाई—वहिनी, त्यांत बेत ते कसले? दादा आपणाकरितां दारूसामान आणील तेव्हां त्याजबरोबर मलाही थोडेंसें आणलें ह्मणजे झालें. बाहुल्या वुडकुल्या तर दर वर्षी आई आणून देतेच.

हिराबाई—ते आपणास असल्या निरुपयोगी वस्तू आतां कां ह्मणून आणतील? शांते, तूंच सांगवरें नळे चेंद्रजोतींत काय मौज असते ती?

शांताबाई—वहिनी, नळा सोडला ह्मणजे मनाला नाहींका मौज वाटत? वः काय ते तारे, आणि काय त्यांचें तेज!

हिराबाई—आपले पेठेंत त्या दिवशीं हजारों नळे सुटतील तेच आपण ओटीवरून किंवा माडीवरून पहावे ह्मणजे झालें.

शांताबाई—वः, वहिनीनें काय सांगितलें पण! लोक

आपल्या घरीं जेवतात म्हणून आपण उपाशीं राहावें! होय?

हिराबाई—बरें; शांते, तुला दारूकाम सोडते वेळीं भीति नाहींका वाटत?

शांताबाई—भीति वाटते तर खरी; पण माझें दारूकाम मी कोठें उडवित्यें?

हिराबाई—तर मग मी म्हणत्यें तसेंच झालें जशी तुझें दारूकाम दुसऱ्यांनीं लावलेलें तूं पाहत्येस तशीच पेठेंतील पहा म्हणजे झालें. पहा शांते, हा दारूचा खेळ फार वाईट आहे, कां म्हणशील तर यांत अंग भाजण्याची भीति फार आहे. एकदां आमचे पेठेंत एक मुलगी हातांत नळा घेऊन उभी होती आणि त्यावर दुसरीकडून एकाएकीं ठिणगी येऊन पडली आणि तो फुटला; तेव्हां काय विचारतेस! त्या बिचारि मुलीचे दोन्ही डोळे फुटून ती जन्माची आंधळी होऊन बसली. म्हणून अशी मौज पाहवयाचीच असली तर ती नेहमीं फार लांब राहून पाहिली पाहिजे. बरें, शांते, सामुबाई हल्लीं किती काळजींत आहेत हें तुला माहित नाहीं बरें?

शांताबाई—होय, हल्लीं ती उदास दिसते खरी.

हिराबाई—बरें, त्या अशा उदास कां दिसतात याविषयीं तूं कधीं विचार केलास काय?

शांताबाई—नाहीं, उदास राहण्याचें कारण मला मुळींच माहित नाहीं.

हिराबाई—शांते हींच का तुझी आईवरील प्रीति! तूं तर म्हणत असतेस कीं, आईवर माझी फार ममता आहे.

शांताबाई—बरें; बाहिनी, आई उदास कां असते सांग पाहूं.

हिराबाई—याचें कारण इतकेंच कीं, तूर्त खर्चाची फार

अडचण आहे आणि आतां सावकारही कर्ज देईनासा झाला त्यामुळें अशी चिंता लागली आहे कीं उद्यां तूं नळे चंद्रज्योतीविषयीं हट्ट धेऊन बसलीस तर ते कोठून आणून द्यावे?

शांताबाई—असें आहे तर आम्हीं नळे चंद्रज्योती, बाहुल्या बुडकुल्या कांहींच मागणार नाहीं मग तर झालेंना ?

हिराबाई—वः, शाबास शांते शाबास, यावरून तर तूं फार विचारी मुलगी आहेस असें दिसतें. (असें म्हणून शांतेला पोटाशीं धरून तिचें चुंबन घेतलें.)

सत्यवंत हातांत एक पुस्तक घेऊन तें वाचीत आहे असा डौल करून ह्या सर्व गोष्टी हळूच कान देऊन ऐकत होता. ह्या सर्व गोष्टी वाजवी वाजवी असल्या कारणानें त्या त्यानें अक्षरशः कबूल केल्या, यांत मोठेंसें नवल नाहीं. तो लागलाच माडीवरून खालीं उतरून आईपाशीं आला आणि म्हणाला, "आई, तूं दसऱ्या दिवाळीचे खर्चाचे चिंतेंत आहेस असें ऐकलें, तर तूं आम्हांविषयीं कांहीं काळजी करूं नको. मला नळे, चंद्रज्योती कांहीं नको व शांताही बाहुल्या बुडकुल्यांविषयीं कांहीं हट्ट घेऊन बसणार नाहीं. "

याप्रमाणें खर्चाची एक बाब तर कमती झाली. व लक्ष्मिनारायणास केलेला नऊस दोन रुपयांच्या मिठाईत खासा मजेनें फिटून गेला. कोणाचे येथें भेटी पाठवायचें सवरायचें काम हिराबाईनें आपलेकडे घेतलें होतें. जेव्हां बाहेरून भेटीचें ताट येत असे तेव्हां पोंचविणारा तें पोंचवून गेला म्हणजे लागलेंच तें घरांतच ठेवितां दुसरेकडेस पाठवून द्यावें व दुसरीकडून आलें म्हणजे तिसरीकडे पाठवावें, असें करकरून सर्व कांहीं व्यवस्था लावून दिली. आणि घरांत पोळी

पक्कान्न दोन रुपयांत उत्तम प्रकारचें झालें. हा बातबेत पाहून ठकीचे तोंडांत मारल्या सारखें होऊन तिचे पायांची तिडीक मस्तकांत जाऊन पोंहोचली. कारण कीं दर वर्षीं जितक्या वाहेरून भेटी यावयाच्या तितक्या सर्व ही एक-टी स्वाहा करीत असे. शिवाय घरांतून जी मेवा मिठाई वाहेर जात असे तींतून अर्धेअर्ध काढून घ्यायाची. या-प्रमाणें दसऱ्या दिवाळीची मेवा मिठाई गोळा करून ती जमवून ठेवावी. आणि ती कित्येक महिने पर्यंत स्वस्थप-णें रगडीत वसावें.

पौर्णिमा झाल्या नंतर हिराबाईचा बाप विश्वासराव हा निपाणीहून घरीं यावयास निघाला. व दसऱ्याचे पूर्वी च्यार दिवस पुण्यास येऊन पोहोंचला. आपला बाप अ-मुक दिवशीं येणार हें हिराबाईस पूर्वीपासूनच माहित होतें ह्मणून तिणें सासूस व नवऱ्यास पूर्वीपासूनच विचारून ठेविलें होतें कीं, माझा बाप आल्यावर मला माहेरीं त्यास भेटण्यास पाठवा ह्मणजे झालें.

विश्वासराव आल्याची बातमी जेव्हां हिराबाईस कळली तेव्हां ती तशीच गाडी मागवून माहेरीं निघून गेली. बापानें तिला पहातांच पोटाशीं धरिलें आणि आपली आवडती मुलगी पुष्कळ दिवसांनीं भेटल्यामुळें त्यास गा-हिंवर येऊन डोळे भरून आले. कांहीं वेळ पर्यंत क्षेम कुशल विचारल्यावर बाप हिराबाईस ह्मणाला, " बाळे, तूं लिहिल्याप्रमाणें रमाकांत कोल्हापुरास गेला आहे आणि देव दर्शनें उद्यां, किंवा पर्वां तुझे सासऱ्यास संगें घेऊन येथें येऊन पोंचेल असें वाटतें. त्याचें एक पत्र मला वाटेंत आलें होतें त्यांत लिहिलें आहे कीं त्याला कार-

भारी साहेबांकडून रजा मिळाली आहे. " हिराबाई त्या दिवसची रात्र आणि दुसरा सगळा दिवस बापाचे येथें राहून संध्याकाळीं त्यास विचारूं लागली कीं, "बाबा, जर आपण आज्ञा द्याल तर मी आज आपले घरीं परत जाईन."

विश्वा०—बाळे, बरें आज मी कैक वर्षांनीं येथें आलों, असें असतां आल्यासारखी आठ चार दिवस तरी रहा आणि मग पाहिजे तर जा. मी तुझे सासुबाईस यावद्दल सांगून पाठवितों, ती कांहीं तूं राहिलीस ह्मणून रागें भरणार नाहीं.

हिराबाई— बाबा, तूं जी आज्ञा करशील ती मला मान्य आहे पण मामाजी येण्याचे अगोदर मी सासरीं जावें हें मला बरें वाटतें.

विश्वासराव—(विचार करून) हां, तूं ह्मणतेस तेंही खरें आहे, बरें जा तर आज.

हिराबाई बापाची आज्ञा घेऊन निघाली ती सूर्यास्तापूर्वीच सासरीं येऊन पोंहोचली.

नंतर दसरा झाल्यावर तिसरे दिवशीं ऐन दोनप्रहरीं जेवणाचे वेळीं सत्यवंताचे वडील माधवराव हे एकाएकीं घरीं येऊन पोंचले. माधवराव हे कोल्हापुरकरांजवळ दुय्यम कारभारी होते व यांस दरमहा शंभर रुपये तैनात मिळत असून शिवाय रहावयास घर व स्वारीचा खर्च इतकें सरकारांतून मिळत असे. रमाकांत हा हिराबाईनें लिहिल्यावरून कोल्हापुरास गेला होता असें मागें सांगितलें आहे. त्यानें तेथें जाऊन हिराबाईचें पत्र माधवरावास दाखविलें; सुनेचें पत्र पाहून माधवराव हे फार खुष झाले. एरव्हीं त्यांणीं कदाचित् रजा सुद्धां घेतली नसती. पण आतां

सूनेला पहायाच्या उद्देशानें महाराजांचे कानावर गोष्ट घालून एक महिन्याची रजा घेतली व रमाकांताबरोबरच पुण्यास निघून आले.

हिराबाईनें लग्न झाल्यापासून सासऱ्याला कधींच पाहिलें नव्हतें; ह्मणून माधवराव येत आहेतसें पाहून पूर्वीच लाजेनें ती माडीवर जाऊन बसली होती. सत्यवंताची आई देखील ते आलेसें पाहून आणि त्यांचा येण्याचा कांहीं संभव नसतां एकाएकीं येणें कां झालें, या विचारांत पडली. ते घरांत आल्यावर क्षेम कुशल विचारून नंतर जेवणखाण आटोपल्यावर इकडच्या तिकडच्या गोष्टी निघाल्या. तेव्हां माधवराव आपले बायकोस ह्मणाले कीं, "ऐकलेंस का, तुझे धाकटे सुनेनें मला इकडे कसें ओढून आणलें तें." असें ह्मणून तिचे पत्राची व रमाकांत इकडे येण्याची सर्व कांहीं हकीकत तिला सांगितली; आणि विजयालक्ष्मीला आपलेकडे बलावून आण असें सांगितलें. तेव्हां सासू माडीवर जाऊन हिराबाईला ह्मणाली, "चल, ते तुला खालीं बोलावीत आहेत; त्यांस इतकें लाजण्याचें कांहीं कारण नाहीं तूं तर त्यांचे अंगावर नाचलेली खेळलेली आहेस." सासूचे सांगण्यावरून हिराबाई तिजबरोबर खालीं गेली आणि आदरपूर्वक सासऱ्याचे पायां पडून एका बाजूस जाऊन उभी राहिली. पायां पडते वेळीं "अष्टपुत्रा सौभाग्यवति भव" असा माधवरावांनीं तिला आशीर्वाद दिला आणि ह्मणाले, "ऐक लेंस मुली, फक्त तुझेच बलावण्यावरून मी येथें आलों आहें आणि तुझें पत्र वाहून मला जो आनंद वाटला तो काय सांगूं. ईश्वर तुझें कल्याण करो. आतां माझें भाग्य खरोखरच मोठें समजावयाचें कीं, तुजसारखी सुशील सून मला मिळाली.

आणि माझी पक्की खात्री होऊन गेली आहे कीं, आतां आमचे सुखाचे दिवस खचीत जवळ आले आहेत. देवाचे दयेनें तुझे मर्जीनुरूप उद्यां सर्व कांहीं व्यवस्था करतां येईल."

माधवराव फार दिवसांनीं आल्यामुळें नवेनवे होते असणून पहिले दोन चार दिवस तर लोकांस भेटण्या सवरण्यांतच गेले त्यामुळें तेवढ्या मुदतींत घर खटल्याकडेस लक्ष द्यावयास त्यांस फावलें नाहीं. पुढें एके दिवशीं सुनेला बलावून जवळ बसविलें व ठकीला तिचे समोर उभें करून विचारलें कीं, "ठके, मी आहें तेथपर्यंत सर्व कांहीं हिशोब करून कोणकोणाचें कितकिती द्यायाचें आहे तें सांग किंवा ज्या ज्या लोकांचें देणें घेणें आहे त्या सर्वांचें लिहून आणावयास सांग म्हणजे ज्याचें त्याचें त्या त्या प्रमाणें दिलें जाईल आणि ज्यांची बाकी राहील त्यांची त्याबद्दल हतेबंदी करून दिली जाईल. आणि मग अशी भानगड कामाची नाहीं.

ठकी—धनीसाहेब, एक दोघांचा हिशोब असेल तर तोंडावर याद राहील; वाण्याचा, तेल तूपवाल्याचा, कापडवाल्याचा, शाख भाजीवाल्याचा, हलवायाचा, याचा, त्याचा अशा अठरा पगड जातीचा हिशोब होणें आहे, इतक्यांची काय मी आपलें कपाळ आठवण ठेवूं? मेल्या तिलकचंदाचा तर एक निराळाच हिशोब आहे. तेव्हां ज्यास जितकें द्यावेंसें वाटतें तितकें मजजवळ द्या म्हणजे मीं त्या त्यास नेऊन देईन, आणि ते आपले नावें तितकें जमा करतील म्हणजे झालें.

माधवराव हे साधेभोळे गृहस्थ होते त्यामुळें ते द्यावयास तयार झाले पण हिराबाई म्हणाली, " मामाजी, तसें नाहीं;

हिशेब केल्याशिवाय असें देण्यांत काय बरें अर्थ? पहिल्या-नें दरएकाचें कर्ज किती आहे हें कळलें ह्मणजे त्यास ल्या त्या प्रमाणें अधिक उणें देतां येईल.

ठकी—बरें बाई, तुझे ह्मणण्याप्रमाणेंच कां होईना. जेवण आटोपलें ह्मणजे मी जाऊन त्या सर्वांस विचारून येईन ह्मणजे मग तर झालेंना? का आणखी कांहीं ह्मणणें आहे?

हिरा०—मावशे, तूं विचारून येऊन काय होणार आहे? उलटा अधिक गोंधळ करून येशील ह्मणून ज्यास घेणें आहे त्यांस गरज असेल तर ते येथें येऊन हिशेब करून जातील.

ठकी—वहिनी साहेब बोलावयाचें काम फार सोपें आहे. पण मी सर्वांस कुठें कुठें ह्मणून बोलावीत फिरूं? तशांत ते काम धंद्याचे माणूस पडले, त्यांस इतका वेळ कुठें आहे कीं ते मजबरोबर येतील?

हिराबाई—मावशे, हें काय सांगत्येस; काय त्यांस दर-रोज बलावायचें आहे, अग एक घटकेचा मामला, जा जाऊन बलाऊन आण. संध्याकाळचें जेवण मेलें कसें तरी सांभाळून घेऊं, आणि तूं कीं नाहीं आज हेंच काम कर. घेणारे तर हि-शोबाचें नांव ऐकतांच कुत्र्यासारखे धांवत येतील कीं नाहीं तें पहा. तिलकचंद नोटीस लावण्याकरितां दोन कोस कचेरी बे-लिफा पर्यंत बरा धांवत गेला, आणि त्यास येथें यावयास बरीक संकट वाटतें नव्हे? आतां दूर ते कोण राहिले. वाणी, तेल व तूपवाला, भाजीवाला, हलवाई इत्यादि सर्व याच पेठें-त आहेत. कापडवाला व तिलकचंद हे दोघे कायते दूर राहतात; या दोघांस पाहिजे तर उद्यां बलावून आण. पण इतरांचा फुटकळ हिशेब तर आज होऊन जाऊंदे.

कोणाचा ह्मणजे हिशोब व्हावा अशी ठकी मोलकरणीची कोणत्याही तीनें मर्जी नव्हती पण हिराबाईनें बोलून तिला अशा पेंचात आणलें कीं तिचे उलट तिच्यानें जावेना. शेवटीं निरुपाय होऊन तिला घेणेदारांस बलावून आणणें भाग पडलें. सर्वांचे अगोदर हलवाई आला, त्याला माधवरावांनीं विचारलें, " भैय्याजी, तुह्मारा क्या क्या देना है ? "

हलवाई—अजी सरकारसाहेब, मेरे फक्त तीस रुपये निकलते है; मेरे गरीबका और कुछ नहीं.

माधवराव— तीस रुपये तो झीयादा बताते हो, भला क्या क्या चिझें तुम्हारे याहांसें आई सो, तो पहिले बतावो.

हलवाई—जी सरकार, क्या तीस रुपये झियादा हुये, पंदर रुपयेकी मिठाई तो कलके दसेरेके तिवारकु आई उन्ते मैं फक्त दस शेर क्या तो शकर है.

सत्यवंताची आई—आग लागो इचे तोंडाला, अग ठके कसची साखर आणि कसची मिठाई गे ? या वेळेस तर आमचे घरांत पोळी पक्वान्नाकरितां जें कांहीं सामान आणलें तें सगळें रोख पैसे देऊन आणलें. आणि भैय्या हें काय सांगतोस तूं ?

ठकी—(हें ऐकताच तिचें तोंड खर्रदिशीं उतरलें, आणि ह्मणते) अरे लाला, ती दाहा शेर साखर व मिठाई यांचे हिशोबांत लिहिलीस काय ? वाः, ती तर मी दुसऱ्याकरितां नेली होती आणि नेतेवेळीं ही अमक्याकरितां ह्मणून तुला बजाऊनही सांगितलें होतें. तूं तरी आपला बराच आहेस.

हलवाई—मुझे तो तुमने किसी वरका नाम नहीं लिया. इसी सरकारके नामसें लायीहो, नहीं तो भला क्या फाय-

दाथा, के दुसरेकी चिझ इनके नाम लिखता, और मुझसें तो ओर किसी सरकारसें उचापतभी नहीं है.

माधवराव—अछा, शक्कर और मिठाईकी रकम रहने देव, भला और दुसरी क्या क्या चीझ सो बताओ.

सारांश हलवायानें अशा पुष्कळ वस्तू दाखविल्या कीं ज्या जन्मांत सुद्धां कधीं आगल्या नव्हत्या. उदाहरणार्थ पांच शेर मसालेदार बासुंदी जी सत्यनारायणाचे कथेकरितां आणलेली झगून दाखविली, पण यांत गम्मत काय होती कीं, सत्यनारायणाची कथा कधीं कोणी स्वप्नांत सुद्धां केली नव्हती. अशा कित्येक जिनसा काढतां काढतां शेवटीं सहा सात रुपये वाजवी वाजवी निघाले. बाकी•एकुन एक सर्व लबाडीचे होते.

माधवराव—(रागानें संतापून) अग कर्मचांडाळणी, अवदसे ठके, असेंच का तूं सर्व जगाचें कर्ज या घरावर करून ठेवलें आहेस? आगि याच रीतीनें तूं आज इतकीं वर्षें घरदाराची राखरांगोळी करून ठेवितली आहेस! वः, बरे दिवे पाजळले पण. (भाजीवाल्याकडेस पाहून) बरें तुमचें देणें किती आहे!

भाजीवाला—शेटसाहेब, माझा गरीबाचा तर रोजचा उकाडा आहे. दररोज दोन आण्यांची भाजी येते. तेव्हां गेल्या चैत्र शुद्ध ५ मी पासून मी देत आहें तेव्हां किती दिवस झाले ते आपणच पहा.

सत्यवंताची आई—अरे, दररोज एक शेर भाजी माझे घरांत येते, त्याचे का दोन आणे झाले?

भाजीवाला—बाईसाहेब, एक शेर कां म्हणतां तीन शेर कां म्हणाना? ही पहा येथें आणलेली हजर आहे इलाच विचारा काय तें. कां ठकु मावशे, खरेंना?

ठकी–होय. तीन शेर आणतें, एक शेर यांचे नांवानें, एक शेर माझे मुलीकारितां, व एक शेर दुसऱ्या घराकारितां, त्यास मी कोठें नाहीं ह्मणतें? पण या मेल्यानें तर सगळें तुमचे नांवावर लिहिलें त्यास मीं काय करूं?

भाजीवाला–अग लुच्चे खोटें बोलतयेस काय? तूं पहिल्यापासून याच घराचे नांवानें रोज तीन शेर भाजी आणीत नव्हतीस? आणि तिचे पैसेही याच घराचे नांवानें देत नव्हतीस?

या नंतर वाणी व तेल तूपवाल्याचा हिशोब झाला. त्यांतही वरील प्रमाणेंच हजारों लुच्चेगिऱ्या दिसून आल्या. त्यावरून असें कळून आलें कीं ठकी ही या घरच्या सौदयांतून कांहीं आपली मुलगी धर्मात्मी, इला देऊन कांहीं शेजार पाजारच्या दोन तीन घरांस देऊन त्यांजवळून पैसे घेत असे. या प्रमाणें संध्याकाळ पर्यंत सर्वांचा किरकोळ हिशोब होऊन गेला. आतां काय तो कापडवाला व तिलकचंद बाकी राहिला होता.

माधवराव–बरें; टके, तिलकचंद व कापडवाला यांस आजचे दिवस असों दे, उद्यां त्यांचाही हिशेब पाहतां येईल (हल्लूच हिराबाईशीं) पण असें न व्हावें कीं ठकीनें कुठचेकुठें आजचे रात्रीचे प्रहरीं फरारी होऊन जावें.

हिराबाई–मामाजी, घरदार, मुलेंलेंकरें सोडून का कोठें पळून जाणार? हां, जर अब्रूची चाड असेल तर मात्र कांहीं तरी खाऊन जन्माचा शेवट करील. पण इतकी अब्रू असती तर असें कर्म कां करती? तरी पण इचेवर नजर ठेवणें वाजवी आहे, कुठें आंत बाहेर जाऊं लागली ह्मणजे कोणास तरी इजवर लक्ष्य ठेवावयास सांगावें हें चांगलें.

माधवरावांबरोबर जे त्यांचे कित्येक चपरासी आलेले होते त्यांपैकीं एकास त्यांणीं सांगून ठेविलें कीं, ठकी जेव्हां बाहेर कुठें येऊं जाऊं लागेल तेव्हां तिचेवर जरा चांगली नजर ठेवीत जा.

संध्याकाळचें जेवणखाण आटोपल्यावर चार प्रहर रात्र होईपर्यंत सर्वत्र सामसूम होतें; परंतु चार प्रहर उलटतांच ठकी हळूच घरांतून निघून बाहेर जाऊं लागली हें पाहून चपरासीही ती कोठें जाते हें पाहण्याकरितां गुप्त रीतीनें तिचे पाठोपाठ हळूहळू बाहेर जाऊं लागला. ठकी पहिल्यानें आपले घरीं गेली आणि तेथून कांहीं कारवेंत मारून वाणासारखी येट कापडवाल्याचे घरीं जाऊन त्यास हांका मारून जागें केलें.

कापडवाला-- (तीस पाहून) मोठी बाई, तमें अवढ्या राती इयां कुठें ?

ठकी—काय सांगूं शेट, कारभारी साहेब आले आहेत ते ज्यांचें देणें आहे त्यांस बलावून हिशेब ठिशेब करीत आहेत. उद्यां तुम्हांसही बोलावणें येईल तेव्हां तेयें तुम्ही गेल्यावर अशी गोष्ट बोलूं नका कीं त्यांत माझी पुरी फजिती होईल.

कापडवाला— हिसाब करवामां तमच्या फजितीच्या शुं कारण हाय ?

ठकी— शेटजी, तुम्हांस तर माहित आहे कीं, ही मेली लालुच किती वाईट आहे ती. कारभारी साहेबांचे हिशोबांतून मी कधीं कधीं आपल्याकरितां तुमचे दुकानावरून बांडाचीं लुगडीं, पातळें, चीट वगैरे नेलें आहे.

कापडवाला— हूं काय ज्याणूं के तमे तमच्या वास्ते शुं शुं घेऊन गयां छे ?

ठकी– शेटजी मला या वेळीं हिशोब करण्याची तर शुद्धी नाहीं पण दोनचार थानें पातळाकरितां, कांहीं धनवडी खण, दहा वार चीट असें माझे हिशोबावर निघेल. हे घ्या माझे हातांतील चार गोठ; हे सोळा रूपयांचे केले होते, मेले कधीं मधीं घालून फार तर एक रूपायाभर झिजले असतील. हे पंधरा रूपये माझे नांवें लिहून तेवढे कमती करा. आणि जे काय दोन चार रूपये माझे नांवें अगखी निघत असतील ते मी देण्यास राजी आहें.

कापडवाला–बाई, तमच्ये बांगडी ज्ये तमे मारे पासे देतां ते ठीक, मैं ते राखूनसी ठेवते पण हातां रातच्या वखते तुमचे खाते दुकानाउपर हाय ते फायल्यासित्राय झला तों-डावर शुं ठावक के शुं देले हाय हानी शुं तमच्या जवळून घ्यायचये हाय.

ठकी– शेटजी, या वेळीं माझी अब्रू तुमचे हातीं आहे. कसेंही करून ती राखा झणजे झालें. (असें झणून तेथून नि-घाली ती तिलकचंदापाशीं आली तेव्हा तोही कापडवाल्याप्रमाणें चकित होऊन गेला आणि झणतो.)

तिलकचंद– ठके, अवढा दिवस सोडूनसी रातीचेपारीं कां आले ?

ठकी– (त्याच्या पायां पडून व रडून) लाला, बाबा माझे हातून एक मोठी चूक झाली आहे.

तिलकचंद– ते चुक केम झ्याली, शांग फाडूं ?

ठकी– तूं माफ करशील असें वचन दे झणजे तुला सांगतें.

तिलकचंद–बरें काय हाय ती आधीं शांगशेल तर खरी!

ठकी– आज चार महिनें होतील, कोल्हापुराहून खं-

र्चाकरितां हुंडी आली होती त्यांतून कारभारी साहेबांनीं शंभर रुपये तुझा द्यावयास सांगितले होते. पण ते माझे हातून खर्च झाले आहेत आणि भीतीमुळें मी ते अजून घरात कळविले सुद्धां नाहींत. आतां कारभारी साहेब कोल्हापुराहून येतें आले अहेत ते उदयीक तुझे हिशोबासाठीं तुझा बलाविताील. तर त्या रुपयांची मी कुठून तरी दोन चार दिसांत सोय लाविते. पण मजवर दया करून ही येवढी रकम तूं तेथें बोलूं नको म्हणजे झालें.

तिलकचंद– ठके, बे चार रुपयांची बात होते तो मे कदाचित् चुनऊनसी ठेवते पण अटला शंभर रुप्या तर माझेयी छुमावी ज्याणार न्हाय. माज्ये गरीबाच्या पैसा ठकवूनशी नई खाशेल ये मने पकूं खबर हाय. पण वखत है आज्ये रुप्यांचें काम.

ठकी– कायरे लाला, आजच जग बुडालें काय? अरे, ह्या शंभर रुपयांसाठीं माझा विश्वास तुला नाहीं?

तिलकचंद– ठके, खरी बात म्हणशेल तर अशी हाय कीं तुझा एक कोरीचा पण ईश्वास मला न्हाय. जे घरांमधी तेने तनचे उमरभर खालेपिलें तेच्यासाथ तमे अशी दगलबाजी केले ते पारक्यासाथे करायला तमे काय च्युकगार हाय!

ठकी होय बाबा, तो तुझा अपराध नव्हे आपलाच. वेळ गईह आता म्हणजे तूं काय पण सारें जग आपलें वैरी होतें. चें जर तुला इतका विश्वास वाटत नाहीं तर ही ये माझे तुझीये गळ्यांतील सरी व बाजूबंद. ही तुझजवळ असूं दे.

तिलकचंद– हां, हें घेणदेणची बात हाय पण दिवश

अशाता तर पारखूनशी घ्यायला आला अशाता की कवड्या-च्या हायतो, पण अटकळथी हा तमच्या माल अशरे पचाश शाठ रूप्याचा होशेल.

ठकी— लाला, तूं असा जुलूम नको करूं; अरे, हे दोन्ही दागिने नवे केल्यास अझून चार महिने सुद्धां झाले नसतील. हे दोन्ही मिळून शंभर सवाशेंच्या जवळ जवळ खर्च झाले होते.

तिलकचंद—ठके, येमंदी तमाला वाईट वाटायच्या काय कारण हाय? तमच्या दागीना शंभरचा होशेल या बेशोच्या होशेल तरी तो तमच्या, हाल्माला काय त्यामधूनशी काढून खायच्या हाय? तोलूनशी जेटला होशेल तेटला ठाऊक पडशेल.

असा ठकीनें जिकडचा तिकडे बंदोबस्त करून ती परत घरीं यावयास निघाली. इकडे माधवरावांचा चपरासी जो तिचे पाळतीवर होता तो पुढें धांवत आला आणि घडलेला सर्व प्रकार त्यांस सांगितला. आणि हिराबाईसही ही गोष्ट तिचे सासूनें सांगितली. प्रातःकाळ होतांच माध-वरावांनीं कापडवाल्यास व तिलकचंदास बलावणें पाठ-विलें. ते आल्यावर त्यांचा हिशोब तपाशीत असतां कांहीं वांधा पडला अतें पाहून ठकी अतिशय चवताळून बोलूं लागली आणि मनांत म्हणूं लागली कीं, यांस दागिन्या-परी दागिना देऊन इतकी पायधरणी केली तरी यांची कटकट मिटत नाहीं!

कापडवाला—म्हतारी, ये तमे शुं बडबड लगवली हाय? ही ये तमच्या बांगडी. तमे तर पंदर रूप्याचये शांगते होती पण बजारमधी शराफानें ज्योयली ते तर नवरूप्या शांगते.'

तिलकचंद–(बाजुबंद व सरी ठकीपुढें ठेऊन) नाहीं ठके, हा मालबी आमच्ये कामाचा न्हाई.

माधवराव–(हा प्रकार पाहून) " केम भाई, ये शुं चीझो छे ? "

तेव्हां त्यांणीं रात्रीं घडलेला सर्व प्रकार सांगितला. या वेळीं ठकीवर जिकडून तिकडून लाखों शिव्यांची पुष्पांजळी होऊं लागली. नंतर सर्वांचा हिशोब रोखठोक करून माधवरावांनीं त्यांस रुपये द्यावयास काढले. आणि ज्यांचे जितके वाजवी वाजवी निघत होते त्यांचे निम्मे देऊन सांगितलें कीं मी कोल्हापुराहून आणखीं रुपये मागविले आहेत ते आठ दाहा दिवसांत येतील असें वाटतें. ते आले ह्मणजे तुमचे बाकीचे रुपये देऊन टाकीन. तेव्हां सर्व लोकांनीं विचारलें कीं ठकीवर जे आमचे रुपये निघतात ते आह्मी कोणापासून घ्यावे ?

ह्या गोष्टी होत असतां उमाकांत शाळेंतून सुटून सहज त्या रस्त्यानें घरीं जात होता त्याणें ह्या सर्व गोष्टी ऐकून घेऊन आपले बहिणीस सांगितल्या. तो ह्मणाला, " आका, आज तर हिरा आकाचे दारावर खूप गर्दी झाली आहे आणि तिचा सासरा कांहीं हिशोब करीत आहे. " हें ऐकतांच सुमतीबाई लागलीच हिराबाईचे येथें आली.

सुमती–अग हिरे, तुला मी इतकें सांगून ठेवलें असतां शेवटीं तूं मला कळविलें नाहींसना ? बरें, कांहीं चिंता नाहीं.

हिराबाई–अग आका, अझून सगळा हिशोब झाला आहे कोठें ? हें भांडण आटोपतांच मी तुला खबर बोलावणार होतें.

माधवराव–(सर्व घेणेदारास) ठकीवर जें तुमचें घेणें

निघतें तें सर्व तिजजवळूनच घ्या. तिचे करितां या उपर आमच्यानें तोटा सोसवणार नाहीं. (ठकाकडेस वळून) बाईसाहेब, या सर्वांचे रूपयांची आधीं काय ती तजवीज करा. नाहीं तर—

ठकी—(खालीं मान घालून) धनीसाहेब, माझेजवळ थोडेसे मुलीचे दागिने आहेत त्यांवर ह्या लोकांनीं आपापली कायती समजूत करून घ्यावी. दुसरें माझेजवळ तर कांहीं नाहीं.

याप्रमाणें मुलीचे जेवढे दागिने होते तेवढे सर्व भाजीवाला, दाणेवाला, कपडेवाला, या सर्वांच्या देण्याबद्दल जेमतेम अर्धेअर्ध किंमतीस गेले आणि तिलकचंदाचे शंभर रूपयांबद्दल स्वतःचें राहावयाचें घर स्टांप कागदावर लिहून देऊन व चार चौघां भल्या माणसांच्या साक्षीनिशीं तिला गहाण ठेवणें भाग पडलें.

माधवराव— ठकाबाई, आपण आतां अजूनिशीं आमचे घरांतून एकदांचें काळें करा आणि जिकडे तुह्मांस जावेंसें वाटेल तिकडे जाऊन खुशाल सुखानें राज्य करा. तुमच्यासारख्या, अविश्वासू, कृतघ्न, लबाड मनुष्याचें आमचे घरांत कांहीं काम नाहीं.

हिराबाई— मामाजी, इजवर अविश्वास, कृतघ्नता व लबाडी यांशिवाय दुसरा एक मोठाच आरोप घरांत कुभांडें रचून कलह लावून देण्याचा आहे. कसें काय मावशे! त्या दिवसच्या भज्यांची आठवण आहे काय? त्यांणीं भजीं करावयास मला सांगण्यास सांगितलें असतां मला विचारल्या खेरीज माझें डोकें दुखत आहे असें बळेंच जाऊन सांगणारी ती तूंच ना! आतां खरें सांग बरें, तूं मला भज्यांविषयीं केव्हां सांगितलें होतें आणि मी डोकें दुखत आहे ह्मणून केव्हां बोलले!

ठकी—वहिनीबाई, मी माडीवर तुह्मांस सांगण्यास आलें होतें. त्यावेळीं तुह्मी भागवत वाचीत बसल्या होतां आणि तुह्मीं वाचण्याचे नादांत गर्क होतां असें पाहून मी मुकाट्यानें खालीं गेलें.

हिराबाई—तर मग मावशे, डोकें दुखण्याचें निमित्त तूं आपले पदरचें सांगितलेंस वाटतें? असेंच कीं नाहीं?

ठकी—होय वहिनीबाई; आतां आपण ह्मणाल तें खरें. पण मी साधेपणानें असें समजलें कीं, तुह्मीं सकाळपासून दुपारपर्यंत एकसारखें भागवत वाचीत होतां तेव्हां चुली-जवळ फुःफुः करतांना तुमचें डोकें दुखूं लागेल ह्मणून तह्मांस सांगितलें नाहीं.

हिराबाई—बरें मावशे, घांटावर जाण्याची गोष्ट तूं कोणते हेतूनें सांगितलीस? मी तुझेजवळ ही गोष्ट कधीं तरी काढली होती? किंवा दुसऱ्या कोणाबरोबर तरी बोलतांना तूं ऐकली होतीस?

यावर ठकीचे तोंडांतून कांहींएक प्रत्युत्तर आलें नाहीं असें पाहून हिराबाईनें दारावर लावलेला जाहीरनामा जो आपल्याजवळ काढून ठेवला होता तो माधवरावांचे समोर ठेवून:—

हिराबाई—मामाजी, ही पहा या मावशीची कशी खोल बुद्धि आहे ती! हिनें पेठेच्या वेशीवरील हा जाहीरनामा काढून आणून आमचे दारावर चिकटवला आणि रात्री अंधारांतून भवानीपेठेंत जाऊन मोठ्यानें आरोळी मारून सासुबाईस सांगितलें कीं, दारावर सावकाराच्या कर्जाबद्दल नोटीस येऊन लागली आहे.

माधवराव—(हें ऐकल्यावरोबर रागीट मुद्रा करून) ठके, आ-

तां तर तुला काढून टाकूनच रहातां कामा नये कारण तूं मोठी चेटकी बायको आहेस. (चमत्कारात उद्गून) सदू, ये या थेरडे डंकिणीचे पाठीमागें हात बांधून इला चावडीवर घेऊन जा, आणि मी इची सगळी हकीकत एका कागदावर लिहून देतों ती नेऊन तेथल्या अमलदारापाशीं दे.

हिराबाई—मामाजी, इला आतां खरोखरच पश्चाताप झाला आहे असें इचे मुखचर्येवरून वाटतें, म्हणून आतां इला चावडीवर पाठवूं नका आणि एकवेळ इला क्षमा करा.

असें म्हणून ठकीला तेथून निघून जाण्याविषयीं हळूच खूण केली व आपणही तिचे मागें तिला दारापर्यंत चार पावलें पोंचविण्यास गेली. या रीतीनें ठकी आपले दुर्दैवानेंच या भाग्यशालीघरास टाकून निघाली ती नीट आपले मुलीचे घरीं जाऊन पोंचली. तेथें गेल्यावर तिची ती दुःखी व उदास मुद्रा पाहून तिचे मुलीस फार दुःख वाटलें आणि तिनें तिचे गळ्यास मिठी मारून म्हटलें, "आई मी तुला नव्हतें का सांगितलें कीं अशी लूट तूं करूं नको; ही कामाची नाहीं. कारण सगळेच दिवस सारखे असतात असें नाहीं. ती कधींना कधीं तरी बाहेर पडावयाचीच. पहिल्यापासून लोकांनींही तुला पुष्कळ सांगितलें, पण त्यांचें तूं ऐकलें नाहींस, आणि आपलें तेंच खरें करून आपल्या हातें आपला नाश करून घेतलास. जशी करणी तशी भरणी. आतां देवाजवळ माझें इतकेंच मागणें आहे कीं दुसऱ्या एकाद्या खटल्यांत तुला विन भाड्याचें घर न मिळो. आतां येवढी तरी कृपा कर कीं; माझे येथें राहून माझे नांवास काळींमा आणूं नको. तुझे राहण्यानें मला सासू सासऱ्याचा जाच फार होईल म्हणून जेथें तुला ईश्वर

वाट दाखवील तिकडे तूं चालती हो. माझे येथें राहून आतां तुझा निभाव लागणार नाहीं. दागदागिन्यांवर मी तर पाणी सोडलें. मेले दैवांत असतील तर पुन्हां मिळतील."

सारांश हिराबाईनें आपल्या शत्रूस काढून टाकण्याचे कांत अशा युक्तीनें एकदांचा जय मिळविला व सर्व घराचारास या अबदसेच्या जाचांतून सोडविलें. जेव्हां हिराबाईचे मनाजोगी गोष्ट झाली तेव्हां तिनें पुन्हां एकवेळ बापाचे येथें जाण्याची आज्ञा मागून मोठ्या खुषीनें माहेरीं गेली, आणि सुमारें एक आठवडाभर तेथें राहून हा सर्व प्रकार आपले बापाचे कानावर घातला आणि ज्या ज्या गोष्टींत बापाची सल्ला मसलत घ्यावयाची ती ती घेऊन सासरीं निघून आली. तेथें आल्यावर सासू चूल फुंकीत आहे असें पाहून ह्मणते:—

हिराबाई सासुबाई, तुम्हीच का चूल फुंकीत आहां? अजूनपर्यंत कोणी मोलकरीण मिळाली नाहीं वाटतें!

सासू—अग, कामाला राहण्यासाठीं पुष्कळ बायकाये ऊन येऊन जातात परंतु त्यांचा पगार ऐकून माझी छाती दडपून जाते. मेली ठकी कशीही असो पण दरमहा पोटास घालून आठ आण्यांवर तिनें आमचे इथें पंचवीस वर्षे काढलीं. आणि आतां जी मोलकरीण येते ती जेऊन दोन रुपये मागते. यापेक्षां कोणी कमती मागेल तर हराम.

हिराबाई—सासुबाई, माझे पहाण्यांतही एक मोलकरीण आहे पण ती देखील पगार जास्त मागते. आपणास सगुणा माहित असेलच तिची धाकटी बहीण सुमार्गी ह्मणून आहे तिला कीं नाहीं रांधपकामाची व शिवणकामाचीही बरीच माहिती आहे. एकदां सगुणा मला बोलली होती कीं,

एकादें चांगलें घर मिळेल तर तेथें सुमार्गी चाकरीला राहायाला राजी आहे.

सासू—बरें ती काय दरमहा घेईल?

हिराबाई—सासुबाई, ती जेऊनखाऊन तीन रुपये घेईन असें एकदां म्हणाली होती पण समजून सांगितलें असतां कदाचित दोन रुपयांस राजी होईल.

सासू—जेऊनखाऊन जर दोन रुपयेच द्यावे लागतील तर आपल्या शेजारची हैबती माळ्याची बायको म्हणजे आपले साळूची आई कालपासून येऊन येऊन माझे पायां पडून जाते तर तिला ठेऊं म्हणजे झालें.

हिराबाई—सासुबाई, खरें म्हणाल तर साळूचे आईला दरमहा चार आण्यांवरही मी ठेवणार नाहीं.

सासू—असें कां? ती काय वाईट आहे?

हिराबाई—वाईट तर नाहीं, पण शेजारचे माणसांची नेहमी बारीक नजर असते आणि शेजारीं घर असलें म्हणजे मग वारंवार जात येत असायची यामुळें एखादी वस्तू न्याव्हीशी वाटली तर ती तिला सहज घेऊन जाता येईल. इतकें असून रात्रीचे प्रहरीं घर जवळ आहे म्हणून तेथेंच बहुधा ती निजावयास जाईल.

सासू—बरें, धोंड्याचे बायकोनें आपली मुलगी सटवाय इजविषयीं मला पुष्कळ वेळां सांगून ठेविलें आहे. आणि सटवाय तर हल्लीं रास्त्यांचे वाड्यांत राहते.

हिराबाई—सासुबाई, जी नटून थटून येत असते तीच कीं नाहीं सटवाय!

सासू—नटूनथटून कसची, नुकें लग्न झालें आहे म्हणून दोन दिवस जरा चोळी लुगड्याची हौस आहे.

हिराबाई—सासुबाई, असलें फुलजी माणूसही ठेवून आपल्या कामाचें नाहीं.

सासू—बरें ती मनाला येत नाहीं तर खुद्द सटवायची आईही रहायाला राजी आहे तिचें कसें ?

हिराबाई—तिला तर लहान मुलीचें एक शेपूट लागलेलें आहे. ती मुलगी तर तिला पाय परतायला देत नाहीं हें आपण पाहिलें असाल, आणि असें असून नांव तर जेवायास एक माणसाचें होणार व इकडे पाहिजे तर आईलेक अशीं दोन माणसें असायचीं. लेंकरूं झालें ह्मणून ह्यास खर्च थोडाका लागतो?

सासू—आतां या शिवाय दुसरें माणूस तर कोणी माझे लक्षांत नाहीं.

हिराबाई—बरें सासुबाई, कोठें नाहींच मिळत तर मी त्या सुमार्गीला बलावून पहात्यें.

सासू—पण तिचे पगाराचें कसें होईल?

हिराबाई— सासुबाई, विश्वासू माणूस पाहिजे तर कमी पगारावर मिळणें कठीण. अशा माणसास दोहोंच्या ठिकाणीं तीन द्यावे लागले तर ते पत्करतील पण ठकीसारख्यास आठ आणे देऊन घर लुटण्यास लावणें ठीक नाहीं.

असो. त्या दिवशीं स्वयंपाक सासू सुनेनें मिळून केला. जेवण आटोपल्यावर हिराबाई शांतेस घेऊन माडीवर गेली. जों पर्यंत माधवराव घरांत असत तोंपर्यंत हिराबाई ही माडीवरून फारकरून खालीं उतरत नसे. मात्र सकाळ व सांज काय ती जेवण करण्यापुरती खालीं येत असे व शांतेसही तिनें वारंवार खालीं न जाण्याविषयीं सांगून ठेवलें होतें. पण शांताबाई जात्या मूल असल्यामुळें तिनें

कां जाऊं नको ह्मणून उलट प्रश्न केला तेव्हां हिराबाईनें ह्मटलें कीं, " शांते, वडिलांचे समोर वारंवार जाण्यायेण्यानें त्यांची भीड मर्यादा राहात नाहीं " इकडे माधवरावांचें जेवण आटोपल्यावर दोघां नवरा बायकोंत घर खर्चाबद्दल बोलणें चाललें होतें. माधवरावांचे बायकोचें ह्मणणें होतें कीं तुह्मी घर खर्चास जो पैसा पाठवितां तो फार थोडा असतो व मला तर इकडे दोघां मुलांचीं लग्नें केल्यापासून सोयरे धायरे व इष्ट मित्र यांस द्यावें लागतें. शिवाय वर्षाचे सणवार करावे लागतात. यामुळें कांहीं तरी अधिक खर्चास पाठवाल तर बरें होईल.

माधवराव—अग, मी तर पाहूं गेलें असतां सरासरी दरमहा पंचवीस रुपये पाठवितों ते काय पुण्यासारख्या ठिकाणीं थोडे नाहींत पण तुझा कारभारच अव्यवस्थित त्यामुळें खर्च पुरा पडत नाहीं त्यास मी काय करूं? असें ह्मणून माधवरावांनीं शांतेस हाक मारून सांगितलें कीं "जा तुझे वहिनीला बलाऊन आण."

शांताबाई—(माडीवर जाऊन) वहिनी, तुला बाबा खालीं बलावीत आहेत.

हिराबाई—(खोडीशी घाबरून)कांग शांते, काय काम आहे?

शांताबाई- वहिनी,तें कांहीं बाबानें मला सांगितलें नाहीं.

हिराबाई—बरें; शांते, खालीं काय चाललें आहे तें तर सांगशील.

शांताबाई- कसलें खर्चाचें कींकाय भांडण चाललें आहे.

हिराबाई—बरें, चल तर. (असें ह्मणून माधवराव बसले होते तेथें आली.)

माधवराव–(हिराबाईला पाहून) कसें काय मुली, ये इकडे, जरा अशी बस. वरें आतां घरचा कारभार चालवावयाचा कोण पत्करं घेतो.

हिराबाई– मामाजी, असला प्रश्न विचारण्याचा काय हेतू? जसें सासुबाई आजपर्यंत सर्व कांहीं चालवीत आल्या तसें त्याच चालवितील ह्मणजे झालें.

माधवराव–इचा कारभार पुरे आतां सर्व कांहीं कळून आला. ज्या घरीं दरमहा पंचवीस रुपये येत असतात त्याची हीं स्थिति. घरांत ह्मणण्यासारखें एखादें भांडें नाहीं किं एखादी योग्यते प्रमाणें वस्तू नाहीं, ह्या वेळीं जर कोणी प्यालाभर चहा मागितला तर त्याचें साहित्य सुद्धां मिळण्याची मारामार मग दुसरें एकीकडेस राहो.

हिराबाई–खरें ह्मणाल तर सासुबाईचा यांत कांहीं अपराध नाहीं. अवदसे ठकीनें हा येवढा घराचा मातेरा करून टाकला आहे.

माधवराव–पण हिच्यांतच घर संसार चालविण्याची अक्कल असती तर ठकीची असें करण्याची काय प्राज्ञा होती? ठकी कशी झाली तरी तीन दमड्यांची चाकर होती. तिनें इच्यावर शेखी कशी मिरवावी?

हिराबाई–मामाजी, आपले वेळेपासून आज नाहीं तर चोवीस पंचवीस वर्षांचें जुनें माणूस जर लुटूं लागलें तर घरांतील मनुष्यांस तें कसें कळणार? असल्या जुन्या माणसाविषयीं तर कोणत्याही प्रकारें संशय घेतां येत नाहीं.

माधवराव–जुनें माणूस असलें ह्मणून काय झालें? शेवटीं तुला नव्या माणसाला तिजविषयीं संशय आला कीं नाहीं, आणि तो कसा?

हिराबाई—मला तरी कोठून संशय आला असता? मामाजी, "विनाशकाले विपरीत बुद्धि" म्हणें तें त्यांचें दुर्दैव कीं तिणें घरांतल्या घरांत चहाड्यो सांगून ह्म असा आपला नाश करून घेतला.

हिराबाईची सासू—(मध्येंच) अहो, इतकी भान-गड पाहिजे कशास? शंभर पऱ्यांच्या पगारांतून तुमचे एकट्याचे जीवाकरितां मात्र तुम्हीं पाऊणशें रुपये ठेवावे, आणि आम्हां इतक्याजणांस अवघे पंचवीस रुपये पाठऊन देतां ते पुरवतील तरी कसे?

माधवराव—घरांतला खर्च आणि बाहेरील खर्च काय बरोबर होतो! तूं मला एकटा समजतोस पण घोडा, चाकर, कपडा लत्ता यांचा खर्च कुठे गेला? आणि तशांतही कांहीं मागला विचार पाहिला पाहिजेना?

हिरा० ची सासू—घोडा, चाकर, तर सरकारांतून मिळत असतो; त्यांस खर्च कसचा?

माधवराव—घोडा मिळाला ह्मणजे झालें त्यास दाणा पाणी कांहीं नको? तें मला आपल्या पदरचें द्यावें लागतें शिवाय त्या घोड्याची चाकरी व घरदार साफसूफ ठेवणारास दरमहा दहा रुपये द्यावे लागतात. त्या उपरांत सरकारदरबार होय नव्हे असें कांहींना कांहीं आहेच तेव्हां आपले माना सारखें राहण्यास हजार पंचायती आहेत. मी कोणत्या रीतीनें आपले दिवस काढतों तें एक-ह्या परमेश्वरासच ठाऊक, तें तुह्मांस सांगून काय फळ?

हिराबाई—(सासूकडे वळून) सासुबाई, आतां उगाच वाद करून काय फळ? जे पंचवीस रुपये आपणांस मिळतात तीच आपणावर ईश्वराची दया समजावी. नाहींतर हल्लीं-

चा वेळ किती कठीण आहे हें आपण जाणतच आहां. परमेश्वरानें मामाजींचे कमाईला बरकत द्यावी ह्मणजे झालें.

साळू–पण माझ्यानें तर पंचवीस रुपयांत घरसंसार चालवणार नाहीं मग बाई तुझ्यानें चालवेल तर पहा.

हिराबाई–मेरें. मामाजी तुमचे मर्जीप्रमाणेंच कां होईना ! पाहिजे असल्यास पंचवीस रुपयांतूनही आणखी दोन रुपये कमती करा पण जे रुपये पाठवाल ते मात्र महिन्याचे महिन्याला मुदतशीर पाठवा. मुदतशीर रुपये नसले ह्मणजे अर्थात कर्ज काढावें लागतें आणि मग त्याची फेड करतेवेळीं अशा भानगडी उपस्थित होतात.

माधवराव–होय मुली; तूं ह्मणत्येस तेंही खरें, पण या मराठी राज्यांत ही एक मोठी वाईट चाल आहे कीं पगार वेळचे वेळेवर मिळत नाहीं कधीं कधीं तर साहा महिने सुद्धां होऊन जातात यामुळें वेळेवर पाठविण्यास होत नाहीं. असें आहे तरी मी कसेंही करून तुह्मांस महिन्याचे महिन्यास पंचवीस रुपये द्यावयास तिलकचंदास सांगून जाईन.

हिराबाई–मामाजी, त्यास तर व्याज द्यावें लागेल मग हांशील तें कोणतें ?

माधवराव–नाहीं, तो मजजवळून व्याज घेणार नाहीं; कारण कीं आमचे सरकारांत त्याचें नेहमीचें घेणें देणें आहे तेव्हां तिकडूनच हुकूम पाठवीन ह्मणजे झालें.

हिराबाई–मामाजी, असें होईल तर फारच चांगलें.

माधवराव–तर मग हिरे तूं आजपासून घर संसार चालविण्यांचे कामाचा पत्कर घेतलाना ? मला पूर्ण खात्री आहे कीं आतां माझे घरांत लक्ष्मी वास करील.

आपल्या मर्जीप्रमाणें मुलीचें शिकणें येथें होत नाहीं असें जर वाटत असेल तर आपण बेलाशक मुलीस घेऊन चालत्या व्हा. पण हकनाक माझ्या शाळेच्या नांवानें ओरडूं नका. बरें बाई, आपणास मी हें विचारतें कीं आपली मुलगी नंबर १ चे शाळेंत किती दिवस शिकत होती व येथें येण्यापूर्वी काय काय शिकली होती हें कृपा करून सांगाल तर बरें पडेल.

अन्नपूर्णाबाई—तेथें तर सरासरी तीन महिने गेली असावी पण तेवढ्या मुदतींत सर्व मूळाक्षरें शिकून अर्ध्या बाराखड्याही संपत आल्या होत्या. शिवाय फाटलेंतुटलेलें कापड तांगडून देण्यासही तिला येत असे.

हिराबाई— बरें, तिला इकडे येऊं लागल्यास किती दिवस झाले असतील?

अन्नपूर्णाबाई—तें मला काय विचारतां मास्तरीणबाई? त्याची मजपेक्षां आपल्यास चांगली आठवण असेल; तर आपणच सांगा बरें किती दिवस झाले ते.

हिराबाई—ज्येष्ठ महिन्याचे आरंभींच ती आली व सध्यां श्रावण चालला आहे. पौर्णिमेस अजून चार दिवस बाकी अहित म्हणजे गंगूला येऊन अडीच महिने पुरे होतील. येवढ्या मुदतींत तिनें सर्व बाराखड्या संपवून थोडेंबहुत पुस्तकावरून वाचावयास लागली आहे. पूर्वी तिला वीस अंकही बरोबर मोजतां येत नसत ते आतां सर्व अंक शिकून पंधरांचा फाढा चालला आहे. शिवाय इतके दिवस पांढऱ्यावर काळें कसें करावें हें तिचे स्वप्नीं सुद्धां नव्हतें तींच आतां कागदावर वेडीं वांकडीं अक्षरें काढूं लागली आहे. तीं अक्षरें तिचे योग्यतेप्रमाणें पाहिलीं असतां पुष्कळ-

अंशीं चांगलीं आहेत. शिवण्याविषयीं ह्मणाल तर फार लांब जावयास नको. कोणग आहे तेथें, यमुने, जा त्या शेवटल्या खणांत गंगूनें टीप घालून तयार केलेली चोळी व लोंकरीचे विणलेले पायमोजे आहेत ते यांला आणून दाखीव बरें.

गंगू– मास्तरीणबाई, तें मीच जाऊन आणतें.

असें ह्मणून धांवत जाऊन आपण भरलेला काशिदा आणून हिराबाईपाशीं दिला. अन्नपूर्णाबाई एका गोष्टीस सत्रा जबाब मिळतातसें पाहून तोंडांत मारल्यासारखी होऊन गुपचूप बसली.

हिराबाई– (नमुनें आणलेले दाखवून) पहा बाई, हातचे कांकणास आरसा नको. अडीच महिन्यांत तुमची मुलगी याहून अधिक तें काय शिकणार?

अन्नपूर्णाबाई हें पाहून इतकी लज्जायमान झाली कीं तिचे आंगांतून दरदरून घामाच्या धारा सुटल्या, व मान वर करून तोंडावाटे चकार शब्दही तिच्यानें काढवेना. अन्नपूर्णाबाई आल्यानें शांताबाईची कहाणी एकीकडेसच राहून सर्व मुली अन्नपूर्णाबाईचे भोंवतीं मिळून तिचे तोंडाकडेसच टकमक पाहूं लागल्या.

अन्नपूर्णाबाई–मास्तरीणबाई, ही इतकी शिकली आहे हें मला काय बरें माहीत? ती सारा दिवस इकडेसच असते व रात्रीं इतका उशीर करून घरीं येते कीं जेवली ह्मणजे आपली तिची बिछान्याकडची वाट. यामुळें मला इची विचारपूस करण्यास वेळ मिळत नाहीं. माझें येणें इकडे फार नाहीं तरी दाहा पांचदां झालें असेल पण त्यावेळीं कधीं तिला बाहुल्या खेळतां, कधीं चूल फुंकीत असतां, आणि कधीं कहाण्या ऐकतांही पाहिलें होतें असें मला आठवतें.

त्यावरून मला संशय येण्यास कारण झालें व मी मनांत समजलें कीं ह्या मुली आपला सर्व वेळ अशाच खेळण्याबागडण्यांत घालवीत असतील. आतां तोंडातून एक वेळ गोष्ट निघून गेली ती गेली. त्याबद्दल मला आपण आतां क्षमा करा इतकें पदर पसरून आपलेजवळ माझें मागणें आहे.

हिराबाई—खरें आहे. आपणास संशय येण्यास तें सबळ कारण होतें. पण मी यांस अशा मौजेच्या गोष्टींनींच कित्येक कामाच्या गोष्टींची माहिती करून देत्यें. शिवाय सूपशास्त्राचे नियमास अनुसरून यांजकडून कधींकधीं रांधप कामही करून घेण्यांत येत असतें, यामुळें मसाल्याचा अदमास, मिठाचें प्रमाण, पदार्थाची रुचि व भांड्यांचें प्रमाण हें त्यांच्या लक्षांत चांगलें बिंबतें. कसें काय गंगू, गेल्या मंगळवारीं मंगळागौरी निमित्य तुम्हीं कोणतें पक्वान्न केलें होतें व त्यास खर्च किती लागला आणि तें कसकसें तयार केलें याची सर्व माहिती सांग पाहूं.

गंगू—मास्तरीणबाई, कालच्या मंगळागौरीस आम्हीं मृदुवल्या केल्या होत्या. त्यांस जो खर्च आला त्याचा तपशीलवार हिशेब शांताबाईनें आपल्या वहींत टांचून ठेवला आहे. मला तो बरोबर सांगतां येणार नाहीं. पण त्या करण्याचा प्रकार तुमचे सांगण्याप्रमाणें केलेला मी लक्ष्यपूर्वक पाहिलेला आहे व तो माझे मनांत पूर्णपणें बिंबलेलाही आहे. तो आपण विचाराल तर सांगतें.

हिराबाई—बरें तेवढाच सांग. तुझे मनांत कसा काय तो बिंबला आहे तो तरी पाहूं.

गंगू—मास्तरीणबाई, पहिल्यानें बाजारांतून एक शेर तांदूळ मागविले आणि त्यांतील कण्या पाकड काढून

चाळीस रुपये भार वजन करून घेतले आणि राहिलेल्या कण्या वगैरे सर्व वाण्याचे हवालीं केलें. नंतर थोडा वेळ भिजत घालून व स्वच्छ धुऊन रोवळींत घालून त्याचें पाणी चांगलें गळूं दिलें. नंतर ते तांदूळ जांत्यांत घालून चांगले दळून तें पीठ वस्त्रगाळ केलें. मग दोन नारळ आणले होते ते फोडून खवसले व दूध काढून ठेविलें. नंतर ऐशीं रुपये भार साखर, एक रुपया भार मीठ, व तितकीच वेलदोडयांची पूड असे तिन्ही पदार्थ वस्त्रगाळ केलेल्या पिठांत घालून, नारळाच्या दुधानें तें पीठ कालवून पळीनें वाढतां येई इतकें पातळ केलें. मग पातेल्याच्या अर्ध भागा इतकें त्यांत पाणी घालून त्या पातेल्याच्या तोंडास फडकें बांधलें आणि त्यावर झांकण वेताचें बसेल अशी एक ताटली घेऊन शिवाय दुसऱ्या दोन लहानशा ताटल्या घेतल्या. पहिल्यानें एका ताटलीला आंतून लोणी चोळून त्यांत सुमार दोन पळ्या तयार केलेलें पीठ घालून, ती पातेल्यास बांधलेल्या फडक्यावर ठेवून त्यावर झांकण ठेविलें व खालीं मंदाग्नि केला. ताटलींतील पदार्थ शिजतांच इकडे एका परातींत बोट बुडे इतकें पाणी घालून ठेविलें होतें त्यांत ती ताटली ठेविली. दुसरी ताटली पहिलीप्रमाणें तयार करून ठेविली. इकडे पाण्यांतील ताटली चांगली निवून मृदुवल्या पक्व झाल्यावर त्याच्या चौकोनी वड्या सुरीनें कापून काढल्या.

हिराबाई—वहावा; गंगू, मृदुवल्या करण्याचा प्रकार तर तुझे मनांत चांगल्या रीतीनें बिंबला असें वाटतें. पण पीठ वस्त्रगाळ करतेवेळीं भरड पुंडकळ मागें राहिली असें माझे पहाण्यांत आलें होतें त्यावरून मला वाटतें कीं

तुम्हीं तांदूळ चांगल्या रीतीनें दळले नसावेत. (अन्नपूर्णाबाई-कडेस वळून) कसें काय बाई, आपल्या मुलीनें मृदुवल्यांचा प्रकार कसा चांगल्या रीतीनें सांगितला तो ऐकलाना ? हा सूपशास्त्र शिकविल्याचा फायदा बरें! बाळे शांते, तूं मृदुवल्यांस झालेल्या खर्चाचा हिशेब सांग बरें.

शांताबाई—(टेबलाचे खणातून वही काढून) वैनी, रुपयाचे सहा शेर तांदूळ या मानानें एक शेरास अडीच आणे दोन पै पडल्या, व ऐशीं रुपये भार साखर ह्मणजे सरासरी शेर झाली तिचे सव्वाचार आणे, व पांच पैशांप्रमाणें दोन नारळांचे अडीच आणें झाले. शिवाय अर्ध आण्याची वेलची, व अर्ध आण्याचें लोणी व एक पैशाचें मीठ मिळून साडेदाहा आणे दोन पै झाल्या. त्यांतून मीठ थोडेंसें शिल्लक आहे. आह्मी सर्व मिळून दहा मुलींनीं ही वर्गणी काढली होती. तींत माझे स्वतांचे पावणेदोन आणे होते. त्याप्रमाणें एक गंगू, दुसरी वेणू, तिसरी प्रेमिला, चौथी यमुना, पांचवी सरस्वती, सहावी गोदावरी, सातवी नर्मदा, आणि कावेरी व तिची दुसरी वहीण मिळून एकंदर नऊजणींत वाकीचे पैसे जमले होते.

हिराबाई—हिशेब तर तूं बरोबर सांगितलास पण यांत कोठें कांहीं एकादी चूक राहिली नाहींना ? अंमळ विचार करून पहा.

शांताबाई—(थोडा वेळ विचार करून) होय वैनी होय, चूक आहे खरी. वाण्याकडून शेर तांदूळ आणले त्यांतून कण्या वगैरे काढलेले त्याला परत केले त्या ऐवजीं दुसरे तांदूळ त्याचे जवळून घ्यावयाचे होते किंवा त्याबद्दल एक दोन पैसे तरी त्याणें परत करायाचे होते. अरेरे ! तेवढ्यांत विलायची व

मिठाचा खर्च सहज आटोपला असता. सुमार्गे, जा गडे स्या वाण्याच्या येथें जाऊन कण्या किंवा त्याबद्दल तो कांहीं पैसे देईल तर घेऊन ये.

हिराबाई—सुमार्गे, तूं आतां जाऊं नको; "हातचें सोडा आणि पळत्याचे पाठी लागा" तसें आतां होणार. त्याचा निकाल त्याच दिवशीं केला असता ह्मणजे झालें असतें कीं नाहीं? नांवाचे वाणी ते, ते का आतां तुला दाद देणार? उगाच तोंडास तोंड मात्र होईल. शांते, तूं आपले चुकी-बद्दल हा एवढा दंड भर. (नंतर प्रेमिलेकडे वळून) प्रेमिलाबाई, मृदुवल्यांस खर्च किती झाला व त्या कोणत्या प्रकारें के-ल्या हें आपण पाहिलें व आतां ऐकिलें पण आतां मृदुवल्यांच्या ताटल्या किती झाल्या व त्यांची कसकशी व्यवस्था केली हें आतां तूं सांग.

प्रेमिलाबाई—मास्तरीणबाई, एकंदर पांच ताटल्या झा-ल्या, त्या प्रत्येकीच्य सात सात वड्या कापल्या या हिशोबानें एकंदर सर्व मिळून पस्तीस वड्या व आह्मी सर्वजणी मिळून स्या दिवशीं पंचवीस मुली शाळेंत हजर होतों. पैकीं ज्या मुली विवाहीत असून ज्यांच्या मंगळागौरी होत्या अशा आठ जणींस दोन दोन वड्या वाढल्या व बाकी राहिलेल्या सोळाजणींस एक एक व शेवटीं तीन वड्या एका ताट-लींत होत्या तीवर मी वसलें !

हिराबाई— (हांसून) वः, तर मग तूं इतरांच्या दुप्पट तिप्पट खाल्लेंस असें झालें.

प्रेमिलाबाई—नाहीं; मास्तरीणबाई, माझे ताटलींतल्या वड्या एका बाजूकडच्या असून त्या अगदीं लहान लहान होत्या, कोणाला विचारा पाहिजे तर.

हिराबाई– (हासून) असें होतें तर त्याच ताटलीवर तूं कां बसलीस ?

प्रेमिलाबाई– मास्तरीणबाई, मी सर्वांचे मागून आलें होतें व सर्वजणी आपापल्या ताटलीवर बसलेल्या असून तीच ताटली काय ती त्या वेळीं रिकामी होती म्हणून तिजवरच जाऊन मला बसणें भाग पडलें. त्या वड्या तरी मास्तरीणबाई, मी एकटीनें खालल्या नाहींत. मागाहून माझा लहानगा भाऊ श्रीनिवास आला त्यास त्यांतील एक वडी दुसऱ्या ताटलींत घालून दिली.

हिराबाई– दुसरी ताटली म्हणजे, दुसऱ्या ताटलींत कां दिलीस आपल्याच पुढ्यांत त्यास कां घेतलें नाहींस ?

वेणू– मास्तरीणबाई, इला कोणाचेंही उष्टें खाण्याचा फार किळस वाटतो.

प्रेमिलाबाई–नाहीं;मास्तरीणबाई, मी अशा अर्थानें त्यास निराळें बसविलें असें नाहीं; पण एक ताटली जवळच रिकामी पडली होती असें पाहून त्यास निराळें दिलें. निराळें देण्याचा दुसरा कांहीं हेतू नव्हता.

वेणू–हां, मास्तरीणबाई असें नव्हे. मघां तूं माझें उष्टें पाणी पीत नव्हतीस का ?

प्रेमिलाबाई– वः, तें आणि हें उष्टें सारखेंच का ? तो कसा झाला तरी नेणता असून माझा भाऊच आहे. पहा हो मास्तरीणबाई, मघाशीं इला सांगितलें कीं तुला तहान लागेल तेवढेंच पाणी तूं पंचपात्रींतून घे, उष्टें पाणी पंचपात्रींत ठेवणें फार वाईट आहे. जेव्हां पहावी तेव्हां ही अशीच आपली कांहींना कांहीं दांडगेपणा करते. मला नाहींबा हा दांडगेपणा सोसायचा.

हिराबाई- बरें तें असूं दे, फार चावटपणा कामाचा नाहीं, आणि वेणू तूं पुन्हा असें करूं नको. प्रेमिले, त्या दिवशीं गोंधळेकरानें केलेलें " सूपशास्त्रा " चें पुस्तक जें मीं तुह्मांस दिलें होतें त्यांतून सर्व जातींचा स्वयंपाक तुह्मीं केला आहां काय ?

शांताबाई- (अंमळ विचार करून) मी आपल्या मनांत तर सर्व शिजवून चुकलें आहें आणि बहुतेक पक्कान्नें दुसऱ्यांनीं करते वेळीं व कित्येक स्वतः करूनही पाहिलेलीं आहेत. येथें जितक्या मुली येतात त्यांतून मोठ्या मुलींस तर साधारण नेहमीच्या स्वयंपाक कामाची माहिती आहेच शिवाय हरएक प्रकारची शाखभाजी, चटणी, कोशिंबिरीं, भजीं व तरतऱ्हेचें मिष्टान्न जसें पुरणपोळी, साखरपुरी, साखरभात, केशरी भात, अनारसे, जिलब्या, लाडू, मांडे, घीवर, श्रीखंड, बासुंदी, पुऱ्या, इत्यादि; हे सर्व प्रकार वारंवार करून चुकल्या आहेत आणि सर्व मुलींनीं ते करते वेळीं पाहिलेंही आहे. आणि वैनी, आपण ह्मणतां कीं शाळेंत येणाऱ्या मुलींस स्वयंपाकाची थोडीशी माहिती व्हावी ह्मणूनच हा थोड्या खर्चांत होणारा अल्पसा यत्न आहे. पण माझे मतें हा लहानसहान यत्न नसून यापासून स्वयंपाक कामाची पूर्णपणें माहिती होते, इतकेंच नव्हे, तर किंबहुना तो स्वयंपाक एका लहान्या कुटुंबास पुरेल इतका होत असतो. आमचे प्रेमिलाबाईस तर चटण्या कोशिंबिरींची फारच आवड, मला वाटतें कीं चटण्या कोशिंबिरी करण्याची हातोटी सर्वांपेक्षां तीसच चांगली साधून गेलेली आहे.

हिराबाई- (अन्नपूर्णाबाईस) कसें काय बाई ऐकलेंना,

ह्मणाल तर तुमच्या बाहुल्यांचीं चोळ्यालुगडीं चांगलींशीं रंगवलेलीं आहेत असें दिसण्यांत येत नाहीं. यावरून कदाचित तुह्मांस तीं चांगलीं रंगवितां येत नसतील असें दिसतें.

प्रेमिलाबाई—रंगाविषयींची तर मला शांताबाईनें "उपयुक्त चमत्कार संग्रह", "व्यवहारदर्पण" व दुसऱ्या कित्येक पुस्तकांवरून चांगली माहिती करून दिली आहे. पण मी त्यांणीं सांगितलेल्या कृती प्रमाणें रंगविलें नाहीं. हें मी आपले अक्कलेनें रंग तयार करून त्यांत रंगवून कसें निघतें हें पाहिलें, पण आपण ह्मणतां हें खरें; हा रंग मला चांगलासा साधला नाहीं.

हिराबाई—बरें, शांताबाईनें रंगाविषयींची आपणांस कसकशी समजूत दिली आहे हें तर सांगा पाहूं.

प्रेमिलाबाई—प्रथमतः कोणत्याही पदार्थास शोभा आणण्याला रंगासारखें दुसरें कोणतेंही साधन नाहीं. असा हा एक रंगाचा गुण प्रसिद्ध आहे. परंतु ह्या खेरीज दुसरा एक गुण रंगाचे अंगीं आहे तो असा कीं कांहीं कांहीं रंगांचे आंगीं उष्णतेचे किरण टाकण्याची शक्ती कमी असते व कांहीं कांहींचे आंगीं तीच शक्ती जास्त असते त्यामुळें रंगविलेल्या वस्त्रादिक पदार्थांचे आंगीं त्या त्या रंगाप्रमाणें ऊब जास्त किंवा कमी असते. ह्मणून ऋतूप्रमाणें त्या त्या रंगाची योजना केली असतां ते अधिक दिवस टिकून त्यापासून शोभा व कांहीं अंशीं शरीरास समाधानही प्राप्त होतें. जसें वर्षाऋतूंत ह्मणजे पर्जन्याचे दिवसांत वापरण्यास रंग गुलाबी, कुसुंबी, केशरी, नारिंगी, खरबुजी, काळा इत्यादि; हेमंतऋतूंत ह्मणजे हिंवाळ्याचे दिवसांत तोलिया, आबाशाई, जांबळा, काळा, अस्मानी, निळा, कंदी,

पिवळा, इत्यादि. ग्रीष्मऋतूंत ह्मणजे उन्हाळ्यांत प्याजी, कापशी, बदामी, सिंदुरी, कपिला, लिंबोळी, हिरवा, पारवा, इत्यादि. ह्या शिवाय अनेक प्रकारचे रंग असतात, पण मी तर तेच सांगितले कीं जे नेहमी लोकांच्या वापरण्यांत येत असून त्यां पैकीं बहुतेक मला स्वतः देतां येतात.

हिराबाई—बरें, हे जे आपण भाराभर रंग सांगितले ते तयार करून त्या एकाचीच योजना सर्व जातीच्चे कापडावर किंवा पदार्थांवर करितां येते किंवा कसें?

प्रेमिलाबाई—मास्तरीणबाई, तसें नाहीं. सर्व पदार्थांचे आंगीं सर्व द्रव्याचे रंग घेण्याची शक्ति नसते, ह्याकरितां एके जातीच्या पदार्थांस ज्या द्रव्याचा रंग बसतो त्याच द्रव्याचा रंग सर्व जातीचे पदार्थांस बसतो असें नाहीं. कदाचित् बसलाच तर तो चांगलासा खुलत नाहीं. ह्याच कारणामुळें सुतास रंग देण्याचीं द्रव्यें निराळीं, रेशमास रंग देण्याचीं निराळीं, लोंकरीस रंग देण्याचीं निराळीं, अशी रंगांच्या द्रव्यांविषयीं निराळी योजना करावी लागते.

हिराबाई—बरें, तूर्त थंडीचे दिवस आहेत व या दिवसांत चोरहळद विपूल मिळते तेव्हां पिंवळा रंग करावयाचा झाला तर तो कसा करावा?

प्रेमिलाबाई—मास्तरीणबाई, पहिल्यानें चोरहळद आणून ती पाण्यांत भिजत घालावी नंतर चांगली भिजली ह्मणजे ती काढून बारीक वांटावी आणि तींत शेरास छटाक ह्या प्रमाणानें तुरटी घालून रंग तयार करावा. आणि त्यांत दोन तीन वेळ वस्त्र रंगवून शेवटीं लिंबाच्या किंवा चिंचेच्या रसांत भिजवावें ह्मणजे लिंबोळी रंगाचें होतें व

तेंच लिंबोळी रंगाचें वस्त्र एक शेर हळद व छटाक कुसुंबा मिश्र करून तयार केलेल्या रंगानें रंगविलें असतां उत्तम पिंवळ्या रंगाचें होतें.

हिराबाई—बरें, तुरटी न मिळाली तर थोडे खर्चांत तिचेबद्दल कोणता जिन्नस घातला असतां चालण्यासारखा आहे?

प्रेमिला—मास्तरीणबाई, थोड्याच खर्चांत करावयाचा असेल तर तुरटीचे बद्दल चुना घातला असतां चालतो. ईश्वराचे दयेनें या वर्षीं चोरहळदीस अतिशयच पीक आलें आहे आणि यामुळें गांवांत पिंवळ्याच रंगानें रंगविलेलीं पातळें पुष्कळ नेसलेलीं दिसण्यांत येतात. पातळें तीं पातळें, पण चोरहळदीचा मिठाईसही फार चांगला रंग देतां येतो. माझे मोठे बहिणीनें परवाचे दिवशीं चोरहळदीचा रंग देऊन बर्फी पाठविली होती तिचा रंग केशरापेक्षांही फार चांगला उतरला होता.

हिराबाई— (घाबरल्यासारखी होऊन) प्रेमिले! तूं चोरहळदीनें रंगिवलेली मिठाई खाल्ली नाहींसना?

प्रेमिलाबाई—नाहींबा, मी नाहीं खाल्ली; पण मास्तरीणबाई, ती खाल्यापासून कांहीं अपाय आहे कीं काय!

हिराबाई— आपाय तर! कारण चोर हळदींत विषाचा अंश असतो बरें का. ह्मणून चोरहळदीनें रंगविलेली मिठाई न खाण्याविषयीं फार जपलें पाहिजे.

प्रेमिलाबाई—मास्तरीणबाई, मी तर चोरहळदीनें रंगविलेले तीळ, संक्रांतीस पुष्कळ खाल्ले होते.

हिराबाई—प्रेमिले, त्यास कांहीं चिंता नाहीं. कारण नखा इतक्या हळदीनें पुष्कळ तीळ रंगविलेले असतात

ह्मणून तुला त्यापासून कांहीं अपाय झाला नाहीं. पण तींत विषाचा अंश असतो हें खूप लक्षांत ठेव बरें.

प्रेमिलाबाई—बरें;मास्तरीणबाई, चोरहळदीनें रंगाविलेली मिठाई तर पुष्कळ लोक नेहमीं खातात पण त्यांस कधीं वीष बाधत नाहीं, हें कसें?

हिराबाई—प्रेमिले, खातात खरी, पण तसें खाणें हें फार धोक्याचें काम होय. कारण वीष जेव्हां त्यांचे शक्तीचे बाहेर होऊन जातें तेव्हां खचीत त्यापासून वाईट परिणाम होतो.

इतकें होत आहे तों संध्याकाळ झाली ह्मणून सर्व मुलींनीं आपलीं दप्तरें व पुस्तकें आटोपून जागचे जागीं ठेविलीं आणि नित्यक्रमाप्रमाणें कोणी खेळण्यास, कोणी गोष्टी व उखाणें सांगण्यास व ऐकण्यास जाऊन बसल्या.

हिराबाई—(अन्नपूर्णाबाईस) बाई, येथें कांहीं कोल्हाकुड्यांच्या कहाण्या सांगण्यांत येत नाहींत हो. पण गोष्टींचें एक पुस्तक आहे त्यांत फार मौजेच्या व उपदेशपर लहान लहान गोष्टी सांगितल्या आहेत आणि शेवटीं त्या गोष्टींचें तात्पर्य दिलें आहे. त्या पुस्तकाची भाषाही फार सोपी व सरळ आहे. आतां ह्या मुली त्या पुस्तकांतील गोष्टी ऐकून फार आनंद पावतील. काहाण्या सांगण्यानें यांस कसें बोलावें हें चांगल्या रीतीनें समजतें. आणि त्यांचा भावार्थ समजल्यानें त्यांचें शहाणपण वाढतें. मला जेव्हां जेव्हां ह्मणून वेळ मिळतो तेव्हां तेव्हां मीही यांच्यांत बसून त्यांस त्या गोष्टींचे संबंधानें अनेक प्रश्न विचारल्यें आणि मग ह्या त्यांची समजूत होते त्याप्रमाणें मला उत्तरें देतात.. दिलेलीं उत्तरें बरोबर नसलीं तर त्यासंबंधानें मी त्यांचीं

समजूत करून देतें. उखाण्यांचा उलगडा केल्यानें यांच्या ज्ञानाचा वाढ व बुद्धीचा विकास होतो. आतां आपण येथें बसून याची गम्मत पहा. मला जरा आज सरस्वतीचे आईनें उभ्या उभ्या भेटून जायास सांगितलें आहे ह्मणून मी तिकडे जाऱ्यें. तिचे मुलाचे जिवास बरें नाहीं ह्मणून पुष्कळ विनवणी करून तिणें सांगून पाठविलें आहे. न जावें तर तिला वाईट वाटेल, व माझे मनासही तें बरोबर दिसत नाहीं.

अन्नपूर्णाबाई—होय, मीही ऐकिलें आहे कीं आज कित्येक दिवस झाले तिचा मुलगा दूध ओढीत नाहीं. काय करील बिचारी! फार घाबरून गेली आहे. आज दाहा वर्षं मुलगा मुलगा करून एकदाचें पुत्रमुख पाहिलें पण तें हें असें. सरस्वतीचे पाठीवर हाच कायतो मुलगा वर्ष दीड वर्ष वांचला आहे. देवा, त्याला चिरायु कररे! मास्तरीणबाई, तुह्मांला तिणें औषध पाणी करण्याकरितां बोलाविलें असेल असें वाटतें.

हिराबाई—औषधपाणी तर बाई मला कांहीं माहीत नाहीं, पण मागें तो लहान असतां त्यास उन्हाळे झाले होते तेव्हां मी त्याला पांढऱ्या गुंजेच्या पाल्याच्या रसांत जिरें आणि साखर घालून द्यावयास सांगितलें होतें व देवदयेनें तें औषध दिल्यानें त्यास आराम पडला होता.

अन्नपूर्णाबाई—मास्तरीणबाई, यावरून तुह्मीं सर्व गुणांत पुऱ्या आहां असें वाटतें. काय तरी बाई आपण एक अमोलीक रत्नच आहांत.

हिराबाई—यांत गुणते कस्सचे? माझे माहेरीं औषधापाण्याचा फार राबता आहे. जेव्हां मी लहान होतें तेव्हां

जें औषध घरांत येत असे तें मी चटकन चाळून व नीट नेटकें करून ठेवीत असें ह्मणून मला पाहूनसवरून कुठें दोन चार औषधें माहित अहेत. शिवाय मजजवळ "बालरोग चिकित्सा" व "गृहवैद्य" अशीं दोन फार उपयुक्त पुस्तकें अहेत त्यांतून कोणास कांहीं गरज पडलीच तर औषधें सांगत असतें. मुलांच्या व स्त्रियांच्या लहानसान रोगांवर उपाय स्त्रियांसच माहित असावे हें बरें. व तसाच कांहीं रोग असला तर मात्र डाक्टरांस किंवा वैद्यांस बोलवावें.

अन्नपूर्णाबाई–मास्तरीणबाई, आपण कृपा करून आपल्या शाळेची सर्व व्यवस्था दाखविली त्याबद्दल मी आपली फार आभारी आहें. पण आतां वेळेवर आल्यें आहें तसें जरा आपण थांबा व मुली काहण्या कशा सांगतात व आपण प्रश्न विचारून त्यांस कोणत्या रीतीनें शिक्षण देतां तेवढें दाखवा ह्मणजे मीही आपली घरीं जातें.

हिराबाई–बाई, आपण ह्मणतां खरें पण मला जावयास उशीर होतो. असो, आपलीही भीड मोडतां येत नाहीं. मुलींनो, आज कोणाची पाळी आहे?

शांताबाई–वैनी, पाळी ह्मणशील तर गोदावरीची आहे पण आज गंगूला जवळ बोलाव.

हिराबाई–बरें तसें कां होईना, गंगू एक अगदीं लहानशी गोष्ट काढ पाहूं.

गंगू–(पुस्तकाचीं पानें उलटून एक लहानशी गोष्ट काढून वाचते)

ए–का–बाद–शाहा–ची–गो–ष्ट.

हिराबाई–गंगू, बादशाह कोणास ह्मणतात?

गंगू–दिल्लींतील अकबराला बादशाह ह्मणतात.

हिराबाई–हें तूं असें सांगितलेंस कीं ज्याला दिल्ली

शहर किंवा बादशाह माहित आहे त्यासच तें समजेल.

गंगू—मास्तरीणबाई, ज्यांचे हातीं सत्ता किंवा अधिकार असतो त्यांस बादशाह म्हणतात.

हिराबाई—असें आहे तर येथील कोतवाल, जज्ज हेही बादशाह झाले. कारण त्यांचे हातीं एखाद्यास दंड करायची किंवा तुरुंगांत पाठवायची सत्ता आहे.

गंगू—नाहीं, कोतवाल, जज्ज हे बादशाह नाहींत. हे राणीचे चाकर आहेत.

हिराबाई—काय गंगू तर मग कोतवाल, जज्ज हे सत्ताधारी नाहींत असें तुला वाटतें?

गंगू—हे बादशाह तर खरे, पण बादशाह म्हणजे सर्वांत मोठा सत्ताधारी असतो त्याला म्हणतात. जो अगदीं झाडून सर्वांवर हुकूम करितो व त्याच्यावर मात्र कोणी हुकूम करीत नाहीं त्यास बादशाह म्हणावें.

हिराबाई—बरें, सध्यां आपला बादशाह कोण आहे?

गंगू— मास्तरीणबाई, जेव्हांपासून अकबर बादशाहाला इंग्रजांनीं धरून काळ्या पाण्यावर पाठविलें तेव्हांपासून कोणी बादशाह नाहीं.(हें ऐकतांच सर्व मुली एकदम खदखदा हांसल्या)

हिराबाई—गंगू! तूं फार वेडी दिसतेस. अगा; अकबर बादशाहाला इंग्रजांनीं काळ्या पाण्यावर पाठविलें हें तुला कोणीग सांगितलें? बरें तें जरी घटकाभर खरें धरलें तरी तूं आपल्या तोंडानें कबूल केलेंस कीं ज्याची सर्वांत मोठी सत्ता असते व जो सर्वांवर अधिकार चालवितो त्यास बादशाह म्हणतात; आतां तूं म्हटलेंस कीं अकबर बादशाहास धरून इंग्रजांनीं काळ्या पाण्यावर पाठविलें तेव्हां इंग्रेज बादशाह झाला किं नाहीं?

गंगू–होय, झाला तर खरा.

हिराबाई–तर मग आतां सांग बरें इल्लीं आपला कोण बादशाह आहे तो?

गंगू–इंग्रेज. आणखी कोण असणार?

हिराबाई–इंग्रेज हें अमुक एकाच माणसाचें नांव आहे कीं काय?

गंगू–नाहीं. इंग्रेज हजारों आहेत.

हिराबाई–गंगू, तर मग सगळेच इंग्रेज बादशाह झाले. असेंच ना!

गंगू–ह्यांत काय संशय? (हें ऐकून सर्व मुली पुन्हा एक वेळ खदखदां हासल्या. मग हिराबाईनें प्रेमिलेस उत्तर देण्याविषयीं खूण केली.)

प्रेमिलाबाई–मास्तरणिबाई, आपली बादशाहीण चक्रवर्तिनी महाराणी विक्तोरिया साहेब आहेत.

हिराबाई–तो पुरुष आहे किंवा स्त्री?

प्रेमिलाबाई– ती स्त्री आहे.

हिराबाई– बरें, प्रेमिले, ती कोठें रहाते?

प्रेमिलाबाई– लंडनमध्यें.

हिराबाई–लंडन कोणीकडे आहे?

प्रेमिलाबाई– तें विलायतेंत आहे.

हिराबाई– तें कितीसें लांब असावें?

प्रेमिलाबाई– तें पांच हजार कोस दूर आहे ह्मणून मी एका पुस्तकांत वाचलेलें आठवतें.

हिराबाई– बरें, कोस कितीसा लांब असतो?

प्रेमिलाबाई– मास्तरीणबाई, गारपिरावरचा शर्यतीचा बंगला येथून दीड कोस आहे ह्मणतात, तेव्हां या मानानें कोसाची लांबी मनांत आणा.

शांताबाई– (हांसून) वहिनी, मी सांगू? १७६० गजांचा एक कोस होतो.

हिराबाई– बरें, शांते, त्या दिवशीं तूं मजबरोबर चतरशिंगीस आली होतीस तेव्हां तूं पाहिलें असशील कीं अंतराअंतरावर रस्त्याच्या बाजूस निमुळते दगड पुरलेले असून त्यांजवर कांहीं लिहिलेलें होतें. आतां सांग पाहूं ते दगड कशाचे असावेत?

शांताबाई– वहिनी, कोसांच्या निशाणीचेच हे दगड असावेत अशी मी अटकळ केली होती परंतु गाडी इतक्या वेगानें जात होती कीं आमची नजर त्या दगडांवर ठरेना, त्यामुळें त्यांवर काय लिहिलें होतें तें मला चांगलेंसें वाचतां आलें नाहीं.

हिराबाई–ते दगड कोसांच्या निशाणीचे नसून मैलांच्या निशाणीचे होते. दोन मैल म्हणजे एक कोस होतो. आणि प्रत्येक राजमार्गावर सर्वत्र ठिकाणीं रस्त्याच्या बाजूस दगड पुरलेले असतात व त्यांवर फक्त मैलांचेच अंक लिहिलेले असतात त्यांवरून समजावें कीं एथून घोरपडी अमुक मैलांवर आणि चतरशिंगी अमुक मैलांवर. (प्रेमिलाबाईस उद्देशून) प्रेमिले, आतां लंडन कोणत्या दिशेस आहे तें सांग पाहूं.

प्रेमिलाबाई– उत्तरेस.

हिराबाई–बरें, तो देश थंड कीं ऊष्ण आहे?

प्रेमिलाबाई– तें मला माहीत नाहीं.

शांताबाई– प्रेमिले, तो देश फार थंड आहे. जसजसें उत्तरेस जावें तसतशी उष्णता कमी होत जाते आणि जसजसें दक्षिणेकडे जावें तसतशी उष्णता वाढत जाते, हा सृष्टीचा नियमच आहे.

अन्नपूर्णा– मास्तरीणबाई, बादशाह स्त्री कशीहो झाली?

हिराबाई–यांत बाई आपणास नवल कोणतें वाटलें?

अन्नपूर्णा–कां, यांत नवल नाहीं? बायका त्या कसली बादशाही गाजविणार?

हिराबाई–ज्याप्रमाणें पुरुष राज्य चालवितो त्याप्रमाणें- च स्त्रियाही तें चालवितात. राज्याचा बंदोबस्त करणें आणि रयतेचें पालन करणें हेंच कायतें राजाचें काम.

अन्नपूर्णा–बायको ती काय करीत असेल! करणारे तर इंग्रज असतील, नांवास मात्र बायको बादशाह केला असेल असेंचना मास्तरीणबाई?

हिराबाई–होय बाई, हे सारे इंग्रज लोक कीं नाहीं त्या राणी सरकारचे नोकर आहेत व प्रत्येकाचें काम आणि अधिकार निरनिराळा आहे. ते सर्व आपआपले कामांत सर्वदा तत्पर असतात. आणि जेव्हां पुरुष बादशाह असतो तेव्हांही प्रधान मंडळीच काम पहात असते.

अन्नपूर्णा– हां असें बोला, नाहीं तर स्त्रियांच्यानें राज्य चालवेल असें माझ्या तर मनाला वाटत नाहीं.

हिराबाई– असें म्हणूं नका बरें. भोपाळच्या राणीचा इतिहास तुम्हीं कधीं ऐकला आहे काय?

अन्नपूर्णा– ऐकला आहेसा वाटतो कारण माझे चुलत सासरे तेथें चाकरीस होते म्हणून थोडासा कानावर आला होता.

हिराबाई– त्यांत व यांत भेद इतकाच कीं तिचें राज्य लहान आहे आणि आपले राणीचें राज्य फार विस्तृत आहे. जशी भोपाळची राणी आपल्या लहानशा राज्याचा बंदोबस्त करिते तशाच विक्टोरिया राणी आपल्या मोठ्या राज्याचा

बंदोबस्त करिते. दुसरें असें कीं भोपाळ हें राज्य लहान आहे. त्याप्रमाणें तेथें कामदारही थोडे असून त्यांना पगारही थोडाच मिळतो आणि राणीसरकारचें राज्य फारच अवाढव्य असून भरभराटींत आहे ह्मणून त्यांत मोठमोठे कामदार पुष्कळ असून त्यांचे पगारही तसेच मोठमोठाले आहेत.

अन्नपूर्णा— बरें, आपल्या राणीला कोणी नवरा आहे?

हिराबाई— होय, पण मृत्यु कोणालाही चुकला नाहीं. पहा आपल्या लोकांनीं मानलेल्या देवादिकांनाही त्यानें सोडिलें नाहीं. मग यःकश्चित् मानवाची काय कथा? बाई, तिचा नवरा स्वर्गवासी झाल्यास थोडींच वर्षें झालीं.

अन्नपूर्णा— बरें, आपले राणीस कांहीं मुलेंबाळें तरी आहेत का?

हिराबाई— होय, ईश्वराचे कृपेनें मुलेंलेंकरें, नातूपणतू वगैरे सर्व कांहीं आहेत.

अन्नपूर्णा—असें आहे तर मग खुद्द राणी आपल्या मुलांस घेऊन या मुलखांत कां बरें येत नाहीं?

हिराबाई—बाई, तिच्या राज्याचा विस्तार मोठा असल्यामुळें राजधानी सोडून तिला फार दिवस बाहेर राहातां येत नाहीं. पण थोड्या दिवसां पूर्वी तिचा मोठा मुलगा प्रिन्स आफ् वेल्स इकडे आला होता तेव्हां आपल्या शहरांत केवढी मोठी धामधूम उडाली होती, हें तुह्माला नाहीं का आठवत? आतां तिचे दोघे नातू वयानें फार लहान असतांही पृथ्वीप्रदक्षणा करण्यास निघाले आहेत असें मी नुकेंच एका वर्तमानपत्रांत वाचलें आहे.

अन्नपूर्णा— बरें, आपल्या महाराणीसाहेब हजारों कोसांवर असून त्यांस येथलें वर्तमान कसें कळत असेल बरें?

हिराबाई— यांत अशक्य कोणतें; येथून रात्रंदिवस तारें-तून बातमी जात येत असते व शिवाय दर आठवड्याचे आठवड्यास डांकमार्गें पत्रें व वर्तमानपत्रें जातात, त्यांवरून तिला पृथ्वीवरचें इत्थंभूत वर्तमान कळून येतें.

अन्नपूर्णा— मास्तरीणबाई, राणीला पहावयाचें असलें तर ती आपल्यास कशी बरें पहातां येईल?

हिराबाई— आपण विलायतेस गेलें असतां ती आपणास मूर्तिमंत पहतां येईल पण तिचें चित्र पहाण्याची इच्छा असेल तर तें येथें दिसेल.

अन्नपूर्णा—बरें मास्तरीणबाई, तें चित्र तरी कोठें आहे तें दाखवा पाहूं.

हिराबाई—काय बाई, तुम्ही सगळी थट्टाच मांडिली आहे? अहो तुम्हीं कधीं रूपया पाहिला नाहीं का?

अन्नपूर्णा०—कां नाहीं? रुपये तर हजारोंसे काय पण लाखों पाहिले आहेत.

हिराबाई—तर मग त्या रूपयावर एके बाजूस जो स्त्रीचा मुखवटा आहे तो महाराणीचा आहे. त्याप्रमाणेंच पोष्टाच्या लाखोऱ्यांवर ज्या टिकीटा असतात त्यांवरही तिचाच मुखवटा असतो हें आपल्यास अजून कसें माहीत नाहीं? शिवाय माझेजवळ राणीचें एक मोठें व फार उत्तम चित्र आहे. तें माझे बाबास एका साहेबानें दिलें आहे. शांते, जा पाहूं माझें कपाट उघडून त्यांत रुमालांत गुंडाळलेली राणीची तसबीर आहे ती आण.

शांतेनें कपाटांतील तसबीर आणून हिराबाईचे हातांत दिली. ती तिनें तिला दाखविली. तेव्हां सर्व मुली मोठ्या उत्कंठेनें त्या तसविरीकडे पाहूं लागल्या.

अन्न०— अहाहा, किती तरी सुंदर तसबीर ही ! जणु-काय राणी खरोखरच आपलेपुढें उभी आहेशी दिसते.

हिरा०—यांत काय संशय ? ती राणीची हुबेहूब तसबीरच आहे. रूपयावरील चेहऱ्याशीं ही लावून पहा किती फेर आहे तो. ही तसबीर की नाहीं कांहीं हातानें काढलेली नव्हे पण चित्र काढावयाचें एक यंत्र असतें त्याचे कांचेस कांहीं औषधी लावून तें ज्या मनुष्याची तसबीर काढावयाची असेल त्या मनुष्याचे समोर ठेवितात; म्हणजे त्याची त्या कांचेवर जशाची तशी पडछाया पडून तसबीर आपोआप उठून येते.

अन्न०—बरें; मास्तरीणबाई, मघाशीं प्रेमिलाबाईनें लंडन पांच हजार कोस दूर आहे म्हणून सांगितलें तर मग येथून तिकडे जाण्या येण्यास दाहा पांच वर्षें लागत असतील नाहीं का ?

हिरा०— छेः, वर्षें कशास पाहिजेत ? हल्लीं आगबोटीच्या योगानें समुद्रांतून विलायतेस जाऊन दोन महिन्यांच्या आंत परत येतां येतें.

अन्न०—अबबब, काय समुद्रांतून जावें लागतें ? किती तरी इंग्रजांचें धाडस हें ! बाई, छातीचे जबरे ते. त्यांस समुद्राची भीति नाहीं का वाटत ? मला तर मेलें समुद्राचें नांव ऐकतांच कांपरी भरून येते.

हिरा०— समुद्राची भीति ती कसची ? मोठ्या तिकटी तारवांत किंवा आगबोटींत बसलें म्हणजे एकाद्या मोठ्या घरांत बसल्यासारखें वाटतें

अन्न०— कायहो बाई तुमचें तरी सांगणें हें, बुडण्याची नाहीं का धास्ती पण ? तिगस्तसालच्या गोष्टीची आठवण झाली म्हणजे बाई आंगावर कांटा उभा रहातो. मास्तरीणबाई,

माझी मावससासू कीं नाहीं (असें म्हणून डोळ्यांतून अश्रु टाकिते) देशमुखांबरोबर रामेश्वरास गेल्या होत्या. मेली जातेवेळीं कशी वाईट वेळा लागली होती कोण जाणें, त्या पुन्हा परत म्हणून आल्या नाहींत, समुद्रांतच (असें म्हणून रडूं लागते).

हिरा०—तें बाई कोणाचे स्वाधीन? होणार गोष्ट कांहीं केल्या चुकत नाहीं. अशीं जहाजें तर पुष्कळ वेळां बुडत असतात, पण असा विचार केला पाहिजे कीं अशीं सर्वच जहाजें जर बुडूं लागतील तर मग समुद्रांत जाव-यायचें कोणी नांव सुद्धां घेणार नाहीं. परंतु इंग्रजांचें राज्य झाल्यापासून समुद्रांतील प्रवास पायवाटेपेक्षां पुष्कळ सोईवार झाला आहे. हजारों जहाजें व आगबोटी रात्रंदिवस एक-सारख्या जात येत असतातच. इंग्रज लोक, त्यांचीं बाय-कामुलें, सामानसुमान, व सर्व कांहीं व्यापाराचा माल, हा आगबोटींतूनच येथें येतो.

अन्न०—मास्तरीणबाई, इंग्रजांचे बायकांची गोष्ट कोठें, त्या तर स्वर्गींच्या वारांगनाच आहेत. आमची त्यांची बरोबरी कशी होईल? त्या तर नित्य बिनधोक रात्रंदिवस बाहेर हिंडतात फिरतात. माझे ऐकण्यांत आलें आहे कीं आपलीं लहान लहान मुलें देखील एकटीं विलायतेस पाठ-वितात. काय तरी बाई छाती ही! असें केल्यानें त्यांचे मनाला कांहींच का वाटत नाहीं? कशा उफराट्या काळ-जाच्या बायका त्या! त्यांचें मन किती तरी कठोर! अशा त्या बाहेर फिरणाऱ्या व पाषाणहृदयी बायकांचें काय तुम्हीं सांगता? त्यांस तर हवेंतून उडून जाण्यासही कठीण नाहीं.

हिरा०—बाहेर फिरणाऱ्या ज्या आपण म्हणालां, त्या त्यांच्या देशांत पडद्याची किंवा आमच्यासारखी घरांत बसून

रहाण्याची चाल नाहीं म्हणून अशा. त्यांच्या सूना मुली पाहिजे त्या बरोबर बोलतात, चालतात. यावरून आपण असें समजतां कामा नये कीं त्यांस म्हणजे लाज व भीड कांहींच नाहीं. माझे बापाचे ओळखीचा एक साहेब होता त्याच्या मुली आमचे घरीं येत असत त्यावरून व दुसऱ्या कांहीं माहितीवरून मी खात्रीपूर्वक सांगतें कीं त्यांच्यांत भीड व मर्यादा जी माझे पहाण्यांत आली आहे तशी आम्हां बाहेर न पडणारांस ईश्वरानें द्यावी म्हणजे झालें. आतां आपण म्हणतां कीं त्या आपलीं मुलें एकटीं विलायतेस पाठवितात ह्यावरून त्यांस माया नसते. असें आपण कसें म्हणतां ? त्या लोकांची माया व प्रीति तर विचारास अनुसरून असते. आपल्या लोकांचा मायाजाळ तेवढा मात्र पाहून घ्यावा. बारीक विचार केला असतां ही माया नसून मुलांची वैरीण आहे. या वेड्या मायेपासून त्यांचें पुढें अनहितच होणार. इतक्या गोष्टी झाल्यावर सर्व गप्प बसल्या आणि गंगूनें आपली गोष्ट पुढें चालविली.

गंगू—(वाचूं लागते) एक बादशहा होता, त्याचे पोटीं पुत्र नसून एकुलती एक कन्या मात्र होती. आपल्या मागें हीच मुलगी गादीची वारस होईल असें समजून बादशाहानें तीस चांगल्या प्रकारें लिहिण्यावाचण्यास शिकविलें आणि पुढें राज्यकारभार चालवितां यावा म्हणून आपल्या हयातींतच तीस राज्याभिषेक केला.

हिरा०—(गंगूनें इतकी गोष्ट वाचल्यानंतर मध्येंच म्हणते) **गंगू**, तूं गोष्ट फार लवकर वाचतेस त्यामुळें तुला जे प्रश्न करावेसे वाटतात ते तसेच राहतात. बरें असो. संध्याकाळ होत आली आणि मला तर सरस्वतीचे आईचे येथें जरूर गे-

लेंच पाहिजे ह्मणून माझ्यानें आतां फार वेळ राहवत नाहीं. तुह्मीं सर्वजणी आपसांत वाचून एकमेकींस प्रश्न करा. बाई अन्नपूर्णे, मी आतां येत्यें. आपली मर्जी असेल तर येथें आणखी कांहीं वेळ बसून यांची गम्मत पहा किंवा उद्यां पुन्हां या. येथें हा रोजचाच प्रकार आहे.

इतकें भाषण झाल्यावर हिराबाई सरस्वतीचे आईचे घरीं गेली. इकडे अन्नपूर्णाबाई त्या मुलींची हुषारी पाहून इतकी दंग होऊन गेली कीं प्रहर रात्र झाली तरी शांताबाई व प्रेमिलाबाई ज्या मनोरंजक गोष्टी वाचीत होत्या त्या ती ऐकत राहिली.

या वरील हकीकतीवरून हिराबाईचे शाळेची व्यवस्था आणि तिची शिकविण्याची पद्धत कोणत्या प्रकारची होती हें चांगल्या रीतीनें कळून येतें. हिराबाई प्रेमिलाबाईवर प्रीति करीत असे आणि तिला हिराबाईनें आपल्या चातुर्यानें इतकें लवकर शिकविलें कीं अवघ्या दोन वर्षांत तिला शुद्ध लिहितां व वाचतां येऊं लागून साध्या त्रिराशिका पर्यंत गणीत करूं लागली;तसेंच तिचा पूर्वीचा तापट व उद्धट स्वभाव जाऊन ती गरीब,बुद्धिवान आणि सर्वांस आवडती अशी झाली. त्याचप्रमाणें तिची मोठी बहीण वत्सलाबाई ही देखील कित्येक वर्षें पर्यंत तिला अंतरलेल्या घरांत हिराबाईचे बुद्धिबलानें पुन्हां सुखानें व आनंदानें नांदूं लागली, त्याचा सर्व वृत्तांत एका निराळ्या पुस्तकांत लिहिला जाईल. सारांश या प्रसंगीं येथें सांगायाचें इतकेंच कीं भाऊसाहेबांचे कुटुंबांतील लहान थोर सर्वच माणसें हिराबाईचीं फारच ऋणी झालीं. हिराबाईनें या उपकारांबद्दल कांहीं तरी व्यावें अशाविषयीं मिराबाईनें हजारो

उपाय केले पण या ईश्वराचे दासीनें व थोर मनाचे मुलीनें कांहीं एक घेतलें नाहीं. जेव्हां प्रेमिलाबाईचें लग्न होऊं लागलें तेव्हां हिराबाईचा सासरा माधवराव यांस मिराबाईनें मध्यस्थीस घालून, एक हजार रुपयांची जडावाची कांकणाची जोडी तिला बक्षीस दिली आणि ह्मणाली, "हिराबाई, तूं मला माझे कन्येसमान आहेस,आणि ही जोडी मी तुला तुझे शिकविण्याचे मेहनतीबद्दल देत आहें असें तिळमात्र न समजतां हिचा स्वीकार कर." हें ऐकून सासऱ्याच्या मुर्वतीस्तव तिनें ती जोडी घेतली.

वाचकहो, आतां ही गोष्ट येथेंच संपवून आपण सत्यवंताकडेस वळूं या.

सत्यवंताचा वृत्तांत.

वर सांगितल्याप्रमाणें हिराबाई ही आपल्या शाळेचे खटपटींत गुंतून गेली होती, पण इकडे तिचा नवरा सत्यवंत यास उद्योग धंदा कांहींच नसल्यामुळें त्याचे जिवास अगदीं चैन पडेना. एके दिवशीं तो हिराबाईस सांगूं लागला कीं मला आतां रिकामें बसून मुळींच चैनपडत नाहीं; ह्मणून तुझी मर्जी असेल तर घांटावर तुझ्या बापाकडे जाऊन त्याचे मार्फतीनें कोठें तरी चाकरीचें संधान पाहतों.

हिरा०—(अम्मळ विचार करून) आपणास कोठें तरी चाकरी केली पाहिजे यांत कांहीं संदेह नाहीं, कारण घरांत कोणत्या प्रकारची अडचण आहे हें आपणास ठाऊकच आहे. मामाजींस तर आतां ह्मातारपण आलें तेव्हां त्यांच्यानें या उपर चाकरीची दगदग सहन होणें कठीण. ह्मणून त्यांचे राहिलेले दिवस सुखानें व शांततेनें जावे असें जर

आपण इच्छीत असाल तर त्यांस घरीं पाठवून आपण कोठें तरी चाकरी धंदा पाहून त्यांला या घोरांतून मुक्त करावें हें चांगलें. इकडे शांताबाई ही दिवसें दिवस मोठी होत चालली, तिला स्थळ कोठें व कसें मिळतें या चिंतेंत मी आहें. माझे मनांतून तिला येथेंच कोठें तरी चांगले घरीं द्यावयाचें आहे व त्याविषयीं मी खटपटही करीत आहें, पाहूं काय होतें तें. ईश्वराची मर्जी असेल तर बहुधा याच वर्षीं लग्नाचें ठरेल असें वाटतें. पण त्यासाठीं बराच पैसा पाहिजे, कारण लग्न म्हणजे खर्चाचें घर, आणि आमचे घरांत तर पांच पंचवीस रूपये देखील मिळावयाचे नाहींत. भावोजींकडेस पहावें तर ते निराळे राहतात. शिवाय त्यांची चाकरी म्हणजे काय त्यांचें त्यांसच पुरत नाहीं मग दुसऱ्यांस ते कोठून पुरवणार ? म्हणून आपण येथेंच कोठें तरी लहान सहान मिळेल तेवढी पहिल्यानें चाकरी धरा, मग हळूहळू दुसरीकडेस पाहतां येईल. पण घांटावर जाईन म्हणतां हें मला तर कोणतेही रीतीनें प्रशस्त वाटत नाहीं. आतां हें खरें आहे कीं माझे बाबा आपण गेल्यावर खुष होतील व हरतऱ्हा करून आपल्यास कोठेंना कोठें तरी पांचपंचवीस रूपयांची चाकरी सहज लावून देतील; पण तें ठीक नव्हे. चाकरी लहान कां होईना पण ती आपले हुशारीनें मिळविलेली पाहिजे. माझे बाबा कीं नाहीं कोणी परकी नाहींत, नात्यानें पाहिलें असतांही ते वडीलच आहेत तेव्हां त्यांची मदत मागण्यांत कांहीं हलकेपणा नाहीं. पण कोणी कोणाचें बाधलें न रहावें तेवढें चांगलें. यामुळें आपला मान राहातो. ते याविषयीं कांहीं मनांत आणणार नाहींत पण लोक आजकाल कसे अहित, तोंडावर तर

कांहीं बोलणार नाहींत पण पाठीमागें म्हणतील कीं, पहा, कोठें कांहीं इलाज चालेना तेव्हां सासऱ्याचे येथें गेले.

सत्यवंत—तर मग बाबाकडेस कोल्हापुरास तरी जाऊन पाहं ?

हिराबाई—कोल्हापुरास जाऊन तरी काय करणार? तसेंच कांहीं चाकरीचें संधान असतें तर मामाजींनीं आपणास इतके दिवसांत लिहिलें असतें. ते आपले फार दिवसांचे चाकर आहेत म्हणून त्यांस शंभर रुपये पराकाष्ठेनें मिळतात.

सत्यवंत—बरें, दुसरीं इतकीं संस्थानें त्यांचे आसपास आहेत त्यांत कोठें तरी त्यांचे ओळखीनें कांहीं होणार नाहीं ?

हिराबाई—ही इंग्रजी झाल्यापासून संस्थानांत तरी राहिलें आहे काय ? पूर्वीचे नांवासाठीं उगाच कोठें पांच पन्नास चाकर लोक त्यांस ठेवणें भाग पडतें. त्या चाकर लोकांस कैक महिने पगार सुद्धां मिळण्याची मारामार.

सत्यवंत—तर मग आतां उपाय तरी कोणता करूं?

हिराबाई—त्यास उपाय हाच कीं येथेंच कोठें इंग्रजी हपिसांत पहिल्यानें प्रयत्न करून पहावें काय होतें तें.

सत्यवंत—आजकाल इंग्रजी चाकरी तर वशिल्याशिवाय मिळत नाहीं आणि माझ्याहून जास्त शिकलेले व एक दोन परीक्षा पास झालेले हजारों उमेदवार चाकरीसाठीं भटकत फिरत आहेत तेव्हां मला कोण विचारतो?

हिराबाई—होय, आपण म्हणतां हें खरें आहे. तथापि कोणीही मनुष्य जर मनोभावानें कोणताही प्रयत्न करील तर खरोखर ईश्वर त्यास यश दिल्याशिवाय रहाणार नाहीं.

सत्यवंत—तें खरें, पण पहिल्यानें प्रयत्न कसा व कोणता करावा हेंच समजत नाहीं.

हिराबाई–प्रयत्न करावयाचा तो असा कीं जे लोक चाकरी धंदेवाले आहेत त्यांजकडे जात येत असून त्यां-च्याशीं मित्रत्व जोडावें ह्मणजे त्यांचे मार्फतीनें चाकरीचा शोध मिळेल व त्यांचेच वशिल्यानें एकादे साहेबाकडून तुमचें काम होईल. नाहीं तर असें घरांत बसून का तुह्मा-स चाकरी मिळणार?

हिराबाईनें याप्रमाणें सांगितल्यावर सत्यवंतानें पहि-ल्यानें अदालतींतील कारकून लोकांची ओळख करून घेतली. पुढें होतां होतां शिरस्तेदार, अव्वल कारकून, वैगेरे मोठमोठ्या लोकांत जाऊं येऊं लागला. दररोजच्या येण्या जाण्यानें सर्वांनीं धोरण बांधलें कीं हा चाकरीच्या शोधांत असावा. शेवटीं रामभट ह्मणून एक नोटिशी लि-हिणारा कारकून, ज्याची व सत्यवंताची अत्यंत मैत्री ज-मली होती, तो एक दिवस सत्यवंतास ह्मणूं लागला कीं "रावसाहेब, आपल्या मनांत उमेदवारी करावयाची असेल तर मजबरोबर दररोज कचेरींत येत असा व शिरस्तेदारीची माहिती करून घेत जा. असें कराल तरच एखादे वेळीं येथेंच कोठें तरी आपली सोय होऊन जाईल." या-वरून सत्यवंत कचेरीस जाऊं लागला व रामभटाच्या हा-ताखालीं नोटिशींच्या नकला करूं लागला. नंतर कांहीं दिवसांनीं हळू हळू साहेबापाशीं जाऊं लागून त्या नोटि-शींवर साहेबांची सही करून आणूं लागला, यामुळें साहेब सुद्धां त्यास ओळखूं लागला. असें होतां होतां दोन चार लहान सहान कारकूनांच्या बदल्याही यास मिळून गेल्या. पुढें कर्म धर्म संयोगानें एक दहा रुपयांचा नोटिशी लि-हिणारा कारकून तीन महिन्यांचे रजेवर गेला आणि पुढें

तीन महिन्यां नंतर त्यानें आपल्या चाकरीचा राजीनामा लिहून पाठविला. तेव्हां सत्यवंत यास त्याचे जागेवर कायम केलें. कधीं मधीं हिराबाईवरोबर चाकरीच्या गोष्टी निघत तेव्हां सत्यवंत धिक्कारून ह्मणत असे, " काय बेटी चाकरी, सारा दिवस पेन घांसून महिन्याचे कांठीं कायते दहा रूपये, नाहीं बढतीची आशा किंवा कांहीं. बरें, बाहेरची तरी कांहीं प्राप्ति आहे ह्मणावी तर तिचे नांवनेंही भोंपळा, " हिराबाई या अशा बोलण्यावरून त्यास नेहमी असें बोलत असे कीं " तुमचा किती तरी उतावीळ स्वभाव हा ? पहिल्यानें तुह्मास उमेदवारी सुद्धां मिळत नव्हती ते दिवस विसरलां वाटतें ? आतां सरकारी कायमची चाकरी लागली असून बाहेर गांवीं जावें न लागतां गांवांतले गांवांत दहा रूपये मिळतात ते काय थोडे झाले ? भावोजी पहा, आज कित्येक वर्षें व्यापाऱ्याच्या येथें दहा रूपयांवर रखडत आहेत. या प्रमाणें तुमचें चाकरीवर बरोबर चित्त नसेल तर काम तरी कसें करीत असाल कोण जाणे. अशा करणीनें इतकें मात्र होईल कीं अर्धी भाकर मिळते तीही घालवून बसाल. मग पुनः येरे माझ्या मागल्या. आणि हीच चाकरी जर नीट लक्ष लावून व काळजीपूर्वक कराल तर यांतच हळू हळू आपली बढती होईल. माझे बाबा पहिल्यानें आपल्यासारखेच नकला करण्याच्या कामावर होते परंतु ते ईश्वराचे दयेनें आतां तहशीलदार झाले आहेत कीं नाहींत ? ईश्वराची कृपा असेल तर अजून याहूनही मोठा हुद्दा त्यांस मिळेल. बाहेरचे प्राप्तीकडे कधीं ढुंकूनही पाहूं नये. कारण ह्मटलें आहे कीं, " अन्यायोपार्जितं द्रव्यम् दश वर्षाणि तिष्ठति । प्राप्तैकादश

वर्षाणाम् समूलंच विनश्यति " ह्मणजे अन्यायानें मिळविलेलें द्रव्य फार फार झालें तर दहा वर्षें पर्यंत रहातें; अकरावें वर्ष लागलें कीं त्या बरोबर स्वकष्टानें संपादिलेलें असतें तें-ही जातें. ह्मणून आपल्या योग्य श्रमांनीं जेवढें द्रव्य मि-ळावयाचें त्याहून जास्त द्रव्य जर मिळत नाहीं तर मनु-ष्यांनीं मोठा डामडौल व बडेजाव न करितां साध्या री-तीनें राहावें हें चांगलें.

याप्रमाणें हिराबाई ही नेहमी सत्यवंताची समजूत करीत असे. पुढें कांहीं दिवसांनीं अशी गोष्ट झाली कीं ज्या सा-हेबाचे हाताखालीं सत्यवंत होता व जो त्याजवर फार प्रीति करीत असे त्याची एकाएकीं दुसरीकडे बदली झाली. ही गोष्ट त्यास कळल्यापासून तो फार उदास दिसूं लागला. ह्मणून हिराबाईनें त्यास विचारलें, "आपण हल्लीं असे उ-दास कां दिसतां? मनाला कसली चिंता लागली आहे?"

सत्यवंत—काय माझें नशीब. माझेवर जो दयाळू सा-हेब होता त्याची बदली दुसरीकडे झाली, तो साहेब माझा मोठा आश्रयदाता होता, आतां अदालतींत राहून कांहीं हेशील नाहीं आणि पुढें कसें होईल ह्मणून मोठी चिंता लागली आहे.

हिरा०—(कांहीं वेळ विचारांत पडून) खरोखर दयाळू साहे-बाची बदली होणें ही दुःख वाटण्यासारखी गोष्ट आहे खरी पण आपण मानतां तेवढें कांहीं तें दुःख नाहीं. दुसरा जो कोणी साहेब त्याचे जागीं येईल तो तुमचेवर अशीच प्रीति करणार नाहीं ह्मणून कशावरून? बरें, हा तुमचा साहेब कधीं जाणार आहे?

सत्य०—बहुधा उद्यां संध्याकाळचे मेलट्रेनींतून जातील असें वाटतें.

हिरा०—तर मग आपण त्यांस भेटावयास कधीं जाणार?

सत्य०—आतां भेटून काय करावयाचें आहे?

हिरा०—वः, असें कां ह्मणतां? भेटण्याची वेळ तर हीच. जातां जातां कदाचित् एकादें सर्टिफिकीट तरी देऊन जाईल.

सत्य०—बरें तर उद्यां सकाळीं जाईन.

त्याप्रमाणें सत्यवंत दुसरे दिवशीं मोठे पहांटेस उठून साहेबाचे बंगल्यावर जाऊन त्यास सलाम केला तेव्हां तो ह्मणाला, "सत्यवंत, मी आतां निळगिरीस चाललों. तुझा स्वभाव मला फार आवडत असे. आणि तुझी मर्जी असेल तर मजबरोबर निळगिरीस चल; तेथें मी तुला चाकरी लावून देईन, किंवा चाकरी लागेपर्यंत खासगी पगारांतून दरमहा पंधरा रुपये देईन." यावर सत्यवंतानें "आईस विचारून दोनप्रहरानंतर काय तें सांगेन," असें उत्तर दिलें व साहेबाची रजा घेऊन घरीं आल्यावर त्याणें तो सर्व वृत्तांत आपले आईस कळविला. तो ऐकतांच तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या आणि हिराबाईही तें ऐकून मोठ्या विचारांत पडली. कांहीं वेळ वाट पाहून शेवटीं सत्यवंत ह्मणाला, "काय तें लवकर सांगा ह्मणजे साहेबांस त्याप्रमाणें जाऊन सांगतों."

सत्यवंताची आई—बाळा, सांगावयाचें काय. जा असें सांगण्यास माझा कांहीं धीर होत नाहीं आणि तूं न गेलास तर साहेबाचें काम अडेल असेंही नाहीं. आतां तूं त्याला भेटूंच नको ह्मणजे झालें.

सत्यवंत– नाहीं, तसें नाहीं. मी कायतें कळवितों असें साहेबास सांगून आलों आहें म्हणून माझी येण्याची खुषी नाहीं असें तरी त्याला कळविलें पाहिजे.

सत्यवंताची आई– जा तर सांगून ये.

सत्यवंत–(हिराबाईस विचारतो) कसें काय, याबद्दल आपलें काय म्हणणें आहे?

हिराबाई– मला जर विचारता तर याबद्दल माझे दोन विचार आहेत. एक विचार असा कीं तुम्हीं येथेंच रहावें, कारण हा संसार सगळा तुमच्यावर चालला आहे; आणि यांत कोणी तरी पुरुष पाहिजे. दुसरा विचार, तुम्हीं साहेबाबरोबर जावें हेंच योग्य. कारण साहेब आपण होऊन जर तुम्हांस नेत आहे तर तिकडे गेल्यावर तो तुमचें कल्याण केल्याशिवाय रहाणार नाहीं.

सत्यवंत– घरदार सोडून पांच रुपड्यांसाठीं इतका लांब तीन चारशें कोस कोण जातो? माझे तर मनांतून जायचें नाहीं. म्हण आहे "घरची अर्धी पत्करली पण बाहेरची सगळी नको."

हिराबाई– आपले मर्जीनुरूप करण्यास आपण धनी आहां, पण नशीबानें योग घडून आला आहे तो व्यर्थ घालवूं नका. प्रवास कोण करीत नाहीं? माझ्या व तुमच्या वडिलांकडेस पहा, त्यांचें तर सगळें आयुष्य प्रवासांत गेलें. आतां तुम्हींच पहा कीं पांच पांच करतां त्यांचा पगार किती मोठा झाला तो. तुमचे मनांतून जायचें नसलें तर सध्यां जे दहा रुपये मिळतात त्यासाठीं कुरकुर करूं नका म्हणजे झालें.

सत्यवंत– बरें, जायचें तर चाकरीचा राजीनामा दे-

ऊन जावें किंवा कसें? न जाणो तेथें कांहीं बस्तान बसलें नाहीं तर "हातचें सोडा आणि पळत्याचे पाठीस लागा" असें होणार.

हिराबाई—तेथें बस्तान बसणार नाहीं असें ह्मणणेंच गैर आहे. एवढा मोठा दयाळू साहेब आपणास रोजगारा निमित्य नेत असून रोजगार लागणार नाहीं असें कधीं होणार नाहीं. तथापि आपले मनांत जर संशय आहे तर मग राजीनामा न देतां एक दोन महिन्यांची रजा घ्या ह्मणजे झालें.

सत्यवंत—रजा ठेवलेली आहे? चाकरी चाकरी करितां ती नुक्तीच मिळाली आणि आतां रजेचें नांव घेतलें तर मग वाटाण्यांच्या अक्षताच!

हिराबाई—रजा मिळण्यास अडचण कोणती? साहेबास नीट समजून सांगाल तर तो रजेसाठीं देखील चिठी लिहून देईल.

हिराबाईनें याप्रमाणें सत्यवंताच्या शंका घालवून त्यास जाण्याविषयीं उद्युक्त केलें व आपल्या जवळचे पन्नास रुपये रोख काढून वाट खर्चास दिले आणि त्याचा कपडा लत्ता व फराळाचें सामान तयार करून देऊन सुमार्गाचा मुलगा यशवंत यास बरोबर दिला. अशा तयारीनें सत्यवंत हे निळगिरीस जावयास निघाले. इकडे हिराबाईनें सत्यवंत गेल्यावर लगेच आपला सासरा माधवराव यांस पत्र लिहून कळविलें कीं "येथील अदालतींतील साहेब निळगिरीस जाण्यासाठीं निघून गेले व त्यांच्या बरोबर प्राणनाथही रोजगारासाठीं गेले आहेत. निळगिरीस जातांना कोल्हापुरावरून जाण्याचा विचार आहे तेव्हां ते आले ह्मण-

जे त्यांची तेथें मुद्दाम भेट घेऊन त्यांजकडे प्राणनाथां-बद्दल तेथील रेसिडेंटाकडून शिफारस करविली असतां पुष्कळ फायदा होईल.' यावरून माधवराव हे साहेब ये-ण्याची वाट पाहात राहिले व ज्या दिवशीं साहेब येणार अशी बातमी लागली त्याच दिवशीं महाराजांचे परवानगीनें त्यांचे बागांत तंबू वगैरे देऊन त्यांच्या उतरण्याची सर्व तयारी केली. पुढें साहेबांची स्वारी आल्यावर ते रेसिडेंट साहेबांचे भेटीस गेले. तेथें उभयतांच्या गोष्टी होत होत्या त्याविळीं माधवराव तेथें होते ते साहेबांस ह्मणाले; " आपण अवघीं दोनच वर्षें जरी पुण्यांत काढलींत तरी तेवढ्या मुदतींत आपण सर्व लोकांची प्रीति संपादन केली ह्मणून आपल्या वियोगामुळें सर्व लोकांस मोठी हळहळ वाटत आहे. आपल्या न्यायी व दयाळूपणाविषयीं तेथील लोक फार खुष होते. माझा मुलगा आपलेजवळ चाकरीस आहे त्याचे लिहिण्यावरून खानंदांची सर्व हकीकत कळून येत असते."

साहेब–काय तुमचा मुलगा माझे जवळ चाकरीस आहे?

माधवराव–होय साहेब, माझा धाकटा मुलगा सत्यवंत आपल्या पायांपाशीं आहे.

साहेब–तो सध्यां मजबरोबर आला आहे तो काय आपला मुलगा?

माधवराव–होय साहेब, ती आपल्या पायांची धूळ आहे.

उभयतांच्या इतक्या गोष्टी झाल्यावर तेथील रेसिडेंट ह्मणाले, "हे कारभारी साहेब आज पुष्कळ वर्षांपासून या राज्यांत आहेत. यांची कारभार चालविण्याची रीति मी फार पसंत करितों. पण बिचारे काय करतील, हें राज्य लहान असल्यामुळें त्यांचे चिरंजिवांचा तूर्त समावेश होणें

कठीण. करितां आपण मेहेरबानी करून त्यांस बढतीची जागा द्याल तर फार चांगलें होईल."

या साहेबांची पहिल्यापासून सत्यवंतावर बहाल मर्जी होतीच आणि आतां दुधांत साखर पडल्याप्रमाणें झालें, तेणेंकरून सत्यवंताविषयीं साहेबांस अधिक आस्था उत्पन्न झाली. साहेब सत्यवंतासह निळगिरीस पोंचले आणि दुसरेच दिवशीं कचेरी भरल्यावर सत्यवंतास पन्नास रुपयांची अ-व्वल कारकुनाची जागा रिकामी होती ती दिली आणि माधवरावांस लिहून पाठविलें कीं "तूर्त तुमचे मुलास पन्नास रुपयांची जागा दिली आहे, आणि ईश्वराची इच्छा अस-ल्यास याहूनही बढतीची जागा त्यास मिळेल. ही गोष्ट आपण कृपा करून रेसिडेंटांस कळवावी." माधवराव हें वर्तमान ऐकतांच फार खूष झाले. सत्यवंतास कांहीं दिवसां पूर्वी नुसती उमेदवारी मिळण्याची मारामार पडत असून शे-वटीं लहानसहान बदल्या करून एक दहा रुपयांची का-यमची जागा ज्यानें मिळविली आणि जो हिराबाईचे आ-ग्रहास्तव पंधरा रुपयांसाठीं साहेबाबरोबर निळगिरीस गेला, तोच सत्यवंत आतां एकदम पन्नास रुपयांचा हुद्देदार हो-ऊन बसला. त्याची आई तो जातेवेळीं मोठा आकांत क-रून बसली होती तीच आतां पन्नास रुपयांचें नांव ऐक-तांच शुद्धीवर आली. आतां घरांत चार हिशानें आवक अधिक येऊं लागली. आधींच हिराबाईचे हातीं कारभार आणि तशांत पंचविसांच्या ठिकाणीं पन्नास रुपये घरीं येऊं लागले मग काय विचारतां? पुढें एक वर्षाच्या आंतच सत्यवंत फौजदार झाला, तेथपर्यंत सर्व कांहीं बेतानें चाल-लें होतें. पण कसें झालें तरी तो ऐन उमेदीचा मनुष्य

असल्यामुळें लवकरच वाईट संगतीच्या योगानें स्वच्छंदपणानें वागूं लागला. घरीं वेळेवर पत्र येत नाहींसें झाल्यामुळें हिराबाई समजली कीं कांहीं तरी बिघडलें आहे. आतां यास कोणता उपाय करावा याविषयीं विचार करतां करतां आपण निळगिरीस गेल्यावांचून गत्यंतर नाहीं असा तिनें आपल्या मनाचा निर्धार केला.

हिराबाईचें निळगिरीस जाणें.

जरी हिराबाईनें निळगिरीस जाण्याचा दृढ निश्चय केला होता तरी त्याविषयीं आपली सोबतीण सुमती इचें काय मत आहे तें समजून घेण्याकरितां तीस बलाविणें पाठविलें व ती आल्यावर तिला आपल्या जाण्याचा इत्थंभूत मजकूर सांगितला.

सुमती–गडे, तुला वेडबीड तर लागलें नाहींना? अग, कोठें पुणें आणि कोठें निलगिरी? काय आपल्या इकडचे गांव आहेत ते?

हिराबाई–काय बाई नवल तरी, मला गांवाशीं काय करावयाचें आहे? मी ज्यांचे पदरीं बांधलें गेलें आहें ते जेथें असतील सोच माझा गांव.

सुमती–हिऱ्ये, तूं म्हणतेस तेंही खरें, पण म्हटलें आहे ना "यद्यपि शुद्धं लोक विरुद्धं, नाकरणीयं नाचरणीयं." आपल्या कुटुंबांत कोणीही बायको अद्याप इतके दूरचे प्रवासास गेली नाहीं, याचें कारण तरी हेंच होय.

हिराबाई–गडे, यांत लोकांचे विरुद्ध ती कोणती चाल? फार तर लोक इतकेंच म्हणतील कीं नवऱ्याकडेस निघून गेली. तसें त्यांनीं म्हटलें तर त्यांत वावगें तें काय?

आतां कुटुंबाचे चालीविषयीं ह्मणशील तर पूर्वीं आपले देशांत हल्लींप्रमाणें सडका, टप्याच्या गाड्या, किंवा लोखंडी रस्ते नव्हते, व प्रवास करणें ह्मणजे महान कठीण व धोक्याचें काम होतें सबब त्या वेळीं स्त्रियांस प्रवासास जाण्याची मनाई केली हें योग्यच. पण हल्लींचे राज्यांत प्रवास करणें ह्मटलें ह्मणजे इतकें निर्भय व सोपें झालें आहे कीं काठीस सोनें बांधून काशीस गेलें तरी कोणी विचारीत नाहीं. आज जर येथें आगगाडींत बसलें तर पर्वांचे दिवशी खुशाल निळगिरीस जाऊन पोंचावें.

सुमती—बरें, येण्याविषयीं कांहीं पत्र आलें होतें काय?

हिराबाई—पत्र चित्र ह्मणशील तर कांहीं नाहीं पण मीच होऊन जावें असें ह्मणतें.

सुमती—माझें ऐकशील तर बोलावल्याशिवाय आपण होऊन जाणें यांत कांहीं शोभा नाहीं.

हिराबाई—गडे, सुमती, तुला तर बाई सगळीच थट्टा वाटते. पण या वेळीं जर माझें जाणें तिकडे न झालें तर या सर्व संसाराची व घरादाराची धुळधाणीच झाली असें समज.

सुमती—हिऱ्ये, पण इतकें भिण्यास कारण तरी काय झालें? देवाचे दयेनें तुला काय कमी आहे? त्यागें तुझे शाळेला भरभराटींत ठेवावें ह्मणजे झालें. मग आपण एकाचाच काय पण दहाजणांचा चरितार्थ चालवूं शकाल यांत संशय नाहीं.

हिराबाई—वः, काय तुझा तर्क तरी! अग, ही पैसे मिळविण्याकरितां का शाळा घातली आहे? माझा वेळ जात नव्हता ह्मणून तो घालविण्याकरितां हा एक उद्योग

उभा केला आहे. आतां तूं खरें मान कीं नको, पण शाळे-च्या फंडांतून आजपर्यंत खासगी खर्चास एक कवडी घे-तली असेल तर शपथ.

सुमती—गडे हिऱ्ये, पण अशा भर पावसांतून तूं कशी बरें जाशील? हा पावसाळा गेल्यावर मग जाण्याचा विचार करावा हें बरें.

हिराबाई—नाहींग गडे, आतां दिवसगतीवर लोटणें हें चांगलें नव्हे कारण आज जें काम एका शब्दानें होणार तें उद्यां मोठ्या आयासानेंही होणें कठीण.

सुमती—गडे, घर सोडून इतकें लांब जावयास तुला कांहीं का वाटत नाहीं?

हिराबाई—कां वाटत नाहीं? मी काय मनुष्य नव्हे? पण एक दोन दिवस वाईट वाटलेलें चांगलें कीं सारे जन्मभर, हें तूंच सांग बरें?

सुमती—बरें, याविषयीं तूं आपल्या सासूचें तरी अनुमोदन घेतलें आहेस काय?

हिराबाई—गडे, ती कशी बरें अनुमोदन देईल? तूं शिकलेली तरी तुझें असें मत. पण एवढें खरें कीं त्या वि-चाऱ्या समंजस आहेत म्हणून कांहीं बरें. त्यांस जर समजा-वून सांगितलें तर माझी खातरी आहे कीं त्या या गोष्टीस कधींही अडथळा करणार नाहींत.

सारांश, हिराबाईचा उद्देश व त्याचीं कारणें वा-जवी होतीं म्हणून तिनें हरकत घेतली नाहीं मग हिरा-बाईनें जाण्याचा दृढ निश्चय केला. आणि आपले माहेरीं जाऊन ही सगळी हकीगत आपले आईस कळवून तिची-ही आज्ञा घेतली. तसेंच शाळेंतील मुलींस समजावून सां-

गितलें कीं मी केवळ दोन महिन्यांसाठीं तिकडे जात आहें, तेव्हां तितके मुदतींत शांताबाई तुह्मांस शिकविण्यास योग्य आहे. मात्र तुह्मीं सध्यां येत आहां तशाच पुढें येत असा ह्मणजे झालें. नंतर ती निरोप घेण्यासाठीं आपल्या वडील बहिणीच्या येथें गेली.

बुद्धिवंत—(तीस पाहून) कसें काय विजयालक्ष्मी, बरी आहेसना? तूं निळगिरीस जाणार ह्मणून कालच मी ऐकिलें. बरें तुझ्या मागें शाळेची कशी काय व्यवस्था?

हिराबाई—भावोजी, हें काय विचारतां? माझ्या मागें घरदार व शाळा हीं सगळीं आपले स्वाधीन बरें!

बुद्धिवंत—तुझें तरी कसें चमत्कारीक बोलणें हें? अगे, तुझे शाळेशीं किंवा घराशीं माझा कांहीं तरी संबंध आहे काय? तेव्हां माझे हातून तें काय होणार?

हिराबाई—आतां संबंध ठेवा कीं नका ठेवूं, पण भावोजी हें सगळें आपले स्वाधीनचें आहे. आपण वडीलच आहां तेव्हां अधिक सांगितलें पाहिजे असें नाहीं.

बुद्धिवंत—विजयालक्ष्मी, तुला हें बोलणें शोभत नाहीं. बरें, माझे स्वाधीन असें त्यांत काय आहे? घर सोडण्यास तर तुझी बहीणच कारण झाली आणि शाळा आहे ती मुलींची. ती जर कां मुलांची असती तर मी मोज्या आनंदानें शिकवावयास गेलों असतों.

हिराबाई—भावोजी, आतां मागचें सारें एकदां पोटांत घाला; कारण झाली गोष्ट पुन्हा परत येत नाहीं. आणि आतां दोघेंजणें आनंदानें पुन्हां घरांत येऊन रहा, सासूबाई मागें एकट्या आहेत त्यांस तरी कोणाचा आधार पाहिजे ना?

बुद्धिवंत–एके ठिकाणीं राहण्यास माझी कोठें आड-काठी आहे ? पण आधीं तुझे बहिणीचीच समजूत कर.

हिराबाई–भावोजी, तिची समजूत ती कसली करा-यची? तिला आतां सगळें कळून आलें आहे. तुमच्या जिवाचे मात्र फुकट हाल होतात. वेळस प्रसंग पडला तर येथें कोणी तरी मुलांची जतन करणारा किंवा पहाणारा आहे काय ? सुख दुःख तर सर्वांस आहेच, त्याचे शिवाय कोणी राहिलेला आहे असें नाहीं. पण कांहीं कारण नस-तां निराळें राहून भाल्या दिवशीं आपदा भोगावी यांत फायदा तो कोणता ?

ताराबाईस आतां निराळें राहिल्यानें काय सुख आहे हें चांगल्या रीतीनें कळून आलें होतें आणि पुन्हा कोणी घरांत जाऊन रहाण्यास केव्हां सांगतें याची ती वाट पहात होतीच, म्हणून फारसे आढेवेढे घेतल्या-शिवाय या गोष्टीस ती राजी झाली आणि हिराबाईनें लागलेंच आपलेबरोबर उभयतांस घरीं नेलें. हिराबाई जाणार म्हणून बुद्धिवंताची आई जरी फार दुःखी होती तरी बुद्धिवंत व ताराबाई हीं दोघें घरीं आलीं असें पाहून तिला समाधान वाटलें. ताराबाई घरांत आल्यामुळें आतां आपला निभाव कसा लागतो म्हणून शांताबाईस मोठी धास्ती उत्पन्न झाली. पण हिराबाईनें तिला एकीकडेस नेवून तिची समजूत केली कीं, आजपर्यंत जें झालें तें झालें आतां पुन्हां तसें होणार नाहीं. इकडे आपले बहि-णीसही समजावून सांगितलें कीं शांताबाई आतां मोठी झाली आहे तेव्हां आतां तिच्याशीं पूर्वीप्रमाणें दांडगाईच्या गोष्टी करूं नको. शाळेच्या व्यवस्थेविषयीं बुद्धिवंतास सां-

गितलें कीं, शांताबाई ही लिहिणें वाचणें वगैरे सर्व कांहीं शिकवील, आपण फक्त देखरेख ठेऊन शाळेच्या फंडासंबंधी हिशोब वगैरे तिला लिहून देत असा ह्मणजे झालें. या प्रकारें हिराबाई सर्वांचा निरोप घेऊन आगगाडींत जाऊन बसली आणि परभारें बलेरी स्टेशनाचें टिकीट काढून निळगिरीस जाण्यासाठीं निघाली. तेथें पोंहचल्यावर इला एकाएकीं आलेली पाहून सत्यवंत फार चक्कित झाला आणि सर्वांचा क्षेम समाचार विचारल्यावर व जेवणखाण आटोप-ल्यावर उभयतांमध्यें येणेंप्रमाणें संभाषण सुरू झालें:—

सत्यवंत—कां, इतकी घाईकरून येण्याचें कारण काय? घरांत आईशीं भांडणबिंडण करून तर नाहींना आलीस? मला तर असाच रंग दिसतो.

हिराबाई—माझा तोच धंदा, आणखी काय आहे? आ-ज चार वर्षांत कोणाशीं कितीशीं भांडलें हें आपणांसच माहित. काय तरी बाई विचारणें हें! एक एक ऐकावें त्याचें नवलच वाटतें.

इकडे वाईट संगतीमुळें सत्यवंत हा अगदीं वेड्या-सारखा होऊन गेला होता, सभोंवतीं खुशामती लोकांचा जमाव नेहमी जमलेला असे, त्यांणीं त्यास अगदीं फुलजी करून सोडलें होतें. फौजदारी सत्ता हातीं असल्यामुळें लांच खाण्याचा खूब सपाटा चालला होता व नाच, बैठकी नेहमी होत असत. पगार एकपट तर खर्च चौपट! अशी स्थिति होती आणि हीच स्थिति जर कांहीं काळ पर्यंत अशीच चालली असती तर खरोखर साहेबास सत्यवंताचीं संशय येऊन चाकरीपरी चाकरी जाऊन कदाचित् अब्रूसही मुकावें लागलें असतें. पण हिरा-

बाई ऐन वेळेवर येऊन पोंचली ह्मणून बरें झालें. तिणें लागलीच आपमतलबी व लुच्चे लोकांची वैठक घरांतून उठविली आणि सत्यवंताची चांगली कान उघडणी केली कीं आतां परमेश्वर दयेनें तुह्मांस शंभर रूपये मिळतात ह्मणजे पूर्वी पेक्षां दसपट अधिक मिळतात तरीही त्यांत तुह्मी तृप्त नाहीं आणि लोकांकडून लांचेची आशा करितां तेव्हां यास काय ह्मणावें?

सत्यवंत—पण हा काय चमत्कार? कोणी खुषीनें देत असतां तें कां घेऊं नये?

हिराबाई--शिव शिव, हल्लींचे काळांत पैसा ह्मटला ह्मणजे लोकांस प्राणाहूनही अधिक झाला आहे. असें असतां तो कांहीं अर्थाशिवाय कोणास द्यावासा तरी वाटेल काय? आपल्यावरून जग ओळखावें. आपणच सांगा कीं अर्थाशिवाय आपण कोणास पैसा द्याल काय? गरीबास एक पैसा देणें झालें तर लोकांचा जीव जातो. तेव्हां त्यांचेजवळ अशी कोणती कुबेराची संपत्ति लागून गेली आहे कीं ते तुह्मांस अर्थाशिवाय कांहीं देतील! बरें इतके दिवस आपणांस कोणी एक पैही आणून देत नव्हता आणि आतांच कां देतात? तर याचें कारण हेंच कीं जेव्हां एखाद्या कज्याचा आपले तर्फे फैसला होण्याचा रंग लोकांस दिसत नाहीं तेव्हां ते निरुपाय होऊन कोणापासून तरी कर्जवाम काढून किंवा घरांतील दागदागिना विकून आपल्यास खुष करण्याकरितां पानसुपारी ह्मणून देत असतील.

सत्यवंत—मी कांहीं आपले हातानें पैसे घेत नाहीं मग त्याची भीति काय ह्मणून वाळगावी?

हिराबाई—अहो, पाप कधींही लपून रहावयाचें नाहीं, तें कधींना कधीं बाहेर पडावयाचें. तशांत घडीभर कबूल केलें कीं तें कदाचित् मनुष्यास समजणार नाहीं, पण सर्वसाक्षी परमेश्वर तो तर पहात आहे कीं नाहीं? तो तर याचा जबाब घेतल्या शिवाय रहाणार नाहीं.

या रीतीनें हिराबाईनें सत्यवंतास चार गोष्टी समजावून त्याची चांगली कान उघडणी केली व त्याजडून पुन्हां लांच घेणार नाहीं अशाविषयीं अभिवचन घेतलें. पुढें थोडे दिवस गेल्यावर हिराबाईनें विचारिलें कीं, ह्या ज्या चार मनुष्यांस रोजचे रोज आपले येथें जेवूं घालतां हे कोण आहेत व काय उद्योग करितात?

सत्यवंत—ते उमेदवार चाकरीसाठीं आलेले आहेत. ते बिचारे फार लांबून आले आहेत व इकडे तिकडे भटकत फिरत होते तेव्हां मला त्यांची दया येऊन त्यांस सांगितलें कीं, तुह्मांस रोजगार धंदा मिळे तों पर्यंत माझे येथें भाजी भाकर मिळेल ती खाऊन रहा.

हिराबाई—इतके दिवस झाले तरी एकासही चाकरी लागली नाहीं हें कसें?

सत्यवंत—चाकऱ्या पुष्कळ आढळतात पण त्या त्यांच्या मोठेपणास शोभतील अशा पाहिजेतना?

हिराबाई—ज्या अर्थीं यांची स्थिति येथपर्यंत येऊन पोंहचली आहे कीं दुसऱ्याचे गळीं पडून फुकटचे आयते तुकडे यथेच्छ घसून खातात त्या अर्थीं त्यांचा यांत मोठेपणा तो कोठें राहिला? त्यांणीं आतां आपले मोठेपणाकडेस न पहातां जशी मिळेल तशी लहान मोठी चाकरी धरावी आणि त्यांतच भूषण मानावें.

सत्यवंत—तुला तर आपली एक घाव आणि दोन तुकडे करण्याची संवय पडुंन गेली काहे. काय त्यांणीं आपल्या पदवीपेक्षां हलकी चाकरी पत्करावी? अशा यांस कांहींचका अब्रू नाहीं?

हिराबाई- हलकी चाकरी पत्करण्यांत मात्र यांची अब्रू जाते आणि फुकटचें बसून खाण्यांत जात नाहीं यास काय ह्मणावें? मला तर आतां खचीत वाटतें कीं, या लोकांस इतकी लज्जा नाहीं त्या अर्थीं यांच्यांत दुसरे कांहीं दुर्गुण असतील यांत संशय नाहीं. ह्मणून यांचा सहवास आतां चांगला नाहीं. खरोखर हे लोक आपले नांवानें लोकांपासून कांहीं तरी उपटाउपटी करीत असतील. यांची आतां भीड धरतां कामा नये, यांस निक्षून सांगावें कीं पाहिजे असल्यास चाकरी धरा किंवा आपली दुसरे कोणीकडेस तरी सोय पहा.

सत्यवंत—माझ्यानें तर एकदां आश्रय देऊन मग कोणाची भीड मोडवत नाहीं, तेव्हां मी सांगूं तरीं कोणत्या तोंडानें?

हिराबाई—त्यांसच्च जर भीड मर्यादा नाहीं तर मग आपण तरीं कशास ठेवावी? ह्मण आहे कीं "भिडे भिडे पोट वाढे" तशांतलें झालें. आपले कुटुंबांत काय थोडीं गरीब माणसें आहेत? त्यांस देण्याचा तर आपला पहिल्यानें धर्म आहे. आपल्यास धर्म करायाचाच आहे तर त्याचा प्रारंभ आपल्या आप्त सोयऱ्यांतच्च झाला पाहिजे. ह्मणून या लोकांस आपण कठीण शब्दांनींच सांगितलें पाहिजे असें नाहीं तर चार गोष्टी कोणत्याही रीतीनें समजावून सांगितल्या असतां आपोआप समजणार आहेत.

शेवटीं सांगायचें इतकेंच कीं हे गृहस्थ सत्यवंताचे चांडाळचौकडीपैकीं होते. पण हिराबाईनें त्यांस युक्तीचे मार्गानें थोड्याच दिवसांत काढून लाविलें, व चाकरांमधून जे जे दुर्गुणी असे तीस आढळले त्यांसही तिनें वाटेस लाविलें. याप्रमाणें हिराबाईनें दीड वर्ष तेथें राहून आंतील व बाहेरील सर्व कांहीं व्यवस्था नीट नेटकी केली. इतक्यामध्यें तिचे मावशीचा मुलगा उमाकांत याचें लग्न होणार होतें ह्मणून इला लग्नपत्रिका आली होती व शिवाय सुमतीनेंही फार आग्रहानें येण्याविषयीं लिहिलें होतें, आणि इलाही पुर्णे सोडून बरेच दिवस झाले होते, या सर्व कारणांमुळें तिनें घरीं जाऊन येण्याचा निश्चय केला; परंतु मनांत विचार केला कीं नवऱ्याला एकटें सोडून जाणें हेंही ठीक नव्हे. एके दिवशीं सहज गोष्टींवरून गोष्ट निघाली असतां ती सत्यवंतास ह्मणाली कीं, "प्रवासांत आपले जिवाचा कोणी असल्याशिवाय एकटें रहाणें हें बरोबर दिसत नाहीं, ह्मणून आपले मावशीचा मुलगा सुमंत यास आपलेकडे बलावून घ्या. तो तिकडे राहून अधिक तें काय करणार? इकडे आपणांबरोबर असला तर कांहीं कामाची माहिती करून घेईल, आणि तसाच कांहीं योग घडून आला असतां त्यास तुमचे हाताखालीं एकादी चाकरी मिळण्यासही उशीर लागणार नाहीं." यावरून सत्यवंतानें आपले मावशीस पत्र लिहिलें व हिराबाई तेथें असतांच सुमंत यास आपलेजवळ बोलावून घेतलें. हा मुलगा फार विश्वासू व मेहनती होता, आणि वयानें ह्मटला असतां सत्यवंतापेक्षां सारा दोन अंडीच वर्षांनीं लहान होता. तो येऊन पोहंचला तेव्हां हिराबाईला पुष्कळ धीर आला. मग ती ने-

थून निघून कोल्हापुरास आली. तेथें तिचा सासरा माधव-राव यांजजवळ ती एक आठवडा राहिली. माधवरावांचें नाहीं तरी या वेळेस साठ वर्षांहून अधिक वय होऊन गेलें होतें. कोल्हापूर सरकारचे चाकरींत त्यांस फार श्रम पडत असत. दररोज सकाळींच मुलकी व फौजदारी कचेऱ्यांतून जाऊन कोणाचे कशासंबंधी दावे येत ते तपासावे लागत असत, आणि तिकडून येऊन जेवले कीं लागलेच पुनः कचे-रींत जात. तेथें तर सर्व राज्याच्या जमाबंदीचा वगैरे हिशेब संध्याकाळपर्यंत पाहून फारच थकून घरीं येत असत. हें पाहून हिराबाई एकेदिवशीं सासऱ्यास ह्मणाली, "मामाजी, आतां हे तुमचे दिवस मेहनत करावयाचे नव्हत. आतां आपण घरीं बसून सुखानें आयुष्य घालवावें. मी एका वि-द्वान ग्रंथकाराचे पुस्तकांत वाचलें आहे कीं मनुष्यानें आ-पल्या आयुष्याचे बालपण, तरूणपण, आणि ह्मातारपण असे तीन भाग करून, त्यांतून पहिला भाग विद्या संपादन कर-ण्याकडे, दुसरा जगांतील व संसारसंबंधी कामकाजांकडे व द्र-व्य संपादन करण्याकडे, आणि तिसरा विश्रांति व ईश्वरभक्ति यांकडे घालवावा. करितां आपण आतां प्रापंचिक संबंधी सर्व कांहीं दगदग सोडून घरीं स्वस्थपणें ईश्वरसेवेंत आनंदानें काळ घालवावा इतकेंच माझें अज्ञान लेंकराचें आपल्या चरणापाशीं करद्वय जोडून मागणें आहे."

माधवराव— विजयालक्ष्मी, तुझें सर्व ह्मणणें अक्षरशः खरें आहे यांत कांहीं संशय नाहीं, व माझीही फार दिवसां-पासून हीच इच्छा आहे. पण काय करूं; महाराज मला सोडण्यास खुशी नाहींत. दुसरें, माझेबद्दल काम करणारा दुसरा कोणी तरी हुशार मनुष्य मिळाला पाहिजे ना?

हिराबाई— मामाजी, महाराजांजवळ जर आपण आपल्या ह्यातारपणाचें कारण सांगाल, तर मला वाटत नाहीं कीं ते या गोष्टीस कोणत्याही प्रकारें ह्मणजे हरकत घेतील. आतां आपल्याबद्दल काम चालविणारा पाहिजे तर आमचे भावोजी काय कमी हुशार आहेत ? ते आपलें काम चालवूं शकणार नाहींत ?

माधवराव— तूं ह्मणतेस खरी पण त्याला दरबारचे कामाची माहिती कोठें आहे ?

हिराबाई—मामाजी, त्यांस थोडे दिवस आणून जर आपलेजवळ ठेवाल तर मला वाटतें कीं तें काम त्यांचे सहज लक्षांत येईल. ज्यांला ट फ करतां येत नाहीं ते देखील कचेरीचें काम नुस्तें कैक दिवसांचे अनुभवानें करतात, मग भावोजी तर चांगले पाठशालेंत शिकलेले आहेत.

माधवरावांनीं विचार करून पाहिलें तों हिराबाईचें ह्मणणें योग्य आहे असें त्यांस वाटलें. पुढें हिराबाई ही पुण्यास येऊन पोंहचल्यावर माधवरावांनीं बुद्धिवंतास येण्याविषयीं पत्र पाठविलें. त्याणें तेथें गेल्यावर थोड्याच दिवसांत बापाचें सर्व काम लक्षपूर्वक पाहून ध्यानांत घेतलें व वेळोवेळीं बापाचें कांहीं काम त्यांचे गैरहजेरींत स्वतांच चालवून महाराजांस खूष करून सोडलें. पुढें एके दिवशीं माधवरावांनीं आतां आपला वृद्धापकाळ आला ह्मणून आपणांस रजा असावी, माझें काम चालविण्यास बुद्धिवंत हा आपले चरणापाशीं तत्पर आहे, इत्यादि सर्व कांहीं गोष्टी महाराजांस समजावून सांगितल्या. महाराज हे स्वभावतःच मोठे विचारवान व मायाळू होते त्यांणीं माधव-

रावांस त्यांच्या योग्य चाकरीबद्दल दरमहा पंचवीस रुपये पेन-शन ठरवून त्यांचे जागीं भर पगारावर वृद्धिवंतास कायम केलें..

शांताबाईची मागणी व तिचे लग्नाची तयारी.

———०००———

हिराबाई पुण्यांत येऊन पोंचल्यावर तिला शांताबाईचे लग्नाची फार काळजी लागली. प्रेमिलाबाई धार संस्थानांत आपले घरीं गेली होती, तीही याच संधीस पुण्यांत आपले माहेरीं आली असून तिला भेटण्याकरितां तिची मोठी बहीण वत्सलाबाई ही देखील सासऱ्यांहून नुकतीच आली होती. सरनोबतांचे घरचीं बहुतेक मुलें हिराबाईचे हाता-खालीं शिकलेलीं होतीं, ह्मणून या दोघी बहिणींस हिरा-बाई परत आल्याची बातमी लागतांच त्या मोठ्या उत्कंठेनें तिला भेटण्याकरितां तिचे घरीं धांवून आल्या. परस्परांचें क्षेमकुशळ विचारल्यावर संभाषण सुरू झालें तें असें:—

वत्सलाबाई— मास्तरीणबाई, काय सांगूं, आपली भेट एकदांची कधीं होईल असें झालें होतें. प्रेमिला तर आ-पली शिष्यच आहे, पण मी तिजहूनही आपली अधिक ऋणी आहें. कारण मला अंतरलेल्या घरीं आपण पुन्हां नांदायास लावलें, याबद्दल मी आपले उपकार जन्मोजन्मीं विसरणार नाहीं बरें.

हिराबाई—छेः, बाई असें बोलूं नका. आपणास घरांत नां-दायास लावण्याजोगा असा मजमध्यें कोणता गुण आहे?

वत्सला०—तुम्ही कांहीं कां ह्मणाना, परंतु आमच्या आं-गाच्या चामड्याचे जोडे जरी आपणास करून दिले तरी देखील उपकार फिटणार नाहींत, मग दुसरें तें काय?

हिराबाई– अगोदर मजकडून आपल्यावर उपकार कोणते झाले आहेत तेंच मला समजत नाहीं. त्यांतूनही माझी यःकश्चित् सेवा आपणास आवडलीच असेल तर आपण मोठ्या मनाच्या आहांत. ईश्वरानें आपणास सर्व गोष्टी अनुकूळ केल्या आहेत तेव्हां आपणास आह्मांसारख्या गरीबांस खुष करण्यास कांहींच अशक्य नाहीं.

प्रेमिला०–मास्तरीणबाई, आपण असें काय बोलतां बरें?

हिरा०– गडे प्रेमिले, मास्तरीणपणाचें नातें आतां बाकी राहिलें नाहीं; तें तुह्मी शाळेंतून गेलां तेव्हांच सरलें. आतां ईश्वरकृपेनें तुमचें लग्न जाहलें आहे, आपण मानानें मोठ्या आहां, व आपणास लक्ष्मीचें सार्वभौमत्व प्राप्त जाहलें आहे. बरें, इकडे कोणत्या गोष्टीची कमताई ह्मणावी तर तेंही नाहीं. इकडेही मोठ्या सरदारांच्या कन्याच आहांत. आज आपल्यासारख्या मोठ्या वजनदार अवघ्या शहरांत कोणी नाहींत. तेव्हां आपल्यासारख्यांच्या जवळ येऊन जर कोणाचा हेतु पूर्ण झाला नाहीं तर तो त्याच्या नशीबाचा दोष समजावयाचा.

प्रेमिला०–मास्तरीणबाई, असा आपला कोणता मनोदय आहे तो तर आधीं कळूं द्या.

हिराबाई– प्रेमिले, काय सांगूं; एक मोठा हेतु मनांत आहे. पण तो निर्फळ होणार नाहीं असें मला पूर्वी वचन द्याल तर मी सांगत्यें.

दोघी बहिणी– मास्तरीणबाई, काय हेतु आहे तो तर सांगा, देवाच्यान आह्मी तो सिद्धीस नेण्याविषयीं मनापासून झटूं. उलटें आह्मांस मोठें भूषण वाटतें कीं आपण एखादें काम आह्मांस सांगावें आणि आह्मी तें करावें.

हिराबाई—काम तर माझे मतें फार मोठें आहे, पण आपण दोघी बहिणी जर मनावर घ्याल तर सहज होण्या-सारखें आहे.

दोघी बहिणी—मास्तरीणबाई, आम्ही कीं नाहीं तुमचें काम करण्याविषयीं कोणत्याही प्रकारें आळस करूं तर ईश्वर साक्षी आहे. काम आमच्यानें होण्यासारखें मात्र पाहिजे.

हिराबाई—(पूर्ण वचन मिळालेंसें पाहून) आतां सांगूंच तर ? माझी अशी इच्छा आहे कीं आमचे शांताबाईस आपल्या बंधूस द्यावी.

हें ऐकतांच दोघी बहिणी स्तब्ध राहिल्या. नंतर ती गोष्ट ऐकिली न ऐकिलीशी करून त्यांनीं इकडच्या तिकडच्या गोष्टी काढल्या. कांहीं वेळानें दोघीजणी उठून जाऊं लागल्या, तेव्हां हिराबाईनें एका हातानें वत्सलाबाईचा व एका हातानें प्रेमिलाबाईचा पदर धरून म्हणाली, "बाई, कांहीं होवो पण मी आतां वचन खरें करून घेईन तेव्हांच आपल्यास सोडीन."

प्रेमिला०—पण मास्तरीणबाई, या गोष्टींत आमचा काय अधिकार ? तशांत धनपाळ तर लहान आहे. आमचे वडील आहेत अस्तां त्यांजपुढें आमचें काय चालणार आहे बरें ?

हिराबाई—वडील आणि विवाह जहालेल्या बहिणी आईचे बरोबरीच्या असतात व सोयरेसंबंध होणें तो सर्वांचे विचारानें होत असतो. म्हणून या गोष्टींत आई तुमचें अनुमोदन घेतल्याशिवाय राहणार नाहीं.

प्रेमिला०—मास्तरीणबाई, अजूनपर्यंत या गोष्टीची चर्चा आमचे येथें जाहली नाहीं. जेव्हां होईल तेव्हां आम्ही आपलें मत दिल्याशिवाय राहाणार नाहीं.

हिराबाई– आपल्यास अजून माहित नाहीं हें मोठें नवल समजावयाचें. अहो, आपले सर्जेराव यांचे येथें मागणी गेली होती, पण काय कारण झालें असेल तें देवास माहीत; मागणी तशीच परत आली.

वत्सलाबाई–आपणास हें वर्तमान कोठून कळलें असेल तें असो, पण याविषयीं आह्मांस कीं नाहीं अद्याप मुळींच माहीत नाहीं. माहिती होईल तरी कशी अजून आह्मांस आल्यास पुरा एक आठवडाही जाहाला नाहीं. आणि मागणी परत येण्यासारखें सर्जेरावांत कोणतें लांछन आहे तें नकळे.

हिराबाई–(पुन्हां एकवेळ दोघी बहिणींनीं ती गोष्ट सोडून दुसऱ्या गोष्टी काढल्या असें पाहून) बायांनो, माझा प्रश्न एकीकडेस राहिलाना ? त्याचें हो, कीं ना, काय तें उत्तर मला द्या.

वत्सलाबाई–मास्तरीणबाई, आपणच सांगा बरें कीं ह्याचें उत्तर आह्मी होऊन याच वेळीं कसें द्यावें तें?

हिराबाई– तें खरें आहे, पण मागणीची गोष्ट निघाली असतां आपण आमचे शांताबाईविषयीं शिफारस कराल अशी आशा आहे. लग्नाचे कामांत मुख्य पैसा, गुण, आणि रूप या तीन गोष्टींकडे पहातात. पैकीं पैसा ह्मणाल तर आह्मां गरीबांजवळ त्याचें नांव घ्यायास नको. गुणांविषयीं आपण शांतेस चांगलें ओळखितां; सुमारें दोन वर्षेपर्यंत आपण व ती एके ठिकाणीं होतां. आतां खरें सांगा कीं, लज्जा, भीड, मर्यादा, सात्विकपणा व बातचेत तसेंच लिहिणें, वाचणें, शिंवणें, कशिदा काढणें, स्वयंपाक करणें, इत्यादि सर्व गुण शांतेचे आंगीं आहेत कीं नाहींत ? माझी ती नणंद किंवा माझें हाताखालीं शिकलेली ह्मणून तिची मी बढाई सांगतें असें नाहीं, ईश्वरानें तिचे आंगीं पुष्कळ

चांगले गुण ठेवलेले आहेत. कां प्रेमिलाबाई, मी ह्मणत्यें हें खोटें आहे काय ?

प्रेमिलाबाई—मास्तरीणबाई हें काय सांगणें, अहो चंद्रास कोणी डाग लावूं शकेल काय ? शांताबाईसारखी गुणी मुलगी मोज्या घरांत सुद्धां मिळणें कठीण. फार तर काय, पण तिचे पासंगासही कोणी पुरणार नाहीं.

हिराबाई—वर मग गरीबी शिवाय आमच्यांत दुसरा कोणता दोष आहे ? तुह्मी असें समजूं नका कीं मी ह्मणजे लहान तोंडीं मोठा घांस घेत आहें. कारण सावाजी भोसले नागपूरकर यांस निवर्तल्यास अजून दोन पिढ्या लोटल्या नाहींत. त्यांच्याच घराण्यापैकीं आह्मीं आहोंत बरें.

दोघी बहिणी—मास्तरीणबाई, आपण आमच्यापेक्षां श्रेष्ठ आहां, आह्मी काय निराळे आहोंत, एकाच रक्ताचे व एकाच पदवीचे. हें ह्मणजे आपण सांगितलें पाहिजे असें नाहीं.

हिराबाई—तर मग माझी गोष्ट कबूल करण्यास आपणास हरकत ती कशाची ?

प्रेमिलाबाई—मास्तरीणबाई, तर मग आह्मी ही गोष्ट आज आईजवळ काढूं. पाहूं बरें ती काय बोलते ती.

हिराबाई—नुस्ती गोष्टच काढायची तर ती माझ्यानें नाहीं का काढवत ? पण तसें नाहीं. आपण खऱ्या मनोभावानें आईची समजूत केली पाहिजे. ज्या अर्थीं या गोष्टींची चर्चा चालली आहे त्या अर्थीं ती शेवटास न्या ह्मणजे झालें.

मग दोघी बहिणींनीं वचन दिलें कीं आपला जो मनोरथ आहे तो ईश्वर कृपेनें शेवटास जावो हेंच आह्मी इच्छितों. असें ह्मणून दोघी बहिणी तेथून निघाल्या.

दुसरे दिवशीं हिराबाई स्वतां मिराबाईस भेटण्यास गेली व दीडशें रुपये किमतीची एक शाल व एक जरीचा खण निलगिरीहून आणला होता तो तीस भेट दिला.

मिराबाई—मुली, तूं मला जेव्हां तेव्हां खालीं पहावयास लावतेस हें चांगलें नव्हे. अग, आह्मांसच तुझें उतराई झालें पाहिजे, असें असतां उलटें तुझेकडून आह्मी कांहीं तरी घ्यावें हें आह्मांस योग्य आहे काय ?

हिराबाई—आईसाहेब, हा जरीकांठी खण व ही शाल आपल्याकरितां मुद्दाम काढविली होती. तिचा आपण स्वीकार केलाच पाहिजे. आज कीं नाहीं जवळ जवळ वर्ष होत आलें ही घडी माझे पेटींत पडून राहिली होती, कारण माझा असा हेतु होता कीं पुण्यास आल्यावर स्वतः आपले हातें ही आपणास भेट द्यावी.

मिराबाई— मुली, मला खरोखर फार वाईट वाटतें. पण ज्या अर्थीं इतके लांबून मुद्दाम मजकरितां ती आणिली आहेस त्या अर्थीं ती तुला वाईट न वाटावें इतक्याच करितां घेतें. आणि तुझें कांहीं काम मजकडून होण्यासारखें असल्यास तें मजकडून करवून घेशील तर मला कांहीं अंशीं समाधान वाटेल.

हिराबाई—(इतकें वचन मिळतांच हात जोडून उभी राहिली आणि म्हणाली) आईसाहेब, माझा एक मनोदय आहे तो आपण पूर्ण कराल तर सांगत्यें.

मिराबाई— बरें बरें, कळूदे तर खरा कोणता हेतू तो.

हिराबाई— सांगूंच तर. पण आईसाहेब, आपणास कदाचित वाईट वाटेल.

मिराबाई—त्यांत वाईट काय वाटायाचें ?

हिराबाई—आईसाहेब, हेतु एवढाच कीं आमची शांताबाई आपल्या धनपाळास द्यावी.

मिराबाई—हात्तेच्या! यांत वाईट तें काय वाटायाचें! नवें तूं आधीं खालीं तर बैस, मग त्याचा विचार पाहूं.

हिराबाई—नाहीं आईसाहेब, मला अगोदर याचें काय तें उत्तर द्या.

मिराबाई—(हिराबाईस धरून खालीं बसवित्ये) मुली, लग्न ह्मटलें ह्मणजे कांहीं लहान सहान काम नव्हे. कुंभाराचे येथून मातीचें भांडें घ्यायचें असलें तर तेंही चांगलें पाहून व वाजवून घेतात; आणि हें तर लग्न. एक वेळ गांठी बांधून दिल्या कीं जन्मभर सुटावयाच्या नाहींत. ह्मणून मागचा पुढचा चांगला विचार करून काय करणें तें केलें पाहिजे. तूं सांगितलीस ही गोष्ट त्यांचे (नवऱ्याचे) कानावर घालून व माझ्या मोठ्या बहिणीचें व कुटुंबांतील दुसऱ्या एक दोन माणसांचें अनुमत घेऊन काय विचार ठरतो तो पाहत्यें. तशांत धनपाळ अद्याप बाळ आहे; त्याच्या लग्नाची इतक्यांतच काय घाई आहे?

हिराबाई—मी लहानतोंडीं मोठा घांस घेतात तसा आपल्यावर शब्द टाकला आहे, तथापि आपली कृपा असली तर त्याप्रमाणें होण्यास उशीर लागणार नाहीं.

पुढें मिराबाईनें याविषयीं फारशी विचारपुस केली नाहीं तरी तिचे मुद्रेवरून ही गोष्ट तिला वाईट वाटली असावी असें दिसलें नाहीं. जातेवेळीं हिराबाई प्रेमिला व वत्सलाबाई यांस सूचना करून गेली कीं ही गोष्ट हुडकून काढणें हें आतां आपले हातीं आहे. हिराबाई गेल्यावर दोघी बहिणींनीं शांताबाईची वाजवीपेक्षां फाजील स्तुति करून मि-

राबाईचें मन पुष्कळअंशीं वळविल्यासारखें केलें. पण तिची बहिण निराबाई इच्या जावेची मुलगी सुंदराबाई म्हणून होती, ती निराबाईचे मनांतून धनपाळ यास द्यावयाची होती, पण याविषयीं तिनें अद्यापपर्यंत मिराबाईजवळ गोष्ट काढली नव्हती. जेव्हां हिराबाईनें आपल्या नणंदेविषयीं गोष्ट काढली तेव्हां मिराबाईनें निराबाईजवळ जाऊन तिचें अनुमत विचारलें. निराबाई तर ही गोष्ट ऐकून फारच खिन्न झाली आणि शांताबाईची मागणी मोडून सुंदराबाईची मागणी कायम होण्यास काय युक्ति करावी या विचारांत पडली. म्हणून त्या वेळीं तर ती मिराबाईला कांहीं बोलली नाहीं, पण याचा विचार करून उदईक उत्तर सांगेन असें म्हणाली. दुसरे दिवशीं ती स्वतां मिराबाईचे येथें गेली आणि जेव्हां मागणीच्या गोष्टी निघाल्या तेव्हां तिला म्हणाली कीं "कोठें तुम्ही आणि कोठें हिराबाई. जमीन अस्माना चा फेर. तुमची बरोबरी त्यांच्यानें कधीं तरी होईल काय? बरें पण ही गोष्ट येथें कोणीकडून आली?"

मिराबाई—मास्तरीणबाई त्या दिवशीं स्वतां येथें आली होती तिणेंच ही गोष्ट काढिली.

निराबाई—तर मग मी आतांच मास्तरणीकडेस जातें.

असें म्हणून प्रेमिलाबाईस बरोबर घेऊन हिराबाईचे येथें गेली, आणि तिला म्हणाली, "काय मास्तरीणबाई, आपण इतक्या शाहाण्या सुरत्या असून आपणास एवढें कसें समजलें नाहीं कीं सोयरेसंबंध बरोबरीचे असतील त्यांच्याशींच होत असतो? त्यांनीं सर्जेरावांकडील मागणी कां फिरविली हें तुम्हांस माहीत नाहींका? त्यांणीं चांदीचा छपर

पलंग द्यावयाचा नाकारिला इतक्याच करितां. तर तुमी शांताबाईला देऊन तें आंदण काय द्याल?"

हिराबाई—बाईसाहेब, मी नुस्ती शांतेच्या मागणीविषयीं गोष्ट काढिली होती, देण्या घेण्याविषयीं नाहीं. आजि जो आपली मुलगी देणार तो आपले शक्त्यनुसार काहीं तरी देईलच; कांहीं नुस्ती मुलगी देणार नाहीं. आतां बरोबरी विषयीं जर ह्मणाल तर आह्मी किती श्रीमान आहोंत हें जगजाहीर आहे. सर्जेराव्यांचे चौथे हिशानें देखील आमच्यापाशीं माया नाहीं. तशांत आपल्यास आंदणाचीच विशेष पर्वा आहे असेंही नाहीं. ईश्वराचे दयेनें सर्व कांहीं गोष्टी आपणास अनुकूल आहेत. तेव्हां मुलगी करणें ती मात्र रूपानें व गुणांनीं पाहून केली पाहिजे. आणि शांतेस आपण रात्रंदिवस पाहत असल्यामुळें तिची कोणतीही गोष्ट आपणापासून लपली आहे असें नाहीं. आतां आमची जात कुळी कशी आहे हें आपणास सांगितलें पाहिजे असें नाहीं. कारण तें आपणास सर्व माहीत आहे.

निराबाई— तरी पण बरोबरीचे पाहून त्यांच्याशीं संबंध करण्याची रीत आहे ना?

हिराबाई—आईसाहेब, बोलण्याची माफी असावी. पण जेव्हां साबाजीरावानें या घरांत आपली बहीण दिली तेव्हां बरोबरी होती आणि आतां तेंच घर सोयरीक करण्यास मागेंपुढें पहात आहे. तेव्हां हा आपला दोष नव्हे तर आमचे नशिबींच तसें आलें त्यास आपण तरी काय करणार?

निराबाई—(हिरमुसल्यासारखी होऊन) मास्तरीणबाई, आपणास माझे बोलण्याचा राग आलासें वाटतें.

हिराबाई—बाईसाहेब, मी राग करून आपलें काय क-

रणार ? मला अशी उमेद होती कीं या गोष्टींत आपण मदत कराल परंतु तें एकीकडेसच राहून आपण या गोष्टीस ओंड येतां हें पाहून बरीक मला फार दुःख वाटतें.

निराबाई-मास्तरीणबाई, आपण मला बरें ह्मणा किंवा वाईट ह्मणा, पण आजपास मुलाची हौस पुरवितां येणार नाहीं व तें कीं नाहीं बरोबरीचा कोणी असेल तेव्हांच होणार आहे.

हिराबाई—होय बाईसाहेब, धन दौलतीचा संबंधानें आमच्यानें आपली बरोबरी करवणार नाहीं खरी, पण घराण्याच्या नात्यानें पहातां आमची व आपली बरोबरीच आहे. आतां कलाकौशल्य व बुद्धिज्ञान यांविषयीं जर विचाराल तर शांताबाईची बरोबरी करणारी आमच्या जातीची मुलगी साऱ्या हिंदुस्थानांत देखील मिळणें कठीण.

निराबाई—बरें. मास्तरीणबाई, राघोबादादांचा मुलगा आहे त्याचेबद्दल शांतेकरितां कां बरें गोष्ट काढली नाहीं ?

हिराबाई—बाईसाहेब, माझे ऐकण्यात असें आलें होतें कीं त्याची मागणी आपले सुंदराबाईला आली होती ह्मणून मी त्याविषयीं फारशी विचारपूस केली नाहीं. शिवाय मी असा विचार पाहिला कीं विद्या व लक्ष्मीचा योग आहे; विद्या श्रीमंतांस मोठें भूषण आहे व श्रीमंतांचे अंगीं तीस लौकिकास आणण्याचें सामर्थ्य आहे. तेव्हां हा योग जर घडून आला तर त्यांत उभयतांसही मोठें भूषण आहे. आतां राघोबादादांचे येथें आपली सुंदराबाई द्यायाची असल्यास बेलाशक द्यावी. या गोष्टींत आमचेकडून मुळींच हरकत होणार नाहीं.

निराबाई—आमची सुंदरा कीं नाहीं अजून बालक आहे,

तिचे लग्नाला तर फार दिवस पाहिजेत आणि तशांत माझा इरादा तिला कोठें तरी परक्या घरीं देण्याचा आहे, कारण नातेवाइकांमध्यें सोयरीक करणें हें बरोबर नाहीं. इतकें बोलून निराबाई निरोप घेऊन जाऊं लागल्या तेव्हां प्रेमिलाबाई तेथेंच बसून राहिली असें पाहून तीस म्हणाल्या, " कां मुली, येत नाहींस का !"

प्रेमिलाबाई—नाहीं मावशे तूं जा, मी फार दिवसांनीं मास्तरीणबाईजवळ आलें आहे. तेव्हां तिचेजवळ थोडा वेळ बसून येतें. (निराबाई गेल्यावर ती हिराबाईस म्हणाली) मास्तरीणबाई, आई तर या गोष्टीस राजी आहे; पण हीच माझी मध्यें आडवी येते. ही तोंडानें तर अद्याप पर्यंत उघड बोलत नाहीं पण इचा आंतील हेतु असा आहे कीं कोठून तरी सुंदराबाई आमच्या धनपाळास द्यावी.

हिराबाई प्रेमिले, हें आतां सर्व परमेश्वराधीन आहे, आणि जेव्हां यांच्यासारख्या मध्यस्थ आहेत तेव्हां त्यांचे-पुढें आमच्यासारख्या गरीबांचें काय चालणार आहे ! पण गडे प्रेमिले, मी कांहीं वावगा विचार केला नव्हता. हा जोडा चांगला शोभेल असें वाटलें म्हणूनच बोललें होतें. आपलें एवढें मोठें कुटुंब व त्यांत एकुलता एक मुलगा, तेव्हां एवढी मोठी धनदौलत आहे ती सर्व त्याची आहे. म्हणून या अशा धनदौलतीची नीट व्यवस्था लावण्याकरितां बुद्धीचें व सारासार विचाराचें साह्य पाहिजे. आमची शांताबाई गरीब कुटुंबांतली खरी पण ईश्वराचे दयेनें बुद्धि, चातुर्य व सारासार विचार जो तिच्यांत आहे तो मोठ्या श्रीमंतांच्या मुलींतही नसेल. आतां आपले घरांत कोणी अडाणी मुलगी येऊन तिनें

लाखो रूपयांचें आंदण आणिलें तर तें काय कामाचें?

प्रेमिलाबाई—मास्तरीणबाई, मीं आणि आक्कानें पुष्कळ प्रकारें आईची समजूत केली आहे आणि आतांही या सगळ्या गोष्टी पुन्हा आईस सांगेन आणि बहुतकरून तुमचा हेतु शेवटास जाईल असें मला वाटतें.

या प्रकारें हिराबाईनें प्रेमिलाबाईस चांगल्या प्रकारें शिकवून सवरून घरीं पाठविलें. इकडे निराबाईनें जाऊन आपले बहिणीस सांगितलें कीं "आपण मास्तरीणबाईची खूप खरडपट्टी काढिली. मी ह्मटलें असें करणें आपणास योग्य नाहीं. मनुष्यानें आंधरूण पाहून पाय पसरले पाहिजेत." निराबाई इतकें बोलली खरी पण तिच्यानें आपले जावेच्या मुलीविषयीं तोंडांतून शब्द काढवेना. पण मनांत समजली कीं "जो योग घडून येणार होता तो तर समूळ नाहींसा झाला, आतां परस्पर पुरुषां पुरुषांत गोष्ट काढावयास लावी ह्मणजे झालें." असा विचार करून आपले घरीं निघून गेली ती गेल्यावर मिराबाई आपल्या दोघी मुलींबरोबर या गोष्टीचा पुन्हा विचार करूं लागली.

प्रेमिलाबाई—आई, खरोखर विचारशील तर मावशीचे मनांतून सुंदराबाईला आमचे घरीं द्यायची आहे व त्याकरितांच तिचा एवढा हा खटाटोप चालला आहे.

मिराबाई—बरें धनपाळास तर इकडे हांक मार. त्याच्या मनांत काय आहे तें तर पाहूं.

वत्सलाबाई— (धनपाळास हाक मारून तो आला तेव्हां) आपा, तुझ्या लग्नाची बोलाघाट चालली असून सुंदराबाई तुला सांगून आली आहे; तर तुझा याबद्दल कसाकाय विचार आहे बाबा?

धनपाळ लज्जेमुळें आईचे पुढें कांहीं बोलला नाहीं पण आपले बहिणीकडे वाईट तोंड करून त्यानें आपली नाखुषी दर्शविली. वत्सला व प्रेमिलाबाई यांस तर हेंच पाहिजे होतें.

प्रेमिलाबाई—आई, रूप, लक्षण, विद्या, शहाणपण इत्यादि गुणांनीं पाहिलें असतां शांताबाईचे नखाचीही सर कोणास येणार नाहीं बरें. तिची हमी पाहिजे असल्यास मी घेतें. आतां तूं ह्मणशील कीं सोन्याचे दागदागिने आंदण मिळतील, तर ती बेलूनचालून गरिबाची मुलगी आहे; त्या बिचाऱ्यांजवळून दागिने कोठून व कसे मिळतील?

मिराबाई मुख्यत्वें आपणाला मुलीकडे पहावयाचें आहे. ईश्वरानें आपणास काय कमती केलें आहे बरें कीं त्यांचे आंदणावर नजर ठेवावी?

वत्सलाबाई—तर मग उशीर कां लावतेस आई? बाबाचे कानावर ही गोष्ट घालून काय तो एकदांचा ठराव करून शेरणी वांटून टाकावी ह्मणजे एकदांची कटकट गेली.

प्रेमिलाबाई—आई, आमच्या मास्तरीणबाई गरीब दिसतात खऱ्या पण त्या मोठ्या धूर्त व चलाख आहेत बरें. तोंडानें गरीब गरीब ह्मणतात खऱ्या पण ऐन वेळावर थाटास थाट जमवून देतील कीं नाहीं तो पहा.

मिराबाई—बरें तर मुली, संध्याकाळीं ते आले ह्मणजे त्यांचे कानावर ही गोष्ट घालून काय ह्मणतात तें पाहूं.

संध्याकाळीं जेव्हां सरनोबत घरीं आले तेव्हां वत्सला व प्रेमिलाबाई यांनीं शांताबाईची गोष्ट त्यांचे कानावर घालून तें प्रकरण तिचा पक्ष घेऊन त्यास अशा रीतीनें समजावून दिलें कीं जसा एखादा वकील आपल्या कुळाच्या तर्फेनें

पुरावा करीत असतो. सारांश गोष्ट वाजवी असल्यामुळें सरनोबतांचेही मनांत उतरली. हें पाहून दोघी बहीणींचा आनंद गगनीं मावेना. त्या लागल्याच धांवत धांवत हिराबाईजवळ गेल्या. बुद्धिवंताचे आईस या गोष्टीची मुळींच माहिती नव्हती म्हणून ती म्हणाली, "मुली, इतक्या उतावळीनें कां धांवतां, जरा जपून चाला."

प्रेमिलाबाई – मावशे, घाई कसची; मास्तरीणबाईजवळ जात आहों. (असें म्हणून हिराबाईचे जवळ जातांच म्हणाल्या) फत्ते, मास्तरीणबाई काम फत्ते, आतां आमचें बक्षीस काय तें येऊंद्या.

हिराबाई—ईश्वर आपणा सर्वांस यशाचा तुरा लावो. आपणास बक्षीस देण्यास अशी काय मी तालीवंत पडल्यें आहें? आपलें ईश्वराजवळ शुभ चिंतणें हेंच आपणास या बद्दल योग्य बक्षीस होय.

प्रेमिलाबाई—ती तर मास्तरीणबाई आपली कृपाच होय, पण आज आमचें तोंड तर गोड कराल कीं नाहीं?

हिराबाई—हं: आपणास मिठाई पाहिजे इतकेंच कीं नाहीं? कोण आहेग तेथें, सुमार्गे, हे पांच रुपये घेऊन शनवार पेठेंत जाऊन लाला मिठाईवाल्याचे दुकानावरून सुतरफेणी, मोतींपाक, जिलब्या व मुंबईचा अर्मीचंद्रचा हलवा इतकें घेऊन ये.

याप्रमाणें सुमार्गीला मिठाई आणावयास पाठवून आपण पानाचे विडे करूं लागली. मिठाई आल्यावर ती तारा, हिरा, वत्सला, व प्रेमिला या सर्वांनीं थोड थोडी खाल्ली व बाकीची शाळेंतील मुलींस पाठवून दिली. त्या दोघी बहिणी परत जाण्यास निघाल्या तेव्हां हिराबाई त्यांस म्हणाली कीं "अद्यापपर्यंत मी ही गोष्ट सासुबाईंचे कानावर घातली

नाहीं. पुष्कळ दिवसां मागें मामाजी व त्या ह्मणत असत कीं शांतेची सोय तेथें झाल्यास फार बरें होईल. पण ही गोष्ट येथपर्यंत येऊन पोंहचली आहे, हें अद्याप त्यांस माहीत नाहीं. ह्मणून त्यांचे कानावर हा सगळा प्रकार घालून त्यांचे अनुमत्तानें मागणी करतां एखादा चांगला दिवस नेमूं." इतक्या गोष्टी झाल्यावर दोघी बहिणी आपल्या घरीं गेल्या. इकडे हिराबाईनें आपली सासू शांतपणें बसली आहे असें पाहून तिला ह्मणाली, "सासूबाई, आतां शांताबाई मोठी झाली तरी तिच्या लग्नाची आपणास अद्याप काळजी नाहीं हें कसें?

सासू–काळजी करून काय करायचें? कोठें तरी चांगलें घर मिळेल तेव्हांच कीं नाहीं? माझे मनांतून तिला साधल्यास राधाबाईचा मुलगा यशवंतराव यास द्यावयाची आहे.

हिराबाई–काय सासूबाई? त्या यशवंतरावास होय! तो कोठें व आमची शांता कोठें!! त्याचें वय आमचे भावोजीं पेक्षां कांहीं कमी नसेल असें वाटतें.

सासू–होय, माझा बुद्धिवंत त्याचेपेक्षां सहा महिन्यांनीं वडील आहे. दोघांचाही जन्म एकेच वर्षी झालेला आहे हें मला पक्कें आठवतें.

हिराबाई–सासूबाई, तर हें काय थोडें अंतर ह्मणायचें?

सासू–तरमग दुसरा कोठें योग जमेलसें वाटत नाहीं.

हिराबाई–सासूबाई, माझे मनांत एक स्थळ आहे, तें आपणास मान्य असेल तर खटपट करून पहातें.

सासू–बरें असें कोणतें स्थळ सांग तर पाहूं.

हिराबाई–सरनोबतांचा मुलगा धनपाळ.

सासू—तूं ह्मणतेस तसें झालें तर मग सोन्याहून पिंवळें. आंधळा कांहीं दोन डोळे मागत नाहीं. पण " कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तटाणी " तसें कोठें सरनोबत व कोठें आह्मीं, आज त्यांचेजवळ इतकी लक्ष्मी आहे कीं अवघ्या पुर्‍यें शहरांतही कोणाजवळ तितकी नसेल. ते आमच्याशीं कोठले सोयरीक करायला? उगाच शब्द टाकून जनांत हंसें करून घेण्यांत कांहीं हांशिल नाहीं.

हिराबाई—सासूबाई, त्यांची श्रीमंती आपणास काय करायाची आहे! ते श्रीमंत असले तर आपले घरीं पंच पक्वान्नें खातील, आह्मी तर आमचे घरीं भाजी भाकर खाऊन आनंद मानूं. पण आमचे शांतेच्या आंगीं जे गुण व जी विद्या आहे ती त्यांच्या तेथल्या अनुभवीक व शहाण्या ह्मणविणाऱ्या बायांत तरी सांपडेल काय?

सासू— हेंही सर्व खरें, पण सर्व विद्या व कला कौशल्य कीं नाहीं एका पैशाचे समोर हात जोडून उभ्या रहातात. अगोदर सोन्या रुप्याच्या छप्परपंलंगाची तयारी करा तेव्हां पुढें त्यांच्याशीं सोयरीक करण्याची गोष्ट काढा, येवढें सांगितलें आहे कोणी! आपणा सारख्या गरीबांनीं या असल्या बडेजावांत पडणें मला तर प्रशस्त वाटत नाहीं. फार कशास त्या आपल्या सर्जेरावांस कशाची उणीव नसतांही त्याचे येथें गेलेली मागणी परत आली. मुली, गरिबांनीं आपल्या बरोबरीच्यांशीं सोयरीकें करावी यांतच शोभा आहे.

हिराबाई—सासूबाई, सौंदर्य ही हजार दौलतींत एक दौलत होय. हरिणीसारखे डोळे, गोंडस बांधा, स्वरू-

यानें व गुणांनीं संपन्न अशी मुलगी त्यांस मिळाली तर मग आणखी काय पाहिजे ?

सासू—कायग तूं पोरांसारख्या गोष्टी सांगत्येसही ? अग, बरोबरीचा निळाल्यावर मग कोणी सुंदरपणाका पहात बसतो ? आणि आमची मुलगी सुंदर आहे अशी टिमकी का वाजवीत फिरायचें ? आणि सुंदर बायका तरी सगळ्याच कोठें आवडत्या असतात ? मी पुष्कळ ठिकाणीं पाहिलें आहे कीं, मोठमोज्या सुंदर बायकांना पायपोसांचीही योग्यता नसते, पण ज्या कित्येक काळयासांवळ्या व ओबड धोबड असतात त्या अगदीं गळ्यांतल्या ताईत होऊन राहिलेल्या असतात.

हिराबाई-सासूबाई, सुंदरपणा ही एक अशी वस्तू आहे कीं जिच्या योगानें मनुष्य अगदीं मोहून जातो. पण ज्या स्त्रिया स्वरूपानें चांगल्या असून दुष्ट चालीच्या व खराब स्वभावाच्या असतात, त्या आपल्याच हातें आपल्या तोंडीं माती घालून घेतात यांत संशय नाहीं. पण त्या जशा दिसण्यांत सुंदर तशाच जर गुणांनींही चांगल्या असतील तर मग त्यांची किंमत कोण करील ! आमचे शांताबाईची गोष्ट अशीच आहे. म्हणजे ती जशी स्वरूपानें तशीच गुणांनींही चांगली आहे.

सासू—तें सगळें खरें, पण शेवटीं कांहीं आंदण तर दिलें पाहिजे ना ? आह्मां गरीबांजवळ त्यांचे डौलास साजण्यासारखी कोणती वस्तू आहे ? घरांत सुग्वाची भाजी भाकर खाऊन कोणाच्या देण्या घेण्यांत नसतां या भानगडींत पडून मग लोकांकडून छीः थू करून घ्या, ऐवढें कोणीं सांगितलें आहे ? घटकाभर असें समज कीं त्यांणीं ही

गोष्ट कबूल केली आणि तसा योगही घडून आला तरी शेवटीं आपली मुलगी हलक्या घरची ठरणार व तेणेंकरून आपल्यास कमीपणा येणार तो येणारच.

हिराबाई–सासूबाई, अब्रू आणि मोठेपणा कांहीं आंदणावरच अवलंबून असतो असें नाहीं. तर नवरा बायकोचें मन मिळण्यावर असतो. वत्सलाबाई काय थोडें आंदण घेऊन गेली होती, पण एक दिवस देखील सासरीं सुखानें काढला नाहीं. दूर कशाला, माझे अक्काला कांहीं थोडकें आंदण मिळालें होतें असें नाहीं. तिलाही माझे इतकेंच दिलें होतें. असें असतां दररोज भांडणें व तंटे कां चालले आहेत? तर हें ज्याचे त्याचे स्वभावावर व वर्तणुकीवर आहे.

सासू–अग, स्त्रीपुरुषांचें चांगलेपणें नांदणें हें आंदण देण्यावर नाहीं खरें, पण आंदण दिलें नाहीं तर सासरचीं मनुष्यें ठोमणा मारल्याशिवाय राहातील काय? एकट्या नवऱ्या मुलानें त्याकडे लक्ष दिलें नाहीं म्हणून काय झालें!

हिराबाई–सासूबाई, सासरच्या मनुष्यांशीं आपल्याला काय कर्तव्य आहे? आतां हें खरें कीं सासवा नणंदांच्या ठोमण्यांनीं अंमळ मनाला वाईट तर वाटणारच. पण प्रेमिला व वत्सला यांविषयीं मुळींच धास्ती बाळगण्याचें कारण नाहीं. त्या तर आमचे शांताबाईला जिवा पलीकडे जपतील अशा आहेत. बरें इतक्या उपरही शांतेला जाचच होऊं लागला तर मी कांहीं कोठें गेलें नाहींना? शांतेला वाईट रीतीनें वागवितील तर मला तोंड दाखविण्यास तरी त्यांजला जागा राहील काय!

सासू–बरें आतां तूं म्हणत्येस तरी काय? लग्न नुस्त्या शेरणीवरच का उरकायचें आहे!

हिराबाई–सासूबाई, आपल्यास राग येऊं देऊं नका. माझी इच्छा शांताबाई कोठून तरी चांगले घरीं पडावी अशी आहे. गरीबीमुळें शेरणी वांटायाला गुळ खोबरें मिळलें नाहीं म्हणून लग्न का रहातें? तशांतून आंदण देण्याची एक चाल आहे. तें आपल्यास अनुकूळ असेल तर द्यावें नाहीं तर नांव लौकिक मिळण्यासाठीं दिवाळें का काढावयाचें आहे? माझे शाळेंत मुक्ता नांवाची मुलगी शिकत असते तिचा बाप एके पलटणींत चाकर होता. त्यानें सत्तावन सालचे बंडांत कोण्या मडमेचा जीव वांचविल्याबद्दल सरकारांतून त्यास दहा हजार रूपये बक्षीस मिळाले होते. शिवाय त्या धांदलींत त्यास लूट मिळाली होती ती निराळीच. ते नुसते दहा हजार रूपये जरी त्यानें बेताबातानें खर्चिले असते तरी त्यास जन्मभर मोज्या अब्रूनें राहतां आलें असतें. पण शिपायबोवा जे रंगांत आले ते सरकारांतून मिळालेले दहा हजार रूपये व शिवाय कर्ज काढलेले हजार बाराशें रूपये एका मुलाचे व मुलीचे लग्नांत उधळून बसले. त्या वेळीं त्यांची जिकडून तिकडून मोठी वाहवा झाली, पण आतां घरांत वेळेस अन्न मिळण्याची पंचाईत पडूं लागली आहे. त्या लग्नांत मीही गेल्यें होत्यें. तेव्हां काय विचारता, जिकडे तिकडे हंड्या झुंबरांचा लखलखाट पडला होता, व कोंचें, खुर्च्या यांची एकच गर्दी होऊन गेली होती. तेव्हां मुक्तेच्या आईजवळ मी सहज म्हटलें, "बाई, सध्या हा डामडौल डोळ्यांस सुख व मनास आल्हाद देत आहे खरा पण पुढें हाच नडणार आहे. म्हणून मनुष्यानें मागचा पुढचा विचार पाहून वागलें पाहिजे." इतकें तोंडांतून

आलें मात्र तों तिच्या अंगाचा अगदीं तिळपापड झाला. तिनें झटलें असेल, " खर्चणारांचें खर्चतें आणि पहाणारांच्या पोटांत ढवळतें. "

सासू—तें सगळें खरें, पण जगाच्या तोंडाला हात कोण लावतो! आपणांस त्यांतच रहाणें आहे तेव्हां जवळ कांहीं असो अथवा नसो, पण जनरूढीप्रमाणें केलेंच पाहिजे. मी एकदां दयानन्द सरस्वतीचे व्याख्यानांत वाचलें होतें कीं पूर्वी आरबलोक मुली जन्मतांच त्यांस मारून टाकीत असत. याचें कारण तरी हेंच असावें.

हिराबाई—सासुबाई, इतक्या लांब कशाला जातां; आपल्या देशांतील रजपूत लोक देखील हें दुष्ट साहसकर्म करीत असत. परंतु इंग्रजसरकारचें राज्य झाल्यापासून ही व अशाच दुसऱ्या निर्दयपणाच्या कित्येक चाली कायदा करून सरकारानें बंद केल्या. तरी देखील अजून कैकवेळां चोरून मारून केलेल्या बालहत्या उघडकीस येतात.

सासू—खरें आहे. जनरूढीपुढें कोणाचें शहाणपण चालत नाहीं.

हिरा०—सासुबाई, पण गरीब लोकांला श्रीमंतांची रूढि काय कामाची बरें?

सासू—कामाची नाहीं हेंही खरें आहे. इंग्रज सरकार जर लग्नकार्यांत अवाढव्य खर्च करण्याचें मना करील तर किती चांगलें होईल बरें?

हिरा०—सासूबाई, कलकत्त्याकडे अशी एक मंडळी झाली आहे व सरकारही या गोष्टीस अनुकूळ आहे असें थोड्या दिवसांवर वर्तमानपत्रांत वाचलें होतें खरें पण त्याचा विचार करण्याकरितां सरकारांतून मोठमोठ्या गृह-

स्यांस बोलाविलें होतें, व त्यांच्या मतानें लोक स्थितीचे मानानें खर्चाची एक यता कायम केली होती, व आंदण अमुक अमुक द्यावें असेंही ठरलें होतें. पण आपले लोकच जर एक मतानें व एक विचारानें चालतील तर हा डामडौल व उधळेपणा सहज कमी होऊन त्यांची अब्रू रहाणार आहे.

सासू—मुली, डामडौलाविषयीं जें तूं म्हटलेंस तें खास्तविक नाहीं. कारण ईश्वरानें ज्याला दिलें आहे त्यानें खर्च केला तर तो वावगा नाहीं. पण ज्याचे पदरीं एक कवडी सुद्धां नाहीं त्यानें मात्र तसें करणें अनुचित होय.

हिरा०—सासूबाई असें म्हणूं नका, केवळ लग्नकार्यांकरितांच जे खर्च आहेत ते फार थोडे असून बाहेरील डामडौलाकरितांच फार अवाढव्य खर्च होत असतो. पहा आपल्या लोकांत वराती, नाच, तमाशे, गाणीं, दारूकामें वगैरे पुष्कळ प्रकार होत असतात त्यांस शेंकडो रुपये खर्च होतात कीं नाहीं?

सासू—नाच, तमाशे ज्यांचें येथें होत असतील त्यांस तें माहित. पण आमचे येथें असा कोणता वावगा खर्च होणार आहे सांग बरें?

हिराबाई—कां नाहीं? वरात, तासे, वाजंत्री, हिलाल, मशाली, मंडप, दागिने ह्या सर्व गोष्टी बढाईच्याच आहेत.

सासू—तर मग उवडपणें असें कां नाहीं म्हणत कीं लग्न करणें हीच एक बढाई!

हिराबाई—(किंचित् गालांत हंसून) छेः छेः, सासूबाई, असें म्हणूं नका. लग्न करणें हा एक ईश्वराचे घरचा नियम आहे. पण त्या प्रीत्यर्थ वेडे वांकडे संस्कार करणें हा मात्र वेडेपणा होय.

सासू—बरें, मंडपबिंडप हा वेडेपणा असें घटकाभर मानिलें; पण लत्ताकपडा, दागदागिना, यांसही तूं वेडेपणा ह्मणतेस याचें मात्र मला मोठें नवल वाटतें.

हिराबाई—सासुबाई, साधा कपडा आणि साधे दागिने यांला कांहीं हरकत नाहीं; परंतु मोज्या किमतीचीं लुगडीं, चोळलग, दागदागिनेहीं काय बरें कामाचीं? माझे जडावाचे दागिने व उंची कपडे जंगून व कुजून जात आहेत कीं नाहींत? ते घरांत तर नेहमीं वापरतां येत नाहींत, कधीं कोठें लग्नकार्य किंवा सणवार असला तर तेवढ्या वेळेकरितां मात्र त्यांचा उपयोग, बाकी बारा महिने पेटींत दडून ठेवलेले. त्यांस वरचेवर ऊन दाखविण्याची व स्वच्छ करून ठेवायाची मात्र दगदग. विकायास गेलें तर मालाचें मोल तें सुद्धां बरोबर येत नाहीं, मग करणावळ कुठची! आपण कोणा रावबहादुराचें थोड्या दिवसां पूर्वी सोलापुर मुक्कामीं लग्न झालेलें ऐकलें असेल. तशा प्रकारचें साधें लग्न मला फार आवडतें.

सासू—उगाच रावबहादुरांच्या फुशारक्या मजकडे कशाला मिरवितेस! त्यांनीं असें कोनाकोपऱ्यांत कांहीं केलें तरी लोक त्यांची टर उडविल्याशिवाय का रहातात?

हिराबाई—लोक काय पाहिजे त्याची टर उडवितात, ह्मणून आपण जें चांगलें तें टाकून वाईट करावें हें कांहीं योग्य नव्हे.

सासू—तर मग तुझे मनांतून आपण त्यांच्यासारखें एकांत वासांतल्यासारखें लग्न करावें कीं काय?

हिराबाई—सासूबाई, खरोखर पुसाल तर लोकांचे बोलण्याची मी कांहीं परवा करीत नाहीं. माझें जर चालण्याजोगें

असतें तर शांताबाईचें लग्न त्या रावबहादुरांप्रमाणेंच अगदीं साधेपणानें केलें असतें.

सासू– तुला माझ्या गळ्याची शपत आहे. असला हेकटपणा तूं आतां धरूं नको. आणि आतां मला कुठें आणखी पांच दहा लग्नें करायाचीं आहेत ? असें नाहीं, तेव्हां माझ्या डोळ्यां देखत एवढें शांतेचें लग्न थाटमाटानें झालें म्हणजे माझीं गंगेस घोडीं न्हालीं !

हिराबाई–सासुबाई, मी आपल्या तर मनांत दृढ निश्चय केला आहे कीं या कार्याकारितां म्हणून एक पैसा देखील कर्ज काढायाचा नाहीं किंवा घरांतील दागिना गहाण ठेवायाचा नाहीं. जीं कांहीं चिरगुट लुगडीं या कार्याकारितां राखून ठेविलीं आहेत तीं आणि शेवटीं भावोजींकडून कांहीं रुपये आल्यास तेवढ्यांत जें कांहीं करतां येईल तितकें करायचें म्हणजे पुष्कळ झालें.

सासू–हो, हो, हो. तिकडून काय येणार तें समजतेंच आहे. आणि तेवढ्यांत जर सर्व आटोपेल तर आंधळा कांहीं दोन डोळे मागत नाहीं. पण नवऱ्यामुलाकडचीं मनुष्यें या अशा पोरखेळांस राजी होतील तेव्हांच कीं नाहीं ?

हिराबाई–बरें त्यांलाही कोणत्या तरी युक्तीनें राजी केलें तर मग ?

सासू–त्यांचें राजी होणें कांहीं मस्करी नाहीं. त्यांचा एकुलता एक मुलगा, तेव्हां त्याची हौस पुरविण्यास ते अगदीं कमी करणार नाहींत. म्हणून त्यांचे डौलास जो कोणी उतरेल त्याजबरोबरच ते सोयरीक करितील आणि आपली सगळीं हौस पुरवून घेतील.

हिराबाई–सासुबाई, ज्या दिवशीं मी निळगिरीहून येथें*

आलें त्या दिवसापासून याच गोष्टीच्या विवंचनेंत आहें आणि, आतां बहुतेक जमल्यासारखें झालें आहे. हरकत काय ती आंपल्याकडूनच आहे. आतांच प्रेमिलाबाई व वत्सलाबाई धांवत धांवत आल्या होत्या त्या सांगून गेल्या कीं ही गोष्ट सरनोबतांस देखील मान्य झाली आहे. निराबाईनें कीं नाहीं आपले पुतणीविषयीं पुष्कळ आग्रह केला पण शेवटीं कांहीं एक निष्पन्न झालें नाहीं. याकरितां आतां वेळ घालवूं नका. उद्यां मंगळवार मंगलदायक आहे करतां उद्यांचे उद्यां साखर वांटून एकदांचें ठरवून टाका ह्मणजे पढें लग्नाचें पहातां येईल.

सासू—ही गोष्ट तर सोन्याहून पिंवळी आहे. त्यांची स्थिति आपले स्थितीशीं ताडिली असतां ती हजार पटीनें अधिक चांगली आहे, पण त्यांचे डामडौलास शोभेल असें करण्यास आपल्याला मात्र सामर्थ्य नाहीं. इतकीच काय ती अडचण आहे.

हिराबाई—सासुबाई, कोणतीही गोष्ट घडवून आणणारा सर्वसमर्थ प्रभु आहे. तेव्हां तोच ती अडचण दूर करणार नाहीं ह्मणून कशावरून? ज्या अर्थीं शांताबाईचा अशा मोठ्या घरीं पडण्याचा योग त्याणें घडवून आणला आहे, त्या अर्थीं तोच आपल्या सामर्थ्यानें ह्या अडचणींतनही आह्मांस पार पाडील.

सासू—बरें तूं त्यांचे कानावर ही गोष्ट घातली असशीलच, आतां त्यांना येऊंदे ह्मणजे त्यांच्या विचारानें साखर वांटण्याचा बेत करूं.

थोड्या वेळानें माधवराव बाहेर गेले होते ते घरीं

आले, आणि मागणी पक्की होऊन साखर वांटण्याची मात्र खोटी आहे असें ऐकून फारच आनंदित झाले आणि ह्मणाले कीं "आतां विलंब न लावतां उद्यांच्या उद्यांच साखर वांटण्याचें करा ह्मणजे झालें." त्याप्रमाणें हिराबाईनें प्रेमिलेचे माहेरीं कळविलें. दुसरे दिवशीं नवऱ्यामुलाचे येथून पांच मण मिठाई, खण, लुगडीं व पांच मोहरा आल्या. तसेंच इकडूनहीं जांवईबुवांकरितां शेला पागोटें व सवामण मिठाई गेली. नंतर सरनोबतांनीं माधवरावांस सांगून पाठविलें कीं, "आतां दिवस थोडे राहिले, माझा बेत काशियात्रेस जाण्याचा आहे, त्यास हीच काय ती हरकत आहे. या आयुष्याचा नेम नाहीं, घडी जाते ती आपली. तेव्हां आपण फाल्गुन वद्य प्रतिपदेचा जर मुहूर्त धराल तर मजवर मोठी कृपा केल्यासारखी होईल." हा निरोप माधवरावांनीं हिराबाईस कळविल्यावर तिणें सांगितलें कीं " त्यांस तूर्त इतकाच निरोप पाठवा; कीं आह्मी त्याच तयारींत आहोंत व जितकी लवकर तयारी होईल तितकी करण्यास झटत आहों. आणि आपले डामडौलास कांहीं तरी शोभा येईल असें करण्यास आमचे शक्ति प्रमाणें पहात आहोंत व त्याची तयारीही चालविली आहे." हा निरोप सरनोबतांस पोंहचल्यावर त्यांणींही लागलेंच सांगून पाठविलें कीं "आह्मीं आपल्याशीं सोयरीक केली ती आपणाकडून आह्मांस कांहीं तरी प्राप्त व्हावें किंवा आमच्यासारखा आपल्याकडून खर्च व डामडौल करवावा या उद्देशानें केली नाहीं, तर केवळ मुलीच्या गुणांकडेस पाहून केली आहे. यास्तव आपणास कोणत्याही गोष्टींविषयीं काळजी करणें नलगे." त्यावर माधवरावांनीं उत्तर पाठविलें कीं "आपले

मर्जी बाहेर आम्ही नाहीं. आपण म्हणतां त्या मुहूर्तासच लग्न धरण्यास आम्ही कबूल आहों."

शेवटीं फाल्गुन वद्य प्रतिपदेचा मुहूर्त कायम झाला आणि त्याला फारच थोडा वेळ राहिल्यामुळें दोहोंकडील तयारी मोठे तांतडीनें होऊं लागली. तयारी होत असतां खर्चाविषयीं माधवरावांस मोठी काळजी पडली, कां कीं वेळ फारच थोडा राहिला म्हणून कधीं कधीं मनांत विचार करीत कीं, तिलकचंदापासून कर्जी रुपये काढावे व पुन्हा मनांत आणीत कीं भारी व्याजानें रुपये काढण्यापेक्षां बाग आहे तो विकून टाकावा, किंवा गहाण ठेवावा. एके दिवशीं हिराबाईनें आपल्या सासऱ्यास चिंतातूर पाहून विचारलें कीं "मामाजी, हल्लीं आपण असे चिंतातूर कां दिसतां वरें ?"

माधवराव— काय सांगूं मुली, मुहूर्त अगदीं जवळ येऊन ठेपला तरी अजून खर्चाविषयीं कांहींच तजवीज होत नाहीं. तिलकचंदापाशीं रुपयांविषयीं गोष्ट काढिली होती पण तो भलभलतींच निमित्यें सांगतो. म्हणून बाग आहे तो गहाण ठेवावा किंवा सोईवार जमल्यास विकून टाकावा असा बेत केला होता, परंतु त्यासही कोणी सावकार उभा रहात नाहीं. आतां मोठी फजितीचीच वेळ आली आहे.

हिराबाई— मामाजी, आपण आतां कर्जाचें नांव सुद्धां काढूं नका व इनामी जमीन आहे तीही विकूं नका. कांकीं कर्जासारखा मोठा शत्रु दुसरा कोणी नाहीं व इनाम जमीन आहे ती विकून टाकण्यास फार उशीर लागणार नाहीं, पण तशी पुनः मिळविण्यास महा प्रयास पडतील.

माधवराव– कर्ज काढूं नको व बागही विकूं नको, तर काय मी जादूगीर आहें किंवा मजपाशीं ब्रह्मव्हाट्स्की बाईसारखें योग साधन आहे कीं त्याचे बलानें द्रव्य संपादन करूं? करूं तरी काय तें सांग पाहूं?

हिराबाई– मामाजी, आपल्यास राग येऊं देऊं नका, पण मी म्हणतें कीं पहिल्यानें घरांत आहे काय नाहीं काय तें पाहून नंतर जरूर किती आहे हें मागाहून पहातां येईल. चोळीलुगडें व शेलापागोटें तर पहिल्यानें तयार करून ठेविलें आहे. कांहीं खणांची आयत्या वेळीं गरज लागली तर माझे लग्नाचे वेळचे पुष्कळ खण पेटींत उगाच पडून राहिले आहेत ते काढितां येतील. तांब्या पंचपात्री वगैरे भांडीं काल आणलींच आहेत, छपरपलंग पाहिजे तर माझेच पलंगास मच्छरदानीची चौकट बसवून घेतली व पुन्हा रोगण देऊन चकचकीत केला म्हणजे तोच कामास येईल. आतां अडचण कोणती ती रोकड रकमेची व शांतेस आणि जांबुवंतास कांहीं दागदागिने कराल त्याची. तर आपल्यापाशीं थोडेबहुत रोख रुपये असतीलच, केवळ अगदींच नाहींत असें नाहीं.

माधवराव– होय, माझेपाशीं पांचशें रुपये रोख शिल्लक आहेत.

हिराबाई– मामाजी, पांचशें रुपये आहेत तर मग आणखी काय पाहिजे? मी ज्या वेळीं निळगिरीस जावयास निघालें होतें, तेव्हां मजजवळ शाळेच्या फंडांतले ४०० रुपये शिल्लक होते ते तसेच अनामत ठेविले आहेत. शिवाय मी गेल्यावर माझे मागें २०० रुपये जमा झालेले आहेत, त्यां पैकीं अर्ध्या म्हणजे १०० रुपयांवर माझे आकाचा हक्क

आहे व बाकी राहिलेल्या १०० रूपयांवर शांताबाईचा आंह. ही शेवटची रक्कम मिळविली ह्मणजे शाळेच्या फंडा पैकीं-च ५०० रूपये होतात. शिवाय ३०० रूपये पाठवून देण्याविषयीं मी निळगिरीस कालच लिहिलें आहे, व आप-णाकडूनही भावोजींस २०० रूपयांविषयीं पत्र गेलें आहे. ते आले ह्मणजे सर्व मिळून १,५०० रूपये होतील. तसेंच हजारांचीं रत्नजडित कांकणें जीं मला प्रेमिलाबाईचे लग्नांत बक्षीस मिळालीं होतीं, तीं माझे मनांतून शांताबा-ईस द्यावयाचीं होतीं. पण मागाहून विचार सुचला कीं ज्या घरचीं कांकणें त्याच घरीं परत देणें हें योग्य नाहीं. मामाजी, मला आणखी दुसरा विचार सुचला आहे कीं आपण जर भावोजींस आणण्याकरितां कोल्हा-पुरीं जाल आणि महाराजांपाशीं त्यांचे रजेविषयीं गोष्ट काढतांना घरीं लग्न कार्य आहे असें सुचवाल तर महाराज मोठ्या मनाचे आहेत आणि आपण अवघें आयु-ष्य त्यांचे सेवेंत घालविलें आहे, ह्मणून या कार्यांत ते आपणास कांहीं तरीं मदत केल्या शिवाय रहाणार नाहींत. कारण आपल्या येथें इमानें इतबारें काम केलेल्या चाक-रांस अशा प्रसंगीं मदत करण्याची चाल आपले देशांतील राजेरजवाड्यांत पुरातन काळापासून एकसारखी चालत आलेली आहे.

याप्रमाणें हिराबाईनें आपल्या सासऱ्याची समजूत करून त्यास कोल्हापुरीं पाठविलें. माधवराव कोल्हापुरीं पोंहचल्यावर महाराजांचे भेटीस गेले. छत्रपति महाराजांनीं ह्यांस पाहून एकाएकीं येण्याचें कारण काय ह्मणून विचा-रलें. माधवराव ह्मणाले, " सरकार, आपले पायांशीं अर्ज

काच आहे कीं माझी एकुलती एक कन्या शांताबाई हिचें लग्न करण्याचें योजिलें आहे, व आपले चरण लग्नमंडपीं लागावे असा हेतु आहे. तसें न होईल तर निदान आपल्या घराण्यापैकीं कोणी तरी लग्नास यावें ह्मणजे झालें. अथवा सरकारचे मुख्य दिवाण साहेब हल्लीं पुणे मुक्कामीं अनायासें गेले आहेत त्यांस जरी लग्नास जाऊन मंडपशोभा करण्याची आपणांकडून आज्ञा होईल तरीही मजवर फार उपकार होतील. दुसरी विनंती ही कीं माझा थोरला मुलगा बुद्धिवंत आपल्या पायांपाशीं आहे त्यास एक महिन्याची रजा असावी." छत्रपतींनीं बुद्धिवंतास रजा देण्याचें कबूल करून माधवरावांस येण्याजाण्याचा खर्च दिला आणि पुण्यास मुख्य दिवाणास हुकूम पाठविला कीं "तुह्मीं माधवरावांचे मुलीचे लग्नास माझ्या तर्फेनें जावें व पांचशें रुपये आंदण द्यावे." याप्रमाणें हिराबाईचे मसलतीनें बसल्याबसल्या पांचशें रुपये सहज आले. यामुळें द्रव्याची जिकडून तिकडून अगदीं गर्दी होऊन गेली. तसेंच हिराबाईचे चातुर्येतानें दागदागिनें व सर्वप्रकारच्या सामानसुमानाची तयारी अशी उत्तम प्रकारें होऊन गेली कीं ती पाहून माधवराव अगदीं खुष होऊन गेले. नवऱ्या मुलाकडचे लोक ही तयारी पाहून फार दंग झाले. ते जी जी वस्तू व सामान पहात तें तें मोठ्या किमतीचें असून नवीन तऱ्हेचेंच आहे असें दिसे. याप्रमाणें दागिनें व आंदण यांची रेलचेल होऊन गेली. नाकांत टिकेची नथ; कानांत कर्णफुलें, कारलें, घोंसबाळी व बुगडी; हातांत बाजूबंद, गोखरू, कांकणें व पाटल्या; डोकींत मुद, राखडी व केतक; गळ्यांत तांदळपोत, ठुशी वज्रटीका व सरी; पायांत सांखळ्या, गेंद,

बैंजण व मासोळ्या; इत्यादि दागीने शांताबाईस घातले. हे सर्व नवे व जुने दागिने मिळून किमानपक्ष दोन हजांरावर झाले होते.

सारांश सांगावयाचें इतकेंच कीं तें लग्न उभय पक्षांस साजे अशा रीतीनें मोठ्या थाटानें लागलें आणि शांताबाई सासरीं रहावयास गेली. तिचें सासरचें नांव सुभद्राबाई असें ठेविलें. सरनोबत व त्यांचे वडील बंधु जगन्नाथराव ऊर्फ भाऊसाहेब हे फार निस्पृही व सचोटीचे मनुष्य असून त्यांची स्वधर्मावर फार श्रद्धा असे. पुष्कळ दिवसांपासून सरनोबतांनीं काशियात्रेस जाण्याचा बेत केला होता परंतु त्यांस धनपाळाचे लग्नाची कायती हरकत होती, असें मागें सांगितलेंच आहे. लग्न झाल्यावर थोडे दिवस ते सुभद्राबाईची चालचलणूक व रीतभात पहात राहिले. शांताबाईनें हिराबाईचा कित्ता इतका हुबेहुब गिरविला होता कीं कोणतेही गोष्टीविषयीं तिला नांव ठेवण्यास जागा उरली नव्हती. सरनोबत हे जों जों तिजवर अधिक लक्ष ठेवीत, तों तों, ती फार बुद्धिवान, मर्यादशील व प्रत्येक कामांत चाणक्ष अशी दिसे. म्हण आहे कीं, आधींच दूध आणि त्यांत साखर तशी शांताबाई ही मूळचीच बुद्धिमान आणि तशांत तिला हिराबाईचें शिक्षण मग काय विचारतां? सरनोबतांची बालंबाल खात्री होऊन चुकली कीं आपले कुळाचा आज खरोखर उद्धार झाला. ही सुभद्रा आपले घराण्याची कीर्ति व लक्ष्मी निःसंशय वाढवील. नंतर सरनोबत घरची सर्व कांहीं व्यवस्था धनपाळावर संपवून आपण काशियात्रेस चालते झाले. व काशियात्रा करून आल्यानंतरही आपण घर संसारात फारसें लक्ष न देतां तो धनपाळावरच संपवून

आपला सारा वेळ ईश्वरभजनांत घालविते झाले. शांताबाईचें लग्न होऊन ती जरी स्वतंत्र झाली होती, तरी हिराबाईचें अनुमोदन घेतल्याशिवाय कोणतेंही मोठें काम स्वबुद्धीनें करीत नसे. सरनोबतांचें घर म्हटलें म्हणजे लहान सहान नव्हे, तर मोठ्या जहागिरदाराच्या घराप्रमाणें सदा गजबजलेलें असायाचें. तथापि त्याचा कारभार शांताबाईचे धोरणानें व अनुमतानें चालूं लागल्यामुळें थोड्याच काळांत धनपाळास चक्रवर्तेनी महाराणी साहेबांकडून "प्रिन्स आफ् दि मर्चंट" म्हणजे 'सावकारांचा राजा' हा किताब मिळाला. त्याचेसारखा श्रीमान सरदार अवघ्या पुणें शहरांत तर काय पण सारे मुंबई इलाख्यांत देखील मिळणें दुर्मीळ इतकी त्याची संपत्ति थोड्याशा काळांत वाढली.

सारांश हिराबाईचे संबंधाचा सर्व वृत्तांत लिहूं गेलें असतां एक मोठा महाभारत ग्रंथच होईल. पण स्थलसंकोचामुळें या ठिकाणीं तसें करतां येत नाहीं. लग्न होई पर्यंत हिराबाई ही गरीब स्थितींत होती पण आतां ईश्वराच्या दयेनें धन दौलतीस पारावार राहिला नाहीं. घरचा पूर्ण अधिकार, संपत्तीची व्यवस्था इत्यादि सर्व "मनःपूतंसमाचरेत्" म्हणजे मनास वाटेल त्याप्रमाणें करायास मिळालें. अशा स्थितींत या धूर्त स्त्रियेच्या हातून जे पराक्रम झाले ते चिरकाल रहावयाचे. ते सर्व पराक्रम या ठिकाणीं वर्णन करायास अवकाश व स्थल नाहीं, याकरितां आह्मीं फार दिलगीर आहों. पण गुणग्राहक जे आहेत त्यांस ही इतकीच उपदेशपर गोष्ट वाचल्यानें किंवा ऐकिल्यानें अवर्णनीय फायदा होईल यांत संशय नाहीं. यांत म्हणजे अमक्या एका विषयाचें विवेचन नाहीं किंवा अमक्या एका

रीतिभातीविषयीं शिक्षण नाहीं अशी गोष्टच नाहीं. दिसण्याला मात्र ही एक गोष्ट किंवा वृतांत आहे, पण त्याचें तात्पर्य लक्षांत आणिलें असतां हा एक उपदेशाचा व सुशिक्षेचा ठेवाच होय असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

हिराबाई आणि तिचीं बालकें.

ह्या पुस्तकाचा शेवट करण्यापूर्वी एका गोष्टीविषयीं लिहिणें फार अगत्याचें आहे. ती ही कीं आमची गोष्ट एथवर येई तोंपर्यंत हिराबाईचे संततीविषयींचा उल्लेख हा वेळपावेतों कोठेंच झाला नाहीं. ज्या गुणवती स्त्रीचें वर्णन आह्मी एथवर केलें तिणें आपल्या मुलांस कोणत्याप्रकारें वागविलें असेल व त्यांची काय स्थिति झाली असेल हें जाणण्यास आमचे वाचक फार उत्सुक असतील, व ते न सांगितलें तर गोष्ट अपूर्ण राहील. सबब त्याविषयीं थोडक्यांत येथें सांगतों.—

हिराबाईला लेंकरें पुष्कळ झालीं, पण त्यांतून शांतवन नांवाचा एकुलता एक मुलगा खेरीज करून बाकी सर्व निवर्तलीं. हा शांतवन पुष्कळ मुलांचे पाठीवर झालेला होता. त्याचे पूर्वी सर्वोतम ह्मणून एक मुलगा व माणकू नांवाची मुलगी अशीं दोन मुलें निवर्तलीं होतीं. हिराबाईनें आपल्या बालकांच्या आरोग्याविषयीं काळजी न बाळगल्यामुळें तीं मरण पावलीं असें कोणी ह्मणेल तर तसें अगदीं नाहीं. तिनें त्यांची कोणतेही प्रकारें हेळसांड किंवा अनास्था न करितां त्यांचें थंडी वाऱ्यापासून संरक्षण करून खाणेंपिणें व स्वछता यांचा बंदोबस्त उत्तम प्रकारें ठेविला होता. इत-

कैंच नव्हे, तर दांत निघण्याचे वेळेस मुलांस फार इजा होऊं नये झणून त्यांच्या हिरड्या ती अगोदरपासूनच शस्त्रानें चिरून ठेवी आणि मूल सहा महिन्यांचें झालें नाहीं तोंच त्यास देवी काढवीत असे. सारांश मनुष्याचे हातून जितकें झगून होण्यासारखें असे तितकें सर्व ती केल्याशिवाय रहात नसे. पण "कर्मणोगहनागतिः" कर्माची गति गहन आहे. त्यापुढें मनुष्याचे सर्व प्रयत्न निष्फळ होत. सर्वोत्तम चार वर्षांचा झालेवर त्याचे पोटांत डबा धरून मग हगवण लागली. जुलाब बंद होण्याचीं पुष्कळ औषधें दिलीं पण कांहीं गुण न पडून पुढें उलट्या सुरू झाल्या व शेवटीं सन्निपातवायु होऊन त्यांतच त्या गोजिरवाण्या बालकाचा अंत झाला. हें हृदयभेदक दुःख हिराबाईला अत्यंत दुःसह झालें. तें ती विसरली नाहीं तोंच सात वर्षांची मुलगी माणकू तीही आजारी पडली. तिला असा कांहीं खडतर ताप जडला कीं सर्व औषधोपचार व्यर्थ होऊन एका आठवड्याच्या आंतच ती मुलगीही गेली. माणकूचे मरणानें तर हिराबाईस परमावधीचें दुःख झालें. कां कीं माणकूचें आई (हिराबाई) वर इतकें प्रेम जडलें होतें कीं, ती तिची पळभर ही पाठ सोडीना. सैंपाक करायास चुलीजवळ बसली कीं तिनें तिचे भोंवती वावरावें, निजायास गेली तर तिजबरोबर निजायास जावें, ती उठली कीं हिनें उठावें, गाऊं लागली तर हिनें मागून सूर द्यावा. लिहिण्यावाचण्यावर तर तिचें फारच लक्ष असे. इतक्या लहान वयांत तिनें सर्व मूळाक्षरें व बाराखड्या शिकून इसापनीतींतील कांहीं गोष्टीही वाचल्या होत्या. जेव्हां सर्वोत्तम मृत्यु पावला तेव्हांपासूनच शेजार पाजारच्या बाया हिराबाईस सांगत असत कीं याचा कांहीं तरी

लकवर बंदोबस्त करा. कोणी म्हणत कीं गांवचे देवीला नारळ द्यावा, कोणी म्हणत कीं प्रवासांतून आलां अहां तेव्हां कांहीं तरी भूतबाधा झाली असेल म्हणून पंचाक्षऱ्याला बोलावून ताईत बांधावा, असें कोणी कांहीं, कोणीं कांहीं सांगत. परंतु धन्य त्या हिराबाईची कीं तिचीं रत्नासारखीं बालकें एका पाठीमागून एक गेलीं तरी तिणें सर्व हवाला जगन्नियंत्या प्रभूवरच ठेविला. कोणी कांहीं म्हटलें तरी सर्वांस तिचें असें एकच उत्तर असे कीं "ईश्वराची कृपा असेल तर तो मला यांतच शांति देईल."

माणकू निवर्तल्याची बातमी जेव्हां हिराबाईचे बडील विश्वासराव यांस कळली तेव्हां त्यांस पराकाष्ठेचें दुःख वाटलें आणि त्यांनीं त्या दुःखाच्या स्थितींत खालील मजकुराचें बोधप्रद व कोणाच्याही मनास विवेक उत्पन्न करणारें पत्र हिराबाईस लिहिलें:—

निपाणी, आश्विन शुद्ध १ शके ——.

चिरंजीवी सौ. हिराबाई हीस,

विश्वासराव हल्लीं वस्ती निपाणी यांचे अनेक आशीर्वाद विशेष.—पत्र लिहावयास कारण कीं हल्लीं पुण्याहून मला पत्र आलें त्यावरून चि. माणकू निवर्तल्याची बातमी समजून अत्यंत दुःख झालें. तुजकडून माणकूची अत्यावस्था असल्याबद्दल पत्र आलें होतें परंतु, त्यानंतर बरेच दिवस पत्र आलें नाहीं, त्यावरून मला वाटलेंच होतें कीं, कांहीं तरी विपरीत घडलें असावें. तिचे मरणामुळें मला जरी दुःख झालें आहे तरी अज्ञ मनुष्याप्रमाणें शोक करीत बसणें हें मला प्रशस्त वाटत नाहीं. मला मोठी चिंता वाटते ती ही कीं तुला या मृत्यूचा फारच मोठा धक्का बसून तूं शोकसागरांत अगदीं बुडून

गेली असशील. असें झालें असल्यास त्यांत कांहीं नवल आहे असें नाहीं. तथापि मनुष्यानें सारासार विचार केला पाहिजे. जगन्नियंत्या प्रभूनें आपणास बुद्धि दिली आहे ती इतक्याच करितां कीं आपणास दुःख होवो अथवा सुख होवो, दोन्ही स्थितींत आपण त्याच्या इच्छेप्रमाणें चालावें. या भवसागराविषयीं विचार करणें फार अगत्याचें आहे व ता विचार केला असतां त्यापासून ह्मणजे आपलें अहित होईल असा मुळींच अर्थ नाहीं. आकाश, जमीन, पर्वत, अरण्य, समुद्र, पशुपक्षी, मनुष्य इत्यादि अनेकप्रकारच्या स्थावरजंगम वस्तू या पृथ्वीच्या आधारावर आहेत. त्यांपैकीं मानव प्राण्याविषयीं विचार करितां तो जन्मास कसा येतो, कोणत्या रीतीनें लहानाचा मोठा होतो, बालपण, तरूणपण व ह्मातारपण या तीन अवस्थांत त्याचा कसा बदल होतो, त्यास हा घोर भवसागर तरून जाण्यास काय काय करावें लागतें इत्यादि सर्व विचार क्षुल्लक आहेत असें समजूं नको तर ते अति उत्तम व फार गहन आहेत व हें सृष्टीचें रहाटगाडगें जगन्नियंत्यानें कांहीं तरी इष्ट हेतूनें चालू ठेविलें आहे आणि जोंपर्यंत त्याची इच्छा असेल तोंपर्यंतच हें चालावयाचें.

" ही पृथ्वि निर्माण झाल्यास भवर्षी सात किंवा आठ हजार वर्षे झालीं असावींत असें अनुमान आहे आणि आतां हचें आयुष्य थोडें राहिलें असून तिचा लौकरच अंत होणार आणि तिजबराबर तिजवरील सर्व जीव जंतूंचाही नाश होणार. हें उघड आहे. तसेंच आलीकडील शोधावरून कळून येतें कीं एका तासांत सुमारें साडेतीन हजारांजवळजवळ मनुष्यें मृत्यू पावतात, ह्मणजे दर पळास सरासरी एक मनुष्य मरतो व याच प्रमाणानें मनुष्यें जन्मासही येत असतात. यावरून विचार कर कीं दर महिन्यास कोटयावधी मनुष्यें मृत्युमुखांत पडतात त्याच प्रमाणें जन्मही पावतात. तेव्हां पृथ्वि उत्पन्न झाल्यापासून आज सात आठ हजार वर्षांत असंख्यात मनुष्यें या पृथ्वीवर जन्मास येऊन नाहींशीं झालीं आहेत. यावरून हें सिद्ध होतें कीं मृत्यु हा प्रत्येक मनुष्यास केव्हांना केव्हां ह्मणून येणारच. मोठमोठाले बलाढय राजे,

मोठमोठाले वैद्य, पंचाक्षरी, ज्योतिषी आणिं मोठमोठाले साधु संत कीं ज्यांचे अंगीं मेलेल्यांस जिवंत करण्याची शक्ति असे असें म्हणतात तेही या मृत्यूचे दाढेंत सांपडल्या शिवाय राहिले नाहींत. तस्मात् या जगांत ज्याणें म्हणून जन्म घेतला त्यास एक दिवस मृत्यूच्या स्वाधीन झालेंच पाहिजे असा ईश्वरी संकेत दिसतो. तर मग ही पाळी कोण्या दिवशीं आपल्यावर किंवा आपल्यास जीं अति प्रिय अशांवर आली तर त्या विषयीं कोणतेही रीतीनें कुरकुर किंवा कल्होळ करण्याची जरूरी नाहीं. ही गोष्ट कांहीं लहान सहान नव्हे या विषयीं फार चांगला विचार केला पाहिजे आणि त्या प्रमाणें विचार केलास म्हणजे तुझे मनास समाधान वाटून—मरणाविषयीं शोक करणें हें निरर्थक होय असें तुलाही दिसून येईल.

"कोणाचेही मरणाविषयीं आपणास दुःख किंवा हळहळ वाटणें हें त्याच्याशीं आपला कांहीं तरी संबंध किंवा ओढा असल्या शिवाय होत नाहीं. उदाहरणार्थ रशियाचा बादशाहा मारला गेला किंवा मृत्यु पावला असें आपण ऐकिलें तर त्याजविषयीं आपणास यत्किंचित् तरी दुःख वाटेल काय? नाहीं. कां कीं त्याच्याशीं आपला कोणत्याच प्रकारें संबंध नाहीं. त्याच प्रमाणें आपल्या पेठेंतील एकादा परकी मनुष्य किंवा ज्याच्याशीं आपला संबंध नाहीं तो मेला तर त्याच्या विषयीं देखील आपल्या मनास कांहीं खेद वाटणार नाहीं ही गोष्ट खरी आहे. आतां आपल्यास दुःख कोणाविषयीं होईल कीं ज्याच्याशीं आपला कांहीं तरी संबंध आहे आणि हा संबंध जितका अधिक असेल त्या मानानें दुःखही अधिक होईल. यावरून हें सिद्ध होतें कीं सोयरे संबंधावर ही कांहीं नाहीं. तर दुःख होणें हें प्रीति संबंधावर अवलंबून आहे. आतां ही प्रीति व हा संबंध अधिक कोणाशीं असतो हें पाहिलें पाहिजे. तर या विषयीं कांहीं निश्चयात्मक सांगतां येणार नाहीं, कारण केव्हां केव्हां अगदीं जवळचें नातें असून त्या ठिकाणीं हर हमेश कज्जे कफावती होत असतात आणि कधीं कधीं अगदीं परकी लोकही आपल्या नातेवाइकापेक्षां आपणास फार प्रिय होतात. यावरून असें होतें

कीं प्रत्येक मनुष्य आपल्या हितासाठीं दुसऱ्या मनुष्याशीं संघटण ठेवीत असतो. जर आपले नातेवाईक आपल्या हिताच्या आड येऊं लागले तर आपल्यास खरोखर असें वाटेल कीं ते आपल्यापासून जितके लवकर दूर होतील तितके चांगले. आणि एखादा परकीय मनुष्य असून तो जर आपल्या उपयोगीं पडत आहे तर आपल्या हिताचे संबंधानें तो आपल्यास प्रिय होईल. तसेंच आपण कोणापाशीं संबंध ठेवितों तो पैशाचे किंवा द्रव्याचे हेतूनें ठेवितों असें सर्वदा केवळ नसतें. असे पुष्कळ लोक आपले मित्र आहेत कीं ज्यांचेकडून आपणास कधीं कांहीं मिळत नाहीं तरी देखील आपणास मोठी आशा ही असते कीं आपणावर कोणताही प्रसंग पडला असतां ते खरोखर आपल्या कामीं पडतील. मित्रत्व किंवा संबंध घडून येण्याचे अनेक योग आहेत. व ते पुष्कळ प्रकारें मला सिद्ध करून दाखवितां येतील व त्याविषयीं जितकें वर्णन करावें तितकें थोडेंच होईल पण ह्या पत्रांत केवळ मुलांबाळां विषयींच तुला चार शब्द सांगण्याचा माझा हेतू आहे. तेव्हां ईश्वर कृपेनें तसा कांहीं योग घडून आल्यास या विषयावर एक निराळा निबंधच लिहून तुला पाठवीन.

"लेंकरांविषयींचें जें प्रेम तें स्वभावतः असून जगप्रसिद्ध आहे. कोणीही मानव किंवा पशु पक्षी या प्रेमाविरहित राहिलेला नाहीं. यावरून हें सिद्ध होतें कीं हें प्रेम केवळ स्वार्था करितांच जडत नसतें तर सर्व पृथ्वि उत्पन्न करणारा जो ब्रह्मांडनायक भगवंत त्याची ही आज्ञा आहे कीं आई बापांस आपल्या लेंकरांविषयीं प्रेम असलेंच पाहिजे. लेंकरें जन्मल्या नंतर कित्येक वर्षें पर्यंत स्वतांचे पोषणा विषयीं असमर्थ व अज्ञाण असतात, तेव्हां त्या वेळीं त्यांचें पालण पोषण चांगले प्रकारें व्हावें या करितांच आईबापांस त्यांजाविषयींचें प्रेम लावून दिलें आहे. या प्रेमबंधनामुळेंच आपलीं लेंकरें आपला चरितार्थ चालविण्यास शक्तिमान होत पर्यंत त्यांचें संगोपन आईबाप करितात. यावरून हेंही सिद्ध होतें कीं या संगोपनाबद्दल लेंकरें आईबापांची सेवा चाकरी करण्यास बांधलीं जातात. तसेंच

